# मराठी नाट्य संमेलन अध्यक्षीय 'नाट्य सूर्यमाला'



मराठी प्रकाशन

मराठी नाट्य संमेलन अध्यक्षीय
नाट्य सूर्यमाला

❑

प्रकाशक :
**मराठी प्रकाशन**
ब-६९/७०,
नासिक इंडस्ट्रीयल इस्टेट लि.,
नाशिक-४२२ ००७.

❑

मुद्रक :
**तुषार अंधृटकर**
अक्षरचित्र,
ब-६९/७०, 'नाईस'
नाशिक-४२२ ००७.

❑

प्रथमावृत्ती -
२५ ऑगस्ट १९९७

❑

मुखपृष्ठ :
तुषार अंधृटकर / सुरेश लासूरे

❑

© १९९७ सौ. वत्सला अंधृटकर

❑

## स्वगत...

१९९७ च्या जानेवारी महिन्यात अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे ७७ वे अधिवेशन, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नासिक शाखेच्या विद्यमाने संपन्न झाले होते. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ख्यातनाम अभिनेते श्री. नाना पाटेकर होते

१९४० सालापासून मी नाट्य परिषदेचा कार्यकर्ता म्हणून कार्यरत होतो. परिषदेच्या कार्यवाहपासून कार्याध्यक्षपदापर्यंत मी वर्षानुवर्ष अधिकारपदे भूषविली. परिषदेच्या नासिक शाखेच्या अध्यक्षपदाची धुरा मी १९८८ पासून आजतागायत सांभाळीत आहे. परिषदेच्यावतीने भरलेल्या संमेलनाच्या ७७ व्या अधिवेशनाचे निमित्ताने एकादे कायम स्वरुपी कार्य आपण करून आपल्या पदाधिकाराचा निरोप घेणे योग्य होईल असे मला वाटले म्हणून एका महत्वाकांक्षी प्रकल्पाची योजना मी आखली.

१९०५ सालापासून १९९७ पर्यंत एकूण सत्त्याहत्तर संमेलनांची अधिवेशने भरविण्यात आली आहेत. या कालावधीत नाट्यसंमेलने निरनिराळ्या पुढील नावांनी कार्यरत होती. ही नांवे पुढीलप्रमाणे होती.
महाराष्ट्र नाटक मंडळ्यांचे संमेलन
भरत नाट्य समाज
भारत नाट्य समाज

१९२३ साली श्री. अनंत वामन बरवे दिवंगत झाल्यावर भारत नाट्य समाज नामशेष झाला, तरी संमेलने याच नावाने १९२९ पर्यंत भरत होती.

२९व्या नाट्यसंमेलनात एक समिती नियुक्त करून मध्यवर्ती संस्थेचा नामकरणाचा विचार होऊन १९३९ मध्ये नागपूर मुक्कामी भरलेल्या संमेलनाचे अधिवेशनात 'महाराष्ट्र नाट्य संमेलन' हे नाव मुक्रर होऊन १९५४ पर्यंतची संमेलने या नावानेच भरत होती.

या नंतर १९५४ साली 'महाराष्ट्र नाट्य संमेलन' या ऐवजी 'मराठी नाट्य संमेलन' हे नाव धारण करून मध्यवर्ती संस्थेने कारभार चालू ठेवला होता.

१९५६ साली बेळगाव येथील ३८ व्या नाट्य संमेलनात घटना समितीचे काम पूर्ण होऊन मध्यवर्ती संस्थेचे नाव 'मराठी नाट्य परिषद' असे ठरविण्यात आले. १९७७ साली पुण्यास भरलेल्या ५८ व्या मराठी नाट्य संमेलनात पुन्हा घटना दुरुस्त होऊन 'अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद' असे नाव मध्यवर्ती संस्थेने धारण केले व याच नावाने आता संमेलनं भरत असतात.

आतापर्यंत झालेल्या संमेलनांची पुढील गावातून अधिवेशने भरली आहेत.

१) पुणे-२१. २) मुंबई-१३. ३) नाशिक-५. ४) सांगली-४. ५) कोल्हापूर-४. ६) नागपूर-२. ७) अहमदनगर-२. ८) सातारा-२. ९) बडोदे-२. १०) दिल्ली-२. ११) अमरावती-१. १२) जळगाव-१. १३) बेळगाव-१. १४) सोलापूर-१. १५) हैदराबाद-१. १६) नांदेड-१. १७) म्हापसे-१. १८) पणजी -१. १९) ग्वाल्हेर-१. २०) कुर्ला-१. २१) कल्याण-१. २२) यवतमाळ-१. २३) सावंतवाडी-१. २४) अकोला-१. २५) पुसद-१. २६) इचलकरंजी-१. २७) इंदोर-१. २८) वाशी-१. २९) मालवण-१. ३०) बारामती-१. या शिवाय १९४३ साली मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सव सांगलीस झाला. हा महोत्सव विशेष होता. एकूण ३० गावातून ७७ संमेलने संपन्न झाली आहेत. ५ अध्यक्ष प्रत्येकी २ वेळा अध्यक्ष झाले तर एकूण ७२ अध्यक्ष या मानाचे मानकरी झाले आहेत. व शतक महोत्सवाचे विशेष ७३ वे अध्यक्ष या मानाचे मानकरी झाले आहे.

नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद नाटककार, कलाकार, कवी, विद्वान, समाज धुरीण, संगीताचार्य, चित्रमहर्षी अशा नाट्यसेवकांनी भूषविले होते.

या ७७ नाट्य संमेलनांचे, व (विशेष अधिवेशनाचे) अध्यक्षपद ७३ नाट्यप्रेमींनी जरी भूषविले असले तरी मराठी रंगभूमीचे जनक कै. विष्णुदास भावे, संगीत रंगभूमीचे प्रणेते कै. अण्णासाहेब किर्लोस्कर व संमेलनाची कल्पना प्रत्यक्षात आणणारे कै. अनंत वामन बरवे यांच्या व्यक्तीचित्रांची भर घालून एकूण ७६ व्यक्तीचित्रांचा संग्रह रसिकांना उपलब्ध करून देण्याचा संकल्प करून मी या योजनेस मूर्तस्वरुप देण्यासाठी प्रयत्न सुरु केले. या पंचाहत्तर व्यक्तिचित्रांचे रंगीत स्वरुपात दर्शन रसिकांना घडविणे आजच्या काळात आवश्यक असल्याने त्या दृष्टीने ही ७६ चित्रे ठराविक मुदतीत एकहाती काढू शकेल अशा चित्रकारासाठी शोध घेऊ लागलो.

१९८७ साली नाशिक महानगर पालिकेच्या 'कालिदास कलामंदिर'च्या उद्घाटन प्रसंगी प्रकाशित केलेल्या स्मरणिकेत कै. बालगंधर्व यांच्या शताब्दीनिमित्त एकूण १६ रंगीत चित्रे कार्यकारी संपादक म्हणून मी समाविष्ट केली होती. ही चित्रे नाशिकचे एक चित्रकार, श्री. दशरथ सोनार यांनी काढली होती. व रसिकांना ती चित्रे आवडली होती. या पूर्वानुभवाने मी श्री. दशरथ सोनार यांना माझी कल्पना विषद केली. श्री. दशरथ सोनार यांना ही कल्पना आवडली. त्यांनी या कामात सहकार्य करण्याचे मान्य करुन तावडतोब कामास प्रारंभ केला ९''- ११'' आकारात कै. बालगंधर्व व कै. न. चिं. केळकर यांची रंगीत व्यक्तीचित्रे नमुना म्हणून करुन दाखविली. या कामासाठी रंगभूमीच्या प्रेमाने त्यांनी आवश्यक तो खर्च फक्त स्वीकारून काम करण्याचे मान्य केल्यामुळेच या योजनेतील व्यक्तीचित्रांचे कामास प्रारंभ झाला.

जानेवारी १५ पर्यंत ५५ चित्रे तयार झाली मात्र २० चित्रांचे काम बाकी होते. त्यामुळे चित्रे पूर्ण झाल्यानंतरच चित्रसंग्रह प्रसिध्द करण्याचा निर्णय घेणे भाग पडले. यामुळे संमेलन प्रसंगी हा चित्रसंग्रह प्रसिध्द होऊ शकला नाही.

श्री. दशरथ सोनार यांच्या एकहाती रंगीत चित्रणामुळे ही ७६ व्यक्तीचित्रे रंगीत स्वरुपात रसिकांना उपलब्ध होत आहेत हा एक विक्रमच आहे. श्री. दशरथ सोनार या आमच्या तरुण मित्राचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय हा संग्रह प्रसिध्द करणे दुरापास्त झाले असते.

व्यक्तीचित्रांच्या मागील बाजूवर संबंधित व्यक्तींचा कर्तृत्वपट छापावा अशी योजना असल्यामुळे एकूण ७६ व्यक्तींचा कर्तृत्वपट शोधून अक्षरांकीत करणे आवश्यक होते. यासाठी श्री. मनोहर पुरंदरे - नाटक व सिनेमा स्तंभलेखक -यांचे सहाय्य मिळवू शकलो. अध्यक्षांचा सुयोग्य परिचय देण्यासाठी गेल्या शंभर वर्षातील काळाचा आढावा घेणे क्रमप्राप्त होते. अनेक संदर्भ ग्रंथ व वृत्तपत्रातील कात्रणे धुंडाळून हा मजकूर तयार करणे आवश्यक होते. श्री. मनोहर पुरंदरे यांनी हे कष्ट आत्मियतेने स्वीकारून व्यक्ती चित्रांची मागील बाजू लेखांकित केल्यामुळे व्यक्तीदर्शन घडविणे शक्य झाले. त्यांनी केलेल्या परिश्रमाबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

तसेच या संग्रहातील पहिल्या काही नाट्य संमेलनातील उत्तम छायाचित्रांचे तसेच नाट्य देवता म्हणून प्रारंभी पूजीलेल्या अर्धनारीनटेश्वराचे चित्र मिळविण्यासाठी त्यांनी केलेल्या परिश्रमांमुळे या संग्रहाचे मोल संदर्भग्रंथ म्हणून निश्चितच वाढले आहे.

या संग्रहातील परीशिष्टे ही रसिकांना अध्यक्षांची नाट्यसंपदा तसेच लिखित पुस्तके व लेख व कलावंत अध्यक्षांनी केलेल्या भूमिकांची माहिती, दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक व तसेच चित्रपट क्षेत्रातील कामगिरी, निर्माते म्हणून कार्य करणाऱ्या अध्यक्षांची ओळख उपयुक्त ठरेल अशी आशा आहे. संबंधित व्यक्तींच्या स्वाक्षरी संग्रहामुळे वैशिष्ट्यपूर्णता लाभली आहे. नाट्य संमेलनाची क्रमवार व सालवार व प्रायोजक संस्थांच्या नावनिशीवार यादी दिल्यामुळे एकत्रित यादी अभ्यासकांना उपयुक्त होईल असा विश्वास वाटतो. या कामी सार्वजनिक वाचनालय नाशिक यांचा मोठा उपयोग मला झाला या बद्दल मी वाचनालयाचा आभारी आहे, तसेच मुंबई मराठी साहित्य संघ व मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय व अ. भा. मराठी नाट्य परिषद यांचा मी आभारी आहे.

या संग्रहातील व्यक्तीचित्राच्या चाररंगी पारदर्शिका (निगेटिव्ह व पॉझिटिव्ह) करण्याचे काम मौज डिजिटलच्या श्रीकांत भागवत यांनी वक्तशीरपणे केले यासाठी त्यांची पाठ थोपटावी असे मला वाटते.

मराठी नाट्य संमेलनांच्या अध्यक्षांची ही सूर्यमाला मूर्त स्वरुपात आणणे शक्य झाले ते प्रायोजक व देणगीदार यांच्या रंगभूमीवरील व व्यक्तीगत माझ्यावरील प्रेमामुळेच. या सर्वांचा मी ऋणी आहे. त्यांचे प्रेम मला सदैव लाभो हीच मनीषा.

ही सूर्यमाला माझे गुरू व मराठी रंगभूमीचे धन्वंतरी डॉ. अमृत नारायण भालेराव यांना समर्पित करावी असा विचार माझ्या मनात उद्भवला. कारण १९४३ साली मराठी रंगभूमीच्या पुनर्स्थापनेची योजना साकार करण्याचे कामी डॉ. भालेरावांचा सिंहाचा वाटा होता. या कामी सहकार्य करण्याचे भाग्य मला लाभले होते. मराठी नाट्य परिषदेच्या मुंबई कार्यालयाला साहित्य संघाच्या वास्तूत प्रतिष्ठित करून, परिषद कार्याचा सांभाळ करण्याचे काम डॉ. भालेराव यांच्या प्रेरणेमुळेच मी अंगावर घेतले होते. मराठी रंगभूमीची आज जी घोडदौड दिसते आहे तिचे मूळ डॉक्टर भालेरावांच्या प्रयत्नातूनच साकारले आहे. 'भाऊबंदकी'ला १९५४ साली राष्ट्रीय नाट्यमहोत्सवात पहिले पारितोषिक खेचून आणण्याचे कामी डॉक्टरांची जिद्द आणि सहकाऱ्यांचे सहकार्य यांच्या संयोगामुळेच सिध्द होऊन नाट्य क्षेत्रात मराठी नाट्याचा ध्वज अटकेपार नेण्याचे काम डॉक्टरांचेच. म्हणूनच ही नाट्य सूर्यमाला डॉक्टरांच्या स्मृतीस अर्पण करण्याचा हा योग महत्वपूर्ण ठरावा.

गेल्या ९५ वर्षातील कालखंडाचा नाट्य संमेलनांच्या अध्यक्षांचा परिचय करून देण्यासाठी माझ्या अनेक मित्रांनी मला सहकार्याचा हात दिल्यामुळेच मी हे कार्य करू शकलो. त्यातील काहींचा उल्लेख करणे आवश्यक आहे. श्री. मनोहर पुरंदरे व नाशिकचे सार्वजनिक वाचनालय, अ. भा. मराठी नाट्य परिषदेतील दप्तराचा हक्काने उपयोग करू देणारे पदाधिकारी , मुंबई मराठी साहित्य संघाचे डॉ. रा. अ. भालेराव, डॉ. बाबा कलगुटकर, श्री. दाजी भाटवडेकर व इतर पदाधिकारी, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मध्यवर्ती कार्यालय व शाखांमधील पुस्तकांचा उपयोग करू देण्यासाठी संग्रहालयाचे तत्पर कर्मचारी, भरत नाट्यमंदिर व त्यांचे पदाधिकारी, यांनी अध्यक्षांच्या ३०/४० स्वाक्ष्ऱ्या उपलब्ध करून दिल्याबद्दल, तसेच श्री. शि. मो. थैसास, श्री. गो. रा. परांजपे, श्री. अप्पा भानप, श्री. शशिकांत कुलकर्णी, श्री. पारायणे यांनी माहिती जमा करण्यासाठी जे परिश्रम केले त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. काही अपूर्ण माहिती मिळविण्यासाठी वृत्तपत्रातून केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन माहिती पुरविणारे १०-१५ अपरिचित सहाय्यक यांचाही मी आभारी आहे. नटराज प्रतिमेसाठी श्री. राम धत्ते, सौ. वत्सला अंधृटकर यांनी मुद्रित तपासनीसाचे किचकट काम स्वीकारुन मला साहाय्य केल्याबद्दल मी आभारी आहे.

हा प्रकल्प सुमारे चार लक्ष रुपयांचा. खर्चासाठी मी माझ्या मित्रांना प्रत्येकी रु. ३,०००/- देऊन व्यक्ती चित्रांचे प्रायोजकत्व स्वीकारण्यास प्रवृत्त केले. यासाठी श्री. देवकिसन सारडा, डॉ. श्रीरंग आडारकर, श्री. अच्युत फडके, श्री. यशवंत पंडित, डॉ. रा. अ. भालेराव, श्री. मधु झेंडे, श्री. मधुसूदन करमरकर, तसेच सुरेश लासुरे, श्री. अंधारे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहे. साहित्य संघाने आठ अध्यक्षांचे प्रायोजकत्व स्वीकारून या कामाचा शुभारंभ केला. 'नाईस' नाशिक संस्थेने पाच जणांचे प्रायोजकत्व स्वीकारून सहकार्य केले. सर्व प्रायोजक यांचा मी आभारी आहे. त्यांची स्वतंत्र यादी इतरत्र दिली आहे. याशिवाय अनेकांनी या प्रकल्पास देणग्या देऊन सहकार्य दिले आहे त्यांचीही यादी दिली आहे. सहकार खात्याने नाशिक जिल्ह्यातील बँकांना सहकार्य करण्याबद्दल जे आवाहन केले त्या बद्दल मी संबंधितांचा आभारी आहे.

माझे नाट्य क्षेत्रातील जेष्ठ सहकारी श्री. वि. वा. शिरवाडकर ज्यांच्या 'दूरचे दिवे' या पहिल्या नाटकाच्या लेखनापासून मला सहयोग करण्याचे भाग्य मिळाले, अशा थोर मित्राने मला या प्रकल्पासाठी आशीर्वाद लिहून पाठवला व रु. १,५००/- देणगी देऊन मला प्रोत्साहन दिले या बद्दल मी स्वत:ला धन्य समजतो.

या प्रकल्पास सहकार्य करणाऱ्या सर्व मित्रांच्या सहकार्यामुळेच मी योजिलेला प्रकल्प पुरा करू शकलो याची मला जाणीव आहे. १९४० सालापासून नाट्यक्षेत्राशी माझे नाव जोडले गेले व ज्यामुळे हजारो मराठी रंगभूमीच्या कर्तबगार सुपुत्रांशी, जेष्ठ आणि श्रेष्ठ सहकाऱ्यांशी, सहयोगाचे भाग्य लाभले, त्यासर्व नाट्य सेवकांना व मराठी रंगभूमीवर प्रेम करणाऱ्या सर्व रसिकांना, मी कृतज्ञ भावनेने प्रणिपात करून हे निवेदन संपन्न करतो.

**नारळी पौर्णिमा**
**दिनांक १८ ऑगस्ट १९९७**

रा. म. अंधृटकर



मराठी रंगभूमीचे धन्वंतरी डॉ. अमृत नारायण भालेराव
माझे गुरू यांना
मराठी नाट्य संमेलन अध्यक्षीय नाट्य सूर्यमाला
श्रध्दापूर्वक समर्पित.

# मराठी रंगभूमीचे धन्वंतरी डॉ. अमृत नारायण भालेराव

## १२ डिसेंबर १९०२ - २५ ऑगस्ट १९५५

मराठी रंगभूमीचे धन्वंतरी म्हणून ज्यांना सार्थ अभिवादनाने संबोधिता येईल असे डॉ. अमृत नारायण भालेराव यांचा जन्म मुंबई मुक्कामी दि. १२ डिसेंबर १९०२ ला झाला.

डॉ. भालेराव हे एका सुखवस्तू व खानदानी कुटुंबात जन्माला आले . गर्भश्रीमंतीचे सुख त्यांनी आपल्या आयुष्याच्या अगदी सुरुवातीला भरपूर अनुभविले. पण मनाची ओढ ऐषारामात लोळण्याकडे नसून समाजकार्य करण्याकडे होती. याचे स्पष्ट पुरावे त्यांच्या पूर्वायुष्यात दिसून आल्याशिवाय राहत नाहीत. त्याचा मोठा पुरावा म्हणजे १९२० साली लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मृतीसाठी, त्यांच्या विचारधारा दिग्दर्शन होण्यासाठी केवळ १८व्या वर्षी त्यांनी 'अरविंद' मासिक सुरू केले. याच सुमारास म. गांधींनी असहकाराची चळवळ सुरू केली. तरुणांनी शाळा कॉलेजांवर बहिष्कार पुकारला श्री. भालेरावांनी सेंट झेवियरला रामराम ठोकून सार्वजनिक जीवनाला सुरुवात केली.

१९२५ साली वैद्यकीय शिक्षणासाठी नॅशनल मेडिकल कॉलेजमधे त्यांनी प्रवेश घेतला व तेथून एल.सी.पी.एस. ही पदवी सन्मानाने डॉ. भालेरावांनी मिळवली. १९२६ सालात हिंदू जिमखान्याचे सदस्यत्व स्वीकारुन क्रिकेटसाठी प्रारंभ करुन बॉम्बे क्रिकेटर्स ची स्थापना केली. याच क्लबात प्रख्यात खेळाडू कै. विजय मर्चंट हे सहभागी होते. १९३४ सालापासून साहित्य विषयक चळवळींना डॉ. अ. ना. भालेराव यांनी प्रारंभ केला. मुंबईस १९३४ मध्ये भरलेल्या मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाचे कार्यवाह म्हणून डॉक्टरांची निवड झाली. जुलै १९३४ मध्ये मुंबई मराठी साहित्य संघाची स्थापना झाली व डॉक्टरांची कार्यवाह म्हणून योजना करण्यात आली. १९५५ साली अकाली मृत्यू होईपर्यंत ते साहित्य संघाचे कार्यवाह म्हणून कार्यरत होते. एकवीस वर्षाच्या या कार्यकालात मराठी

साहित्य आणि मराठी रंगभूमीसाठी डॉक्टरांनी ज्या विविध प्रकारच्या चळवळी केल्या त्यांची नोंद केली तर या कालखंडात साहित्य व नाट्य यांचे तारणहार ही किताबत त्यांनी प्राप्त करुन घेतली. १९३८ साली मराठी साहित्य संमेलनाचे मुंबईत अधिवेशन स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या मुक्ततेनंतर त्यांच्या अध्यक्षतेखाली भव्य प्रमाणात साजरे केले. १९४१ साली मराठी नाट्य संमेलनाचे अधिवेशन आचार्य प्र. के. अत्रे यांच्या अध्यक्षतेत भरले होते. संमेलनात १९४३ साली मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरीक उत्सवाचे आयोजन सुरू करुन एक महत्वाची योजना त्यांनी कार्यान्वित केली. हा शताब्दी महोत्सव सांगलीला रंगभूमीच्या जन्मग्रामी जरी साजरा झाला तरी त्याचे नियोजन मात्र साहित्य संघ व डॉ. भालेराव यांच्याच स्वाधीन होते.

१९४३ साली त्या काळातील सर्व प्रतिष्ठित नट डॉ. भालेराव यांनी एकत्र जमवून त्यांच्या सहकार्याने कै. गो. ब. देवल यांच्या 'शारदा' नाटकाचा प्रयोग सिध्दीस नेला. या प्रयोगात सर्वश्री बालगंधर्व, गणपतराव बोडस, केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, लोंढे, चिंतुबुवा गुरव या सर्व कलाकारांचा सहभाग होता. या प्रयोगामुळे त्या काळच्या सर्व प्रमुख नटांनी मराठी रंगभूमीचे वैभव रसिक प्रेक्षकांना दाखवून दिले यात शंका नाही. यामुळे मराठी रंगभूमीचे अग्रेसरत्व सिध्द झाले होते.

या शताब्दीनंतर मुंबईस सर्वांच्या सामुदायिक सहकार्याने मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने समुद्राकाठी ८/१० हजार प्रेक्षक बसू शकतील असा भव्य उघडा रंगमंच उभारुन रंगभूमीच्या शतसावत्सरिक उत्सवाचे आयोजन केले. यात जुन्यानव्या नाटकांचा प्रयोग सादर करून पंधरा दिवसांचा उत्सव साजरा केला. व या उत्सवातून साहित्य संघाचे नाट्यगृह उभारण्याचे स्वप्न साकार करण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला. या महोत्सवाचे अध्यक्ष होते कै. बालगंधर्व व स्वागताध्यक्ष होते आचार्य प्र. के. अत्रे. ८/१० हजार प्रेक्षक एकत्रितपणे मराठी रंगभूमीचा आस्वाद घेत शताब्दीचा सोहळा पाहण्याचे भाग्य ज्या रसिकांना लाभले ते धन्य पावले यात शंका नाही. त्यानंतर सर्व महाराष्ट्रभर नाट्योत्सवांचा सोहळा वर्षभर चालू राहिला व त्यामुळेच रंगभूमीला चालना मिळून रंगभूमीच्या पुनरुत्थानाचे स्वप्न सर्व रसिकांनी पाहिले आणि मराठी रंगभूमी कात टाकून झकास तेजाने तळपू लागली. नवे नाटककार, नवे कलाकार , नवे दिग्दर्शक या साऱ्यांनी रंगभूमीचा पडता काळ सावरुन नव्या दिशेने मार्ग- क्रमणास प्रारंभ केला आणि मग महाराष्ट्र शासनानेही नाट्य स्पर्धा भरवून नव्या कलाकारांना उत्साहित केले. या सर्व चळवळींचा केंद्रबिंदू होते डॉ. भालेराव आणि मुंबई मराठी साहित्य संघ.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्यात साहित्य आणि नाट्य यांच्या कार्याबाबत तफावत केली जाते. असे काहींचे म्हणणे आहे. आणि नाट्याकडे झुकते माप दिले जाते, असे म्हणणाऱ्यांच्यासाठी श्री. के. नारायण काळे यांनी पुढील विचार व्यक्त केले आहेत, ते बघणे योग्य होईल.

''डॉक्टरांचे रंगभूमीवर खास प्रेम होते किंवा ते नाटकांचे भलतेच नादी होते, असा प्रकार मुळीच नाही. ते तसे असते तर त्या काळात नाटक मंडळ्यांच्या बिऱ्हाडी, विशेषत: संगीत नाटक मंडळीच्या बिऱ्हाडी ठाण मांडून बसणाऱ्या प्रौढ, शौकीन, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कळपात तेही मिरवताना दिसले असते. कित्येक थोर साहित्यिकांशी व नाटककारांशी त्यांचा घरोब्याचा स्नेहसंबंध होता, यामुळे नाट्य व्यवसायातील अनेक मंडळींशीही त्यांची जानपहचान असे, पण स्वत:ला नाटकी म्हणवून घेण्याइतकी नटाबद्दल किंवा नाटकांच्या धंद्याबद्दल त्यांना आपुलकी होती, असे त्यांच्या विद्यार्थीदशेत किंवा नंतरही, त्यांच्या पोषाखात, वर्तनात किंवा उद्योगात कधीच दिसून आले नाही. थोडे फार आर्थिक स्वातंत्र्य आल्याबरोबर त्यांनी पहिले धाडस केले ते नाटक मंडळी स्थापन करण्याचे नव्हे तर , साहित्याच्या प्रचाराला आणि चर्चेला वाहिलेले एक उच्च दर्जाचे मासिक पुस्तक काढण्याचे. असहकाराच्या आंदोलनात त्यांनी कॉलेज सोडले आणि पहिले संघटनात्मक कार्य हाती घेतले ते 'अरविंद' मासिकाचे संचालन. साहित्य आणि नाट्य ही डॉ. भालेरावांच्या कार्यातील दोन अंगे विशेष ठळकपणाने यशस्वी होऊन दृष्टीपुढे आल्यामुळे त्यातील वैशिष्ट्य एकच, त्यांच्या जिव्हाळ्याचे, त्यांना खास महत्वाचे वाटणारे होते. असे हितसंबंधानुसार आग्रहाने प्रतिपादन करण्याचा अट्टाहास काही मंडळी करताना दिसतात. पण वस्तुस्थिती अशी आहे की, डॉक्टरांची धारणा अगर निष्ठा एकांगी, खुरटी, संकुचित नव्हती, त्यांचे व्यक्तीमत्व एकरंगी किंवा दुरंगी नव्हते. इंद्रधनुष्यातील सारे रंग आणि छटा त्यात समाविष्ट झाल्या होत्या. कुणाशीही समरस व्हावे, आणि कशातही रंगून जावे हे त्यांना त्यांच्या अष्टपैलू व्यक्तीमत्वामुळेच साध्य होऊ शके.''

यानंतर साहित्य संघाने दरवर्षी नाट्योत्सव भरवून नाट्यविषयक चळवळ चालू ठेवली होती व साहित्य संघ मंदिरासाठी निधि जमा करण्याचे काम चालू ठेवले होते. १९५१ साली साहित्य संघाने संघ मंदिरासाठी केळेवाडीतील जागा घेण्याचे ठरवून भूमिपूजन समारंभ संपन्न केला.

नवीन नटांना नाट्यशिक्षण देण्यासाठी नाट्यशिक्षण वर्ग सुरु करण्याचे ठरवून त्यासाठी सर्वश्री के. नारायण काळे, श्री. पार्श्वनाथ आळतेकर श्री. केशवराव दाते तसेच काही प्राध्यापक व तज्ज्ञ यांच्या सहाय्याने या वर्गासाठी अभ्यासक्रम आखून नाट्य शिक्षणाचे वर्ग सुरु केले. नाट्याची एक अकादमी सुरु करण्याचाही प्रयत्न डॉक्टरांनी आरंभिला होता.

१९५४ साली भारत सरकारने १४ भाषांचा राष्ट्रीय नाट्य महोत्सव आयोजित केला होता त्यात मराठी नाटकांचे 'भाऊबंदकी' व 'शारदा' असे दोन प्रयोग चाचणीत होते. त्यात साहित्य संघाचे 'भाऊबंदकी' अंतीम फेरीसाठी निवडले गेले होते. पारंपारिक नाटकात 'भाऊबंदकी'स पहिले राष्ट्रीय पारितोषिक प्राप्त झाले व मराठीचा ध्वज भारतभर मानाने फडकता ठेवण्याचे भाग्य साहित्य संघास प्राप्त झाले.

श्री. बापूराव नाईक, हे त्यांचे सहकारी, यांच्या म्हणण्यानुसार ''सार्वजनिक क्षेत्रामध्ये जर काम करावयाचे असेल तर त्या क्षेत्रामध्ये जी प्रतिष्ठित आणि अधिकारी मंडळी आहेत, त्यांना योग्य तो मान दिला पाहिजे. आणि त्यांचे मन दुखावेल अशा गोष्टी करण्याचे टाळले पाहिजे. यासाठी एखाद्या प्रसंगी मानहानी सोसावी लागली तरी ती सोसण्याची तयारी आपण ठेविली पाहिजे.''याच भावनेने डॉक्टरांनी साहित्य संघाच्या कामात अनेक सहकारी जोडले व टिकवले, साहित्य आणि नाट्यप्रांतामध्ये ज्यांनी मानाचे स्थान मिळविले आहे त्या सर्वांचा डॉक्टरांनी याच भूमिकेवरुन संग्रह केला आहे. त्यांनी सहकारी जोडले तेही तसेच. श्री. आमोणकर व प्रा. वा. दा. गोखले पहिल्यापासून होतेच. श्री. वामनराव ढवळे, प्रा. वा. ल. कुलकर्णी, श्री. चंद्रकांत बावडेकर, के. नारायण काळे, नटवर्य केशवराव दाते असे कितीक. ज्यांचे कर्तृत्व संघाबाहेरील कार्यात सिध्द झाले होते त्यांना संघकार्यात ओढून आणले, संघकार्य समृध्द केले.

डॉक्टरांची लोकसंग्राहक वृत्ती, योग्य जागी योग्य माणसांचा वापर करण्याचे चातुर्य, खऱ्या कार्यकर्त्या अनुयांयावर पूर्ण जबाबदारी आणि विश्वास टाकून त्याला निर्णयस्वातंत्र देण्याचे औदार्य , जबाबदारीने कार्य करीत असताना एखाद्याकडून प्रामाणिकपणे चुकण्याची गफलत झाली तर तिचे उत्तरदायित्व स्वत:च्या शिरावर घेण्याची तयारी इत्यादी नेतृत्वाचे गुण डॉक्टरांच्या ठिकाणी भरपूर असल्यामुळेच ते आपल्या आयुष्याच्या वीस वर्षांच्या कालावधीत मराठी रंगभूमी आणि मराठी साहित्य यांचा भार स्वत:च्या शिरावर पेलू शकले हेच त्यांचे अलौकिक सामर्थ्य. डॉक्टरांची प्रेरक शक्ती मोठी खरीच पण त्यांनी आपल्या बरोबर आपली पत्नी, आपली मुले, आपले सहकारी यांना सामील करुन घेतले आणि या सर्वांनीच डॉक्टरांचे वेड आपले मानले हेच त्यांच्या सामर्थ्याचे एक अलौकिक यश.

या बारा वर्षात मराठी रंगभूमीसाठी डॉ. भालेरावांनी अथक परिश्रम केले, नवे नाटककार नवीन कलावंत यांच्या सहाय्याने मराठी रंगभूमीचे वैभव वाढविण्यासाठी व मराठी रंगभूमीची ऊर्जितावस्था व थिएटर करण्यासाठी प्रयत्न केले. तब्बेतीकडे दुर्लक्ष होऊन १९५४ साली दिल्लीहून परत येताच डॉक्टर भालेराव आजारी पडले. हा आजार डॉक्टरांना मृत्यू समीप घेऊन गेला व शेवटी २५ ऑगस्ट १९५५ रोजी डॉक्टर भालेराव यांनी ५३ वर्षांच्या कालावधीत अखेर गाठली आणि मराठी रंगभूमीच्या रसिकांना दु:ख सागरात लोटून नटराज चरणी विलीन झाले.

* * *

# अखिल भारतीय
# मराठी नाट्य परिषद,
# वाटचाल ''दृष्टीक्षेप''

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आता एक्याण्णव वर्षांची झाली.
पहिलं नाट्यसंमेलन मुंबईच्या बॉम्बे थिएटरमध्ये, दिनांक २८ ऑगस्ट १९०५ रोजी,
रसिकवर्य श्री. गणेश श्रीकृष्ण तथा दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरलं.
नाटक मंडळ्यांचे संमेलन भरवावं. नाट्यव्यवसायिकांची वैचारिक देवाणघेवाण व्हावी,
नाटकमंडळ्यांच्या समस्या दूर व्हाव्यात, रंगभूमी व्यवसायाला स्थैर्य व प्रतिष्ठा लाभावी.
नवी दिशा मिळावी, हा सांस्कृतिक प्रवाह सामाजिक उन्नतीसाठी,
राष्ट्रीय जागृतीसाठी चैतन्यदायी ठरावा, मनोरंजनासाठी प्रभावी ठरावा,
अशी कल्पना नाट्यप्रेमी श्री. अनंत वामन बरवे यांच्या मनांत होती.
त्यांच्या प्रयत्नानं पहिलं नाट्यसंमेलन भरलं ''महाराष्ट्र नाटक मंडळ्यांचं संमेलन''
या नावानं एक मध्यवर्ती संस्था जन्माला आली. हीच आता नव्यानं असलेली संस्था
''अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद''.
प्रारंभी 'महाराष्ट्र नाटक मंडळ्यांचं संमेलन', तदनंतर 'भरत नाट्य समाज', 'भारत नाट्य समाज',
'भारत नाट्यसंमेलन', 'महाराष्ट्र नाट्यसंमेलन', 'मराठी नाट्यसंमेलन',
'मराठी नाट्यपरिषद' एवढी नावे बदलत आता ''अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद''
या नावानं ही मध्यवर्ती संस्था स्थिरावली आहे.
नांवे बदलली तरी नाट्यसंमेलने भरतच होती. आतापर्यंत शहात्तर नाट्यसंमेलने झाली.
या वर्षी नाशिक येथे सत्याहत्तरावं नाट्यसंमेलन भरलं होतं.
पहिलं नाट्यसंमेलन राजापूरकर नाटक मंडळीनं भरवलं.
तदनंतर अठ्ठावीस नाट्य संमेलनं बव्हंशी नाटक मंडळ्यांनी भरविली.
नंतर गावोगावची नाट्यमंडळं,
नाट्यविषयक कार्य करणाऱ्या संस्था, संमेलनं भरविण्यासाठी पुढाकार घेऊ लागल्या.
अलीकडे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शाखा,

नाट्यसंमेलनं भरविण्याची जबाबदारी पार पाडीत आहेत.
आतापर्यंत पुणे शहरानं एकवीस नाट्यसंमेलनं भरविली.
मुंबईत बारा नाट्यसंमेलनं झाली. बडोदा, सांगली, कोल्हापूर,
नागपूर वगैरे शहरात एकापेक्षा अधिक नाट्यसंमेलनं झाली आहेत.
ग्वाल्हेर, इंदूर,बेळगांव, म्हापसं येथे एक एक नाट्य संमेलन होऊन, नाट्यप्रेम व्यक्त झालं आहे.
भारताची राजधानी दिल्ली येथे दोन नाट्यसंमेलनं साजरी झाली.
आता या नाट्यसंमेलनांचं स्वरूप अखिल भारतीय पातळीवर स्पष्ट आणि सर्वमान्य झालं आहे.
नामवंत नाटककार, गायक कलावंत, गद्यश्रेष्ठ कलावंत, विनोदी अभिनेते, कुशल निर्माते, जाणकार
संगीत दिग्दर्शक, गीतकार, रसिक विद्वान इत्यादी निवड नाट्यसंमेलनांच्या अध्यक्षपदी झाली आहे.
गिरजाबाई केळकर, दुर्गाबाई खोटे, ज्योत्स्ना भोळे, विजया मेहता
या चार स्त्रियांनी नाट्य संमेलनाचं अध्यक्षपद भूषविलं आहे.
नाशिक येथे यापूर्वी चार नाट्यसंमेलनं झाली.
दुसरं, चौथं, एकतिसावं आणि एकसष्टावं या नाट्यसंमेलनांना
अनुक्रमे न. चिं. केळकर, न. वि. तथा कोंडोपंत छत्रे, गणपतराव बोडस, आत्माराम भेंडे हे
अध्यक्ष लाभले. परिषदेच्या सत्याहत्तराव्या आणि नाशिकच्या पाचव्या नाट्यसंमेलनाच्या
अध्यक्षपदाचा बहुमान ख्यातनाम चित्रपट-नाट्य अभिनेते श्री. नाना पाटेकर यांना लाभला आहे.
नाट्यसंमेलनं भरविणं, नाट्यविषयक परिसंवाद, चर्चा, निबंधस्पर्धा, ग्रंथ प्रकाशन,
नाट्यविषयक प्रदर्शनं, नाट्यप्रयोग,
नाट्यसंगीत, भाषणं, अभिरुप न्यायसभा,
करमणुकीचे कार्यक्रम, सत्कार, शोकप्रस्ताव, अभिनंदनं पार पडत होती.
हेतू मात्र रंगभूमीचा उत्कर्ष प्रगती व त्यासाठी प्रयत्न असा मूलभूत होता.
या नाट्यसंमेलनांच्या आयोजनांतून करमणूक कर माफ करणं, नाटककारांचे हक्क,
नाट्यशिक्षणाचे महत्व, बंदिस्त नाट्यगृह बांधणे, नाट्येतिहास लेखन,
रंगभूमी शतसांवत्सरिक उत्सव वगैरे अनेक विषयांना चालना मिळून, कांही कार्य होऊ लागले.
बेळगाव येथील नाट्यसंमेलनापासून ''मराठी नाट्य परिषद''
या मध्यवर्ती संस्थेच्या कार्याला अधिक चालना मिळाली. कार्यालय पुणे येथे होते.
तदनंतर ते मुंबईत. अनेक वर्ष मुंबई मराठी साहित्य संघाच्या जागेत होते.
कार्य वृध्दिंगत होण्यास जागेची अडचण ही समस्या आड येत होती. त्यामुळे नाट्य परिषदेला
जागा मिळवावी, असा जोरदार प्रयत्न सुरू होता. कार्यचालना मात्र दमदार सुरू होती.
बालगंधर्व आणि केशवराव दाते यांचा अमृतमहोत्सव, नाट्यशिबिरे, व्याख्यानमाला, वादन,
गायन यांच्या विशेष स्पर्धा आणि प्रशिक्षण, संगीत रंगभूमी शताब्दि, नाट्यसंमेलन,
नाट्यभूमी नियतकालिकाचे प्रकाशन, कलावंत मेळावा, निबंधस्पर्धा, रंगभूमीदिन
अशा अनेक उपक्रमांमुळं नाट्य परिषद नावारूपास आली.
प्रारंभी झरा, नंतर ओहोळ आणि आता कार्याच्या अनेक ओहोळांतून निर्माण झालेली दुथडी
वाहणारी कार्यसरिता. मुंबईसारख्या मध्यवर्ती ठिकाणी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचं
''यशवंतराव चव्हाण नाट्य संकुल'' पूर्ण होण्याच्या अवस्थेत आहे.

हे सुसज्ज, दिमाखदार नाट्यसंकुल पूर्ण होताच, संकुलांतील नाट्यगृहात नाट्यप्रयोग,
धुमधडाक्यानं सुरु होतील. सभागृहात भाषणं, चर्चा, परिसंवाद घडून येतील. नाट्य प्रशिक्षण
वर्गांची सत्रं आकार घेतील. ध्वनिलेखन सुविधा, नाटकांच्या तालमी घेण्याची जागा,
रंगभूमीविषयक अनेक सोयी असलेलं हे संकुल नाटकाचं तसेच रंगभूमीविषयक उलाढालींचं एक
महत्वपूर्ण केंद्र ठरेल. हौशी, प्रायोगिक व्यावसायिक यांचा त्रिवेणीसंगम येथे दृष्टीस पडेल.
नाट्यसंकुल लौकर पूर्ण व्हावं, यासाठी नाट्यपरिषदेच्या कार्यकारी मंडळाचे लक्ष केंद्रीत झालं आहे.
मराठी नाट्यव्यावसायिक निर्माता संघ, हौशी रंगमंच संघटना, रंगमंच कामगार संघटना,
मराठी नाट्य कलाकार संघ, मराठी नाटककार संघ असे रंगभूमीचे घटक,
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नेतृत्वानं या वास्तूत कार्यरत राहाणार आहेत.
गेलं अर्ध अधिक तप नाट्यसंकुलाचे व्रत जोपासून, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेनं
आपलं इतर कार्य नाट्य परिषदेच्या स्थापनेच्या मूळ उद्देशाला धरून नेटानं सुरु ठेवलं आहे.
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या जवळ जवळ पस्तीस शाखा, स्थापन झाल्या आहेत.
या शाखा आपल्या ताकदीनुसार रंगभूमीविषयक कार्य करीत आहेत.
परिषदेच्या मध्यवर्ती कार्यालयातर्फे प्रतिवर्षी नाट्यसंमेलन भरविणं, व्याख्यानमालांचं आयोजन,
नाट्यप्रशिक्षण वर्ग, एकांकिका स्पर्धा, रंगभूमीदिन, कलावंत मेळावा,
जवळ जवळ साठ पारितोषिकांचं वार्षिक वितरण, गरजू रंगकर्मीना आर्थिक मदत,
आजारी रंगकर्मींना आवश्यकतेनुसार आरोग्य सुविधा,
असे अनेक उपक्रम सातत्यानं चालू आहेत.
भारत, पाकिस्तान आणि भारत चीन युध्दाचे वेळी,
नाट्य परिषदेनं रंगकर्मीचे सहकार्याने कार्यक्रम करून मोठा निधी जवान कल्याणनिधीस दिला होता.
कोकणातील चक्रीवादळ, देशावरील दुष्काळ या संकटसमयी परिषदेच्या झेंड्याखाली
नाट्यव्यावसायिक कलावंतांनी प्रेक्षकात फिरून, झोळ्या पसरून निधी जमा केला.
आणि संकटग्रस्तांना सहाय्य करण्यांच कर्तव्य आदर्शरूप करुन दाखवलं.
नाट्यशताब्दी समारंभाला परिषदेनं दिलेल्या चालनेमुळे मराठी रंगभूमीला नवी उभारी मिळाली.
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कार्याची अशी ही वाटचाल कधी टीकेचे काटे तुडवत
जाणारी, कधी कोर्ट-कचेऱ्यांच्या दगडात अडखळणारी, कधी प्रोत्साहनानं रुबाबदार होणारी
तर कधी विवंचनांच्या आडवळणात सापडणारी,
तरीसुध्दा ध्येयाच्या दिशेनं निश्चित पावलं टाकणारी, रंगभूमीच्या प्रगती, प्रकाशाचा शोध घेणारी.
ही वाटचाल अनेकांनी घडविली. पूर्वसुरींची स्मृती मनात जागवून,
आताचं कार्यकारी मंडळ ही वाटचाल अधिक प्रगत करण्यासाठी कटीबध्द आहे.
नाशिकचं हे नाट्यसंमेलन परिषदेच्या कार्याला नवा जोम, नवी दिशा देईल अशी आशा करू या.

**जयसिंग चव्हाण**
**प्रमुख कार्यवाह**
**अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद**



कै.श्री.शं.ना.अंधृटकर
मराठी नाट्य संमेलन अध्यक्षीय नाट्य सूर्यमाला ह्या संदर्भ ग्रंथाचे निर्माते

त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन
मराठी प्रकाशन • मुंबई मराठी साहित्य संघ

# संपादकीय...

**(दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने)**

प्रथम रंगभूमीची देवता अर्धनारीनटेश्वर अशा त्या भगवान शंकराला मनोभावे वंदन. कै.श्री.शं.ना. अंधृटकर यांनी अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाध्यक्षांची अध्यक्षीय नाट्यसूर्यमाला या प्रथम खंडाची उत्तम सुरूवात करून दिली.

अ.भा.मराठी नाट्यसंमेलनांच्या १९९८ ते २०१२ या कालावधीतील एकूण १५ नाट्यसंमेलनाध्यक्षांचा त्रोटक परिचय या खंडात दिला आहे. (एकत्रित माहितीचा थोडा परिचयवजा गोषवारा म्हणता येईल, असा) प्रत्येकाच्या कार्यकर्तृत्वाचा सर्वांगीण आढावा घेणे विविध कारणांमुळे व पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे शक्य नव्हते.

या एकूण १५ नाट्यसंमेलनांत (कै.) श्रीमती भक्ती बर्वे-इनामदार, श्रीमती जयमाला शिलेदार आणि श्रीमती लालन सारंग या तीन चतुरस्त्र अभिनेत्रींना अध्यक्षपदाचा मान मिळालेला आहे. डॉ. लक्ष्मण देशपांडे हे मूळ विदर्भातील ज्यांना त्यांच्या कार्य कर्तृत्वामुळे हे पद लाभलेले आहे. बृहन्मुंबईतील सर्वश्री डॉ.रा.अ. तथा बाळ भालेराव, रमेश देव, शं.ना.नवरे, सुरेश खरे, (कै.) मोहन तोंडवळकर हे अध्यक्षपदाचे मानकरी झाले. बाकी मंडळी कोकणातील व मुंबईत स्थायिक झालेली. श्री. रामदास कामत, मूळ गोव्याचे तर श्री. श्रीकान्त मोघे पुणेस्थित. श्री. रामदास कामत या गायक-अभिनेत्याला हा मान दोनवेळा लाभला.

या पंधरा संमेलनांपैकी दोन कणकवली (जि. सिंधुदुर्ग) येथे, तर रत्नागिरी आणि रोहा (जि. रायगड) अशी उत्तर कोकणात दोन, ठाणे जिल्ह्यातील वसई व डोंबिवली अशी दोन संमेलने झाली. परभणी, बीड, नगर, नांदेड या विदर्भ-मराठवाड्यातील चार तर पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड येथे एक आणि कराड, सांगली व सोलापूर या ठिकाणी मिळून तीन अशी पश्चिम महाराष्ट्रात १४ नाट्यसंमेलने झाली. न्यू जर्सी (अमेरिका) येथे सन २०१० चे ९१ वे संमेलन झाले. या एकूण १५ नाट्यसंमेलनांचा त्रोटक इतिहास (माहितीवजा) या खंडात दिला आहे.

या सर्व नाट्यसंमेलनाध्यक्षांची माहिती व छायाचित्रे मिळवणे थोडे जिकीरीचे झाले. प्रयत्न करूनही उपलब्ध न झालेली माहिती संगणकावरील महाजालातून घ्यावी लागली.

तीही फार उपयुक्त ठरली नाही. काही छायाचित्रेही महाजालातून घेतली आहेत.

या १५ नाट्यसंमेलनाध्यक्षांपैकी काहींची परिचयात्मक माहिती अ.भा.मराठी नाट्यपरिषद, मुंबई - १९, येथून तर नाट्यसंमेलनांच्या उपलब्ध स्मरणिकांमधून मिळाली आहे. परिषदेचे आभार मानतो.

याकामी मुंबई मराठी साहित्य संघाचे डॉ. रा.अ. तथा बाळ भालेराव यांचे नेहमीप्रमाणेच सर्वतोपरी साहाय्य झाले आहे व मार्गदर्शनही मिळाले आहे. संघ-कार्याध्यक्ष श्री. यशवंत पंडीत यांनीही आश्वासक पाठिंबा दिला आहे. माहिती मिळवून त्याचे संकलन करणे व खंडासाठी मुद्रणप्रत तयार करणे या कामी संघाच्या नियामक मंडळ सदस्य श्रीमती शकुन्तला मुळ्ये यांचे मोलाचे साहाय्य मिळाले. नियामक मंडळ सदस्य श्री. सतीशचंद्र म्हात्रे, श्री. उपेन्द्र दाते व श्री. सुनील मेहेंदळे यांनी काही छायाचित्रे महाजालातून मिळवून देण्यास साहाय्य केले. या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

कै.श्री.शं.ना. अंधृटकर यांनी अशा प्रकारच्या संकलित माहितीचा ''मराठी नाट्यसंमेलनः अध्यक्षीय नाट्यसूर्यमाला'' हा संदर्भग्रंथ यापूर्वी अत्यंत देखण्या स्वरूपात प्रसिद्ध केला आहे. हा खंड (१) म्हणजे रंगभूमीचेच एक महान कार्य आहे. त्याचे मोल अनमोल आहे. याप्रसंगी त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करीत आहोत, त्यांच्या या कार्यकर्तृत्त्वाची प्रेरणा आम्हांला सदैव मिळत राहिलच. त्यांच्याच निष्ठावान व धडाडीच्या कार्यकर्त्यांची पुढची पिढी म्हणजेच कै. अंधृटकर यांचे सुपुत्र, 'अक्षरचित्र' चे संचालक श्री. तुषार अंधृटकर यांनीही आपल्या थोर पित्याचा वारसा पुढे चालवला आहे. हा ग्रंथ अत्यंत सुबक छपाई करून आपणा रसिकांपुढे ठेवण्याचे श्रेय सर्वस्वी त्यांचे आहे. त्यांच्याबद्दलचे ऋणही येथे व्यक्त करणे उचित ठरेल.

प्रथम खंडा इतका उत्तम असा हा खंड नाही यांची खंत वाटते. या खंडातील काही त्रुटींची नम्र जाणीवही आहे. कै. अंधृटकरांसारखे कार्यकर्ते दुर्मिळ होत चालले आहेत त्यामुळे इच्छा असूनही काही बाबी आम्हाला करता येणे अशक्य झाले आहे.

ज्या ज्या मंडळीचे, संस्थांचे या कामी साहाय्य झाले त्या त्या सर्वांचे पुन्हा आभार मानतो. संघाच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल व कार्यालयीन कर्मचारी यांचेही आभार.

ज्ञात-अज्ञात अशा सर्व हितचिंतकांचे पुनश्च आभार मानून हे हृदगत् पूर्ण करतो. रसिकांना हा खंड उपयुक्त वाटेल अशी आशा व्यक्त करून थांबतो.

**सुभाष भागवत**
कार्यवाह, नाट्यशाखा
मुंबई मराठी साहित्य संघ

# मराठी नाट्य संमेलन अध्यक्षीय नाट्य सूर्यमाला

मराठी रंगभूमीचे दैवत अर्धनारीनटेश्वर



# मराठी रंगभूमीचे दैवत अर्धनारीनटेश्वर

श्रीगजाननाला वंदन करून नाट्यकलेची अधिष्ठात्री देवता श्रीअर्धनारीनटेश्वराची मनोभावे प्रार्थना करू या.

वागर्थाविद संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगत: पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥

शब्द व अर्थ यांचे सम्यक ज्ञान व्हावे यासाठी एकमेकांशी निगडित असलेल्या वाणी व अर्थ याप्रमाणे एकमेकात मिसळून गेलेल्या जगताचे मायबाप अशा पार्वती- परमेश्वराला वंदन असो.

अर्धनारीनटेश्वर हे श्रीशिवाचे एक रूप आहे. नाट्यकला, नृत्यविलास यांची अधिष्ठात्री देवता अर्धनारीनटेश्वर पूर्वापार मानली गेली आहे. श्रीशिवाने नाट्यकला आणि नृत्यकला प्रवर्तित केली अशी धारणा आहे. घटना आणि विषय यांची अभिव्यक्ती करण्यासाठी शिवाने जे चालन केले त्याला नटन वा नाट्य अशी संज्ञा पारंपरिक चालत आलेली आहे. शिव हा आद्य नट आणि त्यानेच नटीचेही रूप घेतले म्हणून शिव हा अर्धनारीनटेश्वर. त्यालाच नटराज हेही बिरुद आहे.

ब्रम्हांड ही नटराजाची नृत्यशाळा. नर्तनात अभिनयाचे अंग अविभाज्य असल्याने आणि पुढे त्याचीच परिणती नाट्यात झाल्याने नाट्यकला नटराजाच्या रूपात प्रतीकात्मक मानली गेली. नाट्य, नृत्य आणि साहित्य या कला नटराजाने अनुप्रणित झाल्या आहेत. भारतीय कलेचाच नव्हे तर विश्वकलेचा हा अमर, अमोल ठेवा आहे.

१९०५ मध्ये भरलेल्या मुंबई येथे श्री. खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या पहिल्या नाट्यसंमेलनाच्या प्रारंभी या अर्धनारीनटेश्वराचे पूजन करून नंतरच संमेलनाला सुरुवात झाली. ही परंपरा पुढेही कित्येक वर्षे चालू होती अलीकडच्या काळात अर्धनारी नटेश्वराच्या ऐवजी नटराज पूजन केले जाते. भगवान शंकराच्या या दोन्ही स्वरूपातील रुपांना अर्धनारी नटेश्वर व नटराज यांना साष्टांग प्रणिपात.

वि. वा. शिरवाडकर
नाशिक : १

२३/७ – ९७

प्रिय [illegible]

मोठे काम आपण हाती घेतले आहे.
त्यास आपल्याला शुभेच्छा [illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

आपला
वि. वा. शिरवाडकर

सोबत:
धनादेश
रु. १५०० चा.

23/7 – 1997

Pay मराठी प्रकाशन, [illegible] या धारक को or Bearer

रुपये Rupees पंधराशे फक्त अदा करें Rs. 1500/=

खाता सं. A/c No. 5707

बैंक ऑफ इंडिया · BANK OF INDIA
शिवाजी उद्यान शाखा 422 001 (महाराष्ट्र)
Shivaji Udyan Branch 422 001 (Maharashtra)

वि. वा. शिरवाडकर

कोड सं. CODE No. 022 0819

SHV/SB № 0120320

# मराठी नाट्य संमेलन अध्यक्षीय 'नाट्य सूर्यमाला'

*या रंगभूमीवरील संदर्भ संग्रहासाठी सहकार्य करणारे देणगीदार. आम्ही त्यांचे आभारी आहोत.*

| | | |
|---|---|---|
| १) | किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि., पुणे<br>किर्लोस्कर ब्रदर्स लि., पुणे<br>किर्लोस्कर न्यूमॅटिक्स, हडपसर, पुणे | रु. ६०,०००/- |
| २) | लायन पॅकेजिंग प्रा. लि., वेरावळ | रु. ३,०००/- |
| ३) | श्री. रमेश सोनपाल, वेरावळ | रु. ३,०००/- |
| ४) | निलकंठ सेल्स एजन्सी, वेरावळ | रु. ३,०००/- |
| ५) | ऋतुराज अर्थमुव्हर, पोरबंदर | रु. ३,०००/- |
| ६) | श्री. मोरेश्वर हरि लिमये, मुंबई | रु. २,०००/- |
| ७) | श्री. वि. वा. शिरवाडकर, नाशिक | रु. १,५००/- |
| ८) | नासिक जिल्हा महिला वि. सह. बँक लि., नाशिक. | रु. १,१००/- |
| ९) | श्री. रामकृष्ण नाईक, मुंबई | रु. १,०००/- |
| १०) | श्री. अतुल पेठे, पुणे | रु. १०००-/ |



मराठी रंगभूमीचे जनक : श्री. विष्णुपंत भावे

प्रायोजक : **अक्षरचित्र**, ब-६९/७०, नाईस, सातपूर, नाशिक-४२२ ००७.

# मराठी नाटकाचे आद्य पुरुष
# श्री. विष्णुदास अमृत भावे

## १८१९/२० - ९-८-१९०१

श्री. विष्णुदास भावे यांना मराठी नाटकाचे जनक म्हणून सन्मानपूर्वक पूजिले जाते. सांगली संस्थानचे अधिपती चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांच्यासमोर १८४३ मध्ये आपल्या 'सीता स्वयंवर' नाटकाचा प्रयोग त्यांनी करून दाखविला. तो दिवस दि. ५ नोव्हेंबर. हा मराठी रंगभूमी दिन सर्व नाट्यकर्मींनी मानला आहे. त्या दिवशी मराठी रंगभूमी श्री. विष्णुदास भावे यांना आदरांजली अर्पण करते.

श्री. विष्णुदासांचे नाटक रंगमंचावर आलेले सर्वांगांनी परिपूर्ण पहिले नाटक होते. त्याला कथानक होते. त्यातील पात्रे त्या काळातील रिवाजाप्रमाणे रंगभूषा-वेषभूषा करून अभिनय करत. या नाटकात संवाद होते, संगीत होते. प्रासंगिक नृत्यही होते. कथा तत्कालीन समाजाला रुचेल अशी आणि कीर्तनकार-हरदासांनी रूढ केलेल्या पौराणिक आख्यानांवर आधारित असे. पुराणातील पात्रे देव गंधर्व सजीव होऊन समोर दिसताच प्रेक्षक भारावून जात असत. गणेश-शारदा नमनाने सुरू झालेल्या या नाटकाचे प्रयोग रंगत असत.

कीर्तन हे नाट्यदर्शनाचा मूळ पायाच मानला जातो. रंगमंचावर हरदास (कीर्तनकार) प्रथम यायचा आणि नाटकाचे सूत्र सांगून नाटकाला सुरुवात करून देत असे आणि मधल्या कालांतरांच्या-प्रसंगांच्या जागा आपल्या निवेदनाने भरून काढून नाटक पुढे नेत असे.

श्री. विष्णुदासांचे नाटक कर्नाटकी नाट्यसंहितेवर आधारलेले होते तरी, ते त्या नाटकासारखे नृत्यप्रधान नव्हते. विष्णुदासांनी नृत्याला नाममात्र ठेवून संवादअभिनयाला प्राधान्य असलेले नाटक रंगभूमीवर आणले. त्याची कथा अधिक रंजक होण्यासाठी ते अनेक प्रसंग-प्रवेशी केले. नाटकाची रंजकता वाढवण्यासाठी विदूषकाचा- विनोदी पात्राचा- प्रथमपासूनच उपयोग करून प्रेक्षकांची नाटकावरची पकड कायम ठेवण्याचा, नाटक कंटाळवाणे होऊ न देण्याचा पायंडा त्यांनी प्रथम पाडला तो आजतागायत रूढ आहे.

मराठी नाटकाचे प्रारंभीचे प्रयोग संस्थानिक-जहागीरदारांच्या, श्रीमंतांच्या रंजनासाठी झाले असले तरी ते लोकरंजनाकडे वळले आणि जनमानसाने हा प्रयोग आपलाच मानला. श्री. भावे यांनी अशा प्रकारची दहा आख्यानक नाटके तयार करून त्यांचे प्रयोग केले. हे नाटक हुबळीपासून झाशीपर्यंत सर्वत्र लोकप्रिय ठरले. मनमुक्त गाणे, महत्वाच्या घटना आणि विदूषकी विनोदाची विपुलता यांमुळे मराठी नाटकाने जे मूळ धरले त्याचा आज विशाल वटवृक्ष झाला आहे. त्यांच्या विपुल पारंब्या आज रसिक रंजन करत आहेत.

श्री. विष्णुदास भावे हे कापडाच्या आणि लाकडी बाहुल्या अप्रतिम तयार करीत. कळसुत्री बाहुल्याचे खेळ ते राजवाड्यात आणि यात्रेच्या वेळी मंदिरात जनतेसाठी ते करत असत. राजाश्रय गेल्यानंतर त्यांनी ठिकठिकाणी आपल्या नाटक कंपनी समवेत जाऊन खेळ करीत असत. राजाश्रयाच्या कालात कंपनीस झालेले कर्ज वारण्यात ते यशस्वी झाले.




संगीत रंगभूमीचे प्रणेते : श्री. अण्णासाहेब किर्लोस्कर

प्रायोजक : मराठी रंगभूमीचा एक हितचिंतक

# मराठी संगीत नाटकाचे प्रवर्तक
# श्री. बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर

## ३१-३-१८४३ - २-११-१८८५

गुणवत्तेने लक्षवेधी असलेले पहिले मराठी संगीत नाटक 'शाकुंतल' दि. ३१ ऑक्टोबर १८८० रोजी पुण्याच्या आनंदोद्भव नाट्यगृहात झाले. त्या आधी मराठी नाटके रंगमंचावर आली होती. या नाटकांचा बहुसंख्य भाग पद्यमय असे आणि ही पद्ये हरदासी पठडीचा सूत्रधार रंगमंचावर उभे राहून म्हणत असे. अधूनमधून पात्रे कथासूत्राला अनुसरून मनात येतील, तसे संवाद बोलत असत. नाटक लिखित नसल्याने असे संवाद आणि त्याच्या अनुषंगाने हातवारेवजा अभिनय पात्रे करत. त्यात सुसूत्र संगत नसे. श्री. बळवंत पांडुरंग किर्लोस्कर यांनी कालिदासरचित 'शाकुंतला'च्या आधारे 'शाकुंतल' लिहिले. कथानकानुरुप कथारंगत वाढविणारे संवाद आणि प्रवेशवार, अंकानुसार ते रंगमंचावर आणले.

स्वत: श्री. अण्णासाहेबांनी 'पंचतुंड नररूंड मालाधर पार्वतीश आधी नमितो' या नांदीने नाटकाला सुरूवात केली. नांदीचे सूर घुमले नि प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. रंगभूमीवर नवयुग सुरू झाले. पूर्वीच्या 'अललडुर्रर' आणि ताकडधोम नाटकांना कंटाळलेल्या प्रेक्षकांना सुविहित संगीत नाटकाची गोडी किर्लोस्कर यांनी लावली. घरगुती, सुबोध शृंगाराला शालिनतेचा साज 'शाकुंतल'ला किर्लोस्करांनी चढविला, रंगभूमीलाही चढवला. 'पहिली महत्वपूर्ण क्रांती' या शब्दात श्री. विष्णुशास्त्री चिपूळणकरांनी 'शाकुंतल'चे कौतुक केले. 'शाकुंतल'ने जनसामान्यात अपार लोकप्रियता मिळविली.

'शाकुंतल'मध्ये भूमिका करण्यासाठी संगीत जाणणारे नट श्री. किर्लोस्कर यांनी जमविले होते. यात श्री. मोरोबा वाघुलीकर प्रमुख होते. शाकुंतला'पाठोपाठ अण्णासाहेबांनी 'संगीत सौभद्र' दि. १८ नोव्हेंबर १८८२ रोजी पुण्याच्या पूर्णानंद नाट्यगृहात सादर केले. 'सौभद्र' हे श्री. अण्णासाहेबांच्या प्रतिभेवर फुललेले बहारदार कमलपुष्प होय. त्यांची 'अल्लाउद्दीनाची चितोडवर स्वारी' आणि 'शांकर दिग्विजय' ही स्वतंत्र नाटके तितकीशी लोकप्रिय झाली नव्हती. 'संगीत सौभद्र'ने संगीत नाटकाची एक वेगळीच परंपरा सुरु केली. आजतागायत 'सौभद्र'ची रसिकरंगत रतीभरही कमी झाली नाही. 'सौभद्र'च्या पहिल्या प्रयोगानंतर प्रा. ना. सी. फडके म्हणाले होते: 'वाङमयदृष्ट्या विलक्षण अशा प्रथम श्रेणीच्या रंगतदार लज्जतदार या नाटकाचा पहिला प्रयोग झाला तेव्हाच या नाटकाचे अमरत्व निश्चित झाले. या नाटकावर अखेरचा पडदा कधीच पडणार नाही'. त्यांचे हे भविष्य खरे ठरले. किर्लोस्करांचे 'रामराज्यवियोग' रंगभूमीवर आले. काही काळ त्याने प्रेक्षकांची पकड घेतली पण ते 'सौभद्र'च्या आसपास पोहोचू शकले नाही.

दि. ३१ मार्च १८४३ रोजी बेळगाव जिल्ह्यातील गुर्लहोसूर येथे जन्मलेल्या श्री. ब. पां. किर्लोस्करांचे शिक्षण पुण्यात त्या वेळच्या पाचव्या इयत्तेपर्यंत झाले. त्यांचे संस्कृतवर चांगले प्रभुत्व होते. संस्कृत नाटक, काव्याचा त्यांनी अभ्यास केला होता. काही नाटक संस्थांच्या नाटकांची पद्यरचनाही त्यांनी केली. या संस्थांमुळे त्यांची अभिनयाशीही जवळीक झाली. पुणेकर नाटक मंडळीच्या नाटकातून त्यांनी काही भूमिकाही केल्या होत्या. १८६८ मध्ये बेळगावात शिक्षकाची नोकरी करत असतानाच काही नाट्यप्रेमींना एकत्र करून त्यांनी 'भरत शास्त्रोत्तेजक नाटक मंडळी'ची स्थापना केली. सांगलीकर नाटक मंडळीच्या 'पारिजात' नाटकाच्या तालमीही त्यांनी घेतल्या (१८७६). पुण्याला नोकरीनिमित्त १८८० मध्ये आले असताना त्यांनी पारसी नाटक मंडळीचे 'इंद्रसभा' पाहिले. त्या नाटकापासून प्रेरणा घेऊन त्यांनी नाटके लिहिण्यास सुरूवात केली.

ऐन तारुण्यात, वयाच्या बेचाळीसाव्या वर्षी, दि. २ नोव्हेंबर १८८५ ला त्यांचे निधन झाले. त्यांची रंगभूमीवर गाजवलेल्या कारकिर्दीची वयोमर्यादा कमी असली तरी 'शाकुंतल', 'रामराज्यवियोग' यांच्यापेक्षाही 'सौभद्र'ने त्यांनी रंगभूमीवर अमरत्व प्राप्त केले आहे.




मराठी नाट्य संमेलनाचे प्रणेते : श्री. अनंत वामन बरवे

प्रायोजक : श्री. प्रभाकरपंत (अण्णा जोशी) जोशी, यांचे स्मरणार्थ श्री. गो. रा. परांजपे, श्री. अच्युत ग. फडके, श्री. म. य. जोशी, मुंबई.

# नाट्यसंमेलनाचे प्रणेते
# श्री. अनंत वामन बरवे
## २८-८-१८५६ - २६-१०-१९२३

१८४३ पासून कै. विष्णुदास भावे प्रणित मराठी नाटकांना प्रारंभ झाल्यानंतर महाराष्ट्रात अनेक नाटक कंपन्या सुरू झाल्या व नाट्यव्यवसाय वाढू लागला. या व्यवसायातील व्यावसायिकांना सुशिक्षित करावे, त्यांच्यातील दोष दूर करून त्यांना सर्वांगीण शिक्षण द्यावे, असे श्री. अनंत वामन बरवे यांना तीव्रतेने जाणवू लागले व यासाठी सन १९०० पासून श्री. बरवे यांनी नाशिकच्या 'लोकसेवा' या वृत्तपत्रातून निवेदने प्रसिध्द केली.

या चळवळीचा परिणाम होऊन राजापूरकर नाटक मंडळीचे मालक श्री. बाबाजीराव राणे यांना नाट्य संमेलन भरवून पहावे, असे वाटू लागले. श्री. राणे यांच्या सहाय्याने दि. २८ ऑगस्ट १९०५ या दिवशी श्री. बरवे यांच्या ४९व्या वाढदिवशी 'मराठी नाटक मंडळींचे संमेलन' या नावाने मराठी नाट्य संमेलनाचे पहिले अधिवेशन राजापूरकर नाटक मंडळीने यजमानपद स्वीकारून मुंबईत भरवले. या संमेलनाचे अध्यक्षस्थान अमरावतीचे सुप्रसिध्द वकील व लोकमान्य टिळकांचे अनुयायी, राजकारणी व समाज हितैषी रसिक श्री. गणेश श्रीकृष्ण उपाख्य दादासाहेब खापर्डे यांनी स्वीकारले होते.

श्री. अ. वा. बरवे यांनी नाट्यकलेच्या उन्नतीसाठी वेगवेगळ्या मार्गांनी प्रयत्न केले. नाट्यविषयक 'नाट्यकला' हे नियतकालिक, 'भरत नाट्य समाज' ही संस्था आणि 'विविध नाट्यविषयक संग्रह' आदी उपक्रम त्यांनी सुरू केले.

नाट्याची सोपपत्तिक, सांगोपांग चर्चा व्हावी आणि नाट्यव्यवसायाला शास्त्रशुध्द, भरदार स्वरूप प्राप्त व्हावे यासाठी 'नाट्यकला' मासिकाची सुरूवात श्री. बरवे यांनी केली होती. मासिक स्वरुपात 'नाट्यकला' दोन वर्ष चालले. १९०७ च्या मार्चपासून त्याला पाक्षिकाचे स्वरुप देण्यात आले. पण दीड-दोन वर्षांच्या अवधीत ते बंद पडले.

श्री. बरवे यांच्या प्रयत्नांमधून सुरू झालेल्या नाट्य संमेलनांद्वारा भरीव असे काही कार्य घडेल, अशी अपेक्षा होती. या संमेलनातून झालेली महत्वाची भाषणे आणि चर्चा यांचे संकलन श्री. बरवे यांनी 'नाट्य विषयाची सुशिक्षित चर्चा' या पुस्तकात केली. नाट्य शिक्षण विषयक एक योजना आखून शिक्षण देण्यासाठी त्यांनी 'नाट्य शाळा' स्थापन केली होती. त्यासाठी 'सुलभ व्यायाम', 'स्वरसाधन', 'वक्तृत्वाची साधने', 'नेपथ्य', 'रंगसूचना अथवा सामान्य नाट्यशिक्षा' ही प्राथमिक स्वरुपाची क्रमिक पुस्तके मेहनत घेऊन त्यांनी तयार केली होती. त्यातील पहिली दोन प्रसिध्द झाली.

श्री. बरवे यांचा जन्म मनमाड येथे झाला. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यावर त्यांनी काही दिवस शिक्षकाची नोकरी केली. नंतर आर्यभूषण मुद्रणालयात मुद्रित तपासनीस म्हणून लागल्यावर त्यांचा श्री. टिळक, श्री. आगरकर, श्री. चिपळूणकर यांच्याशी निकटचा संबंध आला. त्यामुळे त्यांच्या आयुष्याला वेगळेच वळण लागले. ते लेखन आणि सार्वजनिक कार्य करू लागले.

पौराणिक, ऐतिहासिक आणि भाषांतरित अशी सुमारे वीस नाटके श्री. बरवे यांनी लिहिली. ती नाटकांच्या दुसऱ्या श्रेणीतील ठरतील, इतक्या योग्यतेची होती.

श्री. अनंत वामन बरवे यांनी आपले आयुष्य नाट्य संस्था, नाटके, नट यांच्यासाठी वेचले. त्यांचा हा खटाटोप मोठा होता. हे एकट्यादुकट्याचे कामही नव्हते तरीही नाट्यकलेच्या उन्नतीसाठी त्यांनी एक दिशा दाखवून दिली, हे महत्वाचे आहे. श्री. अनंत वामन बरवे यांनी २८ ऑगष्ट या तारखेला म्हणजेच आपल्या जन्मतिथीला 'मराठी नाटक मंडळीचे संमेलन' हे फक्त मराठी भाषिकच सालोसाल भरवितात आणि संमेलनाच्या प्रणेत्याला आदरांजली अर्पण करतात.



१ ले मराठी नाट्य संमेलन, मुंबई, १९०५. अध्यक्ष : **श्री. ग. श्री. खापर्डे**

प्रायोजक : **श्री. राम शेवाळकर**, नागपूर.

# श्री. गणेश श्रीकृष्ण तथा दादासाहेब खापर्डे

## २७-८-१८५४ - १-७-१९३८

पहिले मराठी नाट्य संमेलन
राजापूरकर नाटक मंडळीच्या विद्यमाने
बॉम्बे थिएटर, मुंबई.
स्वागताध्यक्ष : श्री. बाबाजीराव राणे
दिनांक : २८ ऑगस्ट १९०५.

श्री. अनंत वामन बरवे यांनी स्थापन केलेल्या भरत नाट्य समाज या संस्थेच्यावतीने पहिले 'नाटक मंडळांचे संमेलन' दि. २८ ऑगस्ट १९०५ रोजी मुंबईत भरवले गेले होते. या काळात महाराष्ट्रामध्ये नाटके नुकतीच सुरू होऊन स्थिर होण्याच्या प्रयत्नात होती. साऱ्या महाराष्ट्रामधल्या इकडे-तिकडे विखुरलेल्या नाट्य संस्था, क्लबवजा (आज ज्यांना कलापथके संबोधले जाते त्या) संस्था आपापल्या मगदुराप्रमाणे कलाविष्कारात गुंतलेल्या होत्या. या सर्व संस्थांना, कलाकारांना, कलाप्रेमी मंडळींना एकत्र आणून एकाच व्यासपीठावर विचारविनिमय करावा ही कल्पना भरत नाट्य समाजाचे श्री. अ. वा. बरवे यांनी प्रत्यक्षात आणली आणि हे संमेलन भरले.

या संमेलनाचे अध्यक्ष श्री. ग. कृ. खापर्डे यांचा नाट्य व्यवसायाशी प्रत्यक्ष काहीच संबंध नव्हता. श्री. खापर्डे हे अमरावतीचे खानदानी श्रीमंत घराणे. मंडळी सुशिक्षित आणि राजकारण-समाजकारणात रस असलेली क्रियाशील होती. श्री. दादासाहेब खापर्डे रसिक होते.

अमरावती येथे 'जयध्वज', 'कांचनगडची मोहना', 'त्राटिका' आदी नाटकांच्या तालमींना श्री. खापर्डे यांनी मार्गदर्शन केले होते. पुण्याला असताना त्यांचा नाट्यकला प्रवर्तक आणि शाहू नगरवासी आदी नाट्य संस्थांशी जवळचा संबंध जुळला होता, तो एक रसिक प्रेक्षक म्हणूनच. श्री. नारायणराव राजहंस-बालगंधर्व यांचा अमरावतीचा मुक्काम श्रीमंत खापर्डे यांच्याकडेच असावयाचा. राजकारण आणि तत्कालिन ब्रिटीश शासनात त्यांना मानाचे, महत्वाचे स्थान होते.

या संमेलनात निबंध वाचन श्री. आप्पाजी विष्णु कुलकर्णी व श्री. नीलकंठ सखाराम कुलकर्णी यांनी केले. अध्यक्षीय भाषण व विविध ठराव संमत करण्यात आले.

या पहिल्या नाट्यसंमेलनात पुढील नाटक कंपन्या सहभागी झाल्या होत्या. किर्लोस्कर नाटक मंडळी, नाट्यकला प्रवर्तक सं.ना.मं., स्वदेश हितचिंतक ना.मं., वाशीमकर सं.ना.मं., महालक्ष्मी प्रासादिक सं.ना.मं., पाटणकर सं. नाटक मंडळी, राजापूरकर सं.ना.मं., परमानंद प्रासादिक सं.ना.मं., महाराष्ट्र ना.मं., सामाजिक ना.मं., प्रभु ॲमॅच्युअर्स ना.मं., डेक्कन थिएट्रीकल युनियन, रघुनाथ प्रासादिक वाशीमकरानुयायी मंडळी.

१९०५ मध्ये राजापूरकर नाटक मंडळीच्या विद्यमाने झालेल्या पहिल्या नाट्य संमेलनाचे सन्माननीय अध्यक्षपद श्री.ग.श्री. खापर्डे यांना मिळाल्यामुळे संमेलनाची प्रतिष्ठा राजकारणी मंडळीबरोबरच समाजात तर वाढलीच पण नाट्य कार्यकर्तेही हुरुपाने कामाला लागले.




२ रे मराठी नाट्य संमेलन, नाशिक, १९०६. अध्यक्ष : **श्री. न. चिं. केळकर**

प्रायोजक : **सार्वजनिक वाचनालय,** टिळक रस्ता, नाशिक-४२२ ००२.

# श्री. नरसिंह चिंतामण केळकर

## २४-८-१८७२ - १४-१०-१९४७

दुसरे मराठी नाट्य संमेलन
पाटणकर संगीत नाटक मंडळीच्या विद्यमाने
विजयानंद नाट्यगृह, नासिक.
स्वागताध्यक्ष : श्री. माधवराव पाटणकर
दिनांक : १४ व १५ मे १९०६.

नाट्य परिषदेचे दुसरे संमेलन १९०६ मध्ये पाटणकर सं.ना. मंडळीने यजमानपद घेऊन नाशिक येथे भरवण्यात आले होते. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी श्री. नरसिंह चिंतामण उपाख्य तात्यासाहेब केळकर होते.

श्री. न. चिं. केळकर लोकमान्य टिळक यांचे राजकीय अनुयायी आणि केसरीचे संपादक म्हणून प्रख्यात होते. राजकारण आणि संपादकीय व्यापांमुळे नाटक लिहिण्याचे दीर्घकाळ मनात असूनही जमत नव्हते. १९१२ मध्ये त्यांनी आपले पहिले नाटक 'तोतयाचे बंड' लिहिले. इतिहास संशोधक श्री. पारसनीस यांच्या संग्रहामधले पेशवे काळातील सदाशिवरावभाऊच्या तोतयाच्या संदर्भातील कागदपत्र वाचल्यावर त्यांना 'तोतयाचे बंड' लिहिण्याची प्रेरणा मिळाली.

'तोतयाचे बंड' श्री. य. ना. टिपणीस यांच्या भारत नाटक मंडळीने रंगभूमीवर आणले. त्याकाळी या तोतयाबद्दल जनमानसात बरेच कुतूहल असल्याने ते नाटक चांगलेच लोकप्रिय झाले. 'तोतयाचे बंड' ही मराठी नाट्य वाङ्मयातील एक अजोड कलाकृती आहे. ऐतिहासिक नाटकांचा एक ठराविक साचाच ठरलेला असे. पण 'तोतयाचे बंड' लिहिताना ती ठराविक ऐतिहासिकता टाळून चमत्कृतीयुक्त विरोधाभास त्यांनी स्वीकारला. कथानकाची गुंतागुंत न वाढवता व्यक्तीवैशिष्ट्यांवर भर देऊन आणि नाट्य संघर्षाची मानसिक पातळी राखून नाट्य लेखन केल्यामुळे आणि 'तोतयाचे बंड'शी निगडीत असलेल्या रहस्याची प्रेक्षकांना सहजस्वाभाविक उत्सुकता असल्याने 'तोतयाचे बंड' लोकप्रिय झाले.

वॉल्टर स्कॉटच्या 'वुडस्टॉक'चा आधार घेऊन श्री. तात्यासाहेबांनी आपले दुसरे नाटक 'चंद्रगुप्त' लिहिले. पण ते लोकांना तितकेसे पसंत पडले नाही.

'तोतयाचे बंड' नंतर तात्यासाहेबांना यश आणि कीर्ती मिळवून दिली, त्यांच्या 'कृष्णार्जुन युध्द' नाटकाने. मराठी नाटकांमधील अत्यंत यशस्वी असे आनंदपर्यवसायी नाटक असे या नाटकाबद्दल श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी म्हटले आहे. १९१४ मध्ये रंगमंचावर आलेले हे गद्य नाटक संगीतस्वरुपात पुन्हा रंगमंचावर आले. यातील पद्यरचनेसाठी श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे सहकार्य लाभले होते. एकाच अर्थाची दोन दोन पदे या नाटकात बहुतेक ठिकाणी घातलेली होती. हा प्रयोग नवा आणि वेगळा होता.

काहीसा 'मुद्राराक्षसा'वर आणि लॉर्ड लिटनच्या 'रिचिलीया'चा आधार घेऊन लिहिलेले 'अमात्य माधव' हे श्री. केळकरांचे नाटक आज विस्मृतीच्या पडद्याआड गेले आहे.

'वीर विडंबन' श्री. केळकरांनी बलवंत नाटक मंडळीसाठी लिहिले होते. बलवंतने ते मोठ्या थाटात रंगमंचावर आणले होते. श्री. न. चिं. केळकरांच्या मोजक्या नाटकात यशस्वी झालेले हे तिसरे नाटक.

शाहूनगरवासीने संत चरित्रावरील नाटकांची परंपरा श्री. शिरवळकरांच्या 'संत तुकाराम'ने सुरू केली आणि नाट्य पंढरीच्या चंद्रभागा तीरावर संत चरित्र विषयक नाटकांची एकच गर्दी उसळली. त्या गर्दीत श्री. ह. ना. आपटे ('संत सखू') आणि श्री. न. चिं. केळकर हेही सापडले. श्री. केळकरांचे 'संत भानुदास' या लाटेतच रंगभूमीवर आले, पण ते प्रभावी ठरले नाही. १९१२ ते १९१६ पर्यंत 'तोतयाचे बंड', 'अमात्य माधव', 'कृष्णार्जुन युध्द' ही नाटके श्री. नानवा गोखले यांची चित्ताकर्षक मंडळी करत असे.

श्री.न. चिं. केळकर यांनी रवींद्रनाथ टागोरांच्या 'सरोजिनी'चे रूपांतर केले होते. शेरिडिनच्या 'रायव्हल्स'चे भाषांतर 'नवरदेवाची जोडगोळी' १८९४-१८९५ च्या सुमारास लिहिले होते, पण ती नाटके रंगभूमीवर आली नाहीत.

मराठी रंगभूमीशी संबंधित असलेला अध्यक्ष नाशिक येथे पाटणकर संगीत मंडळीच्या निमंत्रणावरून १९०६ मधे भरलेल्या दुसऱ्या नाट्य संमेलनाला लाभला, हेच या संमेलनाचे वैशिष्ट्य मानावे लागेल.




३ रे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९०७.
१३ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९१७.

अध्यक्ष : **श्री. कृ. प्र. खाडीलकर**

प्रायोजक : **देवल स्मारक मंदिर,** सांगली.

# श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर

२५-११-१८७२ - २६-८-१९४८

तिसरे मराठी नाट्य संमेलन
किर्लोस्कर संगीत मंडळीच्या विद्यमाने
किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. शंकरराव मुजुमदार
दिनांक २० व २१ मे १९०७.

तेरावे मराठी नाट्यसंमेलन
गंधर्व नाटक मंडळीच्या विद्यमाने
किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. नारायण राजहंस
दिनांक : ४ व ५ जून १९१७

श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांच्या नाट्यलेखनास एकाच सुमारास सुरुवात झाली. श्री. कोल्हटकरांचे 'वीरतनय' आणि श्री. खाडीलकरांचे 'सवाई माधवरावांचा मृत्यू' १८९४-१८९५ च्या दरम्यान प्रसिध्द झाले. बेचाळीस वर्षांच्या आपल्या नाट्य कारकिर्दीत श्री. कृ. प्र. खाडीलकर यांनी आठ संगीत आणि सात गद्य नाटके लिहिली.

मराठी रंगभूमीवर अनेक नाटककारांची नाटके रंगमंचावर आलेली होती. त्यातली काही गाजली होती. पण श्री. खाडीलकरांना नाटकाची जी जाण होती ती इतर कुणात नव्हती.

उत्कृष्ट संघर्षाचे सुविहित सुरेख दर्शन श्री. खाडीलकरांच्या नाटकांतून जाणवते. संघर्षाची पध्दतशीर पखरण उच्च पातळीवरची राहते. कारण ती तत्त्वाची असते. सिध्दांतांची असते. त्यांची कथानके सुपरिचित असल्याने त्यातली सामाजिक आणि राजकीय गुंफण प्रेक्षकांना पटते.

'सवाई माधवरावांचा मृत्यू' या पहिल्याच नाटकाने श्री. खाडीलकर प्रेक्षकांच्या नजरेत भरले. शोकांतिकांचा सम्राट शेक्सपिअरच्या नाटकांच्या प्रभावामुळे स्वाभाविकच त्यांनी आपल्या पहिल्याच नाटकात सवाई माधवरावांच्या शोकांतिकेला प्राधान्य दिले. त्यानंतरचे 'कांचनगडची मोहना' आणि 'कीचकवध' त्यांनी रंगभूमीवर आणले. या नाटकांमुळे श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर हे नाव नाटकाच्या इतिहासात अग्रस्थानी आले, अजरामर झाले.

'कीचकवध' हे प्रतिकात्मक नाटक. सैरंध्री ही भारतमाता, ब्रिटिश राजवट कीचक अशी प्रतीके धरून लिहिल्यामुळे त्यावेळच्या ब्रिटिश शासनाने त्याच्या प्रयोगावर बंदी घातली. 'भाऊबंदकी'लाही तत्कालीन राजकीय पार्श्वभूमी लाभली होती. त्यातला रामशास्त्री लोकमान्यांची प्रतिमा भासत असे. या नाटकानंतर श्री. खाडीलकर संगीत नाटकांकडे वळले.

श्री. खाडीलकरांचे 'मानापमान' त्याच्या संगीतामुळे अजरामर झाले. श्री. बालगंधर्व, श्री. जोगळेकर यांच्यासारखे स्वर्गीय आवाजाचे गायक प्रथमच त्या नाटकाला लाभले आणि 'मानापमान'ने प्रसिध्दीचे अत्युच्च शिखर गाठले. 'शाकुंतल', 'सौभद्र'ही संगीत नाटके गाजली, पण त्यांच्यापेक्षाही 'मानापमान'चा प्रभाव अधिक पडला. आजही 'मानापमान'चे प्रयोग होत असतात, ते केवळ त्याच्या संगीतामुळे. 'मानापमान'चा नाट्यमय संघर्ष त्यातील संगीतामुळे मागे पडला. त्यातला, 'मृच्छकटिका'तील शकाराच्या वळणाचा विनोदी खलपुरुष लक्ष्मीधर काहीसा नजरेआड झाला आणि प्रेक्षकांच्या कानात भरले अश्विनशेट आणि भामिनीचे संगीत.

'मानपमान'मुळे मराठी रंगमंचावर संगीत प्रभावी ठरले. श्री. खाडीलकरांनी त्यानंतर 'विद्याहरण', 'स्वयंवर', 'मेनका', 'द्रौपदी', 'सत्वपरीक्षा' इत्यादी संगीत नाटके लिहिली. त्यातील 'स्वयंवर'चे प्रयोग आजही गायक कलावंत करतात.

महाराष्ट्र नाटक मंडळीने दि. १० सप्टेंबर १९०४ रोजी श्री. खाडीलकरांचे 'कांचनगडची मोहना' पुण्याच्या रंगभूमीवर आणले. त्यांचे शेवटचे नाटक 'त्रिदंडी संन्यास' १९३६ मध्ये झाले. सतत बत्तीस वर्षे श्री.कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांची नाटके रंगभूमी गाजवीत होती. ते रंगभूमीचे अनभिषिक्त लेखकसम्राट ठरले.

लोकमान्य टिळकांचे सहकारी, 'केसरी'चे संपादक म्हणून त्यांचा लौकिक होताच. स्वत:च्या 'नवाकाळ'चेही वैशिष्ट्य त्यांनी कायम राखले. राजकीय लेखन आणि नाट्य लेखन यात अग्रस्थानी असलेल्या श्री. खाडीलकरांना प्रथम किर्लोस्कर नाटक मंडळीने यजमान पद स्विकारुन पुणे येथे भरलेल्या तिसऱ्या आणि नंतर दुसऱ्यावेळी १९१७ मधे गंधर्व नाटक मंडळीचे यजमानपद लाभलेल्या तेराव्या संमेलनाच्या वेळी अध्यक्ष पद देण्यात आले होते.




४ थे मराठी नाट्य संमेलन, नाशिक, १९०८.

अध्यक्ष : **श्री. नी. वि. (कोंडोपंत) छत्रे**

प्रायोजक : **श्री. विनायकराव पाटील,** नाशिक.

# श्री. नीळकंठ विनायक उपाख्य कोंडोपंत छत्रे

## १५-११-१८५० - ३०-४-१९२७

चौथे मराठी नाट्य संमेलन
नाट्यकला प्रवर्तक संगीत मंडळीच्या विद्यमाने
विजयानंद नाट्यगृह. नाशिक.
स्वागताध्यक्ष :
दिनांक : २२ ते २४ मे १९०८.

१९०८ मध्ये नाट्यकला प्रवर्तक संगीत मंडळीच्या निमंत्रणावरून पुन्हा दुसऱ्या वेळी नाशिक येथे नाट्य संमेलन झाले. या चवथ्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते श्री. नी. वि. तथा कोंडोपंत छत्रे.

नाट्यव्यवसायाशी लेखक वा कलाकार या नात्याने श्री. कोंडोपंत छत्रे यांचा संबंध फारसा आलेला नाही. ते व्यवसायाने डॉक्टर होते. शरीरशास्त्राचा त्यांचा विशेष अभ्यास होता. वैद्यकशास्त्रावरील त्यांची पुस्तके डॉक्टरी व्यवसायाला उपयुक्त होती.

संस्कृत आणि मराठी साहित्याचा त्यांचा अभ्यास मोठा होता. स्वाभाविकच त्यांना कलाप्रांताची-त्यातही नाट्यशास्त्राची विशेष आवड होती. त्या दृष्टीने त्यांनी नाट्यशास्त्राचा गाढा व्यासंग केला होता. त्यातही नाटक कसे बसवावे, आजच्या रूढ भाषेत दिग्दर्शन कसे करावे, या विषयावर त्यांचे अधिक प्रभुत्व होते.

'सर्व धर्माच्या, सर्व मतांच्या आबालवृध्दांची करमणूक करणारी, शिक्षण देणारी अशी नाटक हीच कला असल्यामुळे ती सुधारणे, तिच्यापासून हरकामी उपयोग करून घेण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. हे योग्यच झाले,' अशी आपल्या अध्यक्षीय भाषणाची सुरुवात करुन श्री. छत्रे पुढे म्हणाले, 'भारतीय नाटकाची पूर्वपाठिका फार पुरातन आहे. नाटक हे 'सुसंस्कृत संसार चित्र' आहे. इंग्रजी-संस्कृत नाटकांची भाषांतरे मराठीत झाली पाहीजेत. पाश्चात्य देशातील प्रतिभावंतांचे सिध्दान्त काय आहेत हे आपण समजून घेणे आवश्यक आहे. त्या त्या काळातले रीतीरिवाजही समजले पाहिजेत. या दोन्हींच्या सहाय्याविना आपली वैचारीक सुधारणा प्रागतिक व श्रेयस्कर होणार नाही'.

शब्दांचे चढ-उतार, वाक्याचा ध्वन्यर्थ यांचा विचार करून कलाकाराने आपला आवाज कसा वापरावा, आवाजाला भूमिकेच्या दृष्टीने आकार कसा द्यावा याचे ते जाणकार होते. त्यांचे हे ज्ञान त्या काळात वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण मानावे लागेल. त्यांच्या या जाणकारीचा उपयोग रंगभूमीवर काम करणाऱ्या कलावंतांनी आणि नाट्यसंस्थांनी त्या काळात करून घेतला हे विशेष आहे.

प्रचार आणि प्रसार यांचे नाटक हे अतिशय प्रभावी माध्यम आहे. या माध्यमाचा कुशलतेने उपयोग झाला तर जनजागृती होऊ शकते, आपली मतप्रणाली व विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत सहजपणे पोहोचू शकतात, यावर श्री. छत्रे यांचा पूर्ण विश्वास होता. रंगभूमीच्या उपयोगाकडे याच दृष्टीने ते पाहत असत. रंगभूमीचा अभ्यास आणि नंतर मार्गदर्शनही त्यांनी याच दृष्टीकोनामधून सतत केले होते. समाजजागृतीचे महत्कार्य पार पाडण्यासाठी एक मार्गदर्शक श्रेष्ठी म्हणूनच त्यांना १९०८ मधे नाट्यकलाप्रवर्तक संगीत नाटक मंडळीच्या-वतीने नाशिक येथे भरवलेल्या चवथ्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष पद देण्यात आले होते.

या संमेलनात नाटकासाठी आवश्यक असलेल्या नाट्यवस्तूचे एक प्रदर्शन भरविण्यात आले होते. संमेलनाच्या सुरूवातीस वे. शा. सं. हरिशास्त्री गर्गे यांच्या आशीर्वादपर संस्कृत भाषणाचा समावेश होता.




५ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९०९.

अध्यक्ष : **डॉ. ग. कृ. गर्दे**

प्रायोजक : **श्री. धामणकर बंधू-भगिनी**, आदर्श बेकरी प्रा. लि., नाशिक-४२२ ००२.

# डॉ. गणेश कृष्णाजी गर्दे

## सप्टेंबर १८८५ - २-७-१९१६

पाचवे मराठी नाट्य संमेलन
सोशल क्लब, पुणे यांचे विद्यमाने
नूतन आर्यभूषण थिएटर, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. दत्तात्रय आत्माराम फाटक
दिनांक : २४ व २५ मे १९०९.

हे संमेलन पुणे येथील नूतन आर्यभूषण थिएटरमधे पुण्याच्या सोशल क्लब या संस्थेच्या वतीने दि. २४ व २५ मे १९०९ रोजी भरले.

डॉ. गणेश कृष्णाजी गर्दे हे मूळचे कर्नाटकातले. बेळगाव - धारवाड भागात गर्दे घराण्याला मोठी प्रतिष्ठा होती. श्री. गर्दे यांचे वडील वैद्यशास्त्रातले गाढे विद्वान होते. डॉ. ग. कृ. गर्दे यांना संस्कृत साहित्याची आवड होती. वडिलांचा व्यवसाय चालवण्यासाठी ते वैद्यक व्यवसायाचे पदवीधर झाले.

व्यवसायाच्या निमित्ताने पुण्यात आल्यावर त्यांनी व्यवसायाबरोबरच साहित्य सेवेलाही सुरुवात केली. संस्कृतमधील 'वाग्भट' आणि 'माधव निदान' हे महत्वाचे वैद्यकग्रंथ त्यांनी मराठीत आणले.

या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. गर्दे यांच्या भाषणात नट, नाटक, नाटककार, रंगभूमी आणि प्रेक्षक या घटकांची तात्त्विक चर्चा आली आहे. ही सर्व चर्चा उद्बोधक आहे. नाटककार बहुश्रुत असावा त्याची अवलोकनशक्ती तीव्र असावी, तो प्रभावशाली असावा, तो स्वतः नट असावा किंवा त्याने पुष्कळ प्रयोग तरी पाहिलेले असावेत. असे नाटककारास आवश्यक असलेले गुण डॉ. गर्दे यांनी सांगितले आहेत. यानंतर त्यांनी उत्तम नाटकाचे गुण सांगितले आहेत. (१) कथानक देशकालानुरुप पाहिजे, (२) संविधानक आकर्षक पाहिजे, (३) पात्रानुरूप भाषा असावी व तिच्यात सुगमता असावी, (४) कथानक फार लहान नसावे, फार लांब नसावे आणि ते (५) नानारसात्मक असून बोधपर असावे.

रंगभूमीवर नीरस, ग्राम्य, बीभत्स किंवा उद्वेगजनक गोष्टी केव्हाही दाखवू नयेत, असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले. नाट्यशास्त्राच्या अनुरोधाने रंगभूमीवर वर्ज्य असलेल्या गोष्टींची त्यांनी यादी दिली आहे.

नटाच्या ठायी आवश्यक असलेले गुण सांगताना डॉ. गर्दे यांनी कायिक, वाचिक, मानसिक असे गुणांचे तीन प्रकार सांगितले आहेत. (१) शरीर निरोगी व बांधेसूद असावे, (२) भाषण स्पष्ट असावे, शब्दोच्चार निर्दोष व सतेज असावेत. संगीत नटाचा आवाज मधुर असावा, (३) नटाची अवलोकनशक्ती व ग्रहणशक्ती या चांगल्या असाव्या , (४) त्याची अनुकरणशक्ती उत्कृष्ट असावी आणि (५) त्याला नाट्यकलेचे शिक्षण मिळालेले असावे.

साहित्य आणि सांस्कृतिक सेवेशी संबंध आल्याने डॉ. गर्दे यांचा लोकमान्य टिळकांशीही परिचय झाला. 'केसरी' वृत्तपत्राच्या सुरुवातीच्या संस्थापक पुरस्कर्त्यांमध्ये डॉ. ग. कृ. गर्दे होते. वैद्यकीय व्यवसाय, वेदांतासारखी प्राचीन शास्त्रे, आधुनिक भौतिक शास्त्रे यांच्या चौफेर व्यासंगामुळे १९०९ मध्ये पुण्याच्या सोशल क्लबने पुणे येथे आयोजित केलेल्या पाचव्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.



६ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९१०.

अध्यक्ष : **श्री. चिं. ग. भानू**

प्रायोजक : **रोटोमॅटिक कंटेनर्स,** ई-४, एम. आय. डी. सी., अंबड, नाशिक-४२२ ०१०.

# प्रा. चिंतामण गंगाधर भानू

## २४-७-१८५६ - ३०-१२-१९२९

सहावे मराठी नाट्य संमेलन
महाराष्ट्र नाटक मंडळीच्या विद्यमाने
किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. त्र्यंबक सीताराम कारखानीस
दिनांक : २३ व २४ मे १९१०.

कीर्तन आणि नाटक या एकमेकांशी निगडीत असलेल्या कला आहेत. आजच्या एकपात्री प्रयोगाचे मूळ कीर्तनकलेत आहे. चांगला लोकप्रिय कीर्तनकार हा प्रथम श्रेणीचा अभिनयनिपुण असला तरच त्याचे कीर्तन जनसामान्यात लोकप्रिय होते.

पुण्याच्या सहाव्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष प्रा. चिंतामण गंगाधर भानू हे प्रगाढ तत्वचिंतक, इतिहास संशोधक आणि वक्ते म्हणून महाराष्ट्राला जितके परिचित होते त्यापेक्षाही कीर्तनकार म्हणून अधिक लोकप्रिय होते. १९१० मध्ये वेदांताबरोबरच कीर्तनकलेचाही त्यांनी अभ्यास केला. चांगले वक्ते म्हणून त्यांची कीर्ती सर्वत्र होतीच. कीर्तनाच्या अभ्यासामुळे त्यांच्या वक्तृत्वाला अभिनयाचीही साथ मिळाली. त्यामुळे लोकांचे मनरंजन करतानाच त्यांना ज्ञानदान करणे सोपे गेले. अव्वल दर्जाचा एक कीर्तनकार म्हणून त्यांना जाणकारांची मान्यता मिळाली होती. कीर्तनकलेचा विकास प्रगत होत जाऊन नाट्यकला उदयाला आली. स्वाभाविकच श्री. चिंतामणरावांना नाटकाचे आकर्षण होतेच. त्या काळी होणारे निरनिराळ्या संस्थांचे सर्व नाट्यप्रयोग ते अभ्यासपूर्वक अवलोकीत असत. नाटकातील बारीकसारीक गुणदोष त्यांच्या चिकित्सक नजरेस चटकन येत असत. या त्यांच्या सूक्ष्म अभ्यासामुळेच त्यांचे नाट्यशास्त्रावरील अभ्यासपूर्ण लेखन, वाचक-समीक्षकांच्या लक्षात राहीले आहे. रंगभूमीवरच्या लहान-थोर अभिनेत्यांना त्यांच्या मर्मग्राही लेखनाचा उपयोग झाला. प्रा. श्री. चि.गं.भानू यांनी भरतमुनीच्या नाट्यशास्त्राचे केलेले भाषांतर 'रंगभूमी' मासिकात क्रमशः प्रसिध्द झाले होते. नाट्यशास्त्राचे मराठीतील हे पहिले भाषांतर.

प्रा. चिं. गं. भानू केवळ नाट्यशास्त्रावरील लेखनावरच संतुष्ट राहिले नाहीत. नाटकावरील निरतिशय प्रेमापोटी त्यांनी अभिनेत्यांना अभिनयाचे शिक्षण देण्याचाही उपक्रम सुरू केला. महाराष्ट्र नाटक मंडळीशी त्यांचा घनिष्ट संबंध होता. मंडळीतील अनेक नटांना त्यांनी अभिनयाचे आणि नाट्यतंत्राचे धडे देऊन, त्या क्षेत्रात तरबेज केले होते.

नटवर्गाला उद्देशून आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा.भानू म्हणाले, 'नटांचे काम मनोरंजन करण्याचे आहे. शिकवणे हा नाट्यकलेचा मुख्य उद्देश नाही. नटाने नीतीचे घुटके दिले आणि नटाचे व्यक्तीगत वर्तन त्यास साजेसे असले तर समाज शिक्षणास सहाय्य होऊन आपले अपेक्षित उद्दिष्ट लवकर साध्य होईल'.

१९०७ मध्ये पुण्यात भरलेल्या तिसऱ्या नाट्य संमेलनानंतर नाटकाशी घनिष्ट संबंध असलेला अध्यक्ष महाराष्ट्र नाटक मंडळीच्या विद्यमाने भरलेल्या नाट्य संमेलनाला १९१० मध्ये लाभला. हे संमेलन महाराष्ट्र ना. मंडळीच्यावतीने पुण्यात भरले होते.




७ वे मराठी नाट्य संमेलन, मुंबई, १९११.

अध्यक्ष : **पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर**

प्रायोजक : **डॉ. वसंतराव पवार,** सुश्रुत, टिळकवाडी, नाशिक-४२२ ००५.

# पंडित विष्णू दिगंबर पलूस्कर

## १८-८-१८७२ - २१-८-१९३१

सातवे मराठी नाट्य संमेलन
कोल्हापूरकर संगीत मंडळीच्या विद्यमाने
एल्फिन्स्टन नाट्यगृह, मुंबई.
स्वागताध्यक्ष :
दिनांक : २२ व २३ मे १९११.

नाट्य लेखक श्री. न. चिं. केळकर (नाशिक येथील १९०६ चे नाट्य संमेलन) आणि श्री. कृ.प्र. खाडीलकर (पुणे येथील १९०७ चे नाट्य संमेलन), नाट्यशास्त्राचे अभ्यासू लेखक आणि नाट्यतंत्र शिक्षक श्री. चिं. गं. भानू (पुणे येथील १९१० चे नाट्य संमेलन) यांच्यानंतर संगीत तज्ञाची नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होणे हा काहीसा योगायोगाचा भाग असला तरी ते सहजस्वाभविकच होते.

पंडित विष्णू दिगंबर पलूस्कर यांना गायनी गळा जन्मजात लाभलेला नव्हता. शास्त्रोक्त गायनाला तर त्यांचा आवाज अतिशय प्रतिकूल होता. पण लहानपणापासूनच आपल्या आवाजावर त्यांनी जबर मेहनत घेण्यास सुरुवात केली होती. श्री. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांची शार्गीर्दी त्यांनी स्वीकारली. मान मोडून मेहनत आणि जबरदस्त जिद्द यांच्या जोरावर पंडितजींनी आपला आवाज शास्त्रीय संगीताला साजेसा सुधारून घेतला. आवाजावर नियंत्रण मिळवले. आपल्या भरदार आवाजाने श्रोत्यांना ते मंत्रमुग्ध करू लागले. जाणकारांची मनमुक्त वाहवा मिळवू लागले.

लाहोरमध्ये गांधर्व महाविद्यालयाची प्रतिष्ठापना पंडित पलूस्करांनी केली आणि संगीत शिक्षणाचे दालन विद्यार्थ्यांना मोकळे केले. मुंबईतही महाविद्यालयाची स्थापना केली. श्री.नारायणराव व्यास, श्री.वामनराव पाध्ये, श्री. ओंकारनाथ ठाकूर, श्री. विनायकराव पटवर्धन आदी पुढे नामवंत झालेले गायक गांधर्व महाविद्यालयातून बाहेर पडले होते.

काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात बंकीमचंद्रांच्या 'वंदेमातरम ' राष्ट्रगीताला योग्य चाल लावून ते अधिवेशनात प्रारंभी सामुदायिकरीत्या म्हणावे, असा श्री. वि. दि. पलूस्कर यांचा आग्रह होता. त्याप्रमाणे ते या वार्षिक अधिवेशनांमध्ये, यासाठी सहभागी होत असत आणि 'वंदेमातरम' राष्ट्रगीत म्हणत असत. नंतर त्यांनी आपले वास्तव्य नासिक येथे कायम स्वरुपाचे ठेवून .'रामनाम आधार आश्रम' स्थापन केला. संगीताची पुस्तके छापण्यासाठी 'संगीत प्रिंटीग प्रेस'चीही स्थापना करुन संगीत विषयक पुस्तके छापण्याचे काम अव्याहत सुरू केले. कीर्तनकार या नात्याने श्री. पलूस्करांनी पुन्हा एकदा भारतभ्रमण केले. गायकी आधारावर रामायण गावून आपली कीर्तीध्वजा पुन्हा एकदा उंचावली.

या व्यासंगी गायकाचा सन्मान १९११ मध्ये मुंबईस कोल्हापूरकर संगीत नाटक मंडळीने भरविलेल्या सातव्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन केला.

या संमेलनाचे एक वैशिष्ट्य या संमेलनाला प्रेक्षकांसाठी प्रथमच प्रवेश मूल्य ठेवण्यात आले होते.




८ वे मराठी नाट्य संमेलन, अमरावती, १९१२. अध्यक्ष : **श्री. मो. वि. जोशी**

प्रायोजक : **अक्षय उद्योग,** डब्लू-८०/ए, एम. आय. डी. सी., सातपूर, नाशिक-४२२ ००७.

# श्री. मोरो विश्वनाथ उर्फ अण्णासाहेब जोशी

१३-१०-१८६१ - ५-४-१९६२

आठवे मराठी नाट्य संमेलन
श्रीमहालक्ष्मी प्रासादिक संगीत नाटक मंडळीच्या विद्यमाने
अमरावती, विदर्भ.
स्वागताध्यक्ष :
१९१२. मधे (ईस्टरच्या सुटीत)

अमरावतीचे अग्रगण्य वकील श्री. मोरो विश्वनाथ जोशी हे सामाजिक कार्यकर्ते, कलारसिक, साहित्याची साक्षेपी जाण असलेले आणि नाटकाचे दर्दी प्रेक्षक म्हणून प्रसिध्द होते. नागपूर विद्यापीठाची डॉक्टरेट त्यांनी सन्मानपूर्वक प्राप्त केली होती.

नाट्य कला आणि नाट्य कलावंत यांच्याबद्दल श्री. मोरोपंतांना मन:पूर्वक आस्था होती. नाटक हे समाजप्रबोधनाचे महत्वाचे साधन आहे. त्याचा योग्य उपयोग करून घेता आला पाहिजे, असे त्यांचे मत होते. नाटकामधील स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच केल्या पाहिजेत, याचा ते केवळ प्रचारच करत असे नव्हे तर त्यासाठी ते सतत प्रयत्न करत असत. कलावंत स्त्रियांनी नाटकात भूमिका करण्याचे आर्जवाचे आवाहन त्यांनी केले होते.

स्त्रियांची कामे स्त्रियांनीच केली पाहिजेत या मताचा स्पष्ट पुरस्कार नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षांनीच करण्याचा प्रकार या आठव्या संमेलनात घडला. श्री. मोरोपंत जोशी म्हणाले, 'नाटकी शब्दाचा ३०-४० वर्षापूर्वी जो अर्थ असे, तितक्या हलकट अर्थाचा तो शब्द हल्ली नाही. याचे कारण नाटक मंडळीतील माणसे दिवसेंदिवस जास्ती सुव्यवस्थित राहत आहेत व ती जास्ती शीलाची आहेत. स्त्रियांची कामे करण्यासाठी स्त्रियाच असणे फार इष्ट आहे असे प्रेक्षक या नात्याने मला पुष्कळ वेळा वाटले आहे व जरी या देशात वेश्यांखेरीज इतर स्त्रियांनी नाटकात जाणे संभवत नाही, तरी पण कालांतराने चांगल्या संभावित व शिकलेल्या बायकाही नाटकात जातील अशी मला पूर्ण उमेद आहे. ज्या मानाने एखाद्या धंद्यात चांगली माणसे शिरतील. त्याच मानाने त्या धंद्याची थोरवी वाढते. याच नियमास अनुसरुन हल्ली युरोपात फार मोठमोठे लोक नट होतात, आणि मोठमोठ्या लोकांच्या मुली व स्त्रियाही नाटकाचा धंदा पत्करतात व त्यामुळेच नटाची थोरवी त्या देशात फारच मोठी आहे.'

१९१२ मधे अमरावती येथे महालक्ष्मी प्रासादिक संगीत नाटक मंडळीच्यावतीने भरलेल्या आठव्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.




९ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९१३. अध्यक्ष : **श्री. के. रा. छापखाने**

प्रायोजक : **श्री. विजय सोहनी,** वास्तुशास्त्री, अभिषिक्त, नाशिक-४२२ ००५.

# श्री. केशव रामचंद्र छापखाने

२५-११-१८७५ - १३-२-१९४०

नववे मराठी नाट्य संमेलन
चित्ताकर्षक नाटक मंडळीच्या विद्यमाने
किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. रामभाऊ गोखले
दिनांक : १९ व २० मे १९१३.

शेक्सपिअरच्या बहुतेक सर्व नाटकांची मराठीत रूपांतरे-भाषांतरे झाली आहेत. काही नाटकांची तर तीन वेळा भाषांतरे झाली आहेत. ही सर्व नाटके रंगभूमीवर आली आहेत आणि कमीअधिक प्रमाणात गाजलीही आहेत.

शेक्सपिअरचे 'रोमिओ-ज्युलिएट' हे सर्वच रसिकांचे आवडते नाटक. मनाला भिडणाऱ्या या प्रेमकथेवरील नाटकाचे पहिलेच रूपांतर करणारे श्री. केशवराव छापखाने हे जनजागरणासाठी नाटकासारखे दुसरे प्रभावी साधन नाही, अशा मताचे होते. रोमिओ-ज्युलिएटचे त्यांचे रूपांतर 'मोहन-तारा' मराठी रंगमंचावर एकेकाळी खूपच लोकप्रिय झाले होते. त्यांची आणखीही एक-दोन नाटके आहेत.

'कलेचे रहस्य' या विषयावरील आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. छापखाने म्हणाले, 'नाटकात फक्त अभिनय नसतो, तर देखावे, सुंदर पात्रे, काही वेळेस गाणेही आवश्यक असते. प्रेक्षकांची सर्वपरींनी करमणूक व्हावी असे आता प्रेक्षकांचे म्हणणे आहे. त्या दृष्टीने केवळ अभिनय, केवळ गायन, पृथकपणे दाखवून मनाचे समाधान होणार नाही. या सर्वांचे समुचित संकलन करुन प्रेक्षकांचे समाधान होईल, त्यांना आनंद होईल अशी कलाकृती कलाकाराने प्रेक्षकांसमोर ठेवली पाहिजे. या आनंदाची उत्पत्ती या साऱ्यांच्या समुच्चयाने होते. ही जी प्रतिकृती निर्माण होते. तीच कला होय . आपण योग्य तऱ्हेने ही कला पाहण्यास शिकले पाहिजे. शिक्षण आणि रंजन हे नाटकाचे दोन उद्देश आहेत. म्हणजे त्यात अंजन व रंजन असले पाहिजे . केवळ रंजनाचा अंजनाचा हेतू लक्षात घेऊन प्रेक्षकांनी डोळस नजरेने नाटक पाहिले पाहिजे.

श्री. केशवराव छापखाने यांना १९१३ मध्ये चित्ताकर्षक सं.ना. मंडळीचेवतीने पुण्याला साजऱ्या झालेल्या नवव्या नाट्य संमेलनाचे सन्माननीय अध्यक्षस्थान लाभले होते.



१८ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९१४.

अध्यक्ष : **श्री. शि. म. परांजपे**

प्रायोजक : **लिव्हा फार्मसी प्रा. लि.**, एम.आय.डी.सी, सिन्नर.

# श्री. शिवराम महादेव परांजपे

## २७-६-१८६४ - २७-९-१९२९

दहावे मराठी नाट्य संमेलन
सोशल क्लब यांचे विद्यमाने
आर्यभूषण नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. द. आ. फाटक
दिनांक २१ व २२ मे १९१४

ज्वलज्जहाल लेखणीने आणि वक्तृत्वाने अखिल महाराष्ट्रात परकीय राजवटीविरूध्द जागृती करणारे श्री. शिवराम महादेव परांजपे यांचा जन्म महाडचा. रत्नागिरी येथे माध्यमिक शिक्षण घेत असता त्यांना श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारखा शिक्षक लाभला. देशभक्ती आणि स्वाभिमान यांचे प्रेरणादायी संस्कार श्री. शिवरामपंतांवर लहानपणीच झाले. राष्ट्रप्रेमाची छोटी ज्योत त्यावेळी तेवली. तिने नंतर डोळे दिपवणारे कर्तृत्व आपल्या वक्तृत्वाने आणि लेखणीने दाखविले.

एम. ए. उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालेले श्री. शिवरामपंत कुठलीही सरकारी नोकरी न करण्याची प्रतिज्ञा करून पुण्याच्या महाराष्ट्र महाविद्यालयामध्ये संस्कृतचे प्राध्यापक झाले. मतभेद झाल्यामुळे नोकरी सोडून सार्वजनिक कार्याला त्यांनी सुरूवात केली. त्यांनी लोकमान्य टिळकांची साथ धरली.

व्याख्याने आणि लेखन यांद्वारे त्यांनी जनजागृती केली. जहाल मताचे, जळजळीत विचारांचे 'काळ' वृत्तपत्र त्यांनी सुरू केले. या 'काळ'मधल्या श्री. परांजपे यांच्या लिखाणाने अनेक स्वातंत्र्यप्रेमींना प्रेरणा मिळाली. त्यात स्वातंत्र्यवीर सावरकर अग्रस्थानी होते. 'काळ' पत्रावर ब्रिटिशांची करडी नजर वळली आणि शि. म. परांजपे यांना पंधरा महिन्यांच्या सश्रम कारावासाची शिक्षा झाली. 'काळ' बंद करावा लागला. त्यांनी 'स्वराज्य' पत्र चालू केले. पण 'काळ'ची धडाडी-आवेश त्यात नव्हता. टिळकांच्यानंतर गांधींच्या राजकारणात ते समरस होऊ शकले नाहीत. त्यांनी आपले लक्ष साहित्यावर केंद्रीत केले. 'गोविंदाची गोष्ट', 'विंध्यांचल' आदी कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. 'काळा'तले निवडक निबंध'चे दहाखंड प्रसिध्द आहेत. काही नाटकेही लिहिली. यात 'पहिला पांडव' हे नाटक कर्ण चरित्रावर घेतलेले होते.

नाट्य व्यवसायात शेक्सपिअरच्या भाषांतरीत रूपांतरीत नाटकांचा बहर १८८६ ते १८९७ या काळात आला होता. त्यावेळी श्री. शिवराम महादेव परांजपे यांनी 'ऑथेल्लो'चे रूपांतर 'मानाजीराव' या नावाने केले. शाहूनगरवासीय मंडळीने ते रंगभूमीवर आणले आणि मराठी रंगभूमीचे गॅरिक गणपतराव जोशी यांच्या भूमिकेने ते गाजले.

श्री. शिवरामपंत परांजपे यांना त्यांच्या साहित्य सेवेबद्दल साहित्य संमेलनाच्या आणि नाट्य कर्तृत्वासाठी पुणे येथे १९१३ मध्ये भरलेल्या पुणे सोशल क्लबने बोलावलेल्या मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान मिळाला.




११ वे मराठी नाट्य संमेलन, मुंबई, १९१५. अध्यक्ष : रेव्हरंड ना.वा.टिळक

प्रायोजक : **अॅग्रो केमिकल्स प्रा. लि.**, नाशिक-४२२ ००२.

# रेव्हरंड नारायण वामन टिळक

## ६-१२-१८६१ - ९-५-१९१९

अकरावे मराठी नाट्य संमेलन
भारत नाटक मंडळीच्या विद्यमाने
गांधर्व महाविद्यालय, मुंबई.
स्वागताध्यक्ष : श्री. य. ना. टिपणीस
दिनांक २०, २१ मे १९१५

भारत नाटक मंडळीने प्रायोजिलेल्या १९१५ साली मुंबईत भरलेल्या अकराव्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षस्थान रेव्हरंड नारायण वामन टिळक यांनी भूषविले होते. ख्रिस्तधर्मीय कवीची, एका ख्रिस्ती धर्मगुरुची निवड संमेलनाच्या अध्यक्षपदी व्हावी हे काही मंडळींना पसंत नव्हते. त्यावेळच्या वृत्तपत्रामधून त्याबाबत चर्चाही झाली होती.व्यंगचित्रेही प्रसिध्द झाली होती.पण हा विरोध परस्पर समजुतीने संपला आणि मुंबई येथे संमेलन साजरे झाले.

श्री. ना. वा. टिळक बारा वर्षाचे असताना त्यांच्या वडिलांनी त्यांना मारले. तसा हा प्रकार नित्याचा होता पण या वेळी श्री. टिळक रागावून घराबाहेर पडले.त्यांनी एका नाटक मंडळीत आश्रय घेतला. पण ओळखीच्या लोकांनी त्यांना परत घरी पोहचवले.

नाशिकच्या गंगापूर येथील सावकार काकाजीशेठ आणि सदाशिवशेठ सोनवणी हौसेने दशावतारी नाटकाचे खेळ करत. त्यांच्या या दशावतारी नाटकांसाठी श्री. टिळकांनी काही आख्याने आणि पदे लिहून दिली होती. एका नाटकात ते दशरथाची भूमिकाही करत असत.

१८८६ मधे 'आनंदराव अर्थात पाशबध्द स्वदेशाभिमानी' नाटक त्यांनी लिहिले.त्याचा प्रयोग मुंबईला झाला होता. त्यात आनंदरावांची प्रमुख भूमिका श्री. टिळकांनी केली होती. 'ज्याच्या योगाने स्वदेशाभिमान जागृत होईल अशी नाटिका रचण्याचा आमचा हेतू आहे', असे या नाटकाच्या प्रस्तावनेमधे म्हटले आहे.

'संगीत गोदु:ख विमोचन' नाटक श्री. ना. वा. टिळक (चिखलगांवकर) यांनी नागपूरच्या गोरक्षणी सभेच्या मदतीसाठी लिहिले आणि केले. या नाटकासाठी रंगमंचाची आवश्यकता नव्हती. गावातल्या मोठ्या चौकात वा मोक्याच्या कोपऱ्यावर हा प्रयोग करता येत असे. आजच्या पथनाट्याचे मूळ येथे सापडते. प्रयोगाच्या सुकरतेसाठी या नाटकात स्त्रीचे एकच सोंग होते. त्या पात्राला गाणे नव्हते. नाटक बघण्यासाठी प्रेक्षक रस्त्यात बैठक मारत.

'शीलं परं भूषणम' हे नाटक केवळ विद्यार्थ्यांसाठी लिहिले होते. नाटकात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला या नाटकात भूमिका दिल्यामुळे नाटकात पात्रांची खूपच गर्दी झाली होती. या नाटकात श्री. व्यंकटेश बळवंत तथा बापूराव पेंढारकर प्रथम रंगमंचावर आले. या नाटकाला ख्रिश्चनांचा विरोध होता. शिक्षकांनी तर विरोधाची आघाडीच उघडली होती.पण श्री. शिवरामबुवा भारदे यांच्या मध्यस्थीने विरोध कमी झाला. नाटक झोकात झाले. या नंतर ख्रिश्चनांच्या समाजाच्या आवारात नाटके होऊ लागली. श्री. टिळकांचे विद्यार्थीही नाटके लिहू लागले.

'स्व...राज्य हेच खरे स्वराज्य', 'स्वाराज्य आणि स्त्रिया' अशी दोन छोटी नाटुकली खास ख्रिस्ती मुलींसाठी श्री. ना. वा. टिळकांनी लिहिली. या नाटकात मुलींच्या हौसेसाठी भरपूर गाणी घातली होती. 'स्मृतीचित्रे' लिहिणाऱ्या श्रीमती लक्ष्मीबाई टिळक या श्री. ना. वा. टिळक यांच्या पत्नी.




१२ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९१६. अध्यक्ष : **श्री. शंकरराव मुजुमदार**

प्रायोजक : **श्री. हेमंत टकले,** 'ग्रीन व्ह्यू', नाशिक-४२२ ००७.

# श्री. शंकर बापूजी मुजुमदार

## १८६२ - २९-११-१९३८

बारावे मराठी नाट्य संमेलन
राजापूरकर नाटक मंडळीच्या विद्यमाने
किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. बाबाजीराव राणे
दिनांक २९, ३० मे १९१६

१९१६ साली पुणे येथे राजापूरकर नाटक मंडळीने भरविलेल्या बाराव्या संमेलनाचे अध्यक्ष संगीत मराठी रंगभूमीवरची पहिली न गाणारी नायिका श्री. शंकर बापूजी मुजुमदार. किर्लोस्कर नाटक मंडळीच्या पहिल्या 'शाकुंतल' नाटकात शंकररावांनी नायिका शकुंतला साकारली. कालिदासाने वर्णन केलेली सौंदर्यसंपन्न शकुंतला रंगमंचावर आली खरी, पण गायनी गळा नसल्याने तिला गाणी नव्हती, तरी ती प्रेक्षकांना पसंत पडली,ती तिच्या स्वरूप सुंदरतेमुळे. नंतरच्या 'सौभद्रात' श्री. मुजुमदार रुक्मिणी झाले होते.

लहानपणापासून नाट्यव्यवसायात असल्यामुळे आणि चौकसबुध्दीमुळे त्यांचे व्यवस्थापनाकडे लक्ष असे. या दोन भूमिका नंतर त्यांनी किर्लोस्करची व्यवस्थापकीय सूत्रे स्वीकारली.त्यांच्या व्यवस्थापकीय कारकिर्दीत त्यानी नवे नवे उपक्रम सुरू केले.

नाटकातल्या नटाची रंगमंचावरील राजवट संपली की त्याला बाहेरच्या जगात कोणी विचारीत नाही. त्याला कसेबसे जिणे जगावे लागते. या स्थितीचा विचार करून श्री. मुजुमदारांनी मुद्रणालय सुरू केले. आणि संस्थेतल्या सर्वांना अक्षर जुळणी, मुद्रित शोधन, मुद्रण वगैरे कामे शिकवली. त्यासाठी 'मुद्रणदर्पण' हे मुद्रण विषयक पुस्तकही लिहिले. निवृत्तीनंतरच्या नटाची उपजिविकेची तरतूद केली. १९०७ मधे 'रंगभूमी' मासिक सुरू केले. बारा वर्षे चालविलेल्या या मासिकात रंगभूमिविषयक लेख, पत्रव्यवहार, चर्चा प्रसिध्द होत असे. कर्तबगार कलावंतांची चरित्रे, नाटकांची परीक्षणे त्यात येत असत.नाट्य व्यवसायाला नवी दृष्टी, नवी दिशा देण्याचा प्रयत्न 'रंगभूमी'ने केला.

श्री. शंकररावांनी कलाकारांची चरित्रे लिहून प्रसिध्द केली. त्यात किर्लोस्करांसारखे आद्य नाटककार होते आणि गॅरिकसारखे पाश्च्यात्य कलाकारही होते.समाजात नटाला मानाचे स्थान नसायचे ते श्री. मुजुमदारांच्या अशा उपक्रमांनी मिळू लागले.

मराठी रंगभूमीवर कालिदासादी संस्कृत नाटककारांची नाटके गाजत असतांनाच श्री. मुजुमदारांनी शेक्सपीअरसारख्या प्रसिध्द पाश्चात्य नाटककाराची अनुवादीत, रुपांतरीत नाटके रंगभूमीवर आणण्याचा पायंडा पाडला.

रंगभूमी समृध्द करण्याचा प्रयत्न करत असतानाच रंगभूमीला मोठ्या शहरात स्वत:चे घर असावे म्हणून पुण्यात मोक्याच्या ठिकाणी प्रशस्त नाटकगृह उभारले. नाटक मंडळींच्या मालकीचे किर्लोस्कर हे पहिले नाटकगृह. नंतरच्या काळात श्री. बाबाजीराव राणे यांनी आपल्या 'संत तुकाराम' नाटकाच्या अपूर्व यशातून कल्याण येथे 'तुकाराम' नाट्यगृह बांधले.

'कुलीन स्त्रिया विरुध्द रंगभूमी', 'मिस्टरीज् ऑफ लंडन', 'मुद्रण दर्पण' भाऊराव कोल्हटकरांचे चरित्र आदी त्यांचे साहित्य प्रसिध्द आहे.

मराठी रंगभूमीची अभ्यासपूर्ण जाण करुन घेतलेला, इंग्रजी उत्तम येणारा, कलाकारांची काळजी वाहणारा असा चतुरस्त्र लौकिक असतानांच श्री. शंकर बापूजी मुजुमदारांनी भारतनाट्य समाजाची स्थापना करून नाट्य व्यावसायिकांची संघटना करण्याचा प्रयत्न केला. समाजाच्या वतीने नाट्यसंमेलने ठिकठिकाणी भरविली. सुरवातीच्या नाट्य संमेलनाचे सेक्रेटरी म्हणून त्यांनी या चळवळीत पुढाकार घेतला होता.




१४ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९१८.

अध्यक्ष : **बॅरिस्टर मुकुंदराव जयकर**

प्रायोजक : **डॉ. प्रताप मुळगांवकर, सौ. आशा मुळगांवकर,** मुंबई.

# बॅरिस्टर मुकुंदराव रामराव जयकर

## १३-११-१८७३ - १०-३-१९५८

चौदावे मराठी नाट्य संमेलन
महाराष्ट्र नाटक मंडळीच्या विद्यमाने
नूतन आर्यभूषण नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. त्र्यंबक सीताराम कारखानीस
दिनांक : २७ व २८ मे १९१८

नाटक हे करमणुकीचे साधन असल्यामुळे समाजातील सर्व थरातील लोकांचे ते एक आकर्षण केंद्र बनलेले आहे. नाट्यकलेने सर्वांनाच आपलेसे केले आहे. रंगमंचावरील हरकाम्यापासून कलाकार, पडद्यामागचे रंगकर्मी, लेखक-दिग्दर्शक हे जसे नाट्य व्यवसायाचे कर्तेकरविते आहेत तसेच अन्य व्यवसाय क्षेत्रातील आदरणीय व्यक्तिदेखील नाट्य व्यवसायाच्या आधारस्तंभ ठरलेल्या आहेत.

नाट्य संमेलनांच्या अध्यक्षांची नावे पाहिली तरी रंगभूमीच्या या मार्गदर्शक आधारस्तंभांच्या विविधतेची साक्ष पटेल. यात राजकारणी आहेत, शिक्षणतज्ञ आहेत, अन्य व्यवसायीही आहेत. अनेक रसिकजनांनी आपलेपणाने रंगभूमीची सेवा केली आहे.

अशा रसिकांमध्ये बॅ. मुकुंदराव जयकरांचे अग्रस्थान असणे हे नाट्य व्यवसायालाही अभिमानास्पद आहे, असे त्यांची निवड चौदाव्या नाट्य संमेलनाच्या पुण्याच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी झाल्यावर सर्वसामान्यांना वाटणे सहजस्वाभाविक आहे.

बॅ. जयकरांचे सर्व शिक्षण मुंबईत झाले. त्यांची वकिलीची सुरुवात आणि कारकीर्द मुंबईतच गेली. त्यामुळे चांगली नाटके पाहण्याची त्यांना संधी लाभली. पुणे विद्यापीठाच्या पहिल्या कुलगुरुपदाचा मानही त्यांना लाभला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात बॅरिस्टर जयकर म्हणाले, 'नाट्यव्यवसायासंबंधाने सुशिक्षित वर्ग तटस्थ आहे. तो आपली तटस्थता सोडायला तयार नाही, तोपर्यंत व्यवसायाची प्रगती होणार नाही. यासाठी सुशिक्षित लोकांशी मैत्री व सहकार्य नाटक मंडळ्यांनी साधले पाहिजे. नाटक मंडळ्यांनी आपले वर्तन सुधारले पाहिजे, सुशिक्षित समाजाशी सहवास साधला पाहिजे. नटाबद्दल या समाजात आज आदर नाही. त्याचे कारण नटाचे निकृष्ट वर्तन. आजच्या हिंदी संस्कृतीचे उज्ज्वल स्वरुप प्रेक्षकांपुढे मांडणे हेच नटवर्गाचे आद्य कर्तव्य होय. समाजातले हजारो स्त्री-पुरुष नाटक पाहण्यास येतात. नाटक हे समाजाचे सुसंस्कृत चित्र असेल तरच करमणुकीबरोबरच त्यांना शिक्षणही मिळणार आहे.'

न्यायालयीन क्षेत्रात नावलौकिक मिळवत असतानाच शिक्षण क्षेत्रातही त्यांनी भरीव कामगिरी बजावली. असे एकही क्षेत्र नव्हते की ज्यात बॅ. मुकुंदराव जयकरांचे नाव अग्रस्थानी नव्हते. अनेक मान-सन्मान आणि पुरस्कार मिळवत असतानाच मराठी नाट्य सृष्टीने त्यांना १९१८ साली पुणे येथे महाराष्ट्र नाटक मंडळीने पुरस्कृत केलेल्या चौदाव्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन एक प्रकारे आपलाच गौरव करून घेतला.




१५ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९१९.

अध्यक्ष : **भारताचार्य चिं. वि. वैद्य**

प्रायोजक : **नासिक इंडस्ट्रीयल को-ऑप. इस्टेट लि.**, सातपूर, नाशिक-४२२ ००७.

# भारताचार्य श्री. चिंतामण विनायक वैद्य

## १८-१०-१८६१ - २०-४-१९३८

पंधरावे मराठी नाट्य संमेलन
राष्ट्रीय नाट्यशाळा यांचे विद्यमाने
नूतन आर्यभूषण नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. अनंत वामन बरवे
दिनांक : १२ व १३ मे १९१९

भारताचार्य श्री. चिंतामण विनायक वैद्य यांच्यासारख्या प्रकांड पंडिताच्या अध्यक्षतेखाली १९१९ चे नाट्य संमेलन पुणे येथे झाले. प्रख्यात न्यायतज्ञ म्हणून उज्जयनीच्या न्यायालयात सत्र न्यायाधीश या नात्याने सुमारे आठ वर्ष त्यांनी काम केले. त्या काळात सरन्यायाधीशाच्या श्रेष्ठपदापर्यंत ते पोचले होते. प्रकृती आस्वास्थ्यामुळे त्यागपत्र दिल्यानंतर, वयाच्या पंचेचाळीशीनंतर, त्यांनी रामायण-महाभारत यांच्या अभ्यासाला सुरुवात केली आणि सखोल चिंतनानंतर त्यांनी रामायण-महाभारताच्या संक्षिप्त पण अभ्यासपूर्ण आवृत्त्या प्रसिध्द केल्या. श्रीराम, श्रीकृष्ण यांची चरित्रे लिहिली. पौराणिक ग्रंथलेखनाबरोबरच सामाजिक, वैचारिक विषयांवर त्यांनी लिहिले. त्यांची 'दुर्दैवी रंगू' ही कादंबरी मराठी साहित्यामध्ये महत्वाचा ऐतिहासिक टप्पा ठरलेली आहे. 'संयोगिता' हे त्यांचे नाटक अभ्यासाचा विषय ठरले आहे. नाट्य-तंत्राच्या त्यांच्या अभ्यासाची प्रचिती १९१९ मध्ये पुण्यात राष्ट्रीय नाट्यशाळा संस्थेच्यावतीने भरलेल्या पंधराव्या नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनी केलेल्या अभ्यासपूर्ण भाषणावरून दिसून येते.

कीर्तन व नाटक यांची तुलना करताना अध्यक्ष म्हणाले, 'कीर्तनात वक्ता व श्रोता अशी द्वयी असते तर नाटकात नट, नाटककार व प्रेक्षक अशी त्रयी असते. नट व नाटक यापेक्षा ते नाटक पाहणारा जो द्रष्टा (प्रेक्षक) त्याचा अधिकार मोठा आहे. या द्रष्टांनी आपले कर्तव्य नीट बजावले नाही म्हणून आपल्याकडील नाट्यकलेची सुधारणा व्हावी तशी झालेली नाही. ही कला व शास्त्र फार जुनी आहेत. ब्रम्हदेवाने सांगितले व भरतमुनीने ते ऐकले अशी दंतकथा आहे. यातील भरत शब्द 'अभिनयवाची' आहे. ग्रीकापासून भारतीय लोकांनी नाट्यकला घेतली ही पाश्चात्य विचारसरणी कशी भ्रामक आहे हे सांगून अध्यक्ष म्हणाले, 'मनोरंजन आणि नीतीचा पाया दृढ धरून मनात सद्गुणांचा प्रादुर्भाव उत्पन्न करणे हा नाटकाचा प्रधान हेतू होय. उत्तम नाटकाचा उत्कृष्टपणा म्हणजे ते पाहण्याने देशप्रीति, सत्यप्रेम, स्वार्थत्याग इत्यादी सद्गुणांचे बीजारोपण हृदयात होते. जर्मन लोकांना देशप्रीतीचे शिक्षण गेटीच्या नाटकांनीच दिले. 'हेन्रि दि फोर्थ' व 'फिफ्थ' ही शेक्सपिअरची नाटके देशभक्तीने ओथंबलेली आहेत. समाजाला उच्च व नीच स्थितीला नेण्याचा अधिकार नाटककारांचा आहे.'

नाटकातील संगीताबद्दल आपला अभिप्राय सांगताना श्री. वैद्य म्हणाले, 'नाटकात पदे असू नयेत' हे म्हणणे मात्र पसंत नाही. केवळ गद्याने प्रेक्षकांचे मनावर व्हावा तितका परिणाम होत नाही. गीत हे नाटकाचे प्रधान अंग आहे. कालिदास, भवभूति, गेटी, शेक्सपिअर यांची नाटके पद्यमयच आहेत. संगीतात गीत आणि भाषण या दोघांचाही अंतर्भाव आहे. नृत्य तितके आवश्यक आहे असे वाटत नाही. संगीत हे नादब्रम्ह आहे. परंतु जेव्हा एखाद्या प्रासादिक पदातील सुंदर उपदेश श्रोत्यांच्या मनावर ठसवावयाचा असतो तेव्हा नटाने शब्दाचे अर्थ लुप्त होतील अशा ताना घेत बसू नये.'

नाटक म्हणजे चित्र, सुंदर वचने, उत्कृष्ट देखावे व उदात्त मनोभाव इत्यादी जगातील उत्कृष्ट भागांचे एकीकरण असते हे अध्यक्षांनी 'शाकुंतल' नाटकातील उदाहरणे देऊन पटवून दिले.



१६ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९२०.

अध्यक्ष : **वीर वामनराव जोशी**

प्रायोजक : **गिल्टबर्ट ॲन्ड मॅक्सवेल ट्रान्सफॉर्मर्स प्रा. लि.**, ३५, आकांक्षा, सी-११, नाईस, सातपूर, नाशिक-७.

# वीर वामनराव गोपाळ जोशी

## १८-३-१८८१ - ३-६-१९५६

सोळावे मराठी नाट्य संमेलन
सिध्दराज प्रासादिक संगीत नाटक मंडळीच्या विद्यमाने
नूतन आर्यभूषण नाटकगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष :
दिनांक २४, २५ मे १९२०

अगदी मोजकीच, एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच नाटके लिहून, त्यातील फक्त दोनच नाटकांना अपूर्व कीर्ती मिळविणारी ठरावित असे भाग्य फक्त वीर वामनराव जोशी यांना लाभले.

श्री. वामनरावांनी 'शीलसंन्यास', 'धर्मसिंहासन', 'रणदुंदुभी', 'राक्षसी महत्वाकांक्षा' नाटके लिहिली. त्यातील 'राक्षसी महत्वाकांक्षा' आणि 'रणदुंदुभी' या दोन नाटकांनी दृष्ट लागावी असे यश मिळविले.

लोकमान्य टिळकांपासून स्फूर्ती घेऊन राजकारणात प्रवेश केलेले श्री. वामनराव जोशी त्यांच्या पत्रकारीतेने आणि ओजस्वी वक्तव्याने प्रसिध्दी पावलेले होते. नाटकाशी वा नाट्यसंस्थेशी त्यांचा निकटचा संबंध फारसा आलेला नव्हता.

ललितकलादर्शच्या श्री. केशवराव भोसले यांना नवे नाटक हवे होते. त्यांनी श्री. वामनरावांचे तळपत्या तलवारीसारखे तेजस्वी वक्तृत्व ऐकले होते. त्यांनी श्री. वामनरावांकडे नाटकाची मागणी केली. वामनरावांनी 'राक्षसी महत्वाकांक्षा' लिहून दिले. नाट्यतंत्राशी परिचित नसतांना श्री. वामनरावांनी नाटक लिहिले ते उर्दू रंगभूमीवर गाजत असलेले 'खूबसूरत बला' नजरेसमोर ठेऊन. २०-९-१९१३ ला ललितकलेने रंगभूमीवर आणलेल्या या नाटकाचे अमाप प्रयोग झाले. ललितकलेला लौकिक आणि अर्थिक लाभ प्रचंड झाला. 'राक्षसी महत्वाकांक्षा' हे भयंकर नावाचे नाटक त्यातील भाषाशैलीने, ठसठशीत व्यक्तीरेखांनी प्रेक्षकांची पकड घेतल्यामुळे गाजले. श्री. केशवराव भोसले यांच्यासाठी त्यात मृणालिनी ही व्यक्तीरेखा मुद्दाम लिहिली होती. त्यांची पदे 'विद्याहरण', 'मानापमान'मधल्या लोकप्रिय पदांवरच बेतलेली होती.

श्री. वामनराव जोशी हे काही कवी नव्हते पण कारणपरत्वे त्यांनी 'परवशता पाश दैवे ज्यांच्या गळा लागला' ही कविता केली होती. बलवंत नाटक मंडळीच्या विनंतीला मान देऊन श्री. वामनरावांनी 'परवशता' कवितेचे मध्यवर्ती कल्पनासूत्र धरून 'रणदुंदुभी' नाटक लिहिले. श्री. अच्युतराव कोल्हटकरांना हे नाटक अतिशय आवडले. त्यांनी श्री. चिंतामणराव कोल्हटकरांना सूचना केली की हे नाटक आधी पोलिसांकडून पास करवून घ्या. इतके जळजळीत देशप्रेमविषयक नाटक पास होईल की नाही अशी शंका आहे. पण एकाही शब्दाचा फेरफार न सुचवता नाटक मंजूर झाले. 'रणदुंदुभी' हे तत्कालीन राजकारणाचा आरसाच होते. १७-२-१९२७ ला हे नाटक रंगभूमीवर आले आणि उत्तरोत्तर गाजू लागले. 'परशवता पाश दैवे', 'दिव्य स्वातंत्र्य रवी' ही पदे घरोघरी गुणगुणली जाऊ लागली. 'जगी हा खास वेड्यांचा' पदाने प्रेक्षकांना वेडे केले.

पत्रकार, देशभक्त, योगायोगाने नाटककार झालेल्या आणि दोनच नाटकांनी कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालेल्या वीर वामनराव जोशी यांना १९२० साली पुणे येथे श्री सिध्दराज प्रसादिक सं. ना. मंडळीने आमंत्रिलेल्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले होते.



१७ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९२१. अध्यक्ष : **श्री. य. ना. टिपणीस**

प्रायोजक : **सौ. प्रिया टिपणीस,** सद्गुरु दर्शन, १०५०, न्यू प्रभादेवी रोड, मुंबई-२५.

# श्री. यशवंत नारायण टिपणीस

## ३-१२-१८७६ - २५-३-१९४३

सतरावे मराठी नाट्य संमेलन
दक्षिणी सुबोध ना. मं. यांचे विद्यमाने
किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष: श्री. शि. म. परांजपे
दिनांक २३, २४ मे १९२१

निर्माता, लेखक, अभिनेता, वेषभूषाकार आणि रंगभूषाकार या नात्याने श्री. य. ना. तथा आप्पा टिपणीस यांचा मराठी रंगभूमीशी घनिष्ट संबंध होता आणि या संबंधाचे आपल्या कर्तृत्वाने आप्पांनी चीज केले. श्री. टिपणीसांच्या अनेक कलांचे दर्शन रंगभूमीवर झाले आहे.

महाराष्ट्र नाटक मंडळी या गद्य नाटके करणाऱ्या संस्थेच्या संस्थापकांपैकी श्री. टिपणीस एक होते. या संस्थेत बहुतेक मंडळी महाडची होती आणि सारी सुशिक्षित होती. श्री. कृ. प्र. खाडीलकरांची गद्य नाटके महाराष्ट्र मंडळी प्रभावीपणे करत असे. श्री. खाडीलकरांचे नाटक हे मंडळीचे त्याकाळी वैभव मानले जात असे. श्री. खाडीलकरांच्या 'कांचनगडची मोहना'ने संस्थेची सुरूवात झाली. संस्थेच्या सर्व नाटकांमधून श्री. टिपणीस महत्वाच्या पुरूष भूमिका करत असत. 'भाऊबंदकी'तला आप्पांचा राघोबादादा तुफान गाजला.

श्री. य. ना. टिपणीसांनी पहिले नाटक 'कमला' लिहिले. मेरी कॅरोलीच्या 'थेल्माचा' त्याला थोडासा आधार होता. महाराष्ट्रच्या रंगमंचावर 'कमला' आले. पौराणिक-ऐतिहासिक नाटकांच्या ऐन बहरात साध्या घरगुती पोषाखातले आणि घरात नेहमी वापरली जाणारी साधी भाषा बोलणारे कलाकार पाहून त्या वेळच्या तरुणांना ते नाटक आपलेच वाटले.

महाराष्ट्र सोडून आप्पांनी जून १९१२ मध्ये भारत नाटक मंडळीची स्थापना केली. आपल्या संस्थेसाठी त्यांनी स्वत:च नाटके लिहिली. 'मत्स्यगंधा' ८-९-१९१२ रोजी रंगमंचावर आले. भीष्म प्रतिज्ञेवरच्या या पौराणिक नाटकातल्या शंतनूची वेषभूषा हायलंडर धाटणीची होती. ती भूमिका करणाऱ्या श्री. दादा प्रधानांना ती वेषभूषा शोभून दिसत असली तरी पौराणिक नाटकात ती विसंगत वाटत असे. पुढची 'राधा माधव', 'जरासंध' रंगभूमीवर गाजली. भारतने श्री. न. चिं. केळकरांचे 'तोतयाचे बंड', श्री. कोल्हटकरांचे 'वधू परीक्षा' ही नाटके रंगमंचावर आणली.

भारत सोडल्यानंतर आप्पांनी आर्यावर्त मंडळी काढली आणि आपले पहिले ऐतिहासिक नाटक 'चंद्रग्रहण' काढले. या नाटकातली शिवाजीची भूमिका आप्पांनी केली होती. त्यांना शोभून दिसणाऱ्या या भूमिकेची वेषभूषा त्यांनी स्वत: केली होती. मराठी रंगमंचावर अस्सल ऐतिहासिक स्वरूपात जिरेटोप घातलेला पहिला शिवाजी आला आणि तो जिरेटोप स्वत: श्री. आप्पा टिपणीसांनी तयार केला होता. 'चंद्रग्रहण'ने श्री. य. ना. टिपणीसांचा नाटककार म्हणून लौकिक वाढला. 'चंद्रग्रहण' खूपच यशस्वी झाले. त्या पाठोपाठ आप्पांनीच लिहिलेले 'राज्यारोहण' आले. 'कपिलाषष्ठी'नंतर आर्यावर्त बंद पडली.

गंधर्व मंडळीसाठी आप्पांनी "आशा-निराशा' लिहिले. ललितकलेने आप्पांची 'राज्यरोहण'चे 'शिक्का कट्यार' आणि 'चंद्रग्रहण'चे 'नेकजात मराठा' संगीत स्वरूपात सादर केली. रेडिओ स्टार्सने आणलेले 'स्वस्तिक बँक' चालले नाही. 'शहा शिवाजी' ललितकलेने केले. या नाटकातला शिवाजी गात असे.

नाट्य संस्था स्थापन करणे, नाटके लिहिणे, नाटकात भूमिका करणे एवढेच श्री. य. ना. टिपणीसांचे रंगभूमीवरचे कर्तृत्व नव्हते. पाश्चात्य पध्दतीचे ग्रीज पेन्टस तयार करून ती रंगभूषेसाठी वापरण्यास त्यांनी सुरूवात केली. ऐतिहासिक नाटकाला लागणारे मराठेशाही पध्दतीचे पोषाख त्यांनी तयार केले होते. शिवाजीचा जिरेटोप त्यांनीच रंगभूमीवर प्रचारात आणला.

पुणे ग्रेथे दक्षिणी सुबोध नाटक मंडळीच्या विद्यमाने १९२१ मध्ये भरलेल्या सतराव्या मराठी नाट्य संमेलनाचे श्री. य. ना. टिपणीस अध्यक्ष होते.




१८ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९२२. अध्यक्ष : **न्यायमूर्ती केशवराव कोरटकर**

प्रायोजक : **नाशिक इंडस्ट्रीयल को-ऑप. इस्टेट लि.**, सातपूर, नाशिक-४२२ ००७.

# न्यायमूर्ती श्री. केशवराव संतुकराव कोरटकर

## १६-६-१८६७ - २१-५-१९३२

अठरावे मराठी नाट्य संमेलन
भारत नाट्य समाजाच्या विद्यमाने
नूतन आर्यभूषण नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. अनंत वामन बरवे
दिनांक : ४ ते ६ मे १९२२

भारतावर ब्रिटिश शासनाची सत्ता असताना निजामी राजवटीचा मोठाच दबदबा होता. निजाम संस्थानच्या कारभारात बऱ्याच मराठी अधिकाऱ्यांचा भरणा होता. त्यांचे तेथे वर्चस्वही चांगले होते.

हैदराबाद संस्थानच्या मुख्य न्यायाधीशपदी श्री. केशवराव कोरटकर होते. त्यांचे इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि बंगालीवर चांगलेच प्रभुत्व होते. या भाषातल्या साहित्याचा त्यांचा अभ्यास लक्षणीय होता. विशेषत: बंगाली रंगभूमीशी ते अधिक परिचित होते. बंगाली रंगभूमी आधुनिकतेला अधिक जवळची होती. नवनवे प्रयोग बंगालच्या रंगभूमीवर होत असत. मराठी रंगभूमीच्या विकासासाठी बंगाली आणि मराठी रंगभूमीचा तौलनिक अभ्यास श्री. कोरटकरांनी केला होता. केवळ अभ्यास करून ते थांबले नाहीत तर आपल्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी जनजागृतीसाठी केला.

अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की, महाराष्ट्रातील नाटकांची सुधारणा पाहता हिंदुस्थानात बंगालशिवाय इतरत्र कोठेच इतकी सुधारणा झालेली आढळत नाही. नाटक हे केवळ मनोरंजनाचे साधन नाही. त्याने लोकशिक्षणही देता येते. नाटकाच्या योगाने समाजातील अश्लिलतेस आळा घालता येईल. अश्लिल नाटके व काव्ये यांवर निर्बंध घालण्यासाठी जबाबदार संस्था असणे इष्ट आहे. श्री. राम गणेश गडकरी यांच्या 'एकच प्याला' नाटकासंबंधी आपले विचार प्रदर्शित करतांना श्री. कोरटकर म्हणाले की, या नाटकाच्या नावात फारसा ध्वनी नाही, पण नाव सुंदर आहे. नावाची ही कल्पनाही नवीन आहे. कर्त्यानि नाटक लिहिताना 'मूकनायक' डोळ्यासमोर ठेवलेले दिसते. पात्रांची नावे रोमँटिक आहेत. पहिल्या अंकातील संविधानकाची सूचना मार्मिक वाटत नाही. केवळ शाब्दीक वाटते. पहिला अंक बराच पोचट व बेचव झालेला आहे. संविधानक सामान्य असले तरी त्याचे रहस्य चांगले बठवले आहे.

मराठी रंगभूमीवरील प्रेम आणि अभ्यास यांसाठी पुणे येथे १९२२ मध्ये भारत नाट्य समाजाने भरवलेल्या अठराव्या नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी श्री. केशवराव कोरटकर यांची निवड झाली होती.




१९ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९२३. अध्यक्ष : **श्री. श्री. नी. चाफेकर**

२२ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९२७.

प्रायोजक **: राजाराम जी. पाटील सीडस् प्रा. लि.**, नाशिक.

# श्री. श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर

एकोणिसावे मराठी नाट्य संमेलन
यशवंत सं. ना.मं. यांचे विद्यमाने
किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. नानासाहेब हर्डीकर
दिनांक : २५ व २६ मे १९२३

बावीसावे मराठी नाट्य संमेलन
आनंद संगीत नाटक मंडळीच्या विद्यमाने
किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. शिरगोपीकर
दिनांक : १० व ११ जुलै १९२७

मराठी रंगभूमीला विद्वान प्राध्यापक प्रारंभापासून नेहमीच आपलेपणाने मार्गदर्शन करत आले आहेत. प्रा. चिं. गं. भानू, श्री. मुकुंदराव जयकर, भारताचार्य चिं. वि. वैद्य आदी विद्वानांनी रंगभूमीच्या उत्कर्षासाठी आपल्या ज्ञानाचा लाभ मराठी रंगभूमीला दिलेला आहे. डेक्कन आणि फर्ग्युसन महाविद्यालयांमधील प्राध्यापक, प्रगाढ पंडित श्री. श्री.नी. चाफेकर यांना नाटकाची विशेष आवड होती. फक्त नाट्यप्रेमावरच ते थांबले नाहीत, तर उत्तम नाटक कसे असावे यांचा त्यांनी अभ्यास केला. त्या अभ्यासाचा उपयोग त्यांनी रंगभूमीवर कार्यरत असलेल्या नाट्यसंस्थांना, त्यातील अभिनेत्यांना मार्गदर्शन करण्यासाठी केला. आपल्या अभिनयातील जाणकारीही कलाकारांना अभिनयाचे पाठ देण्यासाठी उपयोगात आणली. त्यांच्या या ज्ञानाचा आणि मार्गदर्शनाचा रंगभूमीला चांगलाच फायदा झाला.

अध्यक्षीय भाषणात ते म्हणतात की, संगीतामुळे गद्य नाटक बिघडते असे नाही. गंभीर व मननीय विषय असलेल्या नाटकातही संगीत घातले तरी चालते. त्यामुळे रसहानी होण्याची भीती नाही. मात्र त्यातील संगीत योजना व्यवस्थित चपखल झाली पाहिजे.

इंग्रजीतील कॉमेडी व ट्रॅजेडी या शब्दांचे आनंदपर्यवसायी व शोकपर्यवसायी असे ढोबळ भाषांतर करण्यात येते. ते योग्य नाही. मनाला प्रसन्न करण्याच्या दृष्टीने लिहिलेली असतात अशा नाटकांना कॉमेडी म्हणतात. भव्योदात्त कल्पनेवर लिहिलेले आणि कारुण्याची छटा असलेले आणि अपेक्षित परिणाम घडविणारे नाटक ट्रॅजेडी होय. 'एकच प्याला' हे ट्रॅजेडीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. उत्कृष्ट नाटक कसे निर्माण होईल. याकडे लेखकाने लक्ष दिले पाहिजे. उत्कृष्ट नाटक निर्मितीसाठी प्रतिभा, परिश्रम, संविधानकचातुर्य, चित्ताकर्षता आणि परिणामकारकता हे गुण आवश्यक आहेत. 'क्रियेची समज्ञता' हे नाटकाचे प्रधान अंग आहे. ते व्यवस्थित साधले की नाटक लहान की मोठे हे पहाण्याचे कारण नाही. सध्याचे संगीत पेपरमिंटसारखे आहे. विरघळल्यावर त्यात हिणकसपणा आढळतो, संगीत कितीही घोळले तरी श्रोत्यांच्या मनावर त्याच्या अर्थाचा प्रकाश मुळी पडतच नाही असे आजचे संगीत आहे.

१९२३ च्या पुणे मुक्कामी यशवंत संगीत नाटक मंडळीने भरविलेल्या एकोणिसाव्या नाट्य संमेलनाचे आणि १९२७ च्या कोल्हापूर येथे बालनटांच्या आनंद संगीत नाटक मंडळी प्रायोजित बावीसाव्या नाट्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.




२० वे मराठी नाट्य संमेलन, सांगली, १९२४. अध्यक्ष : **श्री. बाबासाहेब घोरपडे**

प्रायोजक : **ॲडव्होकेट मधुसूदन करमरकर**, सांगली. **श्री. चिंतामणी दाते**, इचलकरंजी.

# श्री. नारायणराव गोविंदराव तथा बाबसाहेब घोरपडे

२५-११-१८७० - २१-१०-१९४३

विसावे मराठी नाट्य संमेलन
महाराष्ट्र नाटक मंडळी यांचे विद्यमाने
सदासुख नाट्यगृह, सांगली.
स्वागताध्यक्ष : श्री. गणपतराव बोडस
दिनांक : १२ व १३ मे १९२४.

ब्रिटिश राजवटीत संस्थाने आणि संस्थानिक यांना जनसामान्यात महत्वाचे, मानाचे स्थान होते. महाराष्ट्रातल्या संस्थानांमध्ये इचलकरंजी संस्थानने आपले एक वेगळे महत्व त्या काळी प्रस्थापित केले होते.

आपल्या संस्थानातल्या विविध स्वरूपाच्या संस्थांना श्री. बाबासाहेब घोरपडे यांनी मोलाचे सक्रीय मार्गदर्शन करून संस्थानचा लौकिक वाढवला होता.

श्री. बाबासाहेब घोरपडे यांचे वाचन जसे दांडगे होते तसा त्यांचा लेखनाचा व्यासंगही मोठा होता. त्यांनी अनेक इंग्रजी ग्रंथांची भाषांतरे केली. त्या काळच्या किर्लोस्कर, सह्याद्री आदी नियतकालिकांमधून त्यांनी वैचारिक लेखनही केले.

नाटकांची त्यांना विशेष आवड होती. शाहूनगरवासी, किर्लोस्कर, गंधर्व आदी त्या काळच्या नाट्यसंस्थांना आवर्जून आमंत्रित करून आपल्या जनतेसाठी त्यांच्या नाटकांचे खास प्रयोग ते करवून घेत असत. व्यावसायिकांप्रमाणेच हौशी नाट्यकलाकारांना त्यांनी सक्रीय प्रोत्साहन दिले. कलेचे ते मार्मिक, रसिक प्रेक्षक होते.

नाटककला पश्चिमेकडून आली असा लोकप्रवाद ऐकतो पण तो खरा नाही. काश्मीरचे पंडीत दत्तात्रय हे लिहीत असलेल्या एका नाट्यग्रंथात हा प्रवाद खोटा असल्याचे त्यांनी सिध्द केले आहे. नाट्यकला ही प्राचीन व या देशातलीच आहे. हल्लीच्या स्थितीतून हिचा उध्दार होण्यास भारत नाट्य समाजासारखी संस्था असणे अवश्य आहे. हे ठीक, परंतु संमेलनाचे घटक जे नाटककार, प्रेक्षक, नट, मॅनेजर व सरकार या परस्परात विरोध दिसतो. यांनी सलोख्याने घेतल्यास सर्वांचेच हित होईल.

नाटकाच्या सिध्दीची जबाबदारी नटांवर फार आहे. समाजासही फॅशन व पोशाखाच्या विविध तऱ्हा या नटांपासून प्राप्त होतात. अशा उपयुक्त वर्गाची हेळसांड समाजानेही करू नये. नटांप्रमाणे नाटककारांवरही ही जबाबदारी आहे. परिस्थिती बदलली आहे तेव्हां पूर्वीचीच नाटके त्याच स्वरूपात लोकांना आवडणार नाहीत. ती चटकदार, करमणूक करणारी व आटोपशीर असावीत.

महाराष्ट्र नाटक मंडळीने आयोजिलेले सांगलीचे १९२४ चे विसावे नाट्य संमेलन त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

१९४३ सली ५ नोव्हेंबरला सांगलीस मराठी रंगभूमीचा शतसांत्सरिक महोत्सव साजरा होण्यापूर्वी १५ दिवस आधीच श्री. नारायण घोरपडे २०व्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष हे नटराज चरणी विलीन झाले.




२१ वे मराठी नाट्य संमेलन, कोल्हापूर, १९२६. अध्यक्ष : **श्री. दादासाहेब फाळके**

प्रायोजक : **जयंत टिपणीस**, सद्गुरु दर्शन, १०५०, न्यू प्रभादेवी रोड, मुंबई-४०० ०२५.

# श्री. धुंडिराज गोविंद फाळके

## ३०-४-१८७० - १६-२-१९४४

एकविसावे मराठी नाट्य संमेलन
मनोहर स्त्री संगीत नाटक मंडळीच्या विद्यमाने
पॅलेस थिएटर, कोल्हापूर.
स्वागताध्यक्ष :
दिनांक : १८ जुलै १९२६

भारतीय नाटकाची जबरदस्त पीछेहाट चित्रपटाच्या आगमनाने झाली. कमी वेळातली आणि कमी खर्च करून पहायला मिळणारी जादूभरी करमणूक म्हणून सर्व प्रकारचा प्रेक्षकवर्ग चित्रपटाकडे आकृष्ट झाला आणि नाट्यगृहे ओस पडू लागली. ललितकला, बालगंधर्व, बलवंत यांच्यासारख्या मातबर नाट्यसंस्था चित्रपटाकडे वळल्या. नाटक व्यवसाय नामशेष होतो की काय अशी परिस्थिती चित्रपटव्यवसायाने निर्माण झाली.

भारतीय चित्रपटव्यवसायाचे जनक धुंडिराज गोविंद तथा दादासाहेब फाळके यांना मात्र हे विधान मान्य नव्हते. रंगभूमीच्या आधारानेच चित्रपट व्यवसाय तग धरू शकेल, नाटकातले अभिनयसंपन्न गुणी कलाकार चित्रपटात आले तर चित्रपट अभिनयपूर्ण होईल. मुक्या काळात चित्रपट कलाकाराला जे बोलायचे ते 'अभिनयाने बोलून' प्रेक्षकापर्यंत कथा पोहचवावी लागत असे. ते कार्य नाटकातलाच कलावंत अधिक सहजपणे आणि समर्थपणे करु शकतो. आजही बलराज सहानी, श्रीराम लागू, संजीवकुमार यासारखे रंगभूमीवर अभिनय शिकून संपन्न झालेले कलाकारच चित्रपटातल्या भूमिकेला योग्य न्याय देऊ शकतात, असे दिसून आले आहे.

चित्रपटाच्या या जनकाने 'रंगभूमी' नावाचे नाटक लिहिले होते. जुन्या काळच्या इंग्रजी चित्रपटांच्या सिरिअलप्रमाणे ते रंगमंचावर दोन हप्त्यात प्रयोगित करावे लागत असे. या नाटकाचे काही प्रयोग श्री. फाळके यांनी केले होते. १९२२ च्या सुमारास हे प्रयोग झाले होते

आजच्या 'हसवाफसवी' मधे दिलिप प्रभावळकर स्त्रीभूमिकेत प्रेक्षकांमधून रंगमंचावर आलेले दाखवलेले होते. आज वेगळा वाटणारा हा प्रयोग श्री. दादासाहेब फाळके यांनी 'रंगभूमी' च्या प्रयोगाच्या वेळी केला होता. नाटकमंडळीचा व्यवस्थापक रागावून पडदा उघडण्याची आज्ञा पडदेवाल्याला करतो. हळूहळू पडदा वर जाऊ लागतो. पण कुणी वेषभूषा करतो आहे, रंगभूषेला कुणी बसलाय, तर काही विड्या फुंकताहेत असे रंगमंचाच्या आतले दृश्य दिसू लागते. रंगभूमीवरच्या उणीवांचे दोषाचे दर्शन 'रंगभूमी' त विनोदी पध्दतीने श्री. धुं. गो. फाळके यांनी घडविले होते.

१९२६ साली कोल्हापूर येथे मनोहर स्त्री सं. ना. मंडळीने आमंत्रिलेल्या २१ व्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांना देऊन नाटक आणि चित्रपट यांचे संबंध जवळकीचे आहे हेच दर्शविण्याचा संयोजकांचा हेतू होता.



२३ वे मराठी नाट्य संमेलन, मुंबई, १९२८. अध्यक्षा : **श्रीमती गिरिजाबाई केळकर**

प्रायोजक : **दिलीप पाठक,** ५००, रविवार पेठ, नाशिक-४२२ ००२.

# श्रीमती गिरजाबाई केळकर

## १३-१०-१८८६ - २४-२-१९८०

तेविसावे मराठी नाट्य संमेलन
रंगबोधेच्छू नाट्य समाजाच्या विद्यमाने
बॉम्बे थिएटर, मुंबई.
स्वागताध्यक्ष : श्री. रघुवीर सावकार
दिनांक : २८ मे १९२८

बर्वे घराण्यातली द्रौपदी तिच्या वयाच्या पंधराव्या वर्षी श्री. महादेव चिंतामण केळकर यांच्याशी विवाह होऊन सौ. गिरजा केळकर झाली. केळकर घराण्याची प्रतिष्ठा मोठी होती. गिरजाबाईंचे शिक्षण फारसे झालेले नव्हते. पण त्यांना चांगले लिहिता येत असे. वयाच्या सतराव्या-अठराव्या वर्षी 'कुसुम' या टोपण नावाने त्यांनी एक कथा लिहिली. आणि ती प्रसिध्दही झाली. स्वत:च्या कर्तृत्वाने आणि बुध्दिमत्तेने गिरजाबाईंनी मोठा लौकिक मिळवला. त्यांच्या काळात शिकलेल्या स्त्रिया फारच कमी होत्या. आणि वक्त्याही फारशा नव्हत्या. श्री. केळकर जळगावास राहत. त्यांच्याकडे त्या काळातल्या प्रतिष्ठितांची, साहित्यिकांची ऊठबस असे. श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या आग्रहामुळे श्रीमती गिरजाबाईंनी अकोला येथे भरलेल्या संमेलनात जाहीर भाषण केले. आणि उत्तम व्याख्याती म्हणून नांव मिळविले ते वयाच्या विसाव्या वर्षी.

श्री. कृ. प्र. खाडिलकर यांनी लिहिलेले 'बायकांचे बंड' नाटक त्या काळात रंगभूमीवर येऊन गाजू लागले होते. गिरजाबाईंनी ते नाटक पाहिले आणि त्या नाटकाला सडेतोड प्रतिउत्तर म्हणून 'पुरुषांचे बंड' नाटक लिहिले. धुळ्याला त्याचा प्रयोगही झाला. त्यावेळी धुळेकर नागरिकांनी 'पहिली स्त्री नाटककार' म्हणून त्यांचा सत्कार करुन एक पदकही त्यांना दिले होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली, कित्येक व्याख्यानेही दिली. पुण्याच्या हिंदु महिला सभेच्या वेळी, शेवटच्या क्षणी त्यांना सभेचे अध्यक्षपद भूषवावे लागले. ऐन वेळी त्यांनी केलेले भाषण गाजले. नागपूरच्या हिंदू महिला सभेच्या अध्यक्षस्थानावरुन १९३८ मधे केलेले भाषणही उपस्थितांना आवडले होते. श्री. चिंतामणराव कोल्हटकरांनी आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे. 'या गिरजाबाई सनातनीपणाचा बडिवार माजवला नसता तर त्या आपल्या गुणांनी आणि कर्तबगारीने कॉंग्रेसच्या फार मोठ्या पुढारी झाल्या असत्या.'

श्रीमती गिरजाबाईंना गुजराथी चांगले येत असे. गुजराथी वक्तृत्वही त्या चांगलं करत. त्यांना इंग्रजीचे ज्ञान नव्हते. पण मराठीतल्या त्या काळातल्या वाचनाने त्या चांगल्या बहुश्रूत झालेल्या होत्या. केळकरांच्या घरात वाङमयीन वातावरण असल्यामुळे साहित्य आणि साहित्यिक यांच्याशी त्यांचा चांगला परिचय झाला.

या पहिल्या स्त्री नाटककाराचा गौरव मुंबई येथील १९२८ साली रंगबोधेच्छू समाजाने भरविलेल्या २३ व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन करण्यात आला.




२४ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९२९. अध्यक्ष : **श्री. बालगंधर्व**

प्रायोजक : **श्री. भालचंद्र पेंढारकर,** ई-८, प्रशांत हाऊसिंग सोसायटी, सेनापती बापट मार्ग, माटुंगा, (पश्चिम) मुंबई-१६.

# श्री. नारायण श्रीपाद राजहंस तथा बालगंधर्व

## २६-६-१८८७ - १५-७-१९६७

चोविसावे मराठी नाट्य संमेलन
बालमोहन नाटक मंडळीच्या विद्यमाने
विजयानंद नाटकगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. जगन्नाथमहाराज पंडीत
दिनांक : २१ जून १९२९

मराठी रंगभूमीचे ख्यातकिर्त भूषण श्री. नारायण श्रीपाद राजहंस तथा बालगंधर्व. रंगभूमीवर अनेक कलाकार आले. काही काळ त्यांनी गाजविला. काळाच्या पडद्याआड गेल्यावर क्वचितच कुणाचे आवर्जून स्मरण करावे लागले. पण बालगंधर्वांची विस्मृती रसिकाला कधीही होणार नाही.

केसरी कार्यालयात कु. श्रीपाद नारायण राजहंस यांचे गायन वयाच्या नवव्या वर्षी झाले. ते स्वर्गीय गायन ऐकून लोकमान्य टिळक उत्स्फूर्तपणे म्हणाले, 'हा बालगंधर्व कसा छान गातो आहे' त्या वेळेपासून राजहंसांचे बालगंधर्व झाले ते कायमचेच. १९०५ मध्ये किर्लोस्करच्या 'शाकुंतल' (तेव्हा त्याचे चार अंकच केले जात.) नाटकात त्यांनी शकुंतलेचे काम केले. पहिल्याच पदक्षेपात प्रेक्षकांनी पसंतीच्या टाळ्या दिल्या. आणि मग 'सौभद्र', 'वीरतनय', 'मूकनायक' आदी नाटकांची नायिका बालगंधर्व ठरून गेले. श्री. बालगंधर्वांच्या गोड गळयाने श्री. कृ. प्र.खाडिलकरांसारख्या, सहा गद्य नाटकांनी रसिक प्रिय झालेल्याला संगीत नाटक लिहिण्याची प्रेरणा मिळाली. 'संगीत मानापमान' १२-३-१९११ रोजी रंगभूमीवर आले. आणि त्याने रंगभूमीवर विलक्षण संगीत क्रांती केली. बालगंधर्वांची भामिनी एका रात्रीत रसिकांच्या कानात रमली. 'विद्याहरण'ही गाजले.

श्री. बालगंधर्व, श्री. गणपतराव बोडस, श्री. गोविंदराव टेंबे यांनी गंधर्व नाटक मंडळीची स्थापना ५-७-१९१३ रोजी केली. 'मूकनायक', 'संशयकल्लोळ ही नाटके गंधर्व मडळी गाजवत असतानाच श्री. खाडीलकरांनी खास बालगंधर्वांसाठी लिहिलेले 'स्वयंवर' १०-१२-१९१६थाटामाटात रंगभूमीवर आले. या नाटकामुळे श्री. बालगंधर्व आणि गंधर्व नाटक मंडळीची किर्ती चौफेर झाली. त्या काळात 'मानापमान' पेक्षाही 'स्वयंवर' संगीताने अग्रस्थान मिळविले. मराठी रंगभूमी आणि बालगंधर्व वैभवशाली झाले. 'गंधर्वांची' नाटके म्हणजे संपन्नतेचे, वैभवाचे भांडार ठरले.

याच रंगभूमीवर राम गणेशांचे 'एकच प्याला' आल्यावर दारिद्र्याचे दशावतारी सोसलेली दुर्दैवी सिंधू श्री. बालगंधर्वांनी तितक्याच सहजतेने साकार केली. भामिनी आणि सिंधू संपन्नता आणि दारिद्र्य-हातात हात घालून रंगभूमीचा शिखरसोपान झपाट्याने आक्रमू लागल्या.

मराठी रंगभूमीवरचे त्या काळातले प्रचंड खर्चाचे 'द्रौपदी' आले. 'द्रौपदी'च्या निर्मितीसाठी त्या काळात १९२० मध्ये - सत्तर हजार रुपये खर्च करण्यात आले होते. 'द्रौपदी'चे नेपथ्य, वेषभूषा, रंगभूषा पाहून प्रेक्षकांचे डोळे आश्चर्याने-आनंदाने दिपून गेले. याच काळात केशवराव भोसले-बालगंधर्व यांच्या 'संयुक्त मानापमान' आणि संयुक्त 'सौभद्र'चे दोन प्रयोग 'गंधर्व-ललितकला'ने सादर करून रंगभूमीवर एक नवा इतिहास प्रस्थापित केला.

'नंदकुमार', 'आशानिराशा' रंगभूमीवर आली. पण श्री. बालगंधर्वांचे 'मेनका' त्यातील पदांमुळे लोकप्रिय झाले. आतापावेतो रागदारी सुगमसंगीताने गुंजत ठेवलेली रंगभूमी 'संत कान्होपात्रा'च्या भजनीबाजाने दुमदुमली. 'कान्होपात्रा'तली भजने लोकप्रिय झाली. 'सावित्री' पाठोपाठ 'अमृतसिध्दी' मधे मीराबाई रंगमंचावर आली.

या काळात सगळीच रंगभूमी उतरत्या मार्गाला लागली. बालगंधर्वांनी चित्रपटात जाण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.पुन्हा 'गंधर्वमंडळी' सुरु केली. पण प्रयत्न करूनही बालगंधर्व पुन्हा पहिल्या उंचीला पोहचले नाहीत. त्यांची कीर्ती मात्र कायम राहिली.

मुंबई मराठी साहित्य संघाने १९४४ मध्ये नाट्यशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने मुंबईत नव्याजुन्या नाटकांचा भव्य नाट्योत्सव आठ हजार प्रेक्षक रसस्वाद घेऊ शकतील, एवढ्या भव्य प्रांगणात साजरा केला. या नाट्योत्सवाचे अध्यक्षपद देऊन बालगंधर्वांचा यथोचित सन्मान करण्यात आला होता.

बाल मोहन नाटक मंडळीच्या विद्यमाने पुणे येथे चोविसाव्य मराठी नाट्य संमेलनाचे १९२९ मधे भरलेल्या अधिवेशनाचे अध्यक्षपद श्री. बालगंधर्वानी भूषविले होते.



२५ वे मराठी नाट्य संमेलन, मुंबई, १९३०. अध्यक्ष : **श्री. अनंत हरि गद्रे**

प्रायोजक : **मुंबई मराठी साहित्य संघ,** डॉ. भालेराव मार्ग, मुंबई-४०० ००४.

# श्री. अनंत हरि गद्रे

## १७-१०-१८९० - ४-९-१९६७

पंचविसावे मराठी नाट्य संमेलन
बालमोहन नाटक मंडळीच्या विद्यमाने
बॉम्बे थिएटर, मुंबई.
स्वागताध्यक्ष: डॉ. विनायक बापूजी त्रिलोकेकर/श्री. अच्युतराव कोल्हटकर
दिनांक : ५ सप्टेंबर १९३०

श्री. अनंत हरि गद्रे यांना जाहीरात कौशल्याबद्दल 'जाहिरात जनार्दन' पदवी दिली होती. श्री. गद्रे हे विविध वाक्प्रचारांचे विलक्षण भांडार होते. 'तडाखेबंद तिकिटविक्री', 'निर्भिडपणे गर्जून' आणि आज सर्व परिचित असलेला 'हाऊसफुल्ल' असे अनेक वाक्प्रचार वृत्तपत्रसृष्टीत श्री. गद्रे यानी रुढ केले. आचार्य अत्रे यांच्या 'भ्रमाचा भोपळा'ची जाहिरात डोक्यावर भोपळा घेतलेल्यांच्या मिरवणुकीने त्यांनी केली होती. संत नामदेव चित्रपटाची जाहीरात 'नामदेवाने विठ्ठल मंदिर गरगरा गरगरा गरगरा फिरवले' अशी गरगरा शब्द अनेक वेळा वापरुन केली होती.

पुण्यात त्यांनी सुगंधी सामानाचे दुकान काढले होते. या दुकानात बसल्याबसल्या त्यांनी 'भवानी तलवार', 'स्वराज्य सुंदरी', 'माझा देश' इत्यादी नाटके लिहिली आणि आपल्या स्वतःच्या 'हिंद नाटक समाज' संस्थेच्या रंगमंचावर सादर केली.श्री. शं, नी. चाफेकर याच संस्थेच्या प्रयोगातून पुढे आले.

१९३०-३१ च्या सुमारास चित्रपटांच्या झंझावाती आक्रमणामुळे नाटकांना गर्दी होईना. चार पाच तास चालणाऱ्या नाटकांपेक्षा दीड दोन तास चालणाऱ्या चित्रपटांकडे प्रेक्षक वळले. श्री. अनंत हरि यांनी 'मुंबई नाटिका संगीत मंडळी' स्थापन करून एकदीड तासाच्या छोट्या छोट्या खुसखुशीत नाटिका रंगमंचावर आणल्या. चित्रपटगृहात चित्रपट नसेल त्या वेळी या नाटिका होत असत. दिवसातून तीन तीन प्रयोग त्यांनी केले आणि नाटकाकडे प्रेक्षक वळवण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

मुंबईला त्यांनी मौज साप्ताहिक सुरु केले. नंतर 'नवी मौज' काढले. 'निर्भीड' या साप्ताहिकाने काही काळ गाजवला. श्री. गद्रे यांच्या भाषाशैलीवर श्री. अच्युत बळवंत कोल्हटकरांची दाट छाया पडलेली होती. त्या भाषेमुळे त्यांचे लेखन खुसखुशीत, चटकदार होऊन वाचकांना आवडत असे. नाटिकांप्रमाणेच अनेक वादविवादही श्री. अनंत हरि गद्रे यांनी गाजविले. श्री. सोहराब मोदींच्या मिनर्व्हा मुव्हीटोनचे ते प्रसिध्दी प्रमुख होते. श्री. मोदी त्यांना मान देत असत.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या वतीने १९४३ पासून नाट्योत्सव होत असे. साहित्यिक-पत्रकारांच्या नाटकात त्यांनी भूमिकाही केल्या आहेत. नाटक, साहित्य, पत्रकारिता या क्षेत्रात श्री. अनंत हरि गद्रे यांचा राबता होता. सामाजिक कार्यातही ते हिरीरीने सहभागी होत असत. लोकमान्यांचा निष्ठावंत सेवक, श्री. अच्युत बळवंत कोल्हटकरांचा शिष्य-स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अस्पृश्योध्दाराच्या कार्यात आघाडीवर होता. त्यांच्या 'झुणका भाकर सहभोजना'च्या चळवळीमुळे त्यांना समतानंद म्हणत असत.

मराठी नाट्य संमेलनाच्या १९३० च्या, बाल मोहन मंडळीच्यावतीने मुंबई येथे भरलेल्या, रौप्यमहोत्सवी अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून श्री. अ. ह. गद्रे यांची निवड झाली होती.



२६ वे मराठी नाट्य संमेलन, मुंबई, १९३३.

अध्यक्ष : **श्री. ना. रा. बामणगांवकर**

प्रायोजक : **डॉ. सुधीर कुलकर्णी,** निरामय नर्सिंग होम, अद्‌वैत कॉलनी, कॅनडा कॉर्नर, नाशिक-२.

# श्री. नारायण रामलिंग बामणगांवकर

२६-६-१८८८ - ८-७-१९६१

सव्वीसावे मराठी नाट्य संमेलन
आनंद संगीत नाटक मंडळीच्या विद्यमाने
बॉम्बे थिएटर, मुंबई.
स्वागताध्यक्षः डॉ. मो. बा. वेलकर
दिनांक : १६ जून १९३३

यशस्वी पत्रकार, यशस्वी नाटककार झाल्याची उदाहरणे श्री. अच्युत बळवंत कोल्हटकर, श्री. कृ. प्र. खाडीलकर, श्री. न. चिं. केळकर, श्री. आचार्य अत्रे, श्री. मो. ग. रांगणेकर वगैरे आपल्या परिचयाची आहेत. प्रापंचिक अडचणी सोडविण्यासाठी ना. रा. बामणगावकर यांनी नाटके लिहिण्याचे ठरविले. 'तरुण हिंदू', 'राष्ट्रमत' 'उदय' या वृत्तपत्रांचे संपादन त्यांनी केले. 'लोकसंग्रह', 'केसरी', 'महाराष्ट्र', 'संदेश' या वृत्तपत्रामधूनही त्यांनी जनसेवेसाठी लेखन केले.

सीता स्वयंवराच्या कथाभागावर त्यांनी 'धनुर्भंग' नाटक लिहिले. १९१६ मधे रामनवमीच्या दिवशी ते रंगभूमीवर आले. पण थोड्याच प्रयोगांनंतर त्यावेळच्या मध्यप्रदेश शासनाने त्या नाटकावर बंदी घातली. त्यांचे 'आत्मतेज' नाटक द्रौपदी वस्त्रहरणाच्या कथाभागावर उभारलेले होते. नागपूर विद्यापीठाने ते पदवी अभ्यासक्रमास लावले होते. श्री. बामणगांवकर यांची ही दोन्ही नाटके त्यांच्या तेजस्वी लेखनशैलीमुळे गाजली.

शिवकालीन कथाभागावर आधारलेले ऐतिहासिक नाटक 'राष्ट्रध्वज' मात्र तितकेसे समाधानकारक झाले नव्हते.

मराठी नाट्य संमेलनाच्या १९३३ साली मुंबई येथे भरलेल्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते.



२७ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९३५. अध्यक्ष : **श्री. गोविंदराव टेंबे**

प्रायोजक : **गोविंदराव टेंबे सार्वजनिक प्रतिष्ठान**, मुंबई.

# श्री. गोविंदराव सखाराम टेंबे

## ५-६-१८८१ - ९-१०-१९५५

सत्ताविसावे मराठी नाट्य संमेलन
सोशल क्लब पुणे यांच्या विद्यमाने
विजयानंद नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष: श्री. श्री. नी. चाफेकर
दिनांक २५ ते २७ मे १९३५

मराठी रंगभूमीवर स्वरूपसुंदर देखणे कलावंत बरेच झाले. श्री. शं. बा. मुजुमदार, श्री. नानासाहेब जोगळेकर, श्री. वामनराव पोतनीस, श्री. बालगंधर्व, श्री. शं. नी. चाफेकर, श्री. बापू माने, श्री. गोविंदराव टेंबे आदी. पण यातील बहुतेकांनी स्त्री-भूमिका केल्या होत्या. श्री. जोगळेकर आणि श्री. टेंबे हे दोघे नायकाच्या राजस भूमिकेत शोभून दिसले.

सधन घरात श्री. गोविंदरावांचा जन्म झाला. चौदाव्या वर्षापासून त्यांचा हार्मोनियमवर हात बसला. त्यावेळी त्यांनी नाटके पहाण्यास सुरुवात केली ती त्यातील पदे हार्मोनियमवर वाजवता यावीत म्हणून. कोल्हापूरमधे ते वकिली करु लागले.

हार्मोनियम वादनामुळे त्यांचा त्या काळच्या बऱ्याच नाटक संस्थांशी घनिष्ठ संबंध आला. ललितकलेच्या श्री. केशवराव भोसले यांना त्यांच्या पहिल्या शारदेच्या भूमिकेची पदे श्री. टेंबे यांनी बसवून दिली. श्री. बालगंधर्वांनी 'मानापमान' साठी श्री. गोविंदरावांकडून चाली घेतल्या. गेली पंच्याऐंशी वर्षे रसिक प्रेक्षक 'मानापमान'ची गाणी ऐकत आले आहेत. मराठी संगीत नाटकात 'सौभद्र', 'मानापमान', 'संशयकल्लोळ' आणि 'कुलवधू' ही अविस्मरणीय संगीत नाटके आहेत.

श्री. नानासाहेब जोगळेकरांच्या आकस्मिक निधनानंतर 'मानापमान'मधे श्री. गोविंदराव धैर्यधर म्हणून उभे राहिले. बालगंधर्व-गोविंदराव ही जोडी रंगभूमीवर शोभून दिसली. विद्याहरणमधला कचही त्यांनी रंगवला. 'गंधर्व नाटक मंडळी'त ते भागीदार होते. नंतर त्यांनी स्वत:ची शिवराज मंडळी स्थापन केली. श्री. वासुदेवशास्त्री खरे यांची 'चित्रवंचना', 'कृष्णकांचन' हिंदी 'सिध्दसंसार', 'हिंदी मृच्छकटिक', उर्दू 'देशदीपक' इत्यादी नाटके त्यांनी रंगभूमीवर आणली, आणि गाजवली. मराठी नाटकाच्या इतिहासात बालगंधर्व, बोडस, दीनानाथ, चिंतामणराव कोल्हटकरांइतकेच गोविंदराव टेंबे यांचे स्थान महत्वाचे आहे.

श्री. गोविदराव संगीत देत तसेच पदेही लिहित. त्यांची पौराणिक 'पट-वर्धन', 'तुळशीदास' नाटके गाजली. 'तुळशीदास'मधले 'राम रंगी रंगले मन' आजही लोकप्रिय आहे.

मराठी चित्रपटाचे गोविदराव हे पहिले नायक. प्रभातच्या 'आयोध्येचा राजा', 'माया-मच्छिंद्र'चे ते नायक, संगीत दिग्दर्शक आणि पद्यलेखकही होते. अनेक चित्रपटांना त्यांनी संगीत दिले. रंगभूमीवर बालगंधर्व-टेंबे जोडी जमली तशीच चित्रपटात टेंबे-दुर्गा खोटे जोडी शोभून दिसली.

श्री. गोविदराव टेंबे यांनी इतर लेखनही बरेच केले आहे. 'जीवन विहार' आणि 'माझा संगीत व्यासंग' ही त्यांची आत्मचरित्रपर पुस्तके. त्यांनी रूपांतरीत केलेले 'वरवंचना' रंगबोधेच्छू समाजाने, 'वत्सलाहरण' आनंद संगीत मंडळीने आणि 'गंभीर घटना' हे रूपांतरीत नाटक समर्थ मंडळीने रंगभूमीवर आणली होती. यशस्वी नाटककार, गायक नट यांचेपेक्षाही संगीत दिग्दर्शक या नात्याने अधिक लौकिक श्री. गोविदरावांनी मिळविला.

मराठी नाट्य परिषदेचे सत्ताविसावे संमेलन सोशल क्लबच्या वतीने पुणे येथे १९३५ मध्ये भरवण्यात आले. या संमेलनाच्या अध्यक्षपदी श्री. गोविंदराव टेंबे यांची योजना झाली. श्री. टेंबे प्रथमपासूनच 'स्त्रियांनी रंगभूमीवर आले पाहिजे' या मताचे होते. या संबंधात त्यांनी लेखनही केले आहे. त्यांच्या या मतामुळे काहींचा त्यांच्या अध्यक्षपदाला विरोध होता. त्यांची निवड होऊ नये यासाठी 'आमच्या मुलीबाळींनी नाटकात जावे असे सांगणारा हा गृहस्थ अध्यक्ष होण्यास लायक नाही', अशा स्वरुपाचा प्रचार पत्रके काढून करण्यात आला होता.




२८ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९३६. अध्यक्ष : **श्री. शं. प. जोशी**

प्रायोजक : **श्री. अण्णा लोणारी,** तिडके कॉलनी, नाशिक-४२२ ००२.

# श्री. शंकर परशुराम जोशी

१८८० - १६-२-१९४९

अठ्ठाविसावे मराठी नाट्य संमेलन
बालमोहन संगीत नाटक मंडळी व सोशल क्लब पुणे यांच्या विद्यमाने
विजयानंद नाट्यगृह, पुणे.
स्वागताध्यक्ष: आचार्य प्रल्हाद केशव अत्रे
दिनांक ८ व ९ ऑगस्ट १९३६

श्री. शं. प. तथा बापूसाहेब जोशी हे व्यवसायाने वकील. वकिलीच्या व्यवसायात असूनही त्यांचा वाङमयाचा व्यासंग अव्याहास चालू असायचा. त्या व्यासंगातूनच श्री. शं. प. जोशी यांच्यामधला नाटककार उदयाला आला. त्यांनी पहिले नाटक 'विचित्रलीला' महाराष्ट्र नाटक मंडळीसारख्या नामवंत संस्थेने १९१६ मधे रंगभूमीवर आणले. यातच त्यांच्या नाट्यलेखनाची यशस्विता सिध्द झाली.

श्री. अण्णासाहेब कारखानीस 'विचित्रलीला' बसवू लागले. पण ते आजारी पडल्याने तालमींची जबाबदारी श्री. केशवराव दात्यांवर पडली. त्यांनी ती व्यवस्थित पार पाडली. नाटकाचे प्रयोग लागोपाठ होऊ लागले. उत्पन्न चांगले होऊन मंडळींचे कर्ज फिटून गंगाजळी भरू लागली.

या वेळपर्यंत गंधर्व मंडळीने आपला स्वतःचा एक मोठा प्रेक्षकवर्ग निर्माण केला होता. त्या प्रेक्षकांनाही 'विचित्रलीला' पसंत पडली. नट या नात्याने श्री. बालगंधर्व अधिक श्रेष्ठ की लीलेची भूमिका करणारे श्री. वामनराव पोतनीस श्रेष्ठ अशी चर्चाही प्रेक्षकात अहमहमिकेने सुरु झाली होती.

श्री. शं. प. जोशींचे दुसरे नाटक 'मायेचा पूत' महाराष्ट्रनेच १९२१ मधे रंगभूमीवर आणले पण त्या नाटकाला पाहिजे तेवढे यश लाभले नाही.

श्री. शं. प. जोशी यांचे पुढचे नाटक 'खडाष्टक' १९२७ मधे महाराष्ट्रनेच रंगभूमीवर आणले. प्रेक्षकांच्या सद्भिरुचीला किंचितसाही धक्का न लावता सतत सात्विक आनंद देणारे खडाष्टक नाटक होते. 'खडाष्टक' आजही लोकप्रिय आहे. त्याच्या घरगुती वातावरणामुळे, आसपास दिसणारा, आपल्या भोवती दिसणारीच पात्रे रंगभूमीवर पाहण्याचा एक आगळाच आनंद खडाष्टकमुळे प्रेक्षकांना लाभतो.

जोशीबुवांचे चौथे नाटक 'तो आणि ती' नाट्यकला प्रवर्तक नाटक मंडळीने १९३९ मधे केले पण ते यशस्वी झाले नाही. 'परलोक विद्या' विषयाचा श्री. जोशींचा अभ्यास चांगला होता. 'मानसशास्त्र' हा त्यांचा ग्रंथ प्रसिध्द आहे.

अठ्ठाविसावे मराठी नाट्य संमेलन पुणे येथे १९३६ मधे भरले होते. त्याच्या अध्यक्षस्थानी श्री. शं. प. जोशी होते.




२९ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९३८.　　　　अध्यक्ष : **श्री. मामा वरेरकर**

प्रायोजक : **मामा वरेरकर स्मारक निधी समिती**, मुंबई.

# श्री. भार्गवराम विठ्ठल तथा मामा वरेरकर

२७-४-१८८३ - २३-९-१९६४

एकोणतिसावे मराठी नाट्य संमेलन
अभिनव नाट्य मंडळ व सोशल क्लब यांचे विद्यमाने
भरत नाट्य मंदिर, पुणे.
स्वागताध्यक्ष: श्रीमती शकुंतलाबाई परांजपे
दिनांक १४ व १५ मे १९३८.

श्री. भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांनी सर्वार्थाने आयुष्यभर नाटकी संसार केला. शिक्षणाच्या काळात त्यांचे लक्ष अभ्यासापेक्षा अन्य वाचनाकडेच अधिक असे. नाटके वाचण्याचा त्यांचा छंद जबरदस्त होता. ते नाटके वाचत नसत, अभ्यासत असत. वडिलांनी त्यांना शाळेतून काढले आणि वैद्यकीय शिक्षणासाठी रत्नागिरीच्या सिव्हिल हॉस्पिटलमधे ठेवले. तेथे त्यांना रोग्यांच्या नाडीऐवजी वाचनाची नेमकी नाडी गवसली. डॉ. कीर्तीकरांच्या ग्रंथसंग्रहालयातील निवडक आणि नेमके डॉक्टरांनी त्यांना वाचायला लावले. 'डॉक्टरांसारख्या गुरुमुळे साहित्यनिर्मितीचे सामर्थ्य मला लाभले,' असे मामा कृतज्ञतापूर्वक म्हणत असत.

पुढे पोस्टात नोकरी करत असताना त्यांनी 'कुंजविहारी' लिहिले, स्वदेश हितचिंतक मंडळीने ते प्रयोगित केले. मामांचे हे पहिलेच नाटक लोकप्रिय झाले. श्री. विष्णुपंत पागनीस यांची गुजराथी वेषभूषा आणि गुजराथी चालीवरील गाणी यांमुळे मुंबईच्या गुजराथी समाजानेही नाटकाला गर्दी केली. 'हाच मुलाचा बाप' प्रथम श्री. नानबा गोखले गद्यस्वरुपात करत असत. श्री. केशवराव भोसले यांनी ते संगीत करून सादर केले. पाठोपाठ 'संन्याशाचा संसार' आले.

श्री. कृ. प्र. खाडीलकर हे जसे गंधर्व नाटक मंडळीचे नाटककार तसे श्री. मामा वरेरकर ललितकलादर्शचे एकमेव नाटककार त्या काळात ठरले. नाट्य संस्था आणि नाटककार एकमेकांना पूरक आणि प्रेरणादायी कसे ठरतात हे ललितकला आणि मामा यांच्या दृढ संबंधावरुन दिसून येते. रंगभूमीवरील नवनवे विविध प्रयोग हे एकमेकांच्या सल्ल्याने आणि सहकार्याने केल्यामुळे रंगभूमीची प्रगती होतेच पण संस्थेला आणि लेखकालाही मोलाचे मार्गदर्शन मिळते. सादरीकरणात आणि नेपथ्य-संगीतात जे भरीव नावीन्य आले. ते या लेखक-संस्था युतीमुळेच. मामांच्या 'स्वयंसेवक' पर्यंत ही प्रगती, हे प्रयोग सातत्याने झाले. छोट्या छोट्या नाटकांची सुरुवात करण्याची योजना ललितकलेने 'तुरुंगाच्या दारात' पासून केली. पण चार-पाच तासांची नाटके पहाण्याच्या प्रेक्षकांच्या सवयीमुळे ती तात्पुरती बारगळली.

रंगभूमीवर नावीन्य, लेखनात नवनवे विषय घेऊन सुधारणा करण्यासाठी मामांनी अथक प्रयत्न केले. जहाल टीकाही सोसली. सदतीस नाटके, सहा नाटिका आणि कथा-कादंबऱ्या इतके विपुल लेखन मामांनी नाटककार म्हणून केले. कादंबऱ्या, कथा इतर असे स्फुट लेखनही मामांनी खूपच केले. मामांच्या रहस्यकथाही लोकप्रिय झाल्या होत्या. उत्तम बंगाली साहित्य मामांनी मराठीत आणले. 'सत्तेचे गुलाम', 'भूमीकन्या सीता' ही त्यांची आणखी लक्षवेधी नाटके.

चित्रपटक्षेत्रातही श्री. वरेरकरांनी भरपूर लक्षणीय कामगिरी केली आहे. चित्रपटाचे लेखन तर त्यांनी केलेच पण काही मूक चित्रपटही त्यांनी दिग्दर्शित केले.

विषयातले वेगळेपण, विविधता हे श्री. वरेरकरांचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या साहित्यामधील अष्टावधानी संचारामुळे ते मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. राज्यसभेवर त्यांची नियुक्ती झाली. अभिनव नाट्य मंडळ व सोशल क्लब यांनी भरत नाट्य मंदिर पुणे येथे भरवलेल्या १९३८ च्या एकोणतिसाव्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्याना लाभले होते.




३० वे मराठी नाट्य संमेलन, नागपूर, १९३९.  अध्यक्ष : **श्री. त्र्यं. सी. कारखानीस**

प्रायोजक : **श्री. प्रफुल्ल कारखानीस,** वास्तुशास्त्री, तारा अपार्टमेंट, टिळकवाडी, नाशिक-४२२ ००२.

# श्री. त्र्यंबक सीताराम कारखानीस

१५-४-१८७४ - ८-१-१९५६

तिसावे मराठी नाट्य संमेलन
अभिनव नाट्यमंदिर यांचे विद्यमाने
नागपूर.
स्वागताध्यक्ष: अॅडव्होकेट ज. तु. केदार
दिनांक १४ व १५ जानेवारी १९३९.

मराठी रंगभूमीच्या इतिहासात रंगभूमीच्या प्रगतीला पायाभूत असणाऱ्या किर्लोस्कर, शाहूनगरवासी, गंधर्व, ललितकला अशा ज्या संस्था होत्या त्यात महाराष्ट्र नाटक मंडळी अग्रस्थानी आहे. सर्वसामान्य जनतेसमोर तेजस्वी आदर्श असावेत, चांगल्या संस्कृतीचा ठसा उमटावा, रसिली वाङमयीन अभिरुची निर्माण व्हावी अशा हेतूने महाराष्ट्र नाटक मंडळीची स्थापना महाडच्या काही तरुणांनी केली. या तरुणात श्री. य. ना. टिपणीस, श्री. मा. ना टिपणीस, त्यांचे चुलते श्री. गोविंदराव टिपणीस हे प्रमुख होते. श्री. मुळे, श्री. दत्तोपंत देशपांडे, श्री. त्र्यं. सी. तथा अण्णासाहेब कारखानीस यांचे सहकार्य त्यांना लाभले होते.

श्री. त्र्यं. सी. कारखानीस पुण्याच्या न्यू इंग्लीश स्कूलमधे शिक्षक होते. आपल्या उत्साही गावकरी तरुणांच्या अत्याग्रहाने नोकरी सोडून ते या संस्थेत सहभागी झाले. महाराष्ट्र मंडळीची ही संस्थापक मंडळी ध्येयवादी आणि सुशिक्षित होती. त्यात टिपणीस बंधू गावातल्या उत्साही नाट्यप्रयोगात काम करत. काही शिक्षक , काही स्वतंत्र व्यवसायी मंडळी होती. या तरुणांना प्रा. गो. चिं. भाटे, श्री. शिवरामपंत परांजपे यांचे पाठबळ मिळाले. फर्ग्युसन महाविद्यालयातील इंग्रजीचे प्राध्यापक श्री. वासुदेवराव पटवर्धन यांनी 'नोच्चार्धोविफलोऽपि दूषणपदं दुष्यस्तू कामो' हे ध्येयवाक्य संस्थेला दिले. दर्शनी पडद्यावर गंगावतरणाचा देखावा रंगविला होता. पुण्यातले विद्वान, राजकीय, सामाजिक नेते आणि सुसंस्कृत, घरंदाज, प्रतिष्ठितांना महाराष्ट्र मंडळीच्या कामाबद्दल सहानुभूती होती. मंडळीचा पहिला नाट्यप्रयोग श्री. खाडीलकरांच्या 'कांचनगडची मोहना'चा दि. १० सप्टेंबर १९०४ रोजी झाला. नाट्यसंस्थेचा स्थापना दिन म्हणून हाच दिवस संस्था साजरा करत असे.

श्री. त्र्यं. सी. कारखानीस संस्थेच्या नाटकातून महत्वपूर्ण भूमिका करत असत, त्यांना श्री. कृ. प्र. खाडीलकरांसारख्या कसबी तालीममास्तरांकडून अभिनयाचे पाठ मिळाले होते. संस्थेच्या दैनंदिन व्यवहारात कलाकारांवर त्यांचे सावध लक्ष असे. संस्थेतील सर्व मंडळींना श्री. अण्णासाहेब कारखानीसांबद्दल आदर असे. संस्थेत येणाऱ्या महत्त्वपूर्ण पाहुण्यांना आणि संस्थेच्या संबंधित साहित्यिकांना 'अण्णासाहेबांच्या अंगी काही विशेष वैशिष्ट्य आहे.' याची चांगली जाण असे. अण्णांचा तत्कालीन राष्ट्रीय चळवळीकडे स्वाभाविक ओढा असे. केवळ महाराष्ट्र नाटक मंडळीचेच नव्हे तर साऱ्या सुशिक्षित नाट्यव्यवसायी आणि हौशी मंडळींचे अण्णासाहेब गौरवस्थान-आशास्थान होते. महाराष्ट्र नाटक मंडळीला समाजात आणि व्यवसायात प्रतिष्ठा लाभली ती अण्णासाहेबांमुळे.

श्री. त्र्यं. सी. कारखानीसांनी 'राजाचे बंड' मोठ्या कसोशीने लिहिले आणि अथक परिश्रम घेऊन संस्थेच्या इतर काही नाटकांप्रमाणे तालमी घेऊन बसविले. या नाटकाचा विषय आणि नाट्य उच्चश्रेणीचे असूनही ते अपेक्षेइतके यशस्वी झाले नाही. महाभारतातील अंबाहरणाच्या कथाभागावर श्री. कारखानीसांनी 'स्वैरिणी' नाटक लिहिले. पण त्याचे प्रयोग होऊ शकले नाहीत. या नाटकाच्या प्रस्तावनेत श्री. कारखानीस म्हणतात:. 'असे विचारप्रवर्तक नाटक सध्याच्या आपल्या रंजनशील रंगभूमीवर आणले जाणे शक्य नाही'.

अभिनव नाट्य मंदिर संस्थेने बोलाविलेल्या तिसाव्या नाट्यसंमेलनाचे १९३९ मधे नागपूर येथे श्री. अण्णासाहेब कारखानीस अध्यक्ष होते.



३१ वे मराठी नाट्य संमेलन,नाशिक, १९४०. अध्यक्ष : **श्री. गणपतराव बोडस**

प्रायोजक : **दाजी भाटवडेकर,** भाटवडेकर वाडी, राजा राममोहन रॉय मार्ग, मुंबई-४०० ००४.

# श्री. गणेश तथा गणपतराव गोविंद बोडस

२-७-१८८० - २३-१२-१९६५

एकतिसावे मराठी नाट्य संमेलन
महाराष्ट्र नाट्य मंदिर यांचे विद्यमाने
न्यू इंग्लिश स्कूलच्या प्रांगणातील भव्य मंडपात, नाशिक.
स्वागताध्यक्ष : श्रीमंत सरदार विंचूरकर / श्री. वा. श्री. पुरोहित
दिनांक : २३ व २४ मार्च १९४०

फाल्गुनराव, शकार, सुधाकर ही रंगभूमीवरची व्यक्तीचित्रे श्री. गणपतराव बोडस यांच्या अभिनयाने अजरामर झाली आहेत. भूमिका समरसून करणे कलाकाराचे काम असते. श्री. गणपतराव बोडस यांनी आपल्या अनेक भूमिका यशस्वी केल्या. जे करायचे ते चांगलेच, उठावदार करायचे हा श्री. बोडसांचा स्वभाव होता. श्री. बोडसांना नाटकाचा नाद होता. गोवा संगीत नाटक मंडळीच्या 'विक्रमशशिकला' नाटकात सुमतीराणीचे काम करून श्री. बोडस व्यावसायिक रंगभूमीवर आले. 'नाटकातच जायचे तर किर्लोस्करसारख्या मंडळीत जा,' असे त्यांच्या मातोश्रींनी त्यांना फक्त सांगितलेच नाही तर त्या संस्थेत त्यांना प्रवेशही मिळवून दिला.

लहानसहान स्त्री-भूमिका सुरुवातीला काही वर्षे केल्यावर श्री. गो. ब. देवलांनी त्यांना शकाराची भूमिका शिकविली, हीच त्यांची भूमिका हातखंडा झाली. 'मूकनायक' मधला प्रतोद, 'गुप्तमंजुष' मधील श्रृंगी या त्यांच्या भूमिका प्रेक्षकांनी पसंत केल्या.

'सौभद्रा' तला श्रीकृष्ण त्यांनी स्वत:च बसवला. कृष्णाची भूमिका त्यांची कायमची झाली. गायकी गळा नसताही ते कृष्णाच्या पदांना वन्समोअर मिळवित असत. श्री. खाडीलकरांच्या 'मानापमान' चे त्यांनी संस्थेत सर्वांसाठी वाचन अशा वैशिष्ट्याने केले की लक्ष्मीधराचे (प्रथम या पात्राचे नांव मुकुटधर होते.) काम चिंतोबा गुरवांकडून काढून श्री. बोडसांना दिले आणि श्रीमंतीचा देखावा करणाऱ्या लक्ष्मीधराच्या भूमिकेचे श्री. गणपतराव बोडसांनी सोने केले. 'विद्याहरण' मधला शिष्यवरही त्यांनी गाजवला.

श्री. गो.ब. देवलांचे 'फाल्गुनराव' संगीत करुन 'संशयकल्लोळ' नावाने गंधर्व मंडळीने रंगभूमीवर आणले. श्री. गणपतरावांनी फाल्गुनराव चिरंजीव केला. हा संगीत फाल्गुनराव श्री. गणपतरावांनंतर गद्यच राहीला. गाणारा फाल्गुनराव करण्याचा प्रयत्न पुढे कुणीच केला नाही. मात्र श्री. गणपतरावांच्या अभिनयाचे अनुकरण कायम चालूच राहिले.

श्री. गणपतरावांनी विनोदी वळणाच्याच भूमिका केल्या आणि गाजविल्या असे नाही. 'एकच प्याला' तली सुधाकरची धीरगंभीर नायकाची भूमिका यशस्वी करुन सुधाकर म्हणजे गणपतराव असे समीकरणच व्यवसायात कायमचे करून ठेवले. किर्लोस्कर, गंधर्व अशा संस्थांच्या नाटकांच्या तालमी कशा कसोशीने घ्याव्यात याचे पाठ श्री. गो. ब. देवल यांच्याकडून निष्ठेने त्यांनी घेतले होते.

१९२३ नंतर श्री. बोडस कोणत्याही नाट्यसंस्थेमधे पगारी राहीले नाहीत. नाईटवर ते काम करू लागले. त्यांनी नाट्यव्यवसायात हा एक नवा पायंडा पाडला. तो आता रूढ झाला आहे. नाट्यव्यवसायावर मंदीचे संकट आल्यावर काही नाट्यसंस्थांचे चित्रसंस्थात रूपांतर झाले. काही कलाकार चित्रपटव्यसायात गेले. श्री. गणपतराव बोडसांनी 'मराठ्याची मुलगी', 'सुवर्णमंदीर' चित्रपटात भूमिका केल्या पण बालगंधर्व ('धर्मात्मा', 'साध्वी मीराबाई') हिराबाई बडोदेकर ('सुवर्ण मंदिर', 'प्रतिभा') यांच्याप्रमाणेच चित्रव्यवसायाचे तंत्र त्यांनाही अवगत करता आले नाही.

'माझी भूमिका' हे त्यांनी लिहिलेले रंगभूमीवरील कलाकाराचे पहिले आत्मचरित्र या संमेलनात प्रकाशित झाले. त्याच्या दोन आवृत्या प्रसिध्द झाल्या.

नाशिक येथे १९४० मधे महाराष्ट्र नाट्य मंदिरच्या वतीने भरवलेल्या एकतिसाव्या नाट्यसंमेलनाचे श्री. गणपतराव बोडस अध्यक्ष होते.




३२ वे मराठी नाट्य संमेलन, मुंबई, १९४१.

३८ वे मराठी नाट्य संमेलन, बेळगांव, १९५६

अध्यक्ष : **श्री. प्र. के. अत्रे**

प्रायोजक : **श्रीमती शिरीष पै,** श्रॉफ हाऊस, केळूस्कर रोड, (उत्तर) मुंबई-४०० ०२८.

# आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

## १३-८-१८९७ - १३-६-१९६९

बत्तीसावे मराठी नाट्य संमेलन
मुंबई मराठी साहित्य संघ यांचे विद्यमाने
विल्सन हायस्कूलमधील मंडप, मुंबई.
स्वागताध्यक्ष: श्री. श्री. वि. वर्तक
दिनांक २८ ते ३१ डिसेंबर १९४१

अडतिसावे मराठी नाट्य संमेलन
कलोपासक मंडळ बेळगाव, यांचे विद्यामाने
पार्वतीदेवी महाविद्यालय प्रांगण, बेळगांव.
स्वागताध्यक्ष: श्री. वि. आ. नाईक
दिनांक ५ ते ८ जानेवारी १९५६

मराठी रंगभूमीवर हाताच्या बोटावर मोजता येणारी अष्टपैलू व्यक्तीमत्वे आहेत. त्यात आचार्य प्रल्हाद केशव अत्रे अग्रस्थानी आहेत. कवी, नाटककार, पत्रकार, खंदे वक्ते, राजकारणी, जागृत समाजसेवक, शिक्षण तज्ज्ञ, चित्रपट निर्माते, लेखक, दिग्दर्शक आदी गुणांनी आचार्य अत्रे परिपूर्ण होते. ज्या ज्या क्षेत्रात त्यांनी पदक्षेप केला ते ते क्षेत्र ते जिंकतच गेले. काही क्षेत्रात तर ते अनभिषिक्त सम्राटच होते.

त्यातले एक क्षेत्र नाटक. कवी आणि विनोदी लेखक या नात्याने ते लोकप्रिय होतेच. नाट्यव्यवसायाचा सुवर्णकाळ त्यांनी पाहिला होता. चित्रपटव्यवसायाच्या आक्रमणाने आणि अन्य काही कारणांनी नाट्यव्यवसाय मरगळला होता. मोठमोठ्या संस्था बंद पडल्या होत्या. काहीकाही जगण्याची कशीबशी धडपड करत होत्या. फक्त लहान मुलांचीच असलेली श्री. दामुअण्णा जोशींची बालमोहन नाटक मंडळी अशीच धडपडणारी संस्था. नवे नाटक लिहून द्या म्हणून श्री. दामुअण्णा, श्री. अत्रे यांचा पाठपुरावा करू लागले. शेवटी 'साष्टांग नमस्कार' श्री. अत्र्यांनी लिहून दिले आणि बालमोहनने ते थाटामाटात पुण्याच्या विजयानंदच्या रंगमंचावर आणले आणि पहिल्या प्रयोगानेच 'साष्टांग नमस्कार'ने प्रेक्षकांना जिंकले. प्रेक्षक प्रथमच खदखदून हसू लागले.

आणि मग आचार्य अत्र्यांची घोडदौड सुरू झाली. विनोदी 'साष्टांग नमस्कार', कौटुंबिक वळणाची आणि समस्याप्रधान 'घराबाहेर', 'उद्याचा संसार' गर्दीत सुरू झाली. 'घराबाहेर' तर त्या काळात नाट्यगृहातूनच आकाशवाणीवरून ध्वनिक्षेपित करण्यात आलेले पहिले नाटक. 'भ्रमाचा भोपळा', 'मी उभा आहे', 'पराचा कावळा', 'वंदे भारतम्', 'कवडी चुंबक' आदी नाटके रंगभूमीवर आली. बालमोहनच्याद्वारे श्री. अत्रे यांनी रंगभूमीला नवे जीवदान दिले. श्री. अत्रे यांचे नाव मराठी नाटककारांच्या अग्रस्थानी आले. 'पराचा कावळा' नाट्यकला प्रवर्तकने रंगमंचावर आणले आणि या एका नाटकावर आपली मान उंचावली.

श्री. अत्रे यांनी एक प्रवेशी, एक अंकी नाटकांची प्रथा प्रचारात आणली, रूढ केली. पाच अंकी अनेक प्रवेशी नाटके प्रेक्षकांना कंटाळवाणी वाटू लागली असतानाच ही परंपरा सुरू झाल्याने नाटक अधिक सुकर झाले. श्री. अत्रे यांनी मराठी माणसाला मनसोक्त हसायला शिकवले आणि असे हसवताना ते कधी खालच्या पातळीवर आले नाहीत. मराठीत हास्यरस प्रथमपासून होताच पण तो संस्कृत नाटकातल्या विदूषकी वळणाचा होता. गंभीर आणि संगीत नाटकात हास्यरसाला वावच नसे. पण श्री. अत्रे यांनी विनोदाला विशेष प्राधान्य दिले तरी ते नाट्य संहितेला मारक ठरू दिले नाही.

मध्यंतरात आचार्य अत्रे यांनी चित्रपटसृष्टी गाजवली. अत्रे पिक्चर्सच्या 'श्यामची आई' या चित्रपटाला पहिले राष्ट्रपती पारितोषिक मिळाले होते. त्यांचे नाटकाकडे दुर्लक्ष झाले पण पुन्हा एकदा आचार्य अत्रे आखाड्यात उतरले. 'ब्रम्हचारी', 'प्रीती संगम' आदी नाटके त्यांनी गाजवली. 'मोरूची मावशी'ने पुन्हा एकदा 'साष्टांग नमस्कार'ची आठवण करून दिली. या दुसऱ्या कालखंडात त्यांनी स्वत:ची नाट्यसंस्था काढली, रंगभूमी गजबजून सोडली. श्री. मो. ग. रांगणेकरांनी त्यांच्याकडून 'तो मी नव्हेच' लिहून घेतले. या नाटकाने विक्रमी यश प्रास्थापित केले. अद्यापही ते गर्दी खेचते. 'लग्नाची बेडी', 'ब्रम्हचारी', 'मोरूची मावशी', 'तो मी नव्हेच' ही श्री. अत्रे यांची सदाहरित नाटके. 'सौभद्र', 'मानापमान', 'संशयकल्लोळ'च्या मानाच्या रांगेत जाऊन बसली आहेत.

आचार्य अत्रे यांना नाट्य नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मान दोन वेळा लाभला होता. १९४१ मध्ये मुंबई मराठी साहित्य संघाच्या आमंत्रणावरून मुंबई येथे भरलेल्या बत्तीसाव्या संमेलनानंतर पंधरा वर्षांनी १९५६ मध्ये बेळगाव येथील कलोपासक मंडळाने बोलावलेल्या अडतीसाव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षस्थान पुन्हा आचार्य अत्रे यांनी भूषविले होते.




नाट्यशताब्दी महोत्सव, सांगली, १९४३.

अध्यक्ष : **श्री. वि. दा. सावरकर**

प्रायोजक : **श्री. बांदोडकर, स्पेशल परपज मशिन्स,** ५३, आकांक्षा, सी-११, नाईस, सातपूर, नाशिक-७.

# स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

## २८-५-१८८३ - २६-२-१९६६

मराठी रंगभूमी शताब्दी समारंभ
स्थानिक नाट्य मंडळींच्या विद्यमाने
नाट्य विद्या मंदिराच्या नियोजित जागेवरील मंडपात, सांगली
स्वागताध्यक्ष : रावसाहेब वा. गो. भावे
दिनांक : ५ नोव्हेंबर १९४३

स्वातंत्रवीर वि. दा. सावरकर हे ज्वलजहाल क्रांतिकारक होते. लहानपणी मित्र मेळा, अभिनव भारत या क्रांतीसंघटनांमधून त्यांचा क्रांतिकार्याचा पाया घातला गेला. परदेशी कापडांची होळी त्यांनी पेटवली. त्याच्या ज्वाला ब्रिटिश शासनाला होरपळवू लागल्या. लंडनमध्ये श्री. मदनलाल धिंग्रांचे हौतात्म्य स्वा. सावरकरांच्या प्रेरणेतून झाले. त्यांच्या क्रांतीकार्यामुळे त्यांना अटक करण्यात आली. त्यातून सुटण्यासाठी त्यांनी सागरात घेतलेली उडी साऱ्या जगात गाजली. भारतात त्यांच्यावर झालेल्या अभियोगात त्यांना दोन जन्मठेपींची शिक्षा झाली. त्यातून मुक्त झाल्यावर मृत्युंजय स्वा. सावरकर हिंदुराष्ट्राची कल्पना घेऊन ठामपणे उभे राहीले आणि राजकारणाला एक तेजस्वी वळण त्यांनी लावले. हिंदूंचे बलशाली राष्ट्र उभारण्याच्या त्यांच्या मार्गात असंख्य अडथळे आले. पण ते आपल्या ध्येयापासून दूर झाले नाहीत. राष्ट्रासाठी आत्मार्पण करणारे स्वा. सावरकर खंदे लेखकही होते.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी लिहिलेली तीन नाटके 'उत्तरक्रिया', 'संन्यस्त खड्ग' आणि 'उःशाप'. नाट्यकला प्रसारक मंडळीने 'उशा:प' १९२७ च्या एप्रिलमध्ये रंगभूमीवर आणले. स्वा. सावरकरांना अस्पृश्यता मान्य नव्हती. सारा हिंदू एक आहे. ही त्यांची धारणा होती. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी त्यांच्या काळात विविध कार्यक्रम हाती घेतले होते. त्यात मंदिर प्रवेश, सहभोजन हे सर्वसामान्यांना सहजपणे पटतील, पेलता येतील असे प्रमुख होते. त्यांच्या प्रचारासाठी वृत्तपत्रातून ते लेखन करत असतानाच नाटक हे जनजागृतीचे प्रभावी माध्यम असल्यामुळे, अस्पृश्योध्दाराच्या तीव्र तळमळीतून 'उःशाप'ची निर्मिती झाली होती.

बलवंतसारख्या बलाढ्य संस्थेने बुध्द चरित्रातील एका महत्वाच्या सूत्रावर आधारलेले 'संन्यस्त खड्ग' सप्टेंबर १९३१ मधे प्रयोगित केले. बलवंतसारखी संस्था, मा. दीनानाथ, श्री. कृष्णराव कोल्हापुरे, श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांसारखे कसलेले कलाकार यांमुळे 'संन्यस्त खड्ग' यशस्वी झाले. 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले' या सूत्रावर नाटकाची उभारणी होती. ब्रिटिश शासनाशी सशस्त्र क्रांतिकारक लढा देत होते. जनजागृती करणाऱ्या नाट्यसंस्था त्यांना आपल्यापरीने सहकार्य देत होत्या. स्वा. सावरकरांसारख्या साहित्यिकांची त्यांना मदत होती. जनतेच्या मनात होते ते 'संन्यस्त खड्ग'मधील पुरुष वेषातील वल्लभपत्नी सुलोचना त्वेषाने गरजत होती. 'शरण नाही, रण.....मारीत मरण'. आणि ते ऐकताच डॉ. ना.भा. खऱ्यांसारखे कट्टर गांधीवादीही ताडकन उभे राहून खड्या स्वरात म्हणत होते, 'हे......... हे सांगणारा कोणी तरी पाहीजे.' स्वा. सावरकरांच्या नाटकाचे हे खरे यश.

पानिपतच्या पराभवाच्या प्रसंगावर आधारलेले पेशवेकालीन नाटक 'उत्तर क्रिया' भारतभूषण नाटक मंडळीने केले. (१९३३).

स्वातंत्र्यवीर सावरकरांची तीनही नाटके त्यांच्या कृती, उक्ती आणि लेखणीप्रमाणेच जळजळीत तेजस्वी होती. संस्कृतप्रचुर लांब लांब भाषणांमुळे कलाकारांना ती झेपण्यासारखी नव्हती.

'माझी जन्मठेप' हें अजरामर पुस्तक स्वा. सावरकरांचेच. या शिवाय अनेक स्वातंत्र्यवादी कविता, अनेक पुस्तके लिहून साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थानही त्यांनी भूषविले होते.

नाट्यशताब्दीनिमित्त सांगली येथे ५ नोव्हेंबर १९४३ भरलेल्या शतसांवत्सरिक सोहळ्याचे स्वा. सावरकर अध्यक्ष होते.




३३ वे मराठी नाट्य संमेलन, सांगली, १९४३.

अध्यक्ष : **श्री. ना. वि. कुलकर्णी**

प्रायोजक : **स्टॅटिक आर्ट,** २१, आकांक्षा, सी-११, नाईस, रस्ता क्र. ९, सातपूर, नाशिक-७.

# श्री. नारायण विष्णु कुलकर्णी

## २४-७-१८९२ - १२-१-१९४८

तेहतिसावे मराठी नाट्य संमेलन
स्थानिक नाट्य समितीच्या विद्यमाने
नाट्य विद्या मंदिराच्या नियोजित जागेतील भव्य मंडप, सांगली
स्वागताध्यक्ष : श्री. नरहर गणेश कमतनूरकर
दिनांक : ६ नोव्हेंबर १९४३

मराठी रंगभूमीवर एकाकाळी 'माईसाहेब' नाटक अतिशय गाजले. सावत्र आईने सावत्र मुलाच्या केलेल्या छळणुकीवर आधारलेले हे नाटक श्री. नानबा गोखले यांची लोकमान्य नाटक मंडळी करत असे. त्यावेळच्या प्रेक्षकांना ते चांगलेच प्रत्ययकारी वाटले आणि पाहतापाहता त्याचा बोलबाला झाला आणि ते गर्दी खेचू लागले. १९१९ मधे निघालेल्या या नाटकाचा प्रभाव १९५३ पर्यंत, सुमारे चौतीस वर्षे होता. १९५३ मधे त्या कथेवर मकरंद फिल्म्सने चित्रपट निर्माण केला होता. त्यावेळी त्याची पटकथा-संवाद श्री. पु. ल. देशपांडे यांनी लिहिली होती. संगीतही त्यांनीच दिले होते.

'माईसाहेब'चे यश आणि कीर्ती बालगंधर्वांच्या पक्की लक्षात राहीली होती. नंतर दहाबारा वर्षांनी बालगंधर्वांनी श्री. ना. वि. कुलकर्णी यांच्याकडून 'संत कान्होपात्रा' आवर्जून लिहून घेतले होते. बालगंधर्वांनी 'कान्होपात्रा' मोठ्या वैभवपूर्ण दिमाखात रंगभूमीवर आणले. चंद्रभागातीरावरील पांडुरंगाच्या मंदिराच्या दृश्याने प्रेक्षक भारावून गेले होते. 'संत कान्होपात्रा'तले अभंग आणि भजने खूपच लोकप्रिय झाली. त्या भजन-अभंग यांसाठी आजही ते अधून मधून रंगमंचावर येते. किर्लोस्कर मंडळी श्री. शंकरराव चाफेकरांनी चालवायला घेतल्यावर श्री. ना. वि. कुलकर्णी यांचे 'मंगलभुवन' घेतले. पण ते यशस्वी झाले नाही. नायक नवीन आणि कल्पना नायिका यांचे नाव घेऊन रंगभूमीवर आलेले 'संगीत नवीन कल्पना' पुण्यातील एका संस्थेने १९४२ मधे रंगभूमीवर आणले होते.

श्री. कुलकर्णी यांच्या घरची परिस्थिती गरीबीची होती. त्यामुळे त्यांचे शिक्षण कष्टानेच झाले. पण त्यांची लेखनशैली चांगली होती. त्यांनी सोळा कादंबऱ्या, अनेक कथा लिहिल्या. 'महाराष्ट्र कुटुंब माले'चे ते संपादक होते. या मालेतली पुस्तके मोठ्या प्रमाणावर वाचली जात. मराठीतील पहिला बोलपट 'आयोध्येचा राजा'चे संवाद श्री. ना. वि. कुलकर्णी यांचे होते.

६ नोव्हेंबर १९४३ मधे तेहतिसाव्या नाट्यसंमेलनाचे यजमानपद स्थानिक नाट्य समितीकडे होते. संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा सन्मान श्री. ना. वि. कुलकर्णी यांना लाभला.




३४ वे मराठी नाट्य संमेलन, जळगांव, १९४४. अध्यक्ष : **श्री. माधवराव जोशी**

प्रायोजक : **श्री. अशोक पाठक,** संकेत इलेक्ट्रीकल्स, १३६६-डी, टिळकवाडी कॉर्नर, नाशिक-२.

# श्री. माधवराव नारायण जोशी

## ७-१-१८८५ - १६-१०-१९४८

चौतिसावे मराठी नाट्य संमेलन
स्थानिक नाट्य समितीच्या विद्यमाने
नटवर नाट्यगृह, जळगांव
स्वागताध्यक्ष : श्री. नारायण श्रीपाद राजहंस - बालगंधर्व
दिनांक : २८ ते ३० डिसेंबर १९४४

१९१३च्या सुमारास मराठी संगीत रंगभूमीचा सुवर्णकाळ होता. त्या काळची संगीत रंगभूमी पौराणिक नाटकांनी बहरलेली होती. 'शाकुंतल', 'सौभद्र' प्रथमपासूनच संगीतप्रेमी प्रेक्षकांचे आवडते होते. 'मानापमान'ची मोहीनी' रसिकांना गुंगवत होती. ऐतिहासिक गद्य नाटकांचाही पगडा जनमानसावर होता. 'भाऊबंदकी', 'तोतयाचे बंड' आदी ऐतिहासिक नाटकांनी लोकप्रियता मिळविली होती. श्री. माधव नारायण जोशी यांनीही प्रथम 'कर्णार्जुन' आणि 'कृष्णविजय' ही दोन पौराणिक नाटके लिहिली होती. पण ती रंगभूमीवर तग धरू शकली नाहीत.

श्री. माधवरावांनी मग तिसराच मार्ग स्वीकारला. फक्त विनोदी, उपहासगर्भच नाटके लिहिण्याचे त्यांनी निश्चित केले. त्यांचे 'विनोद' नाटक नूतन संगीत मंडळीने १९१३मधे रंगभूमीवर आणले आणि सर्व पुण्यात एकच खळबळ उडाली. या नाटकात त्या काळातल्या समाजसुधारकांची यथेच्छ टवाळी करण्यात आली होती. तसेच श्री. खाडीलकरांच्या काही गीतांची फर्मास विडंबने होती. मराठी रंगभूमीवर अशाप्रकारचा विनोद प्रथमच येत होता. प्रेक्षक या वेगळ्या प्रकाराने भलताच खूष झाला. ते नाटक बंद पाडण्याचाही प्रयत्न झाला पण त्या प्रयत्नात यश आले नाही.

मराठी रंगभूमीवर प्रथमच आलेल्या या खळबळाटी नाटकाने अपूर्व यश मिळवले. श्री. माधवरावांनी सुमारे पंधरा-सोळा नाटके लिहिली. ही सर्व नाटके विनोदप्रधानच होती. 'विश्ववैचित्र्य', 'वऱ्हाडचा पाटील', 'पैसाच पैसा', 'मोरांचा नाच' वगैरे काही नाटके चालली. 'विनोद' इतकेच किंबहुना अधिकच लोकप्रिय झालेले श्री. माधवरावांचे नाटक 'स्थानिक स्वराज्य अथवा म्युनिसिपालिटी.'

१९२५ मधे 'म्युनिसिपालिटी' रंगभूमीवर आले. आणि अल्पावधीत अमाप लोकप्रिय झाले. हे नाटक नगरपालिकांच्या कारभारासारखेच अस्ताव्यस्त आहे. हे एक फर्मास व्यंगचित्र आहे. या नाटकाला नेहमीच्या नाटकांसारखे रूढ अर्थाने सलग असे कथासूत्र नाही. या नाटकात नायक नगरपालिकाच आहे आणि पांडोबा सोडून बाकी सर्व, नगरसेवक होऊ इच्छिणारी पात्रे खलनायक आहेत. अनेक खलनायकांभोवती-सजीव-नायकाविना-रंगवले जाणारे रंगभूमीवरील हे एकमेव नाटक असावे. नाटकभर खळखळून हसणाऱ्या प्रेक्षकांना शेवटी पांडोबा विचारतो. 'हसता कुणाला ? गेले पाच तास पंचवीस फूट लांबीचा आणि वीस फूट उंचीचा हा बिलोरी आरसा तुमच्या पुढे धरला होता. कुणाला हसता ? तुमचे तुम्हालाच? हसू नका ! तुम्हाला खंत वाटली पाहिजे, किळस यायला पाहिजे' नाट्यलेखनाची नेहमीची नेटकी चौकट झुगारून देऊन बहात्तर वर्षापूर्वी, वेगळ्या विचाराने नाटक लिहिणारे श्री.माधवराव जोशी उच्चविद्याभूषित नव्हते. मिलिटरी अकौंटसमधे नोकरी करता करता त्यांनी नाटके लिहिली. श्री. खाडीलकरांप्रमाणे स्वत:च्या नाटकांच्या तालमी स्वत: घेतल्या. रंगभूमीवर एक वेगळा पायंडा पाडला. जळगाव येथे भरलेल्या १९४४ च्या चौतिसाव्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षस्थान त्यांना लाभले होते.




३५ वे मराठी नाट्य संमेलन, अहमदनगर, १९४६.
३६ वे मराठी नाट्य संमेलन, कोल्हापूर, १९४९.

अध्यक्ष : **श्री. चिंतामणराव कोल्हटकर**

प्रायोजक : **प्रतिक इंम्पोटेक्स,** ११, पहिला मजला, सिल्व्हर प्लाझा, कॅनडा कॉर्नर, नाशिक-५.

# श्री. चिंतामण गणेश कोल्हटकर

## १२-३-१८९१ - २३-११-१९५९

पस्तीसावे मराठी नाट्य संमेलन
नाट्योत्तेजक मंडळाच्या विद्यमाने
राजविलास नाट्य मंदिर, मॉडर्न हायस्कूल, अहमदनगर.
स्वागताध्यक्ष: श्री. रावसाहेब पटवर्धन
दिनांक ४, ५, ६ मे १९४६

छत्तीसावे मराठी नाट्य संमेलन
करवीर नाट्य मंडळाच्या विद्यमाने
पॅलेस थिएटर, कोल्हापूर.
स्वागताध्यक्ष: श्री. भालजी पेंढारकर
दिनांक १४ जानेवारी १९४९

श्री. गणपतराव जोशी यांच्या अभिनयाचा जबरदस्त प्रभाव श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांच्यावर लहानपणीच पडला. शाळेच्या संमेलनप्रसंगी 'झुंजारराव'मधली झुंजाररावाची भूमिका त्यांनी त्यांच्याच प्रभावाने प्रेरीत होऊन केली.

महाराष्ट्र नाटक मंडळीत ते १९११ मध्ये गेले. श्री. राम गणेश गडकऱ्यांच्या 'प्रेमसंन्यास'मधली न्यायाधीशाची भूमिका त्यांनी प्रथम व्यावसायिक रंगभूमीवर केली. 'महाराष्ट्र'च्या 'मत्स्यगंधा', 'कमला', 'इंदिरा' आदी नाटकात त्यांना कामे मिळाली. किर्लोस्कर नाटक मंडळीत त्यांना 'पुण्यप्रभाव'मधील वृंदावनची प्रमुख भूमिका मिळाली. ती त्यांनी गाजवली.

श्री. दीनानाथ मंगेशकर, श्री. कृष्णराव कोल्हापुरे आणि श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांनी बलवंत नाटक मंडळी १९१८ मध्ये स्थापन केली. बलवंतने मातब्बर नाटककारांची नाटके रंगभूमीवर आणली. 'भावबंधन', 'राजसंन्यास'सारखी गडकऱ्यांची नाटके बलवंतने केली. 'भावबंधन'मधला श्री. चिंतामणरावांचा घनश्याम अजरामर झाला. बलवंतच्या इतिहासात, 'भावबंधन'च्या एकशे तेरा प्रयोगांचे एकूण उत्पन्न बहात्तर हजार नऊशे चोवीस रुपये झाले होते. हा त्या काळातला उच्चांकच आहे.

बलवंतने १९१८ ते १९३३ पंधरा वर्षे रंगभूमी दणाणून सोडली. यात सिंहाचा वाटा श्री. चिंतामणरावांचा होता. उर्दू 'ताजेवफा', हिंदी 'मानापमान' असे वेगळे प्रयोगही बलवंतने केले. बलवंतचे नंतर चित्रपट संस्थेत रुपांतर झाले, पण ते अयशस्वी ठरले.

श्री. चिंतामणराव कोल्हटकर हे कसबी आणि करडे तालीम मास्तर होते. अनेक नाटके त्यांनी कसोशीने बसविली. श्री. लोंढे यांच्या राजाराम नाटक मंडळीतही त्यांनी 'संगीत प्रेमसंन्यास' नव्याने बसविले. 'छापील संसार'सारख्या आधुनिक नाटकाचे दिग्दर्शनही त्यांनी केले.

ललित कला कुंज ही स्वत:ची नाट्य संस्था त्यांनी चालू केली होती. बदलत्या कालानुसार नव्या लेखकांची नवी नाटके त्यांनी रंगमंचावर आणली. श्री. ग. दि. माडगूळकरांचे 'युध्दाच्या सावल्या' त्यांनी केले. श्री. पु. ल. देशपांडे ललित कला कुंजच्या नाटकातून प्रथम रंगमंचावर आले. श्री. राम गणेश गडकरी यांचा सहवास श्री. चिंतामणरावांना लाभला.

श्री. चिंतामणरावांनी 'रामराज्य वियोग' आणि 'वेड्यांचा बाजार' ही अपूर्ण नाटके पुरी केली, रंगभूमीवर आणली. 'बहुरूपी' हे वेगळ्या स्वरुपाचे आत्मचरित्र त्यांनी लिहिले. त्या पुस्तकाला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांनी १९२४ मध्ये लिहिलेले कृष्ण जन्मावरचे नाटक 'संगीत पूर्णावतार' त्यांच्या जन्मशताब्दीच्या वेळी १९९० मध्ये 'मराठी प्रकाशन' नाशिक यांनी प्रकाशित केले. ते रंगभूमीवरही आले आणि त्यांचे काही प्रयोगही झाले. भारत सरकारने महावस्त्र, मानचिन्ह आणि सनद देऊन उत्कृष्ट अभिनेता म्हणून श्री. कोल्हटकरांचा सत्कार केला.

श्री. चिंतामणराव कोल्हटकरांनी लागोपाठ दोन वेळा नाट्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविले.१९४६ मधल्या नाट्योत्तेजक मंडळाने आयोजिलेल्या नगर येथील पस्तीसाव्या आणि १९४९ मध्ये कोल्हापूरच्या करवीर नाट्य मंडळाने पुरस्कारीलेल्या छत्तीसाव्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. कोल्हटकर होते.



३७ वे मराठी नाट्य संमेलन,पुणे, १९५४.

अध्यक्ष : **श्री. न. ग. कमतनूरकर**

प्रायोजक : **श्री. जयंत जातेगांवकर,** फ्रेन्डस सर्कल, ३०८, दीपज्योती अपार्टमेंट, नासिक-३.

# श्री. नरहर गणेश कमतनूरकर

## २८-५-१८९६ - १३-१२-१९६९

सदतिसावे मराठी नाट्यसंमेलन
सोशल क्लबच्या विद्यमाने
सोशल क्लबच्या हिरक महोत्सवी मंडपात, पुणे.
स्वागताध्यक्ष : प्रा. श्री. ना. बनहट्टी
दिनांक : १७, १८ एप्रिल १९५४.

श्री. राम गणेश गडकरी यांचा मराठी रंगभूमीवर जबरदस्त प्रभाव होता. त्या प्रभावाने भारलेली जी मंडळी होती त्यात श्री. नरहर गणेश कमतनूरकर ऊर्फ सरस्वतीकुमार अग्रस्थानी होते.

श्री. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्याने भारावलेल्या श्री. न. ग. तथा बन्याबापू कमतनूरकरांचा परिचय प्रत्यक्ष श्री. राम गणेशांशीच झाला. महाविद्यालयात असतानाच बन्याबापू त्या काळचे प्रसिध्द नियतकालिक मासिक मनोरंजनमधे गोष्टी लिहू लागले. सरस्वतीकुमार या टोपण नावाने त्यांनी बरेच लेखन केले.

मराठी नाटक त्या काळात बहरलेले होते. नवेनवे तरुण लेखक नाटककार होण्याचा कसून प्रयत्न करीत असत. श्री. गणपतराव बोडस यांनी श्री. कमतनूरकरांना नाटक लिहिण्यास प्रोत्साहन दिले. त्यांनी 'श्री' नाटक लिहिले. अश्वशर्यतीच्या हव्यासावर आधारलेले एक नावीन्यपूर्ण नाटक म्हणून ललितकलादर्शने 'श्री' नाटक रंगभूमीवर आणले. श्री. राम गणेश गडकऱ्यांच्या 'एकच प्याला'ची 'श्री' प्रतिकृती होती. त्यात रंगमंचावर अश्वशर्यत चित्रपटाच्या सहाय्याने दाखविलेली होती. एवढेच त्या नाटकाचे वेगळेपण होते. श्री. बापूराव पेंढारकर, श्री. विठ्ठल गुरव, श्री. नानासाहेब फाटक यांच्या भूमिका त्यात गाजल्या.

'सज्जन' ललितकलेने, 'स्त्री-पुरुष' हिराबाई बडोदेकरांच्या नूतन संगीत विद्यालयाच्या नाट्यशाखेने रंगभूमीवर आणले. 'मराठ्यांची मुलगी' या त्यांच्या कथेवरील चित्रपटात श्री. गणपतराव बोडस, श्री. परशराम सामंत, सौ. हिराबाई बडोदेकर या नाट्यकलावंतांच्या भूमिका होत्या. श्री. न. ग. कमतनूरकर यांनी बरेच ललित साहित्य सरस्वतीकुमार या नावाने लिहिले आहे.

पुण्याच्या सोशल क्लबच्या विद्यमाने पुणे येथे १९५४ मधे झालेल्या सदतिसाव्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. या संमेलनाचे उद्घाटन नटश्रेष्ठ श्री. पृथ्वीराज कपूर यांनी केले होते.




३९ वे मराठी नाट्य संमेलन, सोलापूर, १९५७. अध्यक्ष : **श्री. पार्श्वनाथ आळतेकर**

प्रायोजक : **क्राऊन मेटालर्जिकल्स प्रा. लि.**, एफ-१२४, एम.आय.डी.सी., सातपूर, नाशिक-७.

# श्री. पार्श्वनाथ आळतेकर

## १४-९-१८९८ - २२-११-१९५९

एकोणचाळीसावे मराठी नाट्य संमेलन
अभिनय साधना मंदिर यांचे विद्यमाने
भागवत चित्रमंदिर, सोलापूर
स्वागताध्यक्ष : श्रीमान रतनचंद हिराचंद दोशी
दिनांक : २२ व २३ डिसेंबर १९५७.

श्री. पार्श्वनाथ आळतेकर नाटक आणि चित्रपट दोन्ही क्षेत्रात लोकप्रिय होते. पण त्यांचे पहिले प्रेम आणि निष्ठा नाटकच होती. कोल्हापूरच्या महाविद्यालयातून पदवी प्राप्त केल्यावर कायद्याच्या अभ्यासासाठी ते मुंबईला आले. एल्फिंस्टन महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाच्या वेळी 'राजसंन्यास'मधल्या संभाजीची भूमिका त्यांनी केली. ती भूमिका पाहून मूक चित्रपटांचे त्या वेळी दिग्दर्शन करणारे श्री. नानासाहेब सरपोतदार चांगलेच प्रभावीत झाले. त्यानी लागलीच आपल्या संभाजीवरील नव्या चित्रपटात संभाजीची भूमिका त्यांना दिली. चित्रव्यवसायात त्यांचा प्रवेश काहीसा अनपेक्षित पण सहजगत्या झाला. चित्रपटात काम नसल्यावेळी ते नाटकाकडे धाव घेत.

नाट्यसृष्टीत त्यावेळी नव्याचे वारे नुकतेच सुरु झाले होते. श्री. के. नारायण काळे, श्री. अनंत काणेकर, श्री. श्री. वि. वर्तक, श्री. ग. य. चिटणीस आदी मंडळी या नवप्रवाहाच्या आघाडीची अग्रणी होती. 'नवे नाटक हवे मंडळी' असे नांव घेऊन रंगभूमीवर नवीन प्रयोग करायच्या ईर्षेने सज्ज झालेल्या 'नाट्य मन्वन्तर'मधे पार्श्वनाथांना प्रवेश मिळाला. मन्वन्तरच्या श्री. श्री. वि. वर्तकांच्या 'आंधळ्यांची शाळा' नाटकात त्यांना अण्णासाहेबांची महत्वपूर्ण भूमिका मिळाली. जोडीला होते श्री. केशवराव दाते, श्री. के. नारायण काळे, श्रीमती जोत्स्ना भोळे आदी. श्री. अनंत काणेकरही संस्थेत होते. नव्या उत्साही तरुणांच्या गटाला सुशिक्षित प्रेक्षकवर्गाची साथ मिळाली. पण हा प्रेक्षकवर्ग मर्यादित होता. त्यामुळे संस्था बंद करावी लागली.

चित्रपटात काम करत असतानाच, १९३९ मधे त्यांनी नॅशनल थिएटर अकादमी स्थापन केली. श्री. मामा वरेरकरांच्या प्रेरणेने त्यांनी लिटल थिएटरची स्थापना केली. पण नाट्य शिक्षणाच्या या प्रकल्पाला फारसे यश लाभले नाही.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या डॉ. अ. ना. भालेराव यांनी साहित्य संघाच्या काही नाटकांचे दिग्दर्शन त्यांच्यावर सोपविले. संघाच्या नाटकांमधे त्यांनी भूमिकाही केल्या. त्यावेळी त्यांचे 'उडती पाखरे'-लेखक मामा वरेरकर खूपच गाजले.

श्री. मो. ग. रांगणेकरांचे नाट्य निकेतन त्यावेळी चांगले चालत होते, त्यांच्या 'रंभा', 'लिलाव', 'अ-पूर्व बंगाल' आदी नाटकातून त्यांनी भूमिका केल्या. आधुनिक काळात नाट्यशिक्षणाकडे गांभीर्याने पाहून त्यात कार्यरत असणाऱ्यांमध्ये आळतेकर अग्रेसर होते. विशेषत: आवाजाचा वापर-निगा (व्हॉईस कल्चर) यात ते मार्गदर्शक म्हणून महत्त्वाचे होते

स्वातंत्र्योत्तर काळात प्रचारासाठी 'सर्वोदय कला मंदिर'ची स्थापना करण्यात आली. त्याची सूत्रे श्री. पार्श्वनाथ आळतेकरांकडे सोपविण्यात आली. पण ती योजना फलद्रूप झाली नाही. त्यांच्या 'रेजिसार'चा उपहासच करण्यात आला.

सोलापूर येथे १९५७ मधे अभिनय साधना मंदिर संस्थेच्या विद्यमाने भरलेल्या एकोणचाळीसाव्या मराठी नाट्य संमेलनाचे श्री. पार्श्वनाथ आळतेकर अध्यक्ष होते.




४१ वे मराठी नाट्य संमेलन, हैद्राबाद, १९५९.

अध्यक्ष : **श्री. नानासाहेब फाटक**

प्रायोजक : **मुंबई मराठी साहित्य संघ**, डॉ. भालेराव मार्ग, मुंबई-४०० ००४.

# श्री. गोपाळ गोविंद तथा नानासाहेब फाटक

## २४-६-१८९९ - ८-४-१९७४

एकेचाळीसावे मराठी नाट्य संमेलन
कला मंडळ व स्थानिक नाट्यसंस्था यांचे विद्यमाने
महाराष्ट्र सभागृह, विवेक वर्धिनी, हैदराबाद
स्वागताध्यक्ष : श्री. वासुदेवराव नाईक
दिनांक : ३० व ३१ डिसेंबर, १९५८, १ जानेवारी १९५९

पुण्यात शिकत असताना श्री. नानासाहेब फाटक यांनी नटश्रेष्ठ गणपतराव जोशी यांचे हॅम्लेट पाहिले आणि ते भारावून गेले. या नटसम्राटाप्रमाणे रंगभूमी गर्जून-गाजवून सोडायचा ध्यास त्यांना लागला. नाटके वाचायची, त्यांचे प्रयोग अभ्यासायचे असा छंदच त्यांना लागला. १९१५-१६ च्या सुमारास महाराष्ट्र हितचिंतक भ्रातृ मंडळ या हौशी मंडळीच्या 'सत्वपरीक्षा'मधे विश्वामित्राची खलनायकाची भूमिका त्यांनी केली. गणेश नाटक मंडळीच्या 'मत्स्यगंधा'मधे शंतनूच्या भूमिकेत ते व्यावसायिक रंगभूमीवर आले. श्री. वि. गो. शेटे यांच्या 'रक्षाबंधन'मधे गिरधरच्या भूमिकेने त्यांना लोकप्रियता मिळाली. त्यांच्या या लोकप्रियतेमुळेच श्री. केशवराव भोसले यांनी त्यांना ललितकलेत बोलावले. पण त्या वेळी तो योग जमला नाही.

श्री. गणपतराव जोशी यांनी आपल्या नाट्यसंस्थेत नानांना बोलावून घेतले. नानांना गुरुस्थानी असलेल्या श्री. गणपतराव जोशी यांच्या भूमिकांचा जवळून अभ्यास करण्याची चांगली संधी लाभली. अथेल्लो, मॅकबेथ, हॅम्लेट आपण कसा करतो हे गणपतरावांनी त्यांना समजावून सांगितले.

महाराष्ट्र नाटक मंडळीत त्यांना बोलावणे आले होते. पण त्यांनी नकार दिला. ते ललितकलेत गेले. 'राक्षसी महत्वाकांक्षा'मधली विक्रांतची दणदणीत भूमिका त्यांनी विलक्षण ताकदीने केली. श्री. मामा वरेरकरांच्या 'संन्याशाचा संसार'मधे शंकराचार्य, 'सत्तेचे गुलाम'मधला खलप्रवृत्तीचा वकील केरोपंत आदी भूमिकांनी त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. श्री. राम गणेश गडकऱ्यांच्या सहाव्या पुण्यतिथीला 'पुण्यप्रभाव'च्या प्रयोगात वृंदावन त्यांनी केला. ती त्यांची भूमिका इतकी हातखंडा ठरली की ते ती भूमिका त्यांच्या वृध्दापकाळापर्यंत पहिल्याच तडफेने करीत असत. 'श्री'तला कुसुमाकर आणि 'सोन्याचा कळस'मधला कामगार बाबा शिगवण त्यांनी गाजवला.

१९३२ मधे ललितकला सोडल्यावर काही वर्ष त्यांनी मुक्तपणे (फ्री लान्स) नाईटवर कामे केली. नंतर बालमोहनमध्ये ते पगारावर राहीले. 'जग काय म्हणेल'मधे दिवाकर, 'पाणिग्रहणा'तली पापडवाला घोडके ही विनोदी भूमिका त्यांनी केली. गमतीखातर 'लग्नाची बेडी'त कांचनही रंगवला. बालमोहनशी त्यांचा दोन वर्षाचा करार संपताच पुन्हा ते मुक्तपणे कामे स्वीकारू लागले.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्योत्सवात 'भाऊबंदकी'च्या प्रयोगात त्यांनी राघोबादादा फर्मास रंगवला. जोडीला श्रीमती दुर्गाबाई खोटे आनंदीबाई झाल्या होत्या. अखिल भारतीय नाट्यस्पर्धेमध्ये, दिल्ली येथे या नाटकाचा पहिला क्रमांक लागला. त्यावेळी सर्वांचा सन्मान करण्यात आला. 'एकच प्याला'त सुधाकर, 'राजसंन्यास'मधला पहिलवान देहू, 'मृच्छकटिका'त मैत्रेय अशा अनेकविध भूमिका नानासाहेबांनी सहजतेने केल्या.

कमावलेली धिप्पाड बांदेसूद रेखीव शरीरयष्टी, आवाजावर जबरदस्त हुकूमत, भूमिकेला योग्य न्याय देण्याची प्रथमपासून प्रवृत्ती यांमुळे वयाच्या सत्तरीपर्यंत नानासाहेबांनी रंगभूमीवर सहजतेने संचार केला. रसिक प्रेक्षकांचे प्रेम भरभरून त्यांना नेहमीच लाभले. आदर्श गद्यनटाचा मानदंड त्यांनी निर्माण केला. ते खऱ्या अर्थाने 'नटसम्राट' होते.

हैदराबाद येथे कलामंडळ आणि स्थानिक नाट्यसंस्था यांच्या निमंत्रणावरून १९५८-५९ मधे भरलेल्या एकेचाळीसाव्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी श्री. नानासाहेब फाटक होते.




४२ वे मराठी नाट्य संमेलन, बडोदे, १९६०. अध्यक्ष : **श्री. वसंत शांताराम देसाई**

प्रायोजक : **देसाई ब्रदर्स लिमिटेड, पुणे.**

# श्री. वसंत शांताराम देसाई

## २७-१२-१९०४ - २२-६-१९९४

बेचाळीसावे मराठी नाट्य संमेलन
बरोडा अमॅच्युअर्स ड्रॅमेटिक क्लब यांचे विद्यमाने
महात्मा गांधी नाट्यगृह, बडोदे
स्वागताध्यक्ष : श्रीमंत फत्तेसिंगराव गायकवाड / डॉ. आंबेगावकर
दिनांक : २६ ते २८ फेब्रुवारी १९६०

श्री. वसंत शांताराम देसाई यांनी 'मखमलीचा पडदा' हे पुस्तक लिहिले आणि त्यांना नाट्यसृष्टीत 'बालगंधर्वांचे बखरकार' म्हणू लागले. तरुण वयात, महाविद्यालयीन शिक्षण घेत असल्यावेळेपासूनच, श्री. देसाईंचा नाट्यव्यवसायाशी संबंध आला तो एक जाणता रसिक प्रेक्षक म्हणून. श्री. वसंतरावांनी केवळ असंख्य नाटके पाहिली नाहीत, तर ते नाट्यसृष्टीच्या अंतरंगात सहजपणे वावरू लागले. त्यांचा मुक्काम बहुतेक नाटक मंडळीच्याच बिऱ्हाडी असे.त्यातूनच गंधर्व नाटक मंडळीशी आणि स्वाभाविकच बालगंधर्वांशी त्यांचे संबंध अधिक सलोख्याचे-जिव्हाळ्याचे झाले. राजहंसांच्या कुटुंबातीलच ते एक झाले. त्यामुळेच त्यांनी लिहिलेले 'बालगंधर्व' चरित्र अधिकृत मानले जाते. बालगंधर्वांचे ते फक्त मित्रच नव्हते तर सल्लागारही होते. संस्थेच्या व बालगंधर्वांच्या अडचणीच्यावेळी श्री. वसंत शांताराम देसाई यांचा सल्ला मोलाचा आणि बालगंधर्वांना हितकारक ठरला आहे. बालगंधर्व-प्रभात फिल्म कंपनीच्या कराराच्या वाटाघाटी श्री. देसाईंनी इतक्या कुशलतेने केल्या की त्यात बालगंधर्वांचे पाच चित्रपटांचा करार एकाच-'महात्मा' चित्रपटानंतर मोडायचे बालगंधर्वांनी ठरवले त्यावेळी फारसा वादावादीचा प्रसंग न येता तो करार संपुष्टात आणला गेला. श्री. व. शां. देसाई कायद्याचे पदवीधर होते. न्यायाधीश म्हणूनही त्यांची कारकीर्द न्यायालयीन सेवेत गाजलेली होती.

श्री. वसंतरावांना साहित्यिक जाण चांगली होती. त्यावेळचे वाङ्मयीन नियतकालिक 'रत्नाकर'मधून त्यांनी नाटकांवर समीक्षणे लिहिली. ती अभ्यासपूर्ण आहेत. त्यांनी विपुल लेखन केले आहे.त्यात त्यांच्या नाट्यव्यवसायाच्या सर्वांगीण अभ्यासाचे प्रतिबिंब दिसून येते.

श्री. वसंतराव चांगल्या श्रेणीचे पद्यलेखक होते. काही नाटकांची त्यांची पद्यरचना गाजली आहे. 'स्वामिनी', 'पडछाया' आदींची गाणी त्यांनी केली. बालगंधर्वांसाठी श्री. देसाईंनी 'विधिलिखित' नाटक लिहिले. गंधर्वकंपनीने त्यांचे बरेच प्रयोग केले. पण गंधर्वांच्या रंगमंचावर श्री. देसाईंचे 'अमृतसिध्दी' अधिक लोकप्रिय झाले. त्यातली बालगंधर्वांची भूमिका आणि भजने लोकप्रिय झाली. श्री. वसंत शां. देसाईंनी 'बालगंधर्व चरित्र' लिहिले त्याच्या दोन आवृत्त्या प्रसिध्द झाल्या आहेत.

बेचाळीसावे अखिल भारतीय नाट्यसंमेलन फेब्रुवारी १९६० मधे बडोदे येथे भरले होते. त्याच्या अध्यक्षस्थानी श्री. वसंत शांताराम देसाई होते.




४३ वे मराठी नाट्य संमेलन, नवी दिल्ली, १९६१.

अध्यक्षा : **श्रीमती दुर्गा खोटे**

प्रायोजक : **मुंबई मराठी साहित्य संघ,** डॉ. भालेराव मार्ग, मुंबई-४०० ००४.

# श्रीमती दुर्गाबाई खोटे

## १२-१-१९०५ - २२-९-१९९२

त्रेचाळीसावे मराठी नाट्य संमेलन
मराठी नाट्य परिषद दिल्ली शाखेच्या विद्यमाने, दिल्ली.
विज्ञान भवन, नवी दिल्ली
स्वागताध्यक्ष : ना. श्री. यशवंतराव चव्हाण
दिनांक : २५, ते २७ मार्च १९६१.

सुशिक्षित संपन्न खानदानी लाड घराण्यातील श्रीमती दुर्गाबाई या चित्रपट व्यवसायात गेलेल्या पहिल्या महिला कलावंत. त्यांच्या पाठोपाठ श्रीमती दुर्गा केळेकर (जोत्स्ना भोळे),लीला चिटणीस याही चित्रपट व्यवसायात आल्या.

सॉलिसिटर लाड यांच्या श्रीमती दुर्गाबाई कन्या. सॉलिसिटर लाड हे बालगंधर्वांचे अनन्यसाधारण भक्त. बालगंधर्वांच्या मुंबईत होणाऱ्या प्रत्येक नाटकाला लाड यांची आसने राखीव असावयाची. त्यांच्या बरोबर श्रीमती दुर्गाबाईही असावयाच्या. श्रीमती दुर्गाबाईंनी बालगंधर्वांची नाटके असंख्य वेळा पाहिल्यामुळे त्यांच्यावर नकळतच गंधर्वशैलीची छाया पडली. एका सामान्य हिंदी बोलपटात काम केल्यानंतर प्रभातच्या पहिल्या मराठी-हिंदी बोलपटात- 'अयोध्येचा राजा'त-त्यांना नायिकेची भूमिका मिळाली. नंतरच्या 'माया मच्छिंद्र'मधेही त्या होत्याच.

एकापेक्षा एक सरस भूमिका करून दुर्गाबाईंनी चित्रव्यवसायामधे आपले अग्रस्थान पक्के केले होते. चित्रपटात प्रचंड कीर्ती लाभली होती. गांधीवधावरच्या 'बलीदान' नभोनाट्यात त्यांनी भाग घेतला होता. आकाशवाणीवरून प्रक्षेपित झाले असले तरी 'बलीदान' हा नाट्यप्रकार होता. तो सर्वांना आवडला. इंडियन पीपल्स थिएटर्सच्या (इप्टा) मंडळीच्या आग्रहाने दुर्गाबाईंना कॅप्टन मा. कृ. शिंदे यांच्या 'आंदोलन' नाटकात त्यांनी भूमिका केली. या नाटकाचे लोकाग्रहास्तव झालेले चार प्रयोग हाऊस फुल्ल झाले. मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्यमहोत्सवात 'कीचकवध' आणि 'भाऊबंदकी' नाटकात दुर्गाबाईंनी भूमिका केल्या. दिल्लीच्या अखिल भारतीय नाट्यस्पर्धेत 'भाऊबंदकी' करायचे ठरले. दुर्गाबाईंनी डॉ. भालेरावांना सांगितले, 'खेळ बरा झाला नाही तर सगळ्या मराठी नाट्यसंस्था मला लाखोली वाहतील. स्पर्धा जिंकली नाही तर, 'चाळीशीतली बाई सोळा वर्षाच्या आनंदीबाईच्या भूमिकेत होती म्हणून प्रयोग फसला,' असे म्हणतील. दिल्लीच्या स्पर्धेत 'भाऊबंदकी'ला पहिले पारितोषिक मिळाले. दुर्गाबाईंनी साहित्य संघाच्या 'कौंतेय', 'पतंगाची दोरी', 'खडाष्टक', 'संशयकल्लोळ' 'शोभेचा पंखा', 'राजमुकुट' या नाटकात भूमिकाही केल्या आणि काहींचे दिग्दर्शनही केले. इतर नाटकांहून 'वैजयंती'चा प्रयोग वेगळा होता. या नाटकाचा शेवटचा पडदा पडताच प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करुन आपली पसंती व्यक्त केली.

त्रेचाळीसाव्या संमेलनासाठी उद्घाटक म्हणून राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद लाभले होते. पंडित जवाहरलाल नेहरू हे श्रीमती दुर्गाबाईंच्या सोबत चहापान समारंभास होते. भारताचे सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश न्या. प्र. बा. गजेन्द्रगडकर परिषद शाखेच्या अध्यक्षपदी होते. तर श्री. द्वा. भ. कर्णिक हे कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत होते.

१९६१ मधे दिल्लीच्या नाट्यसंमेलनाचे त्रेचाळीसावे अधिवेशन श्रीमती दुर्गाबाई खोटे यांच्या अध्यक्षतेखाली गाजले. तेव्हा श्री. पु. ल. देशपांडे म्हणाले होते, 'दुर्गाबाईंचं आडनावच फक्त खोटे आहे. बाकी सर्व खरे आहे'.




४४ वे मराठी नाट्य संमेलन,नागपूर, १९६२.

अध्यक्ष : **श्री. शं. नी. चाफेकर**

प्रायोजक : **श्री. सुरेश गुप्ता,** वास्तुशास्त्री, साई, गोळे कॉलनी, नाशिक-४२२ ००२.

# श्री. शंकर नीलकंठ तथा नानासाहेब चाफेकर

२०-१-१८९६ - १५-१-१९६९

चव्वेचाळीसावे मराठी नाट्य संमेलन
विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या विद्यमाने,
श्री. नाना जोग नाट्यमंदिर, नागपूर
स्वागताध्यक्ष :
दिनांक : २१, २२ एप्रिल १९६२

'नाटकात भूमिका करायची तर ती व्यावसायिक रंगभूमीवरच आणि तीही शिक्षण पुरे झाल्यावरच,' असा ठाम निर्धार केलेले श्री. शंकर नीळकंठ तथा नानासाहेब चाफेकर श्री. अ. ह. गद्रे यांच्या 'हिंद नाटक समाज'च्या नाटकांमधे २८-१०-१९१८ पासून नायिकेच्या भूमिकेत रंगभूमीवर आले. जाहिरातजनार्दन श्री. अ. ह. गद्रे यांनी श्री. चाफेकरांची आणि त्यांच्या भूमिकांची पध्दतशीर जाहिरात केली आणि त्यांना प्रसिध्दी मिळवून दिली.

श्री. चाफेकरांना नाटके पाहण्याचा बालपणापासूनच नाद होता. तरुण वयात त्यांच्यावर बालगंधर्वांच्या गायनाचा आणि अभिनयाचा पगडा होता. गायकी गळा त्यांना होताच. जोडीला ते देखणेही होते. 'हिंद नाटक समाजा'च्या नाटकांमुळे नायिकेच्या रूपात प्रेक्षकांना श्री. चाफेकर पसंत पडले.

ललितकलादर्श नाटक मंडळीच्या श्री. केशवराव भोसले यांनी त्यांना आपल्या संस्थेत नेले. 'शहा शिवाजी'चा प्रयोग १४-५-१९२१ रोजी ललितकलेने दिमाखात रंगभूमीवर केला. त्यातल्या सईबाईंची भूमिका श्री. शंकरराव चाफेकरांनी शाही रुबाबात साकार केली.

गंधर्व, ललितकलादर्श या दोन नाट्यसंस्थांनी आयोजित केलेल्या केशव-नारायण संयुक्त नाट्यप्रयोगात, 'मानापमान'मधे आकासाहेब आणि 'सौभद्र'मधे नटी या भूमिका करण्याचा मान श्री. नानासाहेब चाफेकरांना मिळाला.

श्री. केशवराव भोसले यांच्या मृत्यूनंतर ललितकला श्री. बापूसाहेब पेंढारकर आणि श्री. नानासाहेब चाफेकर यांना चालविण्यास मिळाली. श्री. मामा वरेरकरांचे नवे सामाजिक नाटक 'सत्तेचे गुलाम' ललितकलेने केले. नुकतेच ललितकलेत आलेले श्री. नाना फाटक या नाटकात होते. पण मामांचे 'तुरुंगाच्या दारात' प्रेक्षकांची पकड घेऊ शकले नाही. या नंतर श्री. नानासाहेब चाफेकरांनी ललितकलेचा संबंध सोडला.

श्री. चाफेकरांनी किर्लोस्कर नाटक मंडळी चालवायला घेतली. कोल्हापूरच्या छत्रपतींनी मंडळीला राजाश्रय दिला. श्री. शंकररावांनी श्री. टिपणीस यांचे नवेकोरे नाटक 'राजरंजन' सादर केले. पण ते प्रेक्षकांचे रंजन करू शकले नाही. श्री. गणपतराव देवासकर, श्री. माधवराव जोशी यांच्यासारखे गुणी कलाकार असूनही प्रेक्षकांनी किर्लोस्करकडे पाठ फिरवली. संस्था बंद पडली.

श्री. चाफेकर, श्री. अ. ह. गद्रे यांच्या 'मुंबई नाटिका मंडळी'मधे काम करू लागले. ही मंडळी दोन तासांच्या छोट्या छोट्या नाटिका करत असे. एका वर्षात मंडळीने सात नाटिका सादर केल्या. इतर संस्थांमधूनही श्री. नानांनी कामे केली. मध्यंतरात 'पुण्यप्रभाव' नाटकाचे काही प्रयोग श्री. चाफेकरांनी केले. श्री. शंकरराव दीर्घ काळ कुठल्याही संस्थेमध्ये, संस्थेच्या फुटीमुळे वा मतभेदामुळे, स्थिर होऊ शकले नाहीत. बालगंधर्वांच्या आग्रहास्तव 'गंधर्व नाटक मंडळी'त ते सहा महिने राहिले. ती संस्था आणि नाटक मंडळीतील नोकरीचा नाद श्री. नानासाहेबांनी बरोबरच सोडला.

आकाशवाणीवर त्यांनी नोकरी पत्करली. दिल्ली येथे वृत्तनिवेदन दीड वर्षे केल्यावर त्यांची पुण्यात बदली झाली. पंचवीस वर्षे आकाशवाणीत त्यांनी काम केले.

त्यांचे आत्मचरित्र 'स्मृतिधन'ला महाराष्ट्र शासनाचा पंधराशे रुपयांचा पुरस्कार मिळाला.

चव्वेचाळीसावे मराठी नाट्य संमेलन नागपूर येथे १९६२ मधे भरले होते. त्या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी श्री. शं. नी. चाफेकर होते.



४५ वे मराठी नाट्य संमेलन, दादर, मुंबई, १९६३.

अध्यक्ष : **श्री. अनंत काणेकर**

प्रायोजक : **मुंबई मराठी साहित्य संघ,** डॉ. भालेराव मार्ग, मुंबई-४०० ००४.

# प्रा. अनंत आत्माराम काणेकर

२-१२-१९०५ - ४-५-१९८०

पंचेचाळीसावे मराठी नाट्य संमेलन
नाट्यकलोपासक मंडळ, दादर यांच्या विद्यमाने,
डिसिल्व्हा हायस्कूल मधील मंडपात, दादर
स्वागताध्यक्ष : सॉलिसिटर श्री. र. चिं. रेळे
दिनांक : २२ ते २४ फेब्रुवारी १९६३

चित्रपटाचे आक्रमण नाट्यव्यवसायावर प्रचंड वेगाने झाले. लहानसहान नाट्यसंस्था या झंझावातात नष्ट झाल्या. काही उद्ध्वस्त होण्याचा मार्गावर होत्या. हे आक्रमण थोपवून धरण्याचे प्रयत्न काही नाट्यप्रेमी मंडळींनी केले. त्यात श्री. दामुअण्णा जोशींच्या बालमोहनचा बालचमू होता. त्यांच्या सहाय्याला श्री. प्र. के. अत्रे होते. त्यांनी वेगळ्या वळणाची नाटके रंगमंचावर आणण्यास सुरुवात केली. पुरोगामी नवविचारांचा प्रवाह नुकताच वाहू लागला होता. त्यात श्री. के. नारायण काळे, प्रा. अनंत काणेकर, श्री. श्री. वि. वर्तक, डॉ. ग. य. चिटणीस श्री. पार्श्वनाथ आळतेकर आणि नटवर्य केशवराव दाते आदी होते.

नाट्यव्यवसायात काही नवे, वेगळे करण्याच्या ईर्षेने या मंडळींनी १९३३ मधे नाट्य मन्वंतरची स्थापना केली. प्रा. अनंत काणेकर यांचा पाश्चिमात्य नवनाट्याचा अभ्यास होता. प्रवाहाविरुध्द पोहणारी इब्सेनची नोरा त्यांना भावली होती. त्यांनी इब्सेनच्या 'डॉल्स हाऊस'चे रूपांतर 'घरकूल' नावाने केले होते. नाट्यमन्वंतरच्या रंगमंचावर तेच प्रथम यावे अशी कल्पना होती. पण श्री. वर्तकांची 'आंधळ्यांची शाळा' आघाडीवर आली.

प्रा. अनंत काणेकर कवी होते. त्यांचा 'चांदरात' काव्यसंग्रह प्रकाशित झाला होता. श्री. मो. ग. रांगणेकर यांच्या 'चित्रा' आणि नंतर 'आशा' साप्ताहिकांची राजकीय बाजू ते समर्थपणे सांभाळीत होते.

प्रा. अनंत काणेकरांनी प्रवास खूप केला. 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' हे त्यांचे पहिले प्रवास वर्णन खूप गाजले. 'आमची माती आमचे आकाश', 'निळे डोंगर, तांबडी माती', 'सोनेरी उन्हात पाचूची बेटे', 'गुलाबी प्रकाशात बोलक्या लेखण्या' आदी त्यांची प्रवासवर्णने प्रसिध्द आहेत.

प्रा. अनंत काणेकरांचे खुसखुशीत लघुनिबंधसंग्रह 'पिकली पाने', 'शिंपले आणि मोती', 'उघड्या खिडक्या', 'तुटलेले तारे', 'निवडक गणूकाका' वगैरेंनी साहित्यात मानाचे स्थान मिळविले आहे. प्रा. अनंत काणेकर हे मुंबई मराठी साहित्य संघाच्या स्थापनेपासून प्रमुख कार्यकर्ते म्हणून कार्यरत होते.

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मध्यवर्ती कार्यालय दादर येथे सुरू झाल्यावर प्रा. काणेकर येथे कार्यरत होते.

नाट्य मन्वंतरच्या रंगमंचावर 'घरकुल' आले नाही. ते नंतर ४२ सालच्या ३२ व्या नाट्य संमेलनात मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने आले. 'निशिकांताची नवरी', 'घरकुल', 'फास' इत्यादी त्यांची अनुवादित नाटके रंगभूमीवर आली. नाट्यलेखक म्हणून श्री. काणेकर यांचे नाव झाले. त्यांनी वीणा पिक्चर्सच्या 'नीला' चित्रपटाचे कथा-पटकथा, संवाद, गीते लिहिली होती. (१९३५) प्रभातच्या व्ही. शांताराम दिग्दर्शित गाजलेल्या 'माणूस'चे संवाद आणि गाणी श्री. अनंत काणेकरांची होती.

वक्ते म्हणूनही त्यांचा लौकिक मोठा होता. भारत सरकारने त्यांना पद्मश्री दिली होती.

१९६३ मधे दादरमध्ये मुंबईस भरलेल्या पंचेचाळीसाव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे प्रा. अनंत काणेकर अध्यक्ष होते.



४६ वे मराठी नाट्य संमेलन, अहमदनगर, १९६४.

अध्यक्ष : **श्री. पु. भा. भावे**

प्रायोजक : **पु. भा. भावे स्मृती समिती**, मुंबई.

# श्री. पुरुषोत्तम भास्कर भावे

१२-४-१९१० - १३-१०-१९८०

शेहेचाळीसावे मराठी नाट्य संमेलन
मराठी नाट्य परिषद, अहमदनगर शाखेच्या विद्यमाने
मोने कलामंदिर, अहमदनगर
स्वागताध्यक्ष : डॉ. श्रीराम रानडे
दिनांक : १ ते ३ मे १९६४

१९४० ते १९५० च्या दशकात नागपूर येथून प्रथम 'सावधान' आणि नंतर 'आदेश' ही साप्ताहिके प्रकाशित होत असत. या साप्ताहिकांचे राजकीय धोरण कडवे हिंदुत्वनिष्ठ होते . या साप्ताहिकातून प्रतिस्पर्ध्यांवर ज्वलज्जहाल टीका होत असे. या टीकालेखनातला एक एक शब्द अग्निगोलकासारखा प्रखर तेजस्वी असे. ते वाचल्यावर श्री. शिवराम महादेव परांजपे यांच्या आणि श्री. अच्युत बळवंत कोल्हटकरांच्या शैलीची तीव्रतेने आठवण येत असे. श्री. शिवरामपंतांच्या शैलीतला धगधगता निखारा जसा श्री. भावे यांच्या शब्दाशब्दात होता तसाच श्री. अच्युत बळवंतांचा सडेतोड शिवराळपणाही होता. या शिवराळपणाची लक्ष्मणरेषा त्यांनी काही मर्यादेपर्यंतच पाळली. पण प्रतिस्पर्ध्यांनी जेव्हा मर्यादा ओलांडून महापुरुषांवर शिव्यांचे शिंतोडे उडवायला सुरुवात केली तेव्हा श्री. भावे यांची लेखणी चवताळली आणि तिने जहरी नागिणीसारखे फुत्कारून,डंख मारून प्रतिस्पर्ध्याला अक्षरश: जमीनदोस्त केले.

पण श्री. भावे यांची 'पहिला पाऊस' कथा वाचताना सुंदर सुगंधी शिडकावा नाजुकपणे बरसावा तसा अनुभव येतो. 'सतरावे वर्ष'मधे तारुण्यात प्रवेश करणाऱ्या बबनच्या भावना अतिशय नाजुकपणे श्री. भावे उलगडून दाखवतात. 'वर्षाव' ही त्यांची पहिली कांदबरीही विलक्षण गाजली. कथा-कांदबऱ्या लिहिणारे श्री. पु. भा. भावे आणि राजकीय रणमैदानावर रणभेरी फुंकून 'सहदेवा, अग्नी आण' म्हणून गरजणारे, प्रतिस्पर्ध्यांचा थरकाप उडविणारे श्री. पु. भा. भावे आणि उमलत्या मनाच्या नाजुक पाकळ्या कोमलतेने कुरवाळणारे श्री. पु. भा. भावे या दोन वेगवेगळ्या व्यक्ती आहेत अशी साधार शंका यावी असे विलक्षण शब्दसामर्थ्य श्री. भावे यांच्या लेखणीत आहे, शैलीत आहे.

श्री. पु. भा. भावे यांचे पहिले नाटक 'विषकन्या'. या नाटकातली नीलकंठची व्यक्तीरेखा इतकी प्रभावी आहे की श्री. बाबूराव पेंढारकरांना श्री. चिंतामणराव कोल्हटकरांच्या दिग्दर्शनाखाली ती साकार करावीशी वाटली होती. पण त्यातली विषया, समर्थ अभिनयाने साकारणारी अभिनेत्री मराठी रंगभूमीवर तेव्हाही सापडली नव्हती आणि आजही नाही. श्री. भाव्यांच्या 'स्वामिनी'तली अबोल काशी श्रीमती मंगला पितळे आणि श्रीमती मालती पेंढारकरांनी प्रभावीपणे साकारली होती. 'पडछाया'मधे जगन्नाथपेक्षा मामा पेंडसेच छाप पाडून गेले. 'महाराणी पद्मिनी'नेही रंगभूमी गाजवली. श्री. भावे यांची नाटके गाजली ती त्यातल्या व्यक्तीरेखांमुळे 'विषकन्या'चे प्रयोग फारसे झाले नाहीत. पण ललितकलेने 'स्वामिनी', 'पडछाया' गाजविले. श्री. भावे यांनी सात नाटके लिहिली.

लेखणीप्रमाणेच श्री. पु. भा. भावे यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. त्यांनी अनेक सभा जिंकल्या, श्री. भावे यांनी काही चित्रपटकथाही लिहिल्या. 'सौभाग्य'मधली श्री. ग. दि. माडगुळकरांनी साकारलेली व्यक्तीरेखा विलक्षण वेधक होती. श्री. भावे यांनी 'सौभाग्य', 'अंमलदार' या चित्रपटात छोट्या भूमिकाही केल्या होत्या.

अहमदनगर येथे भरलेल्या शेहेचाळीसाव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर १९६४ मधे श्री. पु. भा. भावे विराजमान झाले होते.




४७ वे मराठी नाट्य संमेलन, नांदेड, १९६५.

अध्यक्ष : **श्री. पु. ल. देशपांडे**

प्रायोजक : **डॉ. श्रीरंग आडारकर,** 'दिलकुशा', अल्ट्रामाऊंट रोड, मुंबई-२६.

# श्री. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

८-११-१९१९

सत्तेचाळीसावे मराठी नाट्यसंमेलन

मराठी नाट्य परिषद नांदेड शाखा व कलामंदिर यांच्या विद्यमाने

खास उभारलेल्या गंधर्वनगरी कलामंदिरात, नांदेड उद्‌घाटक : यशवंतराव चव्हाण

दिनांक : ३१ जानेवारी , १, २ फेब्रुवारी १९६५

अभिजात कलावंत, अत्याधुनिकतेबरोबरच चांगल्या जुन्याचे रसिकतेने मूल्यमापन करणारे, प्रवास वर्णने, व्यक्तीचित्रे, विविध प्रकारचे विनोदी लेखन करणारे आणि 'इदं न मम' म्हणून आपल्याला मिळालेले द्रव्य जनतेच्या भल्यासाठी काम करणाऱ्या संस्थांना मुक्तपणे वाटणारे, आजच्या महाराष्ट्राचे लाडके व्यक्तीमत्व म्हणजे महाराष्ट्र भूषण श्री. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे.

महाविद्यालयात शिकत असतानाच त्यांनी गायन-अभिनय यांचा कसून व्यासंग केला. बी. ए. होऊन काही काळ त्यांनी शिक्षकी पेशा पत्करला. ते एम. ए. झाले आणि प्राध्यापकी स्विकारली. मधल्या काळात त्यांनी हार्मोनियम वादनात प्राविण्य प्राप्त केले. महाविद्यालयात असल्यापासून ते नाटकांमधून कामे करू लागले होते. शिक्षण आणि अभिनय या दोन मार्गावरून त्यांची वाटचाल पदोपदी प्रगतीकडेच चालली होती. श्री. चिंतामणराव कोल्हटकरांच्या ललितकलाकुंजमधे ते काम करू लागले. श्री. चिंतामणरावांच्या मार्गदर्शनाने त्यांच्या अभिनयात सफाई आली. तालीम मास्तर कसा असावा याचे आदर्श पाठ त्यांना लाभले.

श्री. मो. ग. रांगणेकरांच्या नाट्यनिकेतनमधे ते गेले. त्यांच्या 'वहिनी', 'माझे घर', अविनाशच्या अनुपस्थितीत 'कुलवधू'तला देवदत्तही ते करत असत. नाट्यनिकेतनच्या नाटकातली त्यांची गाणी गाजली. 'पाखरा जा...' हे अद्यापीही लोकप्रिय आहे. नाटकात काम करत असतानाच गाण्यांना चाली देण्याचेही त्यांचे काम चालूच होते. श्रीमती ज्योत्स्ना भोळे यांच्या गाजलेल्या काही भावगीतांच्या चाली त्यांनी दिल्या आहेत. १९५० मध्ये राणी पार्वतीदेवी महाविद्यालय, बेळगाव, म. गांधी विद्यामंदिर मालेगांव, कीर्ती महाविद्यालय, मुंबई आदि संस्थांमधून काही काळ अध्यापन केले. १९५५ मधे आकाशवाणी केंद्रात नाट्यविभागाच्या प्रमुखपदी त्यांची नेमणूक झाली. युनेस्कोची शिष्यवृत्ती मिळाल्याने प्रक्षेपण आणि दूरदर्शन यांचे खास प्रशिक्षण घेण्यासाठी ते लंडनला गेले.

दिल्ली दूरदर्शनवरुन त्यांनी पहिला कार्यक्रम सादर केला. दूरदर्शनवरून त्यांनी विविध प्रकारचे कार्यक्रम सादर केले. दिल्ली येथे 'गडकरी दर्शन'चा अभिनव कार्यक्रम श्री. देशपांडे यांनी सादर केला. तो खूपच गाजला.

चित्रपटकथा त्यांनी लिहिल्या. चित्रपटात त्यांनी 'कुबेर'पासून काम करण्यास सुरुवात केली होती. 'पंढरीची वारी'मधे ते चोखा मेळा झाले होते. 'अमलदार'चे ते नायक होते. 'पुढचं पाऊल'मधला ढोलकीवाला त्यांनी गाजवला. 'नवरा-बायको', 'मानाचं पान', 'देवबाप्पा' आदी चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन त्यांनी केले. अनेक चित्रपटांच्या पटकथा-संवाद त्यांनी लिहिल्या. कथा, संवाद, संगीत, भूमिका, दिग्दर्शन अशा सबकुछ पु. ल. असलेल्या 'गुळाचा गणपती'ने अपूर्व यश प्राप्त केले. अलिकडच्या काळात त्यांनी 'विदूषक' या चित्रपटासाठी पटकथा-संवाद लिहिले.

रंगभूमीवर ते एकपात्री कार्यक्रम करू लागले. 'बटाट्याची चाळ', 'असा मी असा मी', 'वाऱ्यावरची वरात,' 'आम्ही लटिके ना बोलू,' 'वटवट' या त्यांच्या कार्यक्रमांनी अपूर्व यश मिळवले. 'तुझे आहे तुजपाशी' १९५७ मध्ये रंगमंचावर आले. ते अद्यापही गाजत आहे. 'अंमलदार', 'सुंदर मी होणार', 'भाग्यवान', 'ती फुलराणी', 'तीन पैशाचा तमाशा' ही त्यांची नाटके चांगली यशस्वी झाली. पण 'तुका म्हणे आता'हे त्यांचे पहिले नाटक पहिल्याच प्रयोगाला अयशस्वी झाले. ते नाटक विनोदी समजून प्रेक्षक आले होते. पण तुकारामबोवांच्या जीवनावरचे ते नाटक गंभीर होते.

धन फक्त जमा करण्यासाठी नाही तर इतरांना देतांना जो आनंद प्राप्त होतो याची जाणीव असल्याने त्यांनी 'पु. ल. देशपांडे प्रतिष्ठान' स्थापून त्यांनी अनेक लोकोपयोगी संस्थांना भरघोस आर्थिक सहकार्य दिले.

नांदेड येथे १९६५ चे सत्तेचाळीसावे मराठी नाट्य संमेलन भरले होते. त्यावेळी अध्यक्षपदाचा सन्मान श्री. पु. ल. देशपांडे यांना लाभला होता.




४८ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९६७. अध्यक्ष : **श्री. स. अ. शुक्ल**

प्रायोजक : **मुंबई मराठी साहित्य संघ,** डॉ. भालेराव मार्ग, मुंबई - ४०० ००४.

# श्री. सदाशिव अनंत शुक्ल

## २६-५-१९०२ - २७-१-१९६८

अठ्ठेचाळीसावे मराठी नाट्य संमेलन
स्थानिक नाट्य संस्थांच्या विद्यमाने
भरत नाट्य मंदिर, पुणे.
स्वागताध्यक्ष : उद्योगपती श्री. रा. द. पुसाळकर
दिनांक २२, २३ एप्रिल १९६७

श्री. सदाशिव अनंत शुक्ल यांनी भावगीतकार या नात्याने अमाप कीर्ती मिळवली होती. श्री. जी. एन्. जोशी आणि श्री. जे. एल्. रानडे यांनी गायिलेल्या भावगीतांचा काळ हा ध्वनिमुद्रित भावगीतांचा प्रारंभकाळ मानला जातो. लीला लिमये या भावगीत गायिकेने श्री. स. अ. शुक्ल यांची भावगीते लोकप्रिय केली. 'रमला कुठे ग कान्हा' हे त्या काळचे गाजलेले भावगीत. सोपी सुटसुटीत शब्द योजना, गुणगुणता येतील अशी सोपी वाक्यरचना हे जसे श्री. स. अ. शुक्लांच्या भावगीतांचे वैशिष्ट्य होते. तसेच भक्तीरसपूर्ण गाणीही त्यांनी लिहिली.

श्री. स. अ. शुक्लांची नाटकेही लोकप्रिय झाली होती. 'साध्वी मीराबाई' नाटकाने त्या काळी प्रचंड लोकप्रियता मिळवली होती. 'साक्षात्कार', 'सिंहाचा छावा', 'सत्याग्रही' ही त्यांची पौराणिक नाटके रंगमंचावर आली. पौराणिक नाटकांमधून तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचा उचित उपयोग करून श्री. शुक्लांनी आपली नाटके समाजाला पटतील, जागृती करतील अशा रितीने रचली. 'सौभाग्यलक्ष्मी' आणि 'लोकसिंहासन' ही त्यांची सामाजिक आणि राजकीय नाटके.

बालनाट्याची चळवळ नसलेल्या काळात त्यांनी बालनाट्ये लिहिली. मुलांसाठी लिहिलेल्या त्यांच्या बालनाटिका 'वीर अभिमन्यु', 'नवलगडची राजकन्या', 'नाटक नाटक', 'जयद्रथ वध' शाळांच्या संमेलनांमधून चांगल्याच लोकप्रिय झाल्या होत्या. आपले नाटक आजी-आजोबांपासून नातवापर्यंत सर्वांनी एकत्र बसून पहावे या हेतूनेच त्यांनी बहुसंख्य नाटके लिहिली आणि प्रेक्षकांनीही त्यांच्या नाटकांचे चांगले स्वागत केले.

श्री. स. अ. शुक्ल यांनी चित्रपटकथाही बऱ्याच लिहिल्या. भावपूर्ण चित्रकथा हे श्री. शुक्लांचे वैशिष्ट्य होते. अलिकडच्या काळात गाजलेली त्यांची चित्रकथा राजकमल चित्रमंदिर निर्मित 'भक्तीचा मळा'. आपल्या नित्य कार्यव्यवसायातच पांडुरंग पहाणारा सावता माळी त्यांनी यथार्थ रंगविला होता. फक्त लहान मुलांनीच भूमिका केलेला पहिला बालपट 'भक्त ध्रुव' (१९३८) ही श्री. स. अ. शुक्ल यांची पहिली चित्रकथा. पौराणिक कथेवरील पहिला विनोदी चित्रपट 'नारद नारदी'चे कथासंवाद श्री. शुक्ल यांचे होते.

साहित्याबरोबरच ज्योतिष, तत्वज्ञान, धर्मशास्त्र यांचा त्यांचा व्यासंगही गाढा होता. केवळ साहित्यावर उपजिविका करणाऱ्या साहित्यिकांत श्री. स. अ. शुक्ल अग्रस्थानी होते.

१९६७ साली पुण्यात भरलेल्या अठ्ठेचाळीसाव्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन नाट्यव्यवसायाने त्यांच्या नाट्यसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली होती.




४९ वे मराठी नाट्य संमेलन, म्हापसे (गोवा), १९६८.

अध्यक्ष : **श्री. मो. ग. रांगणेकर**

प्रायोजक : **श्री. प्रभाकर पणशीकर,** ३७२-ए, धुरुवाडी, वीर सावरकर मार्ग, दादर, मुंबई - २८.

# श्री. मोतीराम गजानन रांगणेकर

१०-४-१९०७ - २-२-१९९५

एकोणपन्नासावे मराठी नाट्यसंमेलन
'नाट्यसाधना' म्हापसे-गोवा यांच्या विद्यमाने
रंगदेवता रघुवीर सावकार मंडप, म्हापसे (गोवा)
स्वागताध्यक्ष : नटवर्य वसंतराव सावकार
दिनांक : १० व ११ फेब्रुवारी १९६८

श्री. मोतीराम गजानन रांगणेकर यांचा लौकिकदृष्ट्या जन्म ८८ वर्षापूर्वी झाला असला तरी श्री. रांगणेकरांच्याच शब्दात त्यांचा वाङ्मयीन जन्म १ जून १९२४ रोजी, त्यांच्या 'अरुण' मासिकाच्या पहिल्या अंकाच्या प्रकाशनाच्या दिवशी वाङ्मयीन कर्तृत्वाच्या अर्थाने झाला.

प्रारंभ काळातच श्री. रांगणेकर गाजले ते 'अरुण' मासिकाचे संपादक म्हणून. सिध्दहस्त लेखणीची देणगी लाभलेल्या श्री. रांगणेकरांनी अनेक नियतकालिकांचे साक्षेपी संपादन केले. आणि आपल्या कलादृष्टीची झगमगमुद्रा या लेखनकामाठीला बहाल केली. नंतर श्री. मो. ग. रांगणेकर यांनी 'वसुंधरा' साप्ताहिक काढले. या साप्ताहिकाच्या अनेकविध वैचित्र्यांमुळे आणि खास रांगणेकरी वैशिष्ट्यांमुळे ते अल्पावधीत अमाप लोकप्रिय झाले. प्रत्येक अंक आकर्षक आणि नावीन्यपूर्ण असावा यासाठी श्री. रांगणेकर नवनव्या कल्पना कार्यवाहीत आणत. प्रसिध्द संगीत दिग्दर्शक श्री. केशवराव भोळे यांच्याकडून तत्कालीन गायक-गायिकांबद्दल रसील्या रंगात एक सुरेख लेखमाला त्यांनी प्रसिध्द केली. एकलव्य नावाने लिहिलेली श्री. भोळे यांची ही लेखमाला अद्यापही संगीतरसिकांच्या स्मरणात आहे. बोलपटाच्या आक्रमणाने हतबल झालेल्या रंगभूमीला त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण नाट्यप्रयोगांमधून, नवी उमेद दिली, प्रतिष्ठा दिली.

मध्यंतरात श्री. मो. ग. रांगणेकर यांनी सरस्वती सिनेटोनच्या श्री. दादासाहेब तोरणे यांच्या आग्रहावरून 'औट घटकेचा राजा', 'भक्त प्रल्हाद' या सरस्वतीच्या चित्रांचे कथा, पटकथा, संवाद लिहिले. बाबूराव पै यांच्या मेनका पिक्चर्ससाठी 'सुवर्ण मंदिर' चित्रपट लिहिला. दिग्दर्शित केला.

यानंतर श्री. लोटवाला यांच्या आर्थिक सहकार्याने प्रा. अनंत काणेकरांना घेऊन श्री. मो. ग. रांगणेकर यांनी 'चित्रा' साप्ताहिक चालू केले. या 'चित्रा' साप्ताहिकाने वृत्तपत्र व्यवसायात इतिहास घडवला. त्या काळात 'चित्रा'चा खप सतरा-अठरा हजारांपर्यंत गेला. हा त्या काळातला सर्वात प्रचंड खप होता. त्यानंतर श्री. रांगणेकर यांनी इंग्रजीतील 'ट्रुस्टोरी' सारख्या 'सत्यकथा' मासिकाच्या संपादनाला सुरूवात केली. सत्य घटनांवर आधारलेल्या कथा 'सत्यकथे'त प्रसिध्द होत असत. रेखाचित्रांचा उपयोग न करता प्रत्यक्ष कथाप्रसंगातील छायाचित्रे मुद्दाम काढून घेऊन त्यांचा उपयोग सजावटीसाठी आकर्षकपणे केला होता. नंतर सत्यकथा मौज प्रकाशनने चालवण्यास घेतले.

बोलपटांशी बोलपटांच्याच तंत्राने स्पर्धा करण्यासाठी दोन-अडीच तासांची छोटी छोटी चटपटीत नाटके रंगभूमीवर आणण्याचे ठरवून श्री. मो. ग. रांगणेकरांनी नाट्यनिकेतनची स्थापना १९४१ मध्ये केली. मोजकी पात्रे, नेमके नेपथ्य, सुटसुटीत-घरगुती वातावरण असलेले हलके-फुलके 'आशीर्वाद' हे नाटक नाट्यनिकेतनने प्रथम रंगमंचावर आणले.

दुसरे नाटक 'कुलवधू' दि. २३ ऑगस्ट १९४२ रोजी सकाळी नेटकेपणे सादर झाले. या नाटकाने नाटकाच्या इतिहासात मोठी क्रांती झाली. मास्तर कृष्णरावांचे अमर संगीत आणि श्रीमती ज्योत्स्नाबाई भोळे यांचा मधुर आवाज यांमुळे या नाटकाचे दोन हजारांवर प्रयोग झाले. त्या सर्व प्रयोगात नायिकेची भूमिका श्रीमती ज्योत्स्ना भोळे यांनीच केली. हा एक विक्रम होता. मराठी संगीत नाटकांच्या इतिहासात 'सौभद्र', 'मानापमान', 'स्वयंवर' या नाटकांइतकेच 'कुलवधू'चे संगीत अजरामर झाले. नाट्यनिकेतनने तीस वर्षात एकूण बत्तीस नाटके रंगमंचावर आणली. त्यातील 'आशीर्वाद' 'कुलवधू', 'माझे घर', 'वहिनी', 'एक होता म्हातारा', 'रंभा' ही नाटके गाजली. यातील बहुसंख्य नाटके श्री. मो. ग. रांगणेकरांनीच लिहिली होती. नाट्यलेखन, दिग्दर्शन, नाट्यनिर्मिती, संस्थाचालक अशा अनेक स्तरांवर त्यांची कामगिरी महत्त्वाची आहे.

नाट्यनिकेतनने काही वेगळे प्रयोगही केले, तीन वेगवेगळ्या एकांकिका (तुझं माझं जमेना, फरारी, सतरा वर्षे), या श्री. रांगणेकरांच्या एकांकिकांशिवाय 'आजचे संसार', 'बडे बापके बेटे', 'नवा जमाना' या श्री. रांगणेकर, श्री. वरेरकर लिखित नाटिकांचे अभिनव प्रयोग नाट्यनिकेतनने करून पाहिले. 'भटाला दिली ओसरी' हा जागेच्या प्रश्नावरचा अभिनव प्रयोग निरनिराळ्या कारणांनी गाजला.

प्रसिध्द प्रकाशक ग. पां. परचुरे यांनी काही काळ 'परचुरे' नावाने मासिक प्रकाशित केले होते. त्यात चालू सहित्यिक घटनांवर श्री. मो. ग. रांगणेकर टिपणी लिहित असत. हेच सदर पुढे ठणठणपाळ या नावाने 'ललित'मध्ये अनेक वर्षे चालू होते.

नाट्य परिषदेचे अध्यक्ष झाल्यावर परिषदेचे मुखपत्र म्हणून नाट्यभूमी हे मासिक कांही काळ चालविले होते.

श्री. मोतीराम गजानन रांगणेकर हे साहित्यातील सर्वस्पर्शी व्यक्तीमत्व होते. तरीही ते एकांडे शिलेदारच होते असे म्हणावे लागते. या एकांड्या शिलेदाराने मरणोन्मुख झालेल्या मराठी रंगभूमीला नवा श्वास दिला, नवे चैतन्य दिले. त्याबद्दलची कृतज्ञता १९६८ मधे म्हापसे गोवा येथील एकोणपन्नासाव्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन व्यक्त करण्यात आली.




५० वे मराठी नाट्य संमेलन, ग्वाल्हेर, १९६९.

अध्यक्ष : **श्री. ग. दि. माडगूळकर**

प्रायोजक : **मेटाग्राफ प्रा. लि.**, हस्ते श्री. वि. म. आरेकर, मॅनेजिंग डायरेक्टर, मुंबई.

# श्री. गजानन दिगंबर माडगूळकर

## १-१०-१९१९ - १४-१२-१९७७

पन्नासावे मराठी नाट्य संमेलन
आर्टिस्ट कंबाईन, ग्वाल्हेर विद्यमाने
वाय. सदाशिव सभामंडप, ग्वाल्हेर.
स्वागताध्यक्ष: श्रीमंत सरदार रावराजा राजवाडे
दिनांक ८, ९, १० फेब्रुवारी १९६९

श्री. गजानन दिगंबर माडगूळकर हे माणदेशी मातीतले अस्सल आणि खणखणीत व्यक्तीमत्व होते. घरच्या गरीबीच्या ज्वालातून झळाळून निघालेले हे बावनकशी सोने आपल्या साहित्यकृतींनी रसिकांच्या गळ्यातले ताईत बनले.

कोल्हापूरच्या हंस चित्रसंस्थेत, 'ब्रम्हचारी' चित्रपटापासून पडेल ती कामे करणाऱ्या माडगूळकरांनी 'ब्रम्हचारी'तच चारपाच भूमिका केल्या आहेत. चित्रपटात कामे करताकरताच गणपती उत्सवांमधल्या मेळ्यांसाठीही त्यांनी पदे लिहिली. हिज मास्टर्स व्हाईससाठी भावगीते लिहिली आणि राम (नंतरचे सुधीर) फडकेंनी त्यांना स्वरसाज दिला.

नवहंसच्या 'पहिला पाळणा'साठी त्यांनी पहिले चित्रगीत लिहिले. श्री. स. अ. शुक्लांचा लेखनिक म्हणून काम करताना त्यांचा चित्रपटकथांचा अभ्यास झाला. मंगलच्या 'जय मल्हार' मधल्या ठसकेदार लावण्या सर्वतोमुखी झाल्या. कोल्हापूरच्या हौशी नाट्यसंस्थेसाठी त्यांनी राम जोशीवर नाटक लिहिले. बाबूराव पेंटरांना ते खूपच आवडले. त्यांनी व्ही. शांतारामांकडे त्या पटकथेची शिफारस केली.

'लोकशाहीर राम जोशी' साऱ्या महाराष्ट्रात गाजला. सवाल-जबाब हा संगीत काव्य प्रकार प्रथम 'राम जोशी' साठी श्री. ग. दि. माडगूळकरांनी लिहिला. मराठीत तर तो लोकप्रिय झालाच आणि हिंदीबरोबर इतर भाषातही त्याचे अनुकरण झाले.

सिध्दहस्त पटकथा-संवाद लेखक म्हणून श्री. माडगूळकरांचा लौकिक वाढला. 'पेडगावचे शहाणे', 'ऊन पाऊस', 'पुढचं पाऊल' अशा अनेक कथा-पटकथा त्यांनी लिहिल्या. मराठीतले त्यांचे यश पाहून हिंदी निर्मातेही त्यांना कथा लिहिण्यासाठी बोलावू लागले. 'दो आँखे बारह हाथ', 'गुंज उठी शहनाई' आदी अनेक यशस्वी कथा त्यांनी लिहिल्या.

श्री. चिंतामणराव कोल्हटकरांच्या ललित कला कुंज संस्थेसाठी त्यांनी 'युध्दाच्या सावल्या' नाटक लिहिले. ते रंगभूमीच्या पडल्या काळात रंगभूमीवर आले होते. नाटक यशस्वी झाले नाही, पण त्यांच्यातील नाटककार मात्र घडला. नंतर बऱ्याच वर्षांनी त्यांनी श्री. रमेश देव यांच्यासाठी लिहिलेले नाटक रंगभूमीवर आले होते. ललित कला दर्शसाठी 'गीत सौभद्र' ही पद्यमय संगीतिका लिहिली होती. श्री. पु. ल. देशपांडे यांच्या 'तुका म्हणे आता' नाटकासाठी पद्यरचना केली.

पुणे आकाशवाणी केंद्रावरून दर आठवड्याला श्री. ग. दि. माडगूळकर यांनी आपल्या सिध्दहस्त लेखणीने लिहिलेले गीत रामायणाचे एक एक पद सादर होऊ लागले. एक वर्षात हे 'गीत रामायण' आकाशवाणीने प्रस्तुत केले. हे 'गीत रामायण' जिथे जिथे मराठी बोलले जाते तिथे तिथे, घराघरात गेले, लोकप्रिय झाले.

'गीत रामायणाने प्रतिवाल्मिकी म्हणून मराठी घराघरात पोहोचलेले श्री. ग. दि. माडगूळकर १९६९ च्या ग्वाल्हेरच्या पन्नासाव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते.



५१ वे मराठी नाट्य संमेलन, कोल्हापूर, १९७०. अध्यक्ष : **श्री. वि. वा. शिरवाडकर**

प्रायोजक : **सारडा कन्स्ट्रक्शन प्रा. लि.**, कॉंग्रेस हाऊस, म. गांधी रस्ता, नाशिक-४२२ ००१.

# श्री. विष्णु वामन शिरवाडकर तथा कुसुमाग्रज

२७-२-१९१२

एक्कावन्नावे मराठी नाट्य संमेलन
करवीर नाट्य मंडळाच्या विद्यमाने
केशवराव भोसले नाट्यगृह, कोल्हापूर.
स्वागताध्यक्ष: श्रीमान मदन मोहन लोहिया
दिनांक १३, १४, १५ फेब्रुवारी १९७०

सरस्वतीचा वरदहस्त लाभलेला कवी, नाटककार, कथा-कादंबरीकार श्री. वि. वा. शिरवाडकर यांना ऋषितुल्य म्हणून सर्व क्षेत्रात आदराचे पहिले स्थान आहे.

श्री. तात्यासाहेब पत्रकारितेत असतानाच कवी म्हणून लौकिकास आले. त्यांच्या 'गर्जा जयजयकार क्रांतीचा' कवितेने अक्षरशः क्रांती केली. श्री. वि. स. खांडेकरांसारख्या श्रेष्ठ साहित्यिकाने त्यांचा 'विशाखा' काव्यसंग्रह मोठ्या कौतुकाने आणि सन्मानाने प्रकाशित केला.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या श्री. अ. ना. भालेरावांनी त्यांच्याकडून नाटके लिहून घेऊन ती यशस्वीपणे रंगभूमीवर आणली. 'दूरचे दिवे', 'दुसरा पेशवा', 'राजमुकुट' आदींचे प्रयोग मेहनत घेऊन रंगभूमीवर आणले. श्री. नानासाहेब फाटक, दुर्गाबाई खोटे यांनी त्यात समरसून भूमिका केल्या. मरगळलेल्या रंगभूमीला नवा तजेला, नवा उत्साह लाभला. नवी नाटके येऊ लागली. लोकहितवादी मंडळाच्या रंगमंचावर आलेला 'ऑथेल्लो' विलक्षण प्रभावी ठरला. 'कौंतेय', 'ययाती आणि देवयानी', 'आनंद', 'महंत', 'कैकेयी' आदी नाटकांनी त्यांनी रंगभूमी गाजवली.

तात्यासाहेबांनी पौराणिक कल्पनारम्य नाटके जशी लिहिली तशी 'आमचे नाव बाबूराव', 'विदूषक'सारखी वेगळ्या वळणाची नाटकेही लिहिली. पण श्री. शिरवाडकरांनी अपूर्व लौकिक मिळवला 'नटसम्राट'ने. प्रथम श्री. श्रीराम लागूंनी उभा केलेला नटसम्राट गणपतराव बेलवलकर नंतर श्री. सतीश दुभाषी, श्री. दत्ता भट, श्री. चंद्रकांत गोखले, श्री. यशवंत दत्त, श्री. राजा गोसावी, श्री. मधुसूदन कोल्हटकर, श्री. लक्ष्मण देशपांडे यांनी द्विपात्री केला. कोणाही अस्सल अभिनेत्याला आव्हान वाटावे, असा हा नटसम्राट प्रेक्षकांच्या दृष्टीनेही असामान्य आहे.

'नटसम्राट'च्या पहिल्या प्रयोगाचा दिनांक २३ डिसेंबर १९७०. याच वर्षात श्री. शिरवाडकर नाट्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. श्री. वि. वा. शिरवाडकरांना चित्रपटाचे विशेष आकर्षण आहे. प्रारंभीच्या काळात प्रभात फिल्म कंपनीत जाण्याचा त्यांचा योग फसला. पण नाशिकच्या गोदावरी सिनेटोन लि. च्या 'सती सुलोचना'त त्यांनी लक्ष्मणाची भूमिका केली होती. याची कथाही त्यांनी लिहिली होती. त्यांच्या 'जान्हवी' कादंबरीवर चित्रपट झाला होता.

श्री. तात्यासाहेबांना ज्ञानपीठ पुरस्काराचा सर्वोच्च सन्मानही लाभला. त्याचाच आदर्श पुढे ठेवून त्यांनी जनस्थान आणि गोदागौरव पुरस्कार कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्यावतीने सुरू केले आहेत.

दर दोन वर्षांनी भरणाऱ्या 'जागतिक मराठी संमेलना'च्या पहिल्याच अधिवेशनाच्या अध्यक्षपदी श्री. वि. वा. शिरवाडकर यांची निवड झाली. या संमेलनाच्या अध्यक्षपदावरून श्री. शिरवाडकर यांनी मराठी अस्मिता, मराठी भाषा यांसंबंधी मांडलेले विचार सर्वच उपस्थित मराठी भाषकांना भावले. मराठीच्या दृष्टीने प्रगतीपथावर नेणारी एक दिशा सापडली.

एकावन्नाव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद १९७० मध्ये कोल्हापूर मुक्कामी त्यांना लाभले होते.




५२ वे मराठी नाट्य संमेलन,कुर्ला, १९७१. अध्यक्ष : **श्री. वसंत कानेटकर**

प्रायोजक : **श्री. मोहन वाघ,** १७, पारिजात, मकरंद सहनिवास, दादर , मुंबई-२८.

# श्री. वसंत शंकर कानेटकर

२०-३-१९२२

बावन्नावे मराठी नाट्य संमेलन
राजहंस सेवा मंडळाच्या विद्यमाने
कै. नटवर्य दत्तापंत आंग्रे नाट्य मंदिर, रायरीकर क्रीडांगण, कुर्ला, मुंबई.
स्वागताध्यक्ष: श्री. पां. त्र्यं. गद्रे
दिनांक १२, १३, १४ फेब्रुवारी १९७१

श्री. वसंतराव कानेटकर साहित्य क्षेत्रात आले ते कथाकार, कादंबरीकार म्हणून. साहित्याचे संस्कार त्यांच्यावर त्यांच्या वडिलांकडून, श्री. शंकरराव कानेटकर तथा गिरीश यांच्याकडून. घरात रविकिरण मंडळाचे रसरसते रसीले वातावरण होते. अनेक दिग्गज कवी-साहित्यिकांचे त्यांच्या घरी जाणे-येणे होते. श्री. वि. स. खांडेकर तर घरातलेच होते. वडिलांचा वारसा चालविण्याचे क्वचितच लाभणारे भाग्य श्री. कानेटकरांना मिळाले. किर्लोस्कर, सत्यकथा अशांसारख्या नामवंत नियतकालिकात लिहितालिहिताच स्वत:च्याच कथेवर त्यांनी 'वेड्याचं घर उन्हात' नाटक लिहिले. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनने ते स्वीकारले. यातच श्री. कानेटकरांच्या नाट्यक्षेत्रातल्या पदक्षेपाच्या यशस्वीतेची पावती आहे. हे पाऊल इतके ठसठशीत आणि ठाम पडले की यशस्वीतेने त्यांना मार्ग मोकळा करून दिला. 'वेड्याचं घर...' नंतर 'प्रेमा तुझा रंग कसा', 'देवांचे मनोराज्य', 'दोन धृवांवर, दोन आपण' पी. डी. ए. ने रंगमंचावर आणली. 'वेड्याचे घर...', 'प्रेमा तुझा...' यशस्वी झाली. त्यांचे अनेक प्रयोग झाले. पण 'देवाचे मनोराज्य'ला अपेक्षित यश लाभले नाही. पण श्री. कानेटकर या किरकोळ अपयशाकडे दुर्लक्ष करून पुढे मार्गक्रमण करू लागले आणि यशाची एकेक पायरी चढतच राहिले. आपण किती उंचावर आलो, त्यात यश-अपयश कितपत मिळाले याचा मागे वळून न पाहता, विचार न करता नवे विषय, नवीन हाताळणी करत राहिले.

श्री. वसंत कानेटकरांच्या 'रायगडला जेव्हा जाग येते'ने जितके अपरंपार यश मिळविले तितकेच नाट्यसाहित्य क्षेत्रात आणि इतिहास क्षेत्रात एकच प्रचंड वादळ उठवून दिले. त्या निमित्ताने ऐतिहासिक नाट्यासंबंधी झालेले वाद-चर्चा सर्वांनाच मोलाची आणि मार्गदर्शक ठरली. आणखी चार ऐतिहासिक नाटके त्यांनी लिहिली. अशीच चर्चा 'अश्रूंची झाली फुले'ने घडवून आणली. श्री. कानेटकरांनी नाटकाचे सर्व प्रकार यशस्वीपणे हाताळले. समकालीन थोर व्यक्तींवरची त्यांची चरित्र-नाट्ये: 'हिमालयाची सावली' (महर्षी कर्वे), 'कस्तुरी मृग' (हिराबाई पेडणेकर), 'वादळ माणसाळतेय' (बाबा आमटे), 'विषवृक्षाची सावली' (इतिहासकार राजवाडे) 'तू तर चाफेकळी' (बालकवींच्या जीवनावर आधारीत) यशस्वी झाली. आतापर्यंत वसंतरावांनी एक्केचाळीस नाटके लिहिली. त्याचबरोबर एकांकिका लेखनही केले. ऐतिहासिक-पौराणिक नाटकांप्रमाणेच खुसखुशीत कौटुंबिक सुखात्मिका: 'लेकुरे उदंड झाली', 'प्रेमाच्या गावा जावे' आदीही लोकप्रिय झाली. शेक्सपिअरच्या गाजलेल्या तीन व्यक्तिरेखांची एकच प्रतिकृती उभी करणाऱ्या 'गगनभेदी'ने एक वेगळेच यश मिळविले.

१९७१ साली अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन कुर्ला (मुंबई) येथे भरलेल्या बावन्नाव्या अधिवेशनाचे अध्यक्षपद श्री. वसंतराव कानेटकर यांनी भूषविले होते.




५३ वे मराठी नाट्य संमेलन, कल्याण, १९७२. अध्यक्ष : **श्री. चिं. गो. (मामा) पेंडसे**

प्रायोजक : **श्री. जयंत सावरकर आणि कुटुंबीय,** गणेशकृपा, सदाशिव क्रॉस लेन, मुंबई - ४.

# श्री. चिंतामण गोपाळ तथा मामा पेंडसे

## २८-८-१९०६ - १२-१-१९९१

त्रेपन्नावे मराठी नाट्य संमेलन
मराठी साहित्य मंडळाच्या विद्यमाने
भारताचार्य वैद्यनगर, सुभाष मैदान, कल्याण (ठाणे).
स्वागताध्यक्ष: श्री. द. य. केळकर
दिनांक २१ ते २५ एप्रिल १९७२

नाट्य व्यवसायात अभिनयाचे काही मापदंड परंपरागत चालत आलेले आहेत. श्री. गणपतराव बोडस, श्री. चिंतामणराव कोल्हटकर, श्री. केशवराव दाते आदी सव्यसाचींबरोबर श्री. चिं. गो. तथा मामा पेंडसे यांचे नाव घेणे आवश्यकच आहे. नक्कल चोख पाठ करणे, भूमिकेशी प्रामाणिक राहणे ही या कलाकारांची वैशिष्ट्ये. या महत्वपूर्ण वैशिष्ट्यांमुळेच फाल्गुनराव, शकार म्हणताच श्री. गणपतराव बोडस आठवतात. घनश्यामची आठवण येताच श्री. चिंतामणराव कोल्हटकर नजरेसमोर येतात. वृंदावनाची पडछाया श्री. नाना फाटकांच्या रूपात दिसते. पण श्री. मामा पेंडसे यांच्या बाबतीत मात्र 'सवाई माधवराव यांचा मृत्यू'मधील भूमिका श्री. नाना फडणीस की, 'दुरितांच्या तिमीर...'मधले पंत सुचवावेत की 'एक होता म्हातारा'तला नाना नजरेसमोर आणावा. याबद्दल संभ्रम पडतो. मामांच्या अनेक भूमिकांवर मामांचा स्वत:चा ठसा कायमचा बसलेला आहे. इतरांनी केलेल्या त्या भूमिका प्रेक्षक पाहतील पण त्यांना क्षणोक्षणी आठवतील श्री. मामा पेंडसेच. असा लौकिक मिळवण्यासाठी मामांनी अपार कष्ट उपसले आहेत.

मामा जसे उत्तम अभिनेते होते तसे खंदे दिग्दर्शकही होते. त्यांच्या तालमीत तयार झालेला कलावंत स्वच्छ आणि स्पष्ट शब्दोच्चाराबरोबरच वेळेलाही महत्व देणारा ठरत असे. श्री. मामा पेंडसे हे जसे जन्मजात अभिनयकुशल नट होते तसेच नाटकाच्या तालमी कसून घेणारे तालीम मास्तर-दिग्दर्शकही होते. त्यांनी नाट्य प्रयोगाची ठरलेली वेळ जशी सांभाळली तसेच तालमीच्या वेळेबद्दलही ते काटेकोर असत. वेळप्रसंगी यशस्वी झाली.'गी कलाकाराच्या घरी जाऊन त्याला ठरल्यावेळी तालमीला ते घेऊन आले आहेत. त्यांच्यावर चारपाच वेळा शस्त्रक्रिया कराव्या लागल्या. त्या त्रासदायक अवस्थेतही त्यांनी तालमीत, नाट्य प्रयोगात कधी कसूर केली नाही वा अभियनात उणेपणा येऊ दिला नाही.

'आगऱ्याहून सुटका'त मामांनी प्रथम काम केले आणि ते प्रेक्षकांच्या परिचयाचे झाले ते कायमचेच. महाराष्ट्र नाटक मंडळी, समर्थ नाटक मंडळीमधून सुरुवात करून नाट्य निकेतन, मुंबई मराठी साहित्य संघ आणि शेवटी ललितकलादर्शमध्ये ते स्थिर झाले. मामांनी अनेक भूमिका केल्या. त्या सर्व यशस्वी झाल्या.

श्री. पेंडसे हे जुन्या पिढीतले कलाकार होते. जुन्याबद्दल त्यांना अपार निष्ठा होती तरी नव्याचेही त्यांनी तितक्याच उत्साहाने स्वागत केले. 'आंधळ्याची शाळा'सारखे नाटक असो की 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे'सारखे नवनाट्य असो श्री. मामांनी त्यांच्या प्रयोगात सारख्याच तन्मयतेने काम केले. श्री. केशवराव दाते यांना ते नाट्यगुरू मानीत.

मामांचा चरितार्थाचा व्यवसाय होता दुधाचा. स्वत: दुधाचे हांडे घेऊन ते रतीब घालत. त्यांनी जसे निर्भेळ दुधाचे वाटप केले तसेच प्रेक्षकांना चांगल्या भूमिकांचा रसास्वाद घ्यायला शिकवले.

विष्णुदास भावे सुवर्ण पदक, नाट्य परिषदेचे सुवर्ण पदक, महाराष्ट्र शासनाचा पंचाणव हजार रुपयांचा पुरस्कार असे अनेक सन्मान त्यांना लाभले. कल्याणच्या त्रेपन्नाव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद १९७२ मध्ये त्यांना मिळाल्यामुळे प्रेक्षकांना कृतार्थ झाल्याचे समाधान लाभले.



५४ वे मराठी नाट्य संमेलन, मुंबई, १९७३. अध्यक्ष : **श्री. वसंत देसाई**

प्रायोजक : **भिंगे ब्रदर्स**, गाळा क्र. १०, 'आकांक्षा', रस्ता क्र.९, नाईस, नाशिक-७.

# श्री. वसंत श्रीकृष्ण देसाई

## ९-६-१९१२ - २२-१२-१९७५

चोपन्नावे मराठी नाट्य संमेलन
मराठी नाट्य परिषद विद्यमाने
साहित्य संघ मंदिर, मुंबई.
स्वागताध्यक्ष: उद्योगपती श्री. वा. म. गोगटे
दिनांक ३०, ३१ मार्च व १ एप्रिल १९७३

चित्रपट व्यवसायाच्या उदयाने नाट्य व्यवसायाची पिछेहाट झाली. मराठी नाटकाचे अस्तित्वच संपुष्टात येते की काय अशी भीती निर्माण झाली होती. पण चित्रपटव्यवसायाच्या बरोबरीने आज नाट्यव्यवसाय कार्यरत आहे. किंबहुना हातात हात घालून वाटचाल करत आहे. प्रारंभी नाटक धंदा बसत चालल्याने काही कलाकार चित्रपटात गेले. आज नाटकात आणि चित्रपटात काम करणारे अनेक कलावंत आहेत. एका व्यवसायातल्या प्रसिध्दीचा फायदा दुसऱ्या व्यवसायाला होत आहे. एकमेकाला पूरक असे हे दोन्ही व्यवसाय झाले आहेत.

श्री. वसंत देसाई हे चित्रपट व्यवसायातले बिनीचे संगीतकार. त्यांनी संगीत दिलेल्या अनेक चित्रपटांनी आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळविली. त्यांची गाणी घरोघरी गायली जाऊ लागली.

लहानपणीच भजनी संगीताने भारलेले श्री. वसंत देसाई लहान वयातच प्रभात फिल्म कंपनीत हरकाम्याची नोकरी करू लागले. चित्रपटात मिळतील ती लहानसहान कामे करणे, तंत्रज्ञांना मदत करणे ही कामे करता-करताच त्यांनी व्यवसायातले खूपच ज्ञान आत्मसात केले.

पहिला मराठी बोलपट 'अयोध्येचा राजा'च्या वेळी संगीत दिग्दर्शक श्री. गोविंदराव टेंबे यांचे श्री. वसंत देसाई सहकारी होते. त्या वेळेचा वाद्यवृंद तबला, पेटी, सारंगी, व्हायोलिन एवढाच असे. श्री. वसंत देसाई ही वाद्ये तर शिकलेच पण पुढच्या काळात त्यांनी नवनव्या वाद्यांवर हुकूमत मिळविली. बहुतेक सर्व वाद्ये सफाईने वाजवता येणारे श्री. वसंत देसाई पहिले संगीत दिग्दर्शक.

प्रभातमध्ये श्री. गोविंदराव टेंबे, श्री. केशवराव भोळे, मास्तर कृष्णराव यांच्या हाताखाली त्यांना खूप शिकायला मिळाले. पार्श्वसंगीतावर त्यांनी विशेष मेहनत घेऊन प्रावीण्य मिळविले. 'संत ज्ञानेश्वर'चे बरेचसे पार्श्वसंगीत त्यांनी दिले आहे. गळ्याची साथ नसताना मेहनत घेऊन ते गाणे शिकले. प्रभातच्या 'महात्मा', 'अमरज्योती'पासून ते चित्रपटासाठी गाऊ लागले. भूमिका तर ते करत असतच. 'संत ज्ञानेश्वर'मधली शेतकऱ्याची त्यांची भूमिका गाजलीच पण त्यांनी चाल दिलेले आणि म्हटलेले 'आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी' हे गाणे तुफान लोकप्रिय झाले.

मा. विनायकांनी हौसेखातर एक नाट्य संस्था प्रभातमध्ये असताना काढली होती. एकदा प्रेक्षकांच्या आग्रहास्तव नाटकात नसलेली गाणी घालून नाटक करावे लागले. त्या गाण्यांना ऐनवेळी संगीत देऊन श्री. वसंत देसाईंनी वेळ निभावून नेली.

चित्रपट संगीत दिग्दर्शक म्हणून कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर असतानाच त्यांनी ललितकलादर्शच्या 'पंडितराज जगन्नाथ'ला संगीत दिले. ते नाटक संगीतदृष्ट्या यशस्वी म्हणून नावाजले गेले. 'गीता गाती ज्ञानेश्वर'चेही संगीत लोकप्रिय झाले. 'मृत्युंजय' नाटकात गाणी नव्हती परंतु फक्त पार्श्वसंगीत दिले होते. 'गीत सौभद्र' संगीतिका व श्रीमती वैजयंतीमालेच्या संत सखू नृत्य नाटकास संगीत दिले होते. चित्रपट संगीत आणि नाट्य संगीत यांचा बाज वेगवेगळा असतो हे ओळखून श्री. वसंत देसाईंनी नाटकांना संगीत दिले आणि ते लोकप्रिय झाले.

श्री. वसंत देसाई नेहमी वेगवेगळे प्रयोग करत असत. समूहगीत हा त्यापैकी एक. एक सूर एक नाद या योजनेखाली त्यांनी महाराष्ट्रातल्या हजारो विद्यार्थ्यांना एका वेळी एका सुरात गायला शिकवले. कार्यक्रमात एकाच वेळी अनेक कंठातून निघणारा लयबध्द आवाज आसमंतात घुमला की ऐकणारे भारावून जात असत.

मुंबईच्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे १९७३ मध्ये अध्यक्षपद देऊन त्यांच्या संगीत सेवेचा गौरव करण्यात आला.



५५ वे मराठी नाट्य संमेलन, बडोदे, १९७४. अध्यक्ष : **श्री. विद्याधर गोखले**

प्रायोजक : **श्री. विजय गोखले आणि कुटुंबीय,** ५, पारिजात, मकरंद सहनिवास, सेनापती बापट मार्ग दादर, मुंबई-२८.

# श्री. विद्याधर संभाजीराव गोखले

४-१-१९२४ - २६-९-१९९६

पंचावन्नावे मराठी नाट्य संमेलन
बरोडा ॲमॅच्युअर्स ड्रॅमॅटिक क्लब, बडोदे, यांच्या विद्यमाने
महात्मा गांधी नाट्यगृह, बडोदे
स्वागताध्यक्ष : श्रीमंत महाराज फत्तेसिंगराव गायकवाड
दिनांक : १५ ते १७ एप्रिल १९७४

मराठी नाटकाला एक परंपरा आहे. आणि ती परंपरा नाटककारांनी आणि नाट्यसंस्थांनी शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षापर्यंत आपल्या वैशिष्ट्याने टिकवून ठेवली आहे. विष्णुदास भाव्यांनी १८४३ मध्ये सुरु केलेली नाटयपरंपरा आजही त्याच निष्ठेने नाट्यव्यवसायी चालवत आहेत आणि प्रेक्षकही त्यांना साथ देत आहेत.

श्री. अण्णासाहेब किर्लोस्करांनी लावलेला मराठी नाट्यसंगीताचा वेल गगनाला गवसणी घालण्याच्या सुमारास चित्रपटांचे आक्रमण झाले. त्यातूनही रंगभूमी नव्या उत्साहाने उभी राहीली. गद्य नाटकांच्या बरोबरीने संगीत नाटकांनी रंगमंच नादमय स्वरमय होऊ लागला. पण हळूहळू संगीत नाटके मागे पडू लागली. गद्य नाटकांना बहर आला. अधूनमधून जुन्या-नव्या नाटकांचे प्रयोग होत असत पण त्यात पूर्वीचा जोम नव्हता, उत्साह नव्हता.

अशातच १९६० मध्ये ललितकलादर्शने 'पंडितराज जगन्नाथ' रंगभूमीवर आणले आणि संगीतप्रेमी रसिकांचे दीर्घकाळ आसुसलेले संगीताचे कान तृप्त झाले. 'पंडितराज जगन्नाथ'ने पुन्हा रंगभूमीवर संगीत चैतन्य आणले. पंडितराज जगन्नाथ हे संगीत नाटक लिहून श्री. अण्णा किर्लोस्करांची, मध्यंतरात खंडीत झालेली, संगीतसरीता, श्री. अण्णा गोखले यांनी पुन्हा प्रवाही केली. त्याच जोमाने आणि त्याच नादमधुरतेने.

श्री. विद्याधर गोखले अमरावतीचे, महाविद्यालयीन शिक्षण झाल्यावर श्री. विद्याधर गोखले मुंबईला आले. १९४४ मध्ये ते जनरल एज्युकेशन सोसायटीच्या कुर्ला हायस्कूलमध्ये शिक्षक होते. त्यांचा प्रमुख विषय मराठी असला तरी इंग्रजी आणि संस्कृत तितक्याच समरसतेने ते शिकवत असत. त्या काळात ते विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून लोकप्रिय होते. नंतर त्यांनी वृत्तपत्रव्यवसायात प्रवेश केला. १९५१ मध्ये ते 'लोकसत्ते'त कोडे विभागाचे प्रमुख होते. आदर्श कोडी कशी असावीत हे श्री. विद्याधर गोखले यांनी दाखवून दिले. 'लोकसत्ते'त प्रमुख संपादक झाल्यावर श्री. विद्याधर गोखले यांनी लिहिलेले अग्रलेख वाचणे हा एक वेगळाच आनंद होता. संस्कृत सुभाषिते आणि उर्दू शेर त्या अग्रलेखांना एक वेगळाच आशय प्राप्त करून देत. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषाशैलीने त्यांनी वाचकांवर मोहिनी घातली होती. संस्कृतप्रमाणेच त्यांचे उर्दूवरही प्रभुत्व होते.

श्री. विद्याधर गोखले हे 'लोकसत्ते'चे संपादक म्हणून जितके लोकप्रिय होते तितकेच नाटककार या नात्यानेही रसिकप्रिय आहेत. 'सुवर्णतुला', 'पंडितराज जगन्नाथ', 'मदनाची मंजिरी' या संगीत नाटकांच्यापूर्वी त्यांचे 'साक्षीदार' हे गद्य नाटकही रंगमंचावर आले होते. पण 'सुवर्णतुला' आणि 'पंडितराज जगन्नाथची' मोहिनी अद्यापही प्रेक्षकांच्या मनावर आहे. एक वेगळ्याच पध्दतीची नाट्यसंहिता त्यांनी 'बावनखणी'च्या रूपाने रंगभूमीवर आणली.

नाट्यसेवेसाठी, प्रामुख्याने संगीत नाटकांची परंपरा कायम रहावी म्हणून, श्री. गोखले यांनी 'रंगशारदा' नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेच्या वतीने संगीत नाटकांचे आणि नाट्यसंगीताचे निरनिराळे प्रयोग ते सर्वत्र करत असत. आता या संस्थेने स्वत:चा रंगमंचही मुंबईत उभारला आहे. मराठी संगीत नाटकाला आता हक्काचे स्थान मिळाले आहे.

श्री. विद्याधर गोखले संपादक, लेखक नाटककार या नात्याने जसे लोकप्रिय होते. तसेच एक प्रामाणिक समाजसेवक म्हणूनही समाजप्रिय होते. ते 'प्रामाणिक' समाजसेवक असल्यामुळेच लोकसभा निवडणुकीत ते भरघोस मतांनी निवडून आले.

१९७४ मधे बडोदे येथे झालेल्या पंचावन्नाव्या मराठी नाट्य संमेलनाचे श्री. विद्याधर गोखले अध्यक्ष होते.




५६ वे मराठी नाट्य संमेलन, यवतमाळ, १९७५. अध्यक्ष : **श्री. भालचंद्र पेंढारकर**

प्रायोजक : **मुंबई मराठी साहित्य संघ,** डॉ. भालेराव मार्ग, मुंबई-४०० ००४.

# श्री. भालचंद्र व्यंकटेश पेंढारकर

## २५-११-१९२१

छप्पन्नावे मराठी नाट्य संमेलन
'नाट्यरंजन' मंडळाचे विद्यमाने
वीर वामनराव जोशीनगर, मल्टी परपज हायस्कूल, यवतमाळ.
स्वागताध्यक्ष: श्री. सुधाकरराव नाईक
दिनांक १४ ते १७ नोव्हेंबर १९७५

मराठी रंगभूमीवर गेली अनेक वर्षे आपल्या दर्जेदार नाट्यकलाकृती सादर करणाऱ्या संस्थांपैकी अद्यापही ललितकलादर्श नाटक मंडळी कार्यरत आहे. श्री. केशवराव भोसले, श्री. बापूसाहेब पेंढारकर यांची नाट्यपरंपरा श्री. भालचंद्र पेंढारकर जिद्दीने आणि निष्ठेने पुढे चालवत आहेत.

श्री. भालचंद्र पेंढारकर यांचे बालपणच रंगमंचावर खेळण्यात गेले. आपल्या वडिलांचा आदर्श त्यांच्यासमोर नेहमीच राहीला. स्वच्छ आणि स्पष्ट शब्दोच्चार, अभिनयातील बारकावे त्यांनी वडिलांपासून घेतले. नाटक व्यवस्थित, चांगले बसल्याशिवाय रंगमंचावर आणायचे नाही आणि ठरलेल्या वेळी कोणत्याही परिस्थितीत, नाट्यगृहात प्रेक्षक नसले तरी, पडदा वर गेलाच पाहिजे, हा ललितकलेचा पहिल्यापासूनचा पायंडा अद्यापही तितक्याच कसोशीने पाळला जातो.

श्री. रामकृष्णबुवा वझे यांची कसदार आणि नेटकी संगीताची तालीम श्री. भालचंद्र पेंढारकरांना लाभली. रंगमंचावरचे गाणे कसे असावे, कसे रंगवावे याचा आदर्श श्री. पेंढारकरांनी रंगभूमीला घालून दिला.

श्री. बापूराव पेंढारकरांच्या निधनानंतर ललितकला बंद पडते की काय अशी धास्ती असतानाच जिद्दीने श्री. भालचंद्र पेंढारकरांनी ललितकला चालू ठेवली. ललितकलेच्या हातखंडा 'सत्तेचे गुलाम'मधील वैकुंठाच्या भूमिकेत श्री. भालचंद्र पेंढारकर प्रथम रंगभूमीवर आले. आतापर्यंत त्यांनी विविध भूमिका केल्या.

'सौभद्रा'त नारद, 'भावबंधना'त प्रभाकर, 'स्वामिनी', 'पडछाया'त नायक, 'दुरितांचे तिमिर जावो'मधील दिगू, 'होनाजी बाळा'मधील बाळा, 'पंडितराज जगन्नाथ'मध्ये कवी जगन्नाथ पंडित, 'बावनखणी'त भाट आदी भूमिका त्यांनी गाजवल्या.

मराठी रंगभूमीवरची सर्वात जुनी, आजतागायत चालू असलेली संस्था ललितकलादर्श नाटक मंडळी. संस्थेच्या एकसष्ठाव्या वर्धापनाच्या निमित्ताने जुनी निवडक आणि नवी वेचक, श्री. विजय तेंडूलकर यांच्या 'झाला अनंत हनुमंत' सारखे व 'गीत सौभद्र' हे श्री. ग. दि. माडगूळकर यांचे संगितक घेऊन सर्व भारताचा दौरा करून मराठी रंगभूमीचे वैभव अखिल भारताला दाखविले.

श्री. भालचंद्र पेंढारकर यांनी गाजलेल्या निवडक नाटकांच्या ध्वनीफीती तयार करून ठेवल्या आहेत. त्यासाठी लाखो रुपये खर्च केले आहेत. मराठी नाटकांच्या या ध्वनीफितींचे बहुमोल मार्गदर्शन लाभते.

जुन्या नाटकातील भूमिका नव्या गायक तरुणांना चांगली तालीम देऊन रंगमंचावर आणण्याचा त्यांचा नवा प्रयोग यशस्वी होऊ लागला आहे. त्यामुळे नव्या दमाचे गायक-गायिका रंगमंचावर येऊ लागले आहेत. संगीत रंगभूमीला नवा उजळा देण्याचे मोलाचे आणि महत्वाचे कार्य भालचंद्र पेंढारकर नेटाने करत आहेत.

'तो आणि ते', 'सुदाम्याचे पोहे' आणि 'अमर भूपाळी' या चित्रपटातही पेंढारकरांनी भूमिका केल्या. १९७५ च्या यवतमाळ येथील मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला आहे.




५७ वे मराठी नाट्य संमेलन, नवी दिल्ली, १९७६. अध्यक्ष : **श्री. दाजी भाटवडेकर**

प्रायोजक : **मुंबई मराठी साहित्य संघ,** डॉ. भालेराव मार्ग, मुंबई-४०० ००४.

# श्री. कृष्णचंद्र मोरेश्वर तथा दाजी भाटवडेकर

## १५-९-१९२१

सत्तावन्नावे मराठी नाट्य संमेलन
दिल्ली महाराष्ट्रीय शैक्षणिक व सांस्कृतिक सोसायटीच्या विद्यमाने
महाराष्ट्र रंगायन सभागृह, आरामबाग, नवी दिल्ली.
स्वागताध्यक्ष: श्री. चिंतामणराव देशमुख
दिनांक ४ ते ७ नोव्हेंबर १९७६

दि. ५नोव्हेंबर १९७६ चा
रंगभूमीदिन राष्ट्रपतिंच्या हस्ते
संमेलनात सजरा झाला.

'शारदा'तील श्रीमंत, 'संशयकल्लोळ'मधला फाल्गुनराव, 'भावबंधन'चा धुंडीराज आदी मराठी रंगभूमीवरील अजरामर अविस्मरणीय व्यक्तीरेखात पु. ल. देशपांडे यांच्या 'तुझं आहे तुजपाशी'मधला काकाजी अग्रस्थानी आहे. काकाजी रंगेल वाटतो पण तो खरा रसिक आहे. या रसिकतेतून निर्माण झालेला मार्मिक मिस्किलपणाही त्याच्यापाशी आहे. या भूमिका करण्यासाठी कसलेल्या कलावंताचीच आवश्यकता असते. श्री. दाजी भाटवडेकरांनी ती भूमिका करताना अभिनय केला नाही. ते ती भूमिका जगले. श्री. दाजींचे घराणेच रसिक आणि विद्वान पंडितांचे. त्यामुळे रसिकता त्यांच्या रोमारोमात भिनलेली. भाटवडेकर घराणे खानदानी संपन्न. या संपन्नतेसोबतच पिढीजाद लाभलेली धार्मिक प्रवृत्ती जोपासणाऱ्या आणि संस्कृती जपणाऱ्या भाटवडेकरांकडील मंडळी. संस्कृत, मराठी, इंग्रजी, हिंदी भाषात पारंगत. श्री. भाटवडेकरांचे आजोबा सर भाटवडेकर यांनी गंधर्व नाटक मंडळीचा दर्शनी पडदा १९१३ मध्ये उघडून मंडळीचे उद्घाटन केले होते.

श्री. भाटवडेकरांच्या मुंबईच्या 'बंगली'त दर एकादशीला एखाद्या गाजलेल्या कीर्तनकाराचे कीर्तन होत असे. कीर्तनकार अभिनयसंपन्न आणि गायनीकळा अवगत असलेला असे. त्यामुळे लहान वयातच श्री. दाजींवर गायनाचे आणि अभिनयाचे संस्कार झाले. कीर्तनकारांची नक्कल श्री. दाजी सफाईदारपणे करत असत. त्यावेळी संगीत रंगभूमी ऐन बहरात होती. त्यावेळची नाटके श्री. दाजी समरसून पहात. परिणामी श्री. दाजी संगीत नाटकातून भूमिका करू लागले. गायकीला साजेसा भरदार आवाज श्री. दाजींना लाभलेला होताच. गाण्यावर त्यांनी थोडी मेहनतही घेतली होती. श्री. गणपतराव बोडस, श्री. केशवराव दाते, श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांच्याकडून त्यांना मार्गदर्शन लाभले होते. मुद्राभिनयातला बारकावाही त्यांनी आत्मसात केला. ते संगीत भूमिका करू लागले आणि दुर्दैवाने नाट्यसृष्टीवर चित्रपटांचे आक्रमण झाले. नाट्यसंस्था बंद पडू लागल्या.

श्री. दाजी संस्कृतचे अभ्यासक होते. संस्कृत नाटकांसाठी त्यांनी 'संस्कृत रंगभूमी' चळवळ सुरू केली. ब्राम्हण सभेच्या सहकार्याने, वर्षाला एक याप्रमाणे १९५० ते १९८० या तीस वर्षात तीस संस्कृत नाटके त्यांनी रंगभूमीवर आणली. 'संस्कृत रंगभूमी'वर प्रबंध लिहून मुंबई विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी संपादन केली.

मुंबई मराठी साहित्य संघाचे आघाडीच्या कलाकारात ते पहिल्या पंक्तीत कार्यरत होते. संघाच्या पदाधिकाऱ्यात ते कार्यवाह, प्रमुख कार्यवाह, कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत होते. संघाच्या अनेक नाटकांना त्यांच्या दिग्दर्शनाचा लाभ झाला. शासकीय अनेक नाट्यविषयक समित्यावर त्यांनी आपल्या मार्गदर्शनाचे योगदान दिले आहे.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्य विभागात ते कार्यरत होतेच. 'तुझं आहे तुजपाशी', 'सुंदर मी होणार' आदी नाटकात त्यांनी महत्वपूर्ण भूमिका केल्या. श्री. विश्राम बेडेकरांच्या 'वाजे पाऊल आपुले'मध्ये भगवंतराव मुरकुटे यांची उत्तम भूमिका केली. 'बॉर्न यस्टरडे' या इंग्रजी आणि 'कृष्णद्वीप' या हिंदी नाटकातही त्यांनी भूमिका केल्या.

भारत सरकारने त्यांना पद्मश्री देऊन गौरव केला. संगीत नाटक अकादमीचे राष्ट्रपती सुवर्ण पदकही त्यांना १९९५ मध्ये मिळाले. द्वारका शारदा पीठाची 'नटसम्राट' पदवी, कलकत्ता लिटल थिएटरचा 'गुणी संवर्धन' पुरस्कार त्यांना लाभला.

दिल्ली येथे १९७६ मध्ये भरलेल्या मराठी नाट्य संमेलनाचे श्री. दाजी भाटवडेकर अध्यक्ष होते.




५८ वे मराठी नाट्य संमेलन, पुणे, १९७७. अध्यक्ष : **श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर**

प्रायोजक : **नासिक इंडस्ट्रीयल को-ऑप. इस्टेट लि.**, सातपूर, नाशिक-४२२ ००७.

# श्री. पुरुषोत्तम व्यंकटेश दारव्हेकर

१-६-१९२४

अठ्ठावन्नावे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पुणे शाखांच्या विद्यमाने
टिळक स्मारक मंदिर, पुणे.
स्वागताध्यक्ष: श्री. शंतनुराव किर्लोस्कर
दिनांक : २४, २५, २६ डिसेंबर १९७७

मराठी संगीत नाटकांचे सामान्यत: तीन कालखंड मानले जातात. प्रारंभीचा विष्णुदास भावे यांनी सुरू केलेला आणि श्री. अण्णासाहेब किर्लोस्करांनी सुविहित, सुसंगत अवस्थेत आणलेला, चित्रपटांच्या आगमनापर्यंत भरभराटीत आलेला पहिला कालखंड. बालमोहनच्या सहकार्याने आचार्य अत्रे यांनी सुरू केलेला आणि नाट्य निकेतनच्या श्री. मो. ग. रांगणेकरांनी आपल्या 'कुलवधू', 'एक होता म्हातारा', 'कोणे एके काळी' आदी नाटकांनी पुन्हा ऊर्जितावस्थेत आणलेला संगीत रंगभूमीचा दुसरा कालखंड. नाट्यनिकेतन बंद पडल्यानंतर विद्याधर गोखले यांच्या 'पंडितराज जगन्नाथ'ने सुरू झालेला आणि श्री. पुरुषोत्तम दारव्हेकरांच्या 'कट्यार काळजात घुसली' या बहारदार संगीत नाटकाने पुनरपी अत्युच्च शिखराला गेलेला तिसरा कालखंड. श्री. पुरुषोत्तम दारव्हेकरांच्या 'कट्यार...'ने संगीतप्रेमी प्रेक्षक पहिल्याच उत्साहाने संगीताचा रसास्वाद घेण्यासाठी नाट्यगृहाकडे वळले.

श्री. पुरुषोत्तम व्यंकटेश दारव्हेकर नागपूरचे. नागपूर हे रसील्या रसिकांचे केंद्रस्थान असल्याने मेळ्यापासून बैठकीच्या जलशापर्यंत तेथे संगीत कार्यक्रमांची रेलचेल असे. अशा संगीतमय वातावरणाचे सहजस्वाभाविक अनुकूल परिणाम दारव्हेकरांवर झाले. श्रवणाने त्यांचे संगीतज्ञान आणि कान तयार झाले. महाविद्यालयातच त्यांनी एकांकिकांचे लेखन सुरू केले. त्याचीच परिणती नाट्यलेखनात झाली.

'कट्यार काळजात घुसली'ने श्री. पुरुषोत्तम दारव्हेकरांना लौकिक मिळवून दिला. त्यापूर्वी 'अबोल झाली सतार' संगीत नाटक रंगमंचावर आले होते. त्यांनी आणखीही संगीत नाटके लिहिली. 'घन:श्याम नयनी आला', 'चंद्र नभीचा ढळला', 'नयन तुझे जादूगार', 'वऱ्हाडी माणूस' ही त्यांची नाटके गाजली. 'वऱ्हाडी माणसा'ने ते संगीतप्रधान नाटकाव्यतिरिक्त नाटकेही यशस्वी रितीने लिहितात, हे सिध्द केले.

नागपूरला रसिक रंजन नाट्यसंस्था त्यांनी स्थापली. त्या संस्थेची काही नाटके राज्य स्पर्धेत पारितोषिकपात्र ठरली. तीन अंकी, चार अंकी नाटकांशिवाय श्री. दारव्हेकरांनी बऱ्याच एकांकिका लिहिल्या, त्यांचे प्रयोगही झाले. बाल नाट्यातही ते मागे राहिले नाहीत. 'उपाशी राक्षस', 'काबुलीवाला', 'पऱ्यांचा महाल' आदी त्यांची बालनाट्ये मुलांना आवडली.

नाट्य लेखनाबरोबरच त्यांनी नाट्य दिग्दर्शनही केले. नाटककाराने स्वत:च्याच नाटकांचे दिग्दर्शन केल्यामुळे त्या नाटकाला एक वेगळीच रंगत चढते. नाटकाची उंची वाढते. श्री. पुरुषोत्तम दारव्हेकरांनी नभोनाट्येही लिहिली आहेत आणि प्रसारितही केली आहेत. चित्रपट रंगभूमी सांस्कृतिक महामंडळाचे सदस्य आणि नाट्यप्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे सदस्यत्वाच्या नात्याने त्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. त्यांना मध्य प्रदेश सरकारच्या साहित्य परिषदेचे पारितोषिक प्राप्त झाले होते.

पुण्याला १९७७ मध्ये भरलेल्या अ. भा. नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद श्री. पुरुषोत्तम दारव्हेकरांनी सुशोभित केले.



५९ वे मराठी नाट्य संमेलन,सावंतवाडी, १९७८.

अध्यक्ष : **श्री. भालबा केळकर**

प्रायोजक : **प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन,** २५१, सहकारी गृहकुल संस्था,सहकार नगर, पुणे-४१.

# प्रा. भालचंद्र वामन तथा भालबा केळकर

## २३-९-१९२० - ६-१२-१९८७

एकोणसाठावे मराठी नाट्य संमेलन
नाट्यदर्शन सावंतवाडी यांच्या विद्यमाने
कै. शेठ गोविंदराव केढारकर सभा मंडप, सावंतवाडी.
स्वागताध्यक्ष: उद्योगपती श्री. बा. म. गोगटे
दिनांक २३ ते २५ डिसेंबर १९७८

मराठी नाट्य व्यवसायात प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनचे नाव आदराने घेतले जाते. हौशी नटांच्या या संस्थेने मराठी नाट्य व्यवसायाच्या इतिहासात मानाचे स्थान मिळविले आहे. संस्थेला हे महत्वपूर्ण स्थान मिळवून देण्यात प्रा. भालबा केळकर यांचा सिंहाचा वाटा आहे. हौशी रंगभूमीची जडणघडण करण्यात भालबांनी आयुष्य वेचले. भालबा विज्ञानाचे प्राध्यापक होते. 'विज्ञानामुळेच मी कलाविष्काराचा तर्कसंगत अभ्यास करू शकलो', असे भालबा म्हणत असत.

नट, दिग्दर्शक आणि संघटक या नात्याने तरुण वयातच भालबा रंगभूमीशी निगडीत झाले. 'भावबंधन', 'पैसाच पैसा', 'लग्नाची बेडी', 'खडाष्टक' आदी नाटकातून त्यांनी प्रारंभीच्या काळात स्त्री भूमिका केल्या. प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन ही केवळ हौशी, नाट्यप्रेमी कलाकारांसाठी भालबांनी आपल्या चार-पाच सहकाऱ्यांच्या सहाय्याने स्थापन केली.

पी. डी. ए. ने राज्य नाट्य स्पर्धा' मध्ये सहभागी होऊन अनेक चांगली नाटके, एकांकीका रंगमंचावर आणल्या. या नाटकांपैकी अनेकांनी पारितोषिके मिळविली. श्री. श्रीराम लागू, श्री. जयंत धर्माधिकारी, श्री. जब्बार पटेल आदी गुणी कलाकार पी. डी. ए. ने व्यवसायाला दिले.

वसंत कानेटकरांचे 'वेड्याचे घर उन्हात', 'प्रेमा तुझा रंग कसा', 'देवांचे मनोराज्य' ही पहिली नाटके पी. डी. ए. च्या रंगभूमीवर आली. ती श्री. भालबांनी दिग्दर्शित केली होती. डॉ. लागू 'वेड्याचे घर...'पासून उदयाला आले. 'प्रेमा तुझा...'तला प्रा. बल्लाळ भालबांनी अजरामर केला. मराठी रंगभूमीवर श्री. वसंत कानेटकरांसारखा श्रेष्ठ नाटककार आला.

'जगन्नाथाचा रथ', 'पवनाकाठचा धोंडी', 'जोशी काय बोलतील', 'बनगरवाडी' ही नव्या पठडीतली नाटके आणि 'शारदा', 'भावबंधन' अशी जुनी नाटके पी. डी. ए. च्या रंगमंचावर आल्यामुळे नव्या जुन्याचा आणि प्रायोगिकतेचा समतोल साधला गेला.

व्यवसाय आणि हौस यांच्या द्वंद्वात पी. डी. ए. काही काळ सापडली. फक्त हौशी रंगभूमीसाठीच पी. डी. ए. आहे, हा श्री. भालबांचा दावा न पटल्याने काही सहकाऱ्यांनी संस्था सोडली. श्री. भालबा केळकर मात्र आपल्या मताशी ठाम राहिले. भालबांच्या रेखीव, ठाशीव संस्कारांमधून श्रीमती सई परांजपे, श्री. जब्बार पटेल, श्री. श्रीराम लागू यांसारखी कर्तृत्ववान मंडळी नाट्य व्यवसायाला आणि चित्रपट व्यवसायाला लाभली. मतभेद असूनही १९७२ साली 'घाशीराम कोतवाल' प्रथम पी. डी. ए.नेच केले.

१९७८ च्या सावंतवाडीच्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन त्यांच्या नाट्यसेवेचा गौरव करण्यात आला.




६० वे मराठी नाट्य संमेलन, माटुंगा, मुंबई, १९८०. अध्यक्ष : **श्री. छोटा गंधर्व**

प्रायोजक : **नासिक इंडस्ट्रीयल को-ऑप. इस्टेट लि.**, सातपूर, नाशिक-४२२ ००७.

# श्री. सौदागर नागनाथ तथा (छोटा गंधर्व) गोरे

१०-३-१९१८

साठावे मराठी नाट्य संमेलन
नाट्य व्यावसायिक निर्माता संघाच्या विद्यमाने
रुपारेल कॉलेज मैदानावरील डॉ. अ. ना. भालेराव सभामंडप, माटुंगा, मुंबई.
स्वागताध्यक्ष: श्री. पु. ल. देशपांडे
दिनांक २३ ते २५ फेब्रुवारी १९८०

श्री. दामुअण्णा जोशी यांनी बाल नटांचीच असलेली 'बालमोहन संगीत मंडळी' स्थापली. त्या संस्थेसाठी गोड गळ्याच्या मुलांचा शोध घेताना कोरेगाव (सातारा) येथे गाणारी दोन मुले असल्याचे त्यांना समजले. ते कोरेगाव येथे श्री. गोरे यांच्याकडे गेले. तेथे त्यांनी लहान सौदागरचे गाणे ऐकले. आवाजाची असामान्य देणगी असलेला हा मुलगा संगीतात नाव गाजवणार याबद्दल दामुअण्णांची खात्री पटली. नानासाहेब गोखले यांच्या 'प्राणप्रतिष्ठा'त नायिका वारणेची भूमिका सौदागरला प्रथम देण्यात आली.

दि. २२ जुलै १९२८ ला 'प्राणप्रतिष्ठा'चा पहिला प्रयोग पुण्याच्या विजयानंदमध्ये झाला. सौदागरच्या गोड गळ्यावर प्रेक्षक निहायत खूष झाले. गोरे यांच्या गंधर्वगळ्यामुळे दामुअण्णा त्यांना छोटा गंधर्व म्हणू लागले आणि तेच नाव पुढे रूढ झाले. 'स्वर्गावर स्वारी', 'कर्दनकाळ', 'संशयकल्लोळ' आदी नाटकात श्री. सौदागर-छोटा गंधर्व-नायिकेच्या भूमिका गाजवू लागले. 'संशयकल्लोळ'मधल्या रेवतीच्या पदांना त्यांनी चार-चार वन्समोअर प्रेक्षकांकडून घेतले आहेत. त्यांच्यासाठी दामुअण्णांनी खास संगीत शिक्षक नेमला होता. श्री. बळवंतराव गोवित्रीकर त्यांना नाट्यपदे शिकवत. श्री. बागलकोटकरबुवा, श्री. पाध्येबुवा, सेंदेखान यांच्यासारख्या गायकांकडे छोटा गंधर्वांनी शास्त्रोक्त गायनाचे पाठ घेतले.

बालमोहनने आचार्य अत्रे यांच्याकडून नाटके लिहवून घेऊन रंगमंचावर आणली. पहिल्याच 'साष्टांग नमस्कार'मध्ये छोटा गंधर्वांनी त्रिपुरीची भूमिका फर्मास वठवली. स्त्री भूमिकेमधले त्यांचे हे शेवटचे काम.

अत्र्यांच्या 'घराबाहेर'मध्ये ते पद्मनाभ झाले. अत्र्यांच्या नाटकांनी बालमोहनला लौकिक आणि छोटा गंधर्वांना लोकप्रियता मिळवून दिली. बालमोहन + श्री. अत्रे + श्री. छोटा गंधर्व= हमखास यशस्वी नाटक असे समीकरणच नाट्यव्यवसायामध्ये रूढ झाले.

लाहोरकडचे श्री. सेंदेखान मुंबईत होते. लोक त्याला वेडा समजत. पण तो चांगला गायक होता. प्रा. बी. आर. देवधरांनीही त्यांच्याकडून गाणे शिकून घेण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याने दाद दिली नव्हती. पण या सेंदेखानने छोटा गंधर्वांना मनापासून गाणे शिकवले.

श्री. छोटा गंधर्वांनी कलाविकास नाट्यसंस्था स्थापली. बालमोहनचेच अकरा कलाकार संस्थेचे मालक होते. कलाविकासाचे पहिलेच नाटक 'देवमाणूस' खूपच गाजले. त्यातले 'चांद माझा हासरा' आजही रसिकांच्या स्मरणात आहे. कलाविकासच्या नाटकांचे संगीत दिग्दर्शन छोटा गंधर्वच करत असत. पदेही तेच लिहीत. 'स्त्री', 'विजय', 'शांती संग्राम' आदी नाटकांची पदे आणि चाली छोटा गंधर्वांनी दिल्या होत्या.

१९५०-५१ नंतर 'सौभद्र', 'मानापमान', 'मृच्छकटिक', 'संशयकल्लोळ', 'विद्याहरण' वगैरे नाटकात छोटा गंधर्वांनी भूमिका केल्या. १९८१ मध्ये मुंबईत संगीत नाटकांचा महोत्सव झाला. त्याची सांगता छोटा गंधर्वांच्या 'सौभद्र'ने झाली. या नाटकाचे उत्पन्न पासष्ट हजार रुपये झाले.

शंकराचार्य कुर्तकोटी यांनी छोटा गंधर्वांना 'बालकिन्नर' पदवी दिली. १९८० मधील मुंबई येथील साठाव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्ष छोटा गंधर्व होते.



६१ वे मराठी नाट्य संमेलन, नाशिक, १९८१.

अध्यक्ष : **श्री. आत्माराम भेंडे**

प्रायोजक : **इंडियन नॅशनल थिएटर,** १९२१, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई -४०० ०२३.

# श्री. आत्माराम भेंडे

## ७-५-१९२३

एकसष्ठावे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नाशिक शाखेच्या विद्यमाने
कै. शांता जोग मंडप, भालेकर हायस्कूल, नाशिक.
स्वागताध्यक्षः श्री. वि. वा. शिरवाडकर
दिनांक : २४ ते २६ जानेवारी १९८१

मराठी रंगभूमीवर फार्स या नाट्यप्रकाराला एक आगळेच महत्व प्राप्त झाले आहे. रंगमंचावर पूर्वी प्रहसन या अभिधानाने फार्स होत असत. गद्य रंगभूमीचा प्रेक्षकांवरचा प्रभाव आणि संगीत नाटकाने भारावलेला शौकिन रसिक प्रेक्षक यांनी फार्स या वेगळ्या आणि हलक्याफुलक्या नाट्य प्रयोगाकडे दुर्लक्षच केले. त्यामुळे प्रारंभीच्या काळात फार्स रंगभूमीवर मूळ धरू शकला नाही.

फार्स पुन्हा रंगभूमीवर आणून तो लोकप्रिय करण्याचे श्रेय श्री. आत्माराम भेंडे यांना द्यावे लागेल. त्यांना श्री. बबन प्रभू या गुणी अभिनेत्याने आणि लेखकाने साथ दिली. श्री. बबन प्रभूंचे 'झोपी गेलेला जागा झाला', 'दिनूच्या सासूबाई राधाबाई', 'ही का ती, ती का ही?', 'माणूस खाणारी कोंबडी' आदी फार्स करून श्री. भेंडे-प्रभू जोडीने रंगमंचावर फार्सचे युग पुन्हा सुरू केले.

१९४६ मध्ये रंगभूमीवर आलेल्या श्री. माधव मनोहर लिखित 'सशाची शिंगे'च्या दिग्दर्शनाने आणि त्यातील भूमिकेने श्री. आत्माराम भेंडे प्रेक्षकांच्या प्रथम परिचयाचे झाले. इंडियन नॅशनल थिएटर या संस्थेच्या मराठी नाट्यविभागाचे श्री. भेंडे प्रमुख होते. त्यांची नाटके आणि इतर वीस नाटकांच्या दिग्दर्शनाने, अनेक भूमिकांनी ते प्रेक्षकांचे मित्रच झाले. श्री. आत्माराम भेंडे यांनी आपला स्वत:चा एक स्वतंत्र वर्गच (स्कूल) रंगभूमीवर प्रस्थापित केला.

केवळ फार्सच श्री. भेंडे यांनी दिग्दर्शित केले नाहीत. 'दिवा जळू दे सारी रात', 'अपराध मीच केला', 'अशी बायको असावी', 'या चिमण्यांनो या', 'सीमेवरुन परत जा' अशी विविध वळणांची नाटकेही त्यांनी यशस्वीपणे दिग्दर्शित केली.

सहज अभिनय हे श्री. आत्माराम भेंडे यांचे दुसरे वैशिष्ट्य. 'सुंदर मी होणार', 'एक रात्र अर्धा दिवस', 'आता मात्र कमाल झाली' आदी नाटकातल्या भूमिकांवर भेंडे यांचा स्वतंत्र छाप आहे. 'प्रिती परि तुजवरती', 'नरो वा कुंजरोवा', 'नेपोलियन' यातील त्यांच्या भूमिका अविस्मरणीय झाल्या.

विष्णुदास भावे सुवर्ण पदक, विनोदी भूमिकेचा नाट्य दर्पण पुरस्कार, नाट्य परिषदेचे शंकर घाणेकर पारितोषिक, मराठी रंगभूमीच्यां प्रदीर्घ सेवेबद्दल श्री. आत्माराम भेंडे यांचा 'नाट्यदर्पण' पुरस्काराने १९८० मध्ये सन्मान करण्यात आला. नाटकाचे दिग्दर्शन, भूमिका, चित्रपटातील अनेकविध भूमिका यांबद्दल श्री. आत्माराम भेंडे यांचा यथोचित सन्मान झाला तो १९८१ मध्ये नाशिक येथे भरलेल्या एकसष्टाव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन.



६२ वे मराठी नाट्य संमेलन, अकोला, १९८२. अध्यक्ष : **श्री. वसंतराव देशपांडे**

प्रायोजक : **नासिक इंडस्ट्रीयल को-ऑप. इस्टेट,** सातपूर, नाशिक-४२२ ००७.

# श्री. वसंतराव देशपांडे

## २-५-१९२० - ३०-७-१९८३

बासष्टावे मराठी नाट्य समेलन
'रसिकाश्रय' अकोला यांच्या विद्यमाने
वीर वामनराव जोशी नाट्यनगरी आगरकर विद्यालय, अकोला.
स्वागताध्यक्ष: श्री. मधुसूदन वैराळे
दिनांक: १३ ते १५ फेब्रुवारी १९८२

श्री. वसंतराव देशपांडे नागपूरचे. त्यांच्या मातोश्रींना गायनाचा छंद होता. गायनाचे संस्कार लहानपणीच वसंतरावांवर झाले. त्यातच श्री. वसंतरावांना अभिनयाची आवड होती. नागपूरच्या गणेशोत्सवी मेळ्यांमधून ते गायचे, त्यांच्या नाटुकल्यातून अभिनय करायचे. नागपूरच्या नागरिकांना वसंतरावांचे मोठेच कौतुक वाटत असे. श्री. सप्रेबुवांनी त्यांच्या गायनाला पध्दतशीर शास्त्रोक्त बैठक मिळवून दिली. नागपूरलाच ते बालकलाकार म्हणून रंगभूमीवर आले. डॉ. केशवराव हेडगेवारांनी त्यांना कोल्हापूरला श्री. भालजी पेंढारकरांकडे पाठवले. श्री. भालजींनी आपल्या 'कालियामर्दन' चित्रपटात त्यांना भूमिका दिली.

श्री. बालगंधर्व आणि मा. दीनानाथ मंगेशकर यांच्या गायनाने श्री. वसंतरावांना मंत्रमुग्ध केले. त्यातही श्री. दीनानाथांच्या गायकीचा प्रभाव त्यांच्या गायनावर अधिक पडला. त्यांच्या गायनाची मैफल श्री. दीनानाथांच्या पदाविना पुरी व्हायची नाही.

श्री. वसंतराव देशपांडे पुण्याला आले आणि त्यांचे नाव गायनप्रेमी रसिकात गाजू लागले. मिलिटरी अकाऊन्टसमध्ये नोकरी करत असतानाच ते मैफली गाजवायचे. पण पुण्यात येऊनही व्यावसायिक रंगभूमीशी त्यांचा संबंध फार उशीराच आला.

'मी जिंकलो मी हरलो' या नाटकाद्वारे ते प्रथम व्यावसायिक रंगमंचावर आले. या नव्या अभिनेत्यावर प्रेक्षक खुष झाले. श्री. वसंतरावांमधल्या गायकाला वाव दिला 'मेघमल्हार' नाटकाने. त्या नाटकातली 'गुलजार नार' आणि 'धीर धरी धीर धरी' गाणी लोकप्रिय झाली. मागे पडत चाललेल्या मराठी संगीत रंगभूमीला एक तळपता तारा गवसला.

श्री. पुरुषोत्तम दारव्हेकरांचे 'कट्यार काळजात घुसली' रंगभूमीवर आले आणि त्या नाटकाने गंधर्वयुगाची याद यावी अशी बहार उडवून दिली. या नाटकाने श्री. वसंतराव देशपांडे यांना अमाप कीर्ती मिळवून देऊन रंगभूमीवरचे गायक नटाचे त्यांचे स्थान पक्के केले. 'बीज म्हणाली धरतीला'मधला राजगुरु त्यांनी अविस्मरणीय केला. नव्या नाटकांप्रमाणे जुन्या नाटकातल्या संगीत भूमिकाही त्यांनी केल्या. अश्विनशेट त्यांनी बहारीने रंगवला. नारद पुन्हा लोकप्रिय केला. चित्रपटात पार्श्वगायन केले आणि 'दूधभात', 'अष्टविनायक' चित्रपटात भूमिकाही केल्या. 'गुळाचा गणपती'तली त्यांची गाणी चांगलीच गाजली. संगीत अकादमीचे सुवर्णपदक, विष्णुदास भावे सुवर्णपदक त्यांना मिळाले.

"अकोल्याच्या बासष्टाव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे १९८२ मध्ये अध्यक्ष झाल्यावर त्यांनी भारावलेल्या भावनेने मराठी रसिक प्रेक्षकांचे ऋण मोकळ्या मनाने मान्य केले.




६३ वे मराठी नाट्य संमेलन, कोल्हापूर, १९८३. अध्यक्ष : **श्री. रणजीत देसाई**

प्रायोजक : **साबळे वाघीरे ॲण्ड कंपनी लि.**, १०५, भवानी पेठ, पुणे-४११ ०४२.

# श्री. रणजीत देसाई

## ८-४-१९२८ - ६-३-१९९२

त्रेसष्टावे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, कोल्हापूर शाखेच्या विद्यमाने
संगीत सूर्य कै. केशवराव भोसले नगर, प्रायव्हेट हायस्कूल प्रांगण, कोल्हापूर.
स्वागताध्यक्ष: श्रीमान मदनमोहन लोहिया
दिनांक ८ ते १० जानेवारी १९८३.

कथालेखक आणि कादंबरीकार म्हणून लोकप्रिय असलेला साहित्यिक यशस्वी नाटककार होतोच असे नाही. कादंबरीकार या नात्याने लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर असलेले प्रा. ना. सी. फडके आणि श्री. वि. स. खांडेकर नाटककार होऊ शकले नाहीत. आणि नाटकांमुळे अमाप लोकप्रिय झालेले आचार्य प्र. के. अत्रे कांदबरीकार म्हणून गाजले नाहीत. श्री. रणजीत देसाईंचा 'संगीत सम्राट तानसेन' पहिल्याच प्रयोगाला अयशस्वी झाला. पण 'हे बंध रेशमाचे' या नाटकाच्या वेळी श्री. देसाईंना नाट्याची नस नेमकी सापडली. या नाटकाने चांगलेच यश मिळविले. आणि मग 'स्वामी', 'गरूडझेप', 'रामशास्त्री' या नाटकांनी त्याच यशाची पुनरावृत्ती केली. 'सावली सुखाची', 'पंख झाले वैरी', 'कांचन मृग', 'धन अपुरे' आदी नाटकेही श्री. रणजीत देसाईंनी लिहिली.

खानदानी सरदार घराण्यात जन्मलेल्या श्री. रणजीत देसाईंचे शिक्षण कोल्हापुरात झाले. इतिहास हा त्यांचा आवडीचा विषय. ललित साहित्यात ते रमत. ठसठशीत, जिवंत व्यक्तीचित्रे आणि ओघवती भाषा हे श्री. देसाईंच्या लेखनाचे वैशिष्ट्य. त्यांच्या 'स्वामी' कादंबरीने लोकप्रियतेचे उच्चांक मोडले. 'श्रीमान योगी' मराठी घराघरात पोहोचले. 'स्वामी'ला महाराष्ट्र राज्य पुरस्कार, ह. ना. आपटे पुरस्कार मिळाला.

१९६४ मध्ये श्री. देसाईंना साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. भारत सरकारने 'पद्मश्री' पदवीने त्यांना सन्मानीत केले. अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे बडोदे येथील अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. त्रेसष्टावे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन १९८३ मध्ये कोल्हापूर येथे झाले. त्यांचे श्री. रणजीत देसाई अध्यक्ष होते.



६४ वे मराठी नाट्य संमेलन, पणजी (गोवा), १९८४. अध्यक्षा : **श्रीमती ज्योत्स्ना भोळे**

प्रायोजक : **डॉ. वसंत गोडसे व श्री. अजित रेगे,** (सारस्वत बँक), मुंबई.

# श्रीमती ज्योत्स्ना केशवराव भोळे

११-५-१९१४ -

चौसष्टावे मराठी नाट्य संमेलन

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पणजीच्या विद्यमाने

कला अकादमीचे आवार, पणजी (गोवा)

स्वागताध्यक्ष : डॉ. सावळाराम केणी

दिनांक : ४ ते ६ फेब्रुवारी १९८४

गोव्यातील बांदोड्याचे केळेकर घराणे हे गायकीचे घराणे म्हणून सर्वत्र प्रसिध्दी पावलेले होते. मुंबईत वास्तव्याला आल्यावर श्रीमती गिरिजाबाई आणि श्रीमती केसरबाई विलायत हुसेन खाँ यांच्याकडून गायनाची तालीम घेऊ लागल्या. त्यांची धाकटी बहिण कुमारी दुर्गा ही त्यांचा रियाझ चालू असताना जवळच बसलेली असे. त्यामुळे गायनाचे शिक्षण कु. दुर्गाला लहान वयातच मिळाले. मुंबईच्या कृष्ण मूव्हीटोन आणि भारत मूव्हीटोनचे महत्वाकांक्षी मालक श्री. माणिकलाल पटेल यांनी संत सखूच्या जीवनावर बोलपट निर्माण केला होता. या चित्रपटात श्रीमती दुर्गा शिरोडकर यांनी सासूची आणि श्रीमती दुर्गा भोळे यांनी सुनेची-सखूची भूमिका केली होती. या दोन दुर्गांमुळे काहीसा गोंधळ होऊ लागल्यामुळे दुर्गा भोळे याचे नांव ज्योत्स्ना भोळे करण्यात आले. या बोलपटाचे संगीत दिग्दर्शक होते श्री. केशवराव भोळे. श्रीमती ज्योत्स्नाबाईनी त्यानंतर श्री. माणिकलाल पटेल यांच्या 'कृष्णावतार'मध्ये कंसपत्नीची भूमिका केली. मेनका पिक्चर्सच्या श्री. मो. ग. रांगणेकरलिखित-दिग्दर्शित 'सुवर्ण मंदीर' (१९३४), भूपाल पिक्चर्सच्या 'कुबेर' (१९४७) एवढ्याच चार चित्रपटांत त्यांनी भूमिका केल्या. श्रीमती ज्योत्स्नाबाई प्रसिध्दीस आल्या त्या नाटकांमधूनच.

नाटकात नव्याचे वारे नुकतेच वाहू लागले होते. बोलपटांच्या आक्रमणामुळे नाटकाचा प्रेक्षकवर्ग कमी होऊ लागला होता. तत्कालीन नाटकातील संगीताच्या अतिरेकी जलशालाही लोक कंटाळले होते. त्यांना काही तरी वेगळे पाहिजे होते. नवे पाहिजे होते. श्री. के. नारायण काळे, श्री. अनंत काणेकर, श्री. श्री. वि. वर्तक या पुरोगामी विचारांच्या तरुणांनी आधुनिक नाट्यतंत्राची आणि नवविचाराची नाटके रंगभूमीवर आणण्याच्या हेतूने नाट्य मन्वंतर या नाट्यसंस्थेची स्थापना केली. या तिघांच्या सहाय्याला श्री. केशवराव दाते, श्री. पार्श्वनाथ आळतेकर आणि डॉ. ग. य. चिटणीस होते.

नाट्य मन्वन्तरचे पहिले नाटक श्री. श्री. वि. वर्तक यांचे 'आंधळ्यांची शाळा' दिनांक १ जुलै १९३३ रोजी मुंबईच्या रिपन नाट्यगृहाच्या रंगमंचावर सादर झाले. एक प्रवेशी-एक अंकी या नाटकात श्री. केशवराव दाते, श्री. के. नारायण काळे, श्री. पार्श्वनाथ आळतेकर, श्रीमती गोदूताई वर्तक आणि श्रीमती जोत्स्नाबाई भोळे यांच्या भूमिका होत्या. नाटकात फक्त दोनच गाणी होती. ती गाणीही त्या नाटकासाठी लिहिलेली नव्हती, तर श्री. अनंत काणेकरांच्या पूर्व प्रकाशित दोन कविता 'तू माझा अन् मी तुझी तरी' आणि 'एकलेपणाची आग' यांचा उपयोग करण्यात आला होता. नाटकात त्या श्रीमती ज्योत्स्नाबाईंनी गायिल्या होत्या. श्री. केशवराव भोळे यांनी त्या भावगीतासारख्या बसविल्या होत्या. पुण्याच्या प्रयोगात 'आला खुषीत समिंदर' हे श्री. काणेकरांचे कोळीगीत श्रीमती ज्योत्स्नाबाई म्हणू लागल्या. ते लोकप्रिय झाले, पण कथारसपरिपोषाच्या दृष्टीने पूर्वीची दोन गाणी अधिक योग्य वाटली. 'आंधळ्यांची शाळा'मध्ये प्रथमच पार्श्वसंगीताचा प्रयोग करण्यात आला होता. वाद्यवादक रंगमंचासमोर न बसता रंगमंचावरच एका बाजूला बसत. पण नाट्य मन्वन्तर फार काळ तग धरू शकली नाही. संस्था अल्पावधीत बंद पडली. श्रीमती ज्योत्स्नाबाई नवनव्या भावगीतांच्या ध्वनिमुद्रिकांमुळे संगीतप्रेमी रसिकांच्या आवडत्या झाल्या.

'कुलवधू'मध्ये श्री. अविनाश, श्रीमती ज्योत्स्ना भोळे यांच्या प्रमुख भूमिका होत्या. हलक्याफुलक्या घरगुती संवादांमुळे आणि मास्तर कृष्णराव यांच्या संगीतामुळे जिथेजिथे मराठी बोलले जाते तिथेतिथे 'कुलवधू' लोकप्रिय झाले. श्रीमती ज्योत्स्नाबाईंचे नाटक म्हणून 'कुलवधू' ओळखले जाते. नाट्य निकेतनने 'कुलवधू'चे सुमारे दोन हजार प्रयोग केले. नायिका भानुमती ज्योत्स्नाबाईंनी सर्वच प्रयोगात केली होती. त्यांची 'बोला अमृत बोला', 'मनरमणा मधुसूदना', 'भाग्यवती मी त्रिभुवनी झाले' ही गाणी अद्यापही पूर्वीइतकीच रसिकप्रिय आहेत. नाट्यनिकेतनच्या अन्य नाटकातही ज्योत्स्नाबाईंनी नायिकेच्या भूमिका केल्या. प्रेक्षकांनी त्यांचे चांगले स्वागत केले. परंतु 'कुलवधू'च्या भानुमतीची लोकप्रियता त्यांना लाभली नाही. 'कुलवधू'ने मराठी रंगभूमीला नवा उत्साह, नवा श्वास दिला. 'कुलवधू'च्या संगीताने नाट्यसंगीताला नवा उमेदीचा स्वर दिला. श्रीमती ज्योत्स्नाबाईंनी 'आराधना' नाटक लिहून त्यांचे काही प्रयोगही केले.

आपल्या गोवा या जन्मक्षेत्रात, पणजी येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या १९८४ मधल्या चौसष्टाव्या अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषवून श्रीमती ज्योत्स्नाबाई मराठी रंगभूमीच्या भाग्यवती ठरल्या.




६५ वे मराठी नाट्य संमेलन, नागपूर, १९८५.
६६ वे मराठी नाट्य संमेलन, पुसद, १९८६.

अध्यक्ष : **श्री. प्रभाकर पणशीकर**

प्रायोजक : **कै. सरस्वतीबाई गणेश फडके,** यांचे स्मरणार्थ सौ. दीपा, श्री. अच्युत व श्री. मंदार फडके, दादर, मुंबई-२८.

# श्री. प्रभाकर पणशीकर

१४-५-१९३१

पासष्टावे मराठी नाट्य संमेलन
अ.भा. मराठी नाट्य परिषद, नागपूर शाखेच्या विद्यमाने
कै. राम गणेश गडकरी सभा मंडप, नागपूर विद्यापीठ,
दिक्षांत सभागृह प्रांगण, नागपूर.
स्वागताध्यक्ष: श्री. वसंतराव साठे
दिनांक ११ ते १३ जानेवारी १९८५.

सहासष्टावे मराठी नाट्य संमेलन
जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यमाने
फुलसिंग नाईक महाविद्यालय पटांगण, पुसद.
स्वागताध्यक्ष: ना. सुधाकरराव नाईक
दिनांक ७ ते ९ फेब्रुवारी १९८६

सलग दोन वेळा अध्यक्षपदी निवडून आलेले श्री. प्रभाकर पणशीकर १९८५ चे नागपूरचे पासष्टावे आणि १९८६ चे पुसदचे सहासष्टावे अशी दोन संमेलने श्री. पणशीकरांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या दोन वर्षांच्या कालावधीत नाट्य संकुलाची भव्य कल्पना त्यांनी आकारास आणली.

श्री. बाबूराव पेंढारकर-स्नेहप्रभा प्रधान यांच्या गाजलेल्या 'झुंझारराव' या नाट्यप्रयोगात श्री. प्रभाकर पणशीकर प्रथम व्यावसायिक रंगभूमीवर आले आणि तेथेच स्थिरपद झाले. त्या वेळपर्यंत चाळीतल्या गणेशोत्सवातील नाटकांचे दिग्दर्शन करणे, जी मिळतील ती छोटी छोटी कामे करणे यातच ते मार्ग शोधत होते. नाट्य निकेतनच्या श्री. आजगावकरांनी त्यांना नाट्य निकेतनमध्ये नेले आणि तेथून त्यांनी यशाच्या पायऱ्या चढण्यास सुरुवात केली. नाट्य निकेतनच्या 'राणीचा बाग' मध्ये छोटीशी भूमिका करून खऱ्या अर्थाने त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण केले. श्री. मो. ग. रांगणेकरांच्या 'भटाला दिली ओसरी' मधल्या नवकवीच्या भूमिकेमुळे प्रेक्षकांच्या नजरेत ते भरले. आणि नाट्य-निकेतनच्याच आचार्य अत्रे लिखित 'तो मी नव्हेच मधल्या लखोबा लोखंडेला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. लखोबा नाटकाचा नायकही आणि खलनायकही आहे. सावज हातात येईपर्यंत नायक आणि ते जाळ्यात सापडल्यावर खलनायक. या परस्परविरोधी भूमिका श्री. प्रभाकर पणशीकर विलक्षण ताकदीने करतात. एकाच नाटकात दोन हजार प्रयोगांतून एकच भूमिका सातत्याने करणारे दोन कलाकार मराठी रंगभूमीवर झाले. श्री. प्रभाकर पणशीकर आणि श्रीमती ज्योत्स्ना भोळे ('कुलवधू') दोन्हीही नाटके नाट्य निकेतनची हेही एक वैशिष्ट्य.

श्री. प्रभाकर पणशीकरांच्या स्वतःच्या नाट्यसंपदा संस्थेच्या 'अश्रूंची झाली फुले' मधील प्रा. विद्यानंद, 'इथे ओशाळला मृत्यू' मधील औरंगजेब या भूमिकांनाही प्रेक्षकांनी त्यांना मनापासून दाद दिली.

पण श्री. प्रभाकर पणशीकरांची नाट्य व्यवसायातील महत्वाची भूमिका निर्मात्याची. ती ते अत्यंत कसोशीने, हिशेबी व्यवस्थितपणे पार पाडतात. त्यांच्या संस्थेच्यावतीने श्री. वसंत कानेटकर, श्री. वि. वा. शिरवाडकर, श्री. श्री. ना. पेंडसे आदी प्रथितयशांची नाटके रंगभूमीवर आली तशीच प्रा. व. अ. कुंभोजकर, सौ. रत्नमाला हडप, श्री. शशीकांत अकोलकर अशा नवोदितांनाही त्यांनी न्याय दिला.

सव्यसाची कलाकार आणि व्यवसायाची नेमकी जाण असलेला निर्माता म्हणून श्री. प्रभाकर पणशीकर सर्वपरिचित आहेत.




६७ वे मराठी नाट्य संमेलन, इचलकरंजी, १९८६ अध्यक्षा : **श्रीमती विजया मेहता**

प्रायोजक : **मुंबई मराठी साहित्य संघ**, डॉ. भालेराव मार्ग, मुंबई-४०० ००४.

# श्रीमती विजया मेहता

## ४-११-१९३३

सदुसष्टावे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, इचलकरंजी शाखेच्या विद्यमाने
गोविंदराव हायस्कूल पटांगण, इचलकरंजी.
स्वागताध्यक्ष: श्री. कल्लाप्पा अण्णा आवाडे
दिनांक २६ ते २८ डिसेंबर १९८६.

कलेच्या क्षेत्रात नवी कला आणि जुनी कला हा वाद व्यर्थ आहे. कला कधीच ताजी वा शिळी रहात नसते. कलेच्या सादरीकरणाच्या पध्दती कालानुरूप बदलणे अपरिहार्य असते. हे जे बदलणे असते, त्यालाच प्रारंभावस्थेत प्रायोगिक म्हणतात. नाटकात अभिनयाला महत्व असते. अभिनयाच्या कक्षा काही बदलता येत नाहीत. बदल होतो तो नाटकाच्या सादरीकरणात-प्रेझेंटेशनमध्ये.

मराठी रंगभूमीने जुन्याप्रमाणेच ज्याला प्रायोगिक म्हणता येईल, अशा नाटकांनाही आपलेसे केले आहे. त्यांच्यातील चांगल्याचे कौतुक करून अनुकरणही केले आहे.

मराठी नाट्यमंचावर प्रायोगिकतेची चळवळ उभारून नाट्याला नव्या प्रवाहाचे नवे वळण देणाऱ्यांच्या अध्वर्यु आहेत श्रीमती विजया जयवंत-मेहता. रंगभूमीवर विविध नवप्रयोग करण्याआधी त्यांनी, शैक्षणिक कार्य पूर्ण झाल्यावर, दिल्लीच्या नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामधला अभ्यासक्रम यशस्वी रितीने पूर्ण केला. त्यांनी नाट्य दिग्दर्शन आणि अभिनयाचा विशेष अभ्यासक्रमही भारत सरकारच्या शिष्यवृत्तीवर पुरा केला.

मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्य शाखेने सादर केलेल्या 'तुझं आहे तुजपाशी'मध्ये त्यांनी नायिका उषाची भूमिका केली. त्यानंतर 'सुंदर मी होणार', 'सवाई माधवरावांचा मृत्यु', 'संशयकल्लोळ', नाटकांमध्ये प्रमुख भूमिकेत त्या रंगमंचावर आल्या.

१९६० मध्ये त्यांनी मुंबईस रंगायन संस्थेची स्थापना केली आणि नवप्रवाहातली नाटके रंगमंचावर आणली. नव्या विचारांचा प्रेक्षक रंगभूमीपासून दुरावत चालला होता. त्याला पुन्हा रंगभूमीकडे आकर्षित करण्याचे महत्वाचे कार्य श्रीमती विजया मेहतांच्या या प्रायोगिक चळवळीने यशस्वीपणे केले. रंगायनसाठी विजयाबाईंनी सुमारे तीस नाटकांचे दिग्दर्शन केले आणि त्यात भूमिकाही केल्या. उदा. 'एक शून्य बाजीराव', 'मी जिंकलो मी हरलो', 'मादी', 'खुर्च्या' (एकांकिका).

'हमिदाबाईची कोठी', 'हयवदन', 'बॅरिस्टर', 'पाहिजे जातीचे', 'संध्याछाया', 'वाडा चिरेबंदी', 'नागमंडल' या नाटकांचे दिग्दर्शन आणि त्यांमधील, त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना आवडल्या. रंगायनने आजचे अनेक प्रथितयश नाटककार आणि आजच्या रंगभूमीवरचे नामवंत कलाकार प्रथम रंगभूमीवर आणले.

नवप्रवाहाची प्रायोगिक नाटके करत असतानाच जर्मन रंगभूमीवर गाजलेली नाटकेही त्यांनी रंगभूमीवर आणली. त्यात 'अजब न्याय वर्तुळाचा' होते. त्याचे प्रयोग मुंबई मराठी साहित्य संघाच्यावतीने त्यांनी परदेशातही केले. संस्कृत नाटकांचा आणि भरत नाट्यशास्त्राचा अभ्यास करून त्या तंत्राने बसविलेले 'मुद्राराक्षस' आणि 'शाकुंतल' रंगमंचावर त्यांनी आणले. परदेशातही काही नाटकांचे प्रयोग त्यांनी नेले.

मराठी रंगभूमीवर अनेक प्रयोग झाले. काहींमुळे रंगभूमी प्रगत झाली. काही नवे प्रयोग कायमचे रूढ झाले आहेत. प्रयोगाशिवाय प्रगती होत नाही हेच श्रीमती विजयाबाईंनी दाखवून दिले.

१९८६ च्या इचलकरंजी येथे भरलेल्या सदुसष्टाव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे सन्माननीय अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.



६८ वे मराठी नाट्य संमेलन, इंदूर, १९८७. अध्यक्ष : **श्री. चित्तरंजन कोल्हटकर**

प्रायोजक : **कै. श्रीकृष्ण अनंत (मनुकाका) पंडित,** यांचे स्मरणार्थ, श्री. यशवंत पंडित, अंधेरी, मुंबई-६९.

# श्री. चित्तरंजन चिंतामणराव कोल्हटकर

## १५-१-१९२३

अडुसष्ठावे मराठी नाट्य संमेलन
मराठी समाज इंदूरच्या विद्यमाने
कै. अण्णासाहेब किर्लोस्कर नगर, गांधी हॉलजवळील पटांगण, इंदूर.
स्वागताध्यक्ष: श्री. बाबा डिके
दिनांक २५ ते २७ डिसेंबर १९८७

कलाकाराचा मुलगा कलाकारच व्हावा-असावा अशी अनेकांची अपेक्षा असते. परंतु आतापर्यंतचा कलाक्षेत्राचा, नाट्यक्षेत्राचा इतिहास पाहता हाताच्या बोटावर मोजण्याइतके काही अपवाद वगळता ही अपेक्षा फलद्रूप झालेली नाही, असे आढळून येते.

ललितकलेच्या श्री. बापूसाहेब पेंढारकरांचे चिरंजीव भालचंद्र, बलवंतच्या चिंतामणराव कोल्हटकरांचे पुत्र चित्तरंजन, चंद्रकांत गोखले यांचे चिरंजीव विक्रम, श्री. जयराम शिलेदार यांच्या कन्या हे अपवाद सोडले तर अन्य कुणी कलाकारपुत्र रंगभूमीवर यशस्वी झाल्याचे आढळून येत नाही.अखिल भारतीय नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी पितापुत्र श्री. चिंतामणराव कोल्हटकर आणि श्री. चित्तरंजन कोल्हटकर निवडून येणे हा एक विलक्षण योगायोग होता.

मराठी रंगभूमीवर श्री. चिंतामणराव कोल्हटकरांचे कार्यकर्तृत्व फार मोठे आहे. अभिनेता, तालीम मास्तर, नाट्यनिर्माता, लेखन आदी क्षेत्रात श्री. चिंतामणराव आघाडीवर होते. त्यांचे सुपुत्र श्री. चित्तरंजन कोल्हटकर. नटसम्राटांचा मार्ग यशस्वीपणे अनुसरत आहेत. श्री. चिंतामणराव नाट्यव्यवसायात असल्याने त्यांच्या कुटुंबाच्या पायालाही चाके बांधलेली असत. त्यामुळे श्री. चित्तरंजनच्या शिक्षणाची काहीशी आबाळच झाली. सांगलीत मात्र दीर्घकाळ स्थिर राहिल्याने त्यांच्या शिक्षणाला काहीशी दिशा मिळाली. शाळेत असतानाच श्री. भास्करराव सहस्रबुध्दे या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी मेळ्यात आणि नाटकात बालवयात कामे केली. नाटकात काम करण्याची प्रेरणा येथपासूनच त्यांना मिळाली. घरातल्या परिस्थितीमुळे उपजिविकेसाठी ते नाट्यव्यवसायात शिरले.

श्री. राम गणेश गडकऱ्यांच्या 'भावबंधनमध्ये' प्रथम त्यांनी मोरूची भूमिका केली. त्याच नाटकात त्यांनी खलनायक धनश्याम आणि कामण्णा अशा परस्परविरोधी स्वभावांच्या भूमिका केल्या. तशाच 'एकच प्यालामध्ये' सुधाकर आणि तळीरामही रंगवला. परस्पराविरुध्द स्वभाववैशिष्ट्ये, भूमिकेच्या स्वभावाशी तद्रूप होऊन करण्याची श्री. कोल्हटकरांची हातोटी अभिनव आणि विलक्षण आहे, असा अभिनेता रंगभूमीवर दुसरा झालेला नाही.

श्री. चित्तरंजनांची चण लहानखुरी असली तरी 'बेबंदशाही', 'आग्राहून सुटकासारख्या' ऐतिहासिक नाटकातील भूमिका ते आपल्या अभिनयकौशल्याने प्रेक्षकांच्या मनावर बिंबवतात. जुन्या पीढीतल्या नाटकाप्रमाणेच नवी नाटकेही ते हाती घेतात. 'गारंबीचा बापू', 'इथे ओशाळला मृत्यू', 'अश्रूंची झाली फुले', 'विषकन्या', 'विषवृक्षाची छाया' आदी नाटकातील त्यांच्या भूमिका गाजल्या आहेत.

'मी दारू सोडली'पासून ते चित्रपटात चमकू लागले. चित्रपटातल्या आपल्या भूमिकातही त्यांनी आपले वैशिष्ट्य राखले. अधिककरून खलपुरुषाचीच कामे त्यांच्या वाट्याला आली. काही विनोदी भूमिकाही त्यांनी केल्या. 'रायगडचा राजबंदीमधली' श्री. चंद्रकांत गोखलेंच्या शिवाजीबरोबरचा संभाजीही त्यांच्या अभिनयशैलीने अविस्मरणीय झाला आहे.

१९८७ च्या इंदूरच्या अडुसष्टाव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे गौरवास्पद अध्यक्षस्थान त्यांना लाभले.




६९ वे मराठी नाट्य संमेलन, सांगली, १९८८. अध्यक्ष : **श्री. राजाराम शिंदे**

प्रायोजक : **मॅक्झीलस् इलेक्ट्रो मॅगनेटिक्स प्रा. लि.**, नाईस, सातपूर, नाशिक-४२२००७.

# श्री. राजाराम केशव शिंदे

५-१०-१९३१

एकोणसत्तरावे मराठी नाट्य संमेलन
अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यापीठ सांगली व
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद यांच्या विद्यमाने
कै. विष्णुदास भावेनगर, राजवाडा परिसर, नाट्य पंढरी, सांगली.
स्वागताध्यक्ष: श्री. वसंतदादा पाटील
दिनांक २३ ते २५ डिसेंबर १९८८

मराठी नाटकाला नाटककार, दिग्दर्शक, नटसंचच लागतो असे नाही तर कल्पन-चतुर निर्माता आणि वितरकाची नितांत आवश्यकता आजच्या काळात आहे. श्री. राजाराम शिंदे हे कल्पक निर्माते आणि व्यवहारी वितरक असल्यामुळे त्यांच्या 'नाट्यमंदार' संस्थेच्या नाटकांचा लौकिक अल्पावधीतच सर्वत्र पसरला.

श्री. राजाराम शिंदे तारुण्याच्या उंबरठ्यावर पाऊल टाकत असतानाच व्यावसायिक रंगभूमीवर नट म्हणून आले. विविध नाटकातील साठसत्तर लहानमोठ्या भूमिका त्यांनी केल्या. स्वत: 'कांचनगंगा' लिहून रंगमंचावर आणले. 'नाट्य मंदार' नाट्य संस्थेची स्थापना केली.

श्री. विद्याधर गोखले ('मंदारमाला', 'मेघमल्हार') श्री. मधुकर तोरडमल ('तरुण तुर्क म्हातारे अर्क', 'भोवरा') श्री. मधुसूदन कालेलकर ('चांदणे शिंपीत जा'), श्री. वसंत सबनीस ('वरचा मजला रिकामा', 'सौजन्याची ऐसी तैसी') श्री. विद्याधर पुंडलिक ('माता द्रौपदी'), श्री. शरद घाग ('फुलाला सुगंध मातीचा') इत्यादी नामवंत लेखकांची दर्जेदार नाटके त्यांनी रंगभूमीवर आणली. या नाटकांचे प्रयोग त्यांनी महाराष्ट्राबाहेरही करून आपल्या नाटकांचे सात हजारांवर प्रयोग केले.

नाट्यकर्मीची - नाटकाला आवश्यक असणाऱ्या सर्व घटकांची आणि नाटकातल्या भागउपभागांची संघटना स्थापून त्या मराठी नाट्य परिषदेच्या आधिपत्याखाली श्री. शिंदे यांनी आणल्या. 'रंगभूमी सहकारी गृहनिर्माण संस्था', 'रंगदेवता सहकारी पतसंस्था' निर्माण करून रंगभूमीशी संबंधित सर्व घटकांच्या आर्थिक आणि निवासी अडचणी सोडविण्याचा कसोशीने प्रयत्न केला. रंगभूमी संशोधनाच्या कामासाठी, सर्व भाषिक नाट्यव्यवसायींसाठी, प्रकल्प उभा केला.

अलिकडे नाट्यसंस्थांचा संसारसुध्दा प्रवासातच थाटलेला असतो. नित्यनियमाने दौरे करावे लागतात. प्रवासाची सुविधा रेल्वे वा अन्य वाहनाने व्यवस्थित होत नाही. नाट्य संस्थेच्या दौऱ्यासाठी स्वत:ची सुसज्ज आराम बस प्रथम श्री, राजाराम शिंदे यांनी तयार करवून घेतली. आता त्यांचे अनुकरण सर्वच संस्थांनी आपली स्वताची आराम बस तयार करून केले आहे.

नाट्यक्षेत्राप्रमाणेच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातही श्री. राजाराम शिंदे यांनी मोलाचे कार्य केले आहे. विधान सभेवरही ते निवडून आले होते. त्या काळात त्यांनी आपल्या मतदार संघासाठी भरीव कार्य केले. 'मंदार' एज्युकेशन सोसायटी ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, स्थापून शाळा व कॉलेज शिक्षणाची सुविधा निर्माण केली.

सर्व क्षेत्रात आघाडीवर असलेले श्री. राजाराम शिंदे १९८८ च्या एकोणसत्तराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे सांगली येथे अध्यक्ष होते.




७० वे मराठी नाट्य संमेलन, मुंबई, १९९०. अध्यक्ष : **शाहीर साबळे**

प्रायोजक : **श्री. भालेराव, पराग कन्स्ट्रक्शन,** ४६१०, हिरावाडी, नासिक-४२२ ००३.

# शाहीर श्री. कृष्णराव साबळे

## ३-९-१९२३

सत्तरावे मराठी नाट्यसंमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती शाखा, मुंबई यांचे विद्यमाने
रवींद्र नाट्य मंदिर-संगीत सूर्य केशवराव भोसले नगर, मुंबई.
स्वागताध्यक्ष: श्री. दामू केंकरे
दिनांक ३, ४ फेब्रुवारी १९९०

नाट्यकला आणि लोकनाट्य यांचा निकटचा संबंध पूर्वापार आहे. खेड्यापाड्यातले शेतकरी, कामकरी लोकनाट्य आपले मानतात आणि खेड्यात कधीमधी येणाऱ्या नाटकाचा रसास्वादही तितक्याच सहजतेने आणि रसिकतेने घेतात. त्यामुळे १९९० मध्ये भरलेल्या मुंबईच्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद शाहीर साबळे यांना मिळाल्याबद्दल लोकनाट्यप्रेमी रसिकांना जितका आनंद झाला तितकेच समाधान नाट्यकर्मी आणि प्रेक्षक यांना झाले.

मराठी सातवीपर्यंत शिकलेल्या शाहीर कृष्णराव साबळेंची बहुश्रुतता दांडगी आहे. वाई तालुक्यातल्या पसरणीसारख्या खेड्यात बालपणीच भजने ऐकून ऐकून त्यांना गाण्याचा नाद लागला. त्यांनी भजनबाजाबरोबरच खेड्यातल्या पोवाडा, लावणीचाही लळा घेतला. त्यांची हुबेहूब नक्कल करण्यात साबळे वाकबगार झाले आणि याच छंदातून त्यांचा शाहीरी बाणा तयार झाला. त्यातच ब्रिटीश विरोधाच्या आंदोलनाचा जोर वाढत होता. शाहीर साबळे १९४२ च्या आंदोलनात हीरीरीने सहभागी झाले. देशभक्तीपर गाणी आणि पोवाडे स्वत: रचून खेड्यापाड्यात आपल्या पथकासह हिंडून त्यांनी जनजागृती केली. त्यांचा दौरा महाराष्ट्रभर गाजला. शाहीर साबळे यांचे नाव सर्वतोमुखी झाले. त्यांनी 'जागृती शाहीर मंडळी' स्थापन केली आणि स्वातंत्र्याच्या प्रभातकाळी सरकारी प्रचार मोहिमेत ते सहभागी झाले.

मुंबईत स्थायिक होऊन ते गिरणीत काम करू लागले तरी शाहीरीसाज आणि त्यांनी दूर केला नव्हता. मुंबईत ते नाटकातून कामे करू लागले. 'स्वर्गावर स्वारी' मधली त्यांची स्त्री भूमिका आणि श्री. मामा वरेरकरांच्या 'सत्तेचे गुलाम'ची नायिका नलिनी त्यांनी तडफदारपणे साकार केली.

दुसऱ्यांच्या नाटकात काम करण्यापेक्षा स्वत: नाटक लिहून ते रंगमंचावर सादर करणे त्यांना अधिक आवडले. 'कोंड्याची करामत', 'यमराज्यात एक रात्र', 'बापाचा बाप', 'नशीब फुटलं सांधून घ्या' आदी स्वत:ची बरीच नाटके, श्री. विजय तेंडूलकरांचे 'फूटपायरीचा सम्राट', श्री. चिं. त्र्यं. खानोलकरांचे 'माकडाला चढली भांग', सई परांजपे यांचे 'एक तमाशा सुंदरसा', श्री. नेताजी भोईरांचे 'एक नट अनेक सम्राट' वगैरे अनेक नाट्यप्रयोग त्यांनी रंगमंचावर सादर केले. लोकनाट्य आणि नाटक यांचे संबंध शाहीर साबळे यांनी दृढ केले.

१९९० साली मुंबईस भरलेल्या सत्तराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद शाहीर साबळे यांना देऊन शाहीर समाजाचा नाट्य परिषदेशी संबंध जोडला.




७१ वे मराठी नाट्य संमेलन, सातारा, १९९० अध्यक्ष : **श्री. माधव मनोहर**

प्रायोजक : **प्राईम प्लास्ट प्रा. लि.**, एफ-११४, एम.आय.डी.सी., नाशिक-४२२ ००७.

# श्री. माधव बळवंत मनोहर

## २०-३-१९११ - २३-५-१९९४

एकाहत्तरावे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सातारा शाखेच्या विद्यमाने
श्री. यशवंतराव चव्हाणनगर, सातारा.
स्वागताध्यक्ष: श्री. प्रतापराव भोसले
दिनांक : २८ ते ३० डिसेंबर १९९०

नाशिक येथे जन्मलेले प्रा. माधव मनोहर एक चतुरस्त्र साहित्यिक होते. शालेय जीवनापासूनच त्यांनी मेळ्यांसाठी गीते, पोवाडे रचले. सॉमरसेट मॉम, ऑस्कर वाइल्ड, बल्झॅक आदी लेखक अभ्यासले. याच काळात 'स्मृतिरंग' हे खंडकाव्य रचले.इंग्रजी साहित्याचा अभ्यास केला. प्रामुख्याने मराठी नाटकाचा सखोल अभ्यास केला. इंग्रजीतले दर्जेदार साहित्य मराठीत आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या 'एक आणि दोन', 'एका रात्रीची गोष्ट', 'अन्नदाता' आदी कादंबऱ्या, अनुवादित आणि स्वतंत्र कथा त्यांनी लिहिल्या. त्यांची नाटके 'डावरेची वाट', 'चेटुक', 'आई' भाषांतरीत आहेत. 'प्रकाश देणारी माणसे', 'आपण साऱ्या दुर्गाबाई', 'सौदा', 'आजोबांच्या मुली' आदी रूपांतरीत नाटकांनी आणि एकांकिका यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे.

'नाटक' १९५६ मध्ये 'मराठी नाटक थिटे आहे' अशी प्रदीर्घ लेखमाला लिहून मराठी नाटक कुठे कमी पडत आहे, असा विचार विस्ताराने कथन केला.

मराठी रंगभूमीवर पूर्णिमा थिएटर्स या संस्थेने 'सशाची शिंगे', 'झोपलेले नाग' आदी श्री. माधव मनोहरांची नाटके रंगभूमीवर आणली. श्री. आत्माराम भेंडे या संस्थेचे दिग्दर्शक आणि प्रमुख होते.

पण सर्वापेक्षाही श्री. माधव मनोहर विशेष गाजले ते समीक्षक म्हणून. मराठी नाटक थिटे आहे असा त्यांचा दावा होता. मराठी नाटकाचा कलात्मक आणि प्रयोगात्मक दर्जा वाढावा, त्याला श्रेष्ठ, मौलिक स्वरूप प्राप्त व्हावे, मराठी नाटक मोठे व्हावे यासाठी त्यांनी आपली लेखणी सरसावली होती, झिजवली होती. त्यांच्या प्रहारी टीकेने अनेकजण घायाळ झाले, कित्येक विरोधक झाले पण श्री. माधव मनोहर नाटकांचे आणि साहित्याचे निष्ठावान पाईक होते. त्यांची टीका परखड प्रामाणिक होती. व्यक्तीगत रागलोभाचा त्यात अंशही नव्हता म्हणूनच त्यांच्यावर नाराज असलेलेही त्यांच्यावर प्रेम करत. त्यांच्या टीकेचेही स्वागत करत आणि त्यामुळेच पहिल्या नाट्यसमीक्षकांच्या संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना कृतज्ञतापूर्वक देण्यात आले होते. १९८१ चे विष्णुदास भावे सुवर्णपदक श्री. माधव मनोहरांना दिले होते.

श्री. माधव मनोहरांचे वाचन चौफेर आणि सखोल असे आणि स्मरणशक्ती सजग असल्याने वाङ्मय चौर्य त्यांच्या लगेच लक्षात येत असे आणि ते त्या चौर्यकर्माचा सज्जड समाचार घेत. 'साहित्यातले फौजदार' असे त्यांना संबोधले जात असे ते त्यामुळेच.

सातारा येथे १९९० मध्ये अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होते प्रा. माधव मनोहर.



७२ वे मराठी नाट्य संमेलन, वाशी, १९९२.

अध्यक्ष : **श्री. शरद तळवलकर**

प्रायोजक : **तृप्ती इंडस्ट्रीज,** ३०, आकांक्षा, ९ वा रस्ता, नाईस, नाशिक-४२२ ००७.

# श्री. शरद गणेश तळवलकर

## १-११-१९१९

बहात्तरावे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद वाशी शाखेच्या विद्यमाने
श्री. वसंतराव नाईक नगर, वाशी, नवी मुंबई.
स्वागताध्यक्ष: श्री. प्रभाकर शिंदे
दिनांक २७ ते २९ डिसेंबर १९९१

श्री. शरद तळवलकरांना नाटकाचे जबरदस्त वेड. त्यांनी पहिलेच नाटक पाहिले ते सदा बहार, विनोदी नाटक 'संशयकल्लोळ' त्यांचे मामा, प्रख्यात नाट्य अभिनेते विसूभाऊ भडकमकर त्यात काम करत होते. पुण्याच्या भावे स्कूलमधे ऐनवेळी 'रणदुंदुभी'तला शिशुपाल, 'साष्टांग नमस्कार'मधला भद्रायु भाटघर त्यांनी सफाईने रंगविला. अशी लहान-लहान कामे, कित्येकदा ऐनवेळीही, करून तळवलकरांनी आपले नांव नाट्यवर्तुळात सर्वतोमुखी केले.

नाट्यविकास संस्थेत 'छापील संसार', 'उसना नवरा' आदी नाटकातून छोट्या मोठ्या भूमिका केल्या. कंपनी बंद पडल्यामुळे ते शिक्षणाकडे वळले. नोकरीही पत्करली. या धावपळीतूनही परशरामभाऊ महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनातील 'खडाष्टक'मधली कर्कशरावाची भूमिका गाजवून अभिनयाचे पारितोषिक मिळवले. 'भावबंधन'मधला कामण्णा बेमालूम वठवला. त्यांच्या या भूमिकांमुळे व्यावसायिकांचे त्यांच्याकडे लक्ष वेधले.

'लग्नाची बेडी'तला गोकर्ण श्री. शरद तळवलकरांनी ठसकेबाज शैलीत रंगवून अविस्मरणीय केला. बालगंधर्वांसारख्या नटश्रेष्ठाबरोबरचा 'एकच प्याला'मधला तळीराम बालगंधर्वांच्या शाबासकीला पात्र ठरला. 'संशयकल्लोळ' हे फाल्गुनरावाचे नाटक. तेही त्यांनी सफाईदारपणे साकार केले.

पुणे आकाशवाणी केंद्रावर नाट्यनिर्माते म्हणून केलेले त्यांचे कार्य मोलाचे आहे. त्या काळातली नभोनाट्ये श्रोत्यांना चांगली आवडली.

नाटकांप्रमाणेच चित्रपटातूनही श्री. शरद तळवलकरांनी कामे केली. प्रभातच्या 'माझा मुलगा'मध्ये राजा परांजपेंबरोबर मतदानाच्या गर्दीच्या दृश्यात शरद तळवलकर प्रथम रूपेरी पडद्यावर आले. दीर्घकाळानंतर 'लाखाची गोष्ट', 'पेडगावचे शहाणे', 'मी तुळस तुझ्या अंगणी' आदी चित्रपटात किरकोळ भूमिकेत चमकलेले श्री. तळवलकर पुढे महत्वपूर्ण भूमिकात चमकले. 'रंगल्या रात्री अशा'तला उस्ताद, 'अखेर जमलं', 'वाट चुकलेले नवरे', 'बायको माहेरी जाते' आदी चित्रपट त्यांनी गाजवले. त्यातल्या काहीमध्ये ते नायकही झाले होते. प्रौढ भूमिकांमधे 'एकटी'तली त्यांची भूमिका गाजली. 'एकटी'च्या भूमिकेबद्दल महाराष्ट्र शासनाने सर्वोत्कृष्ट कलाकाराचे, 'जावई विकत घेणे'मधील म्हाताऱ्याच्या भूमिकेचे पारितोषिक त्यांना मिळाले.

'करायला गेलो एक'मध्ये सहसंपादक हरिभाऊ हर्षेची भूमिका श्री. शरद तळवलकरांनी केली होती. हरिभाऊ एका वृत्तपत्राचा सहसंपादक आहे. याची नेमकी जाण ठेवून ती व्यक्तीरेखा रंगवल्यामुळे ती प्रेक्षकांच्या चांगली स्मरणात राहिली आहे. ही भूमिका त्यांनी पाचशे प्रयोगात केली. 'दिवा जळू दे सारी रात'मधील गोळे मास्तराची भूमिकाही विशेष गाजली. श्री. शरद तळवलकरांनी आपली स्वत:ची 'कलाकार' संस्था स्थापून 'घरोघरी हीच बोंब', 'आप्पाजीची सेक्रेटरी' आदी नाटके यशस्वी रितीने सादर करून संस्थेचे नाव उज्ज्वल केले.

भावे सुवर्ण पदक, महिन्द्र पुरस्कार, नाट्य गौरव पुरस्कार त्यांना मिळाले.

श्री. शरद तळवलकरांच्या कलाकर्तृत्वाचा गौरव रसिकांनी त्यांना वाशी (मुंबई) येथे १९९२ मध्ये भरवलेल्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन केला.




७३ वे मराठी नाट्य संमेलन, मुंबई, १९९३. अध्यक्ष : **श्री. वसंत सबनीस**

प्रायोजक : **श्रीरंग एजन्सीज्,** ए-१, नंदज्योत इंडस्ट्रीअल इस्टेट, अंधेरी कुर्ला रोड, मुंबई-४०० ०७२.

# श्री. वसंत सबनीस

## ६-१२-१९२३

त्र्याहत्तरावे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन मुंबई यांचे विद्यमाने
श्री. यशवंतराव चव्हाण सेंटर नरिमन पॉईंट, मुंबई.
स्वागताध्यक्ष: श्री. जयंत साळगांवकर
दिनांक १०, ११ एप्रिल १९९३

'विच्छा माझी पुरी करा' या लोकनाट्याने मराठी रंगभूमीवर एकच धमाल उडवून दिली. ते लोकनाट्य त्यातील कलाकारांच्या कर्तबगारीने जितके लोकप्रिय झाले तितकेच त्याच्या मूळ लेखनाने गाजले. मूळ पाया चांगला चिरेबंदी असल्यानेच त्यातील कलाकारांना आपले कौशल्य दाखवता आले. मूळच ढिसूळ असते तर 'विच्छा'ने जोर धरलाच नसता. 'विच्छा'चे रंगभूमीवर प्रयोग होऊ लागले. ते लोकनाट्य म्हणून रंगमंचावर असले तरी आपला वगनाट्याचा बाज कायम ठेवून 'नाटका'च्या एका वेगळ्या स्वरुपात ते आले. हा नवा प्रयोग प्रेक्षकांना आवडला. हा प्रयोग करताना निर्मित कलाकार श्री. दादा कोंडके जो प्रासंगिक हजरजबाबीपणा दाखवायचे त्यामुळे तो प्रयोग प्रत्येकवेळी प्रेक्षकांना नवा वाटायचा, वेगळा वाटायचा. केवळ ते हजरजबाबी सवाल-जबाब ऐकण्यासाठीही प्रयोगाला येणारा प्रेक्षक वाढला. 'विच्छा'ने प्रसिध्दीचा विक्रम केला आणि श्री. वसंत सबनीसांना रंगभूमीचा पडदा उपडा झाला. कारण 'विच्छा माझी पुरा करा'चे लेखक होते श्री. वसंत सबनीस.

श्री. वसंत सबनीसांचा विनोद प्रसन्न असतो. गुदगुल्या करणारा असतो. बोचकारे-ओरखडे काढणारा विनोद काही काळच प्रेक्षकांना आकर्षित करतो. श्री. वसंत सबनीसांच्या विनोदात देवल-गडकरी-अत्रे यांच्या विनोदाचे विलक्षण मनोहारी मिश्रण असल्यामुळेच सर्व थरातल्या प्रेक्षकांना तो सारखाच आवडतो.

सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर हे श्री. सबनीसांचे गाव. आईचे छत्र नसल्याने आलेले एकाकीपणाचे दु:ख विसरण्यासाठी त्यांनी विनोदाचा आसरा घेतला आणि लोकांना हसवण्यात आपल्या दु:खाचा विसर पाडू लागले. लहानपणापासून काही ना काही लिहिण्याची सवय त्यांनी लावून घेतली. सर्व प्रकारच्या लिहिण्याचा सराव करत असतानाच विनोदाची नस त्यांना नेमकी सापडली.

कथा, कविता लिहिता लिहिताच त्यांनी लोककथेच्या बीजांकुरावर 'विच्छा माझी पुरी करा' लिहिले आणि त्यांना यशाची वाट सापडली.

श्री. वसंत सबनीसांनी विनोदी कथांबरोबरच नाटकेही लिहिली. 'निळावंती', 'म्हैस येता घरा', 'सौजन्याची ऐसी तैसी', 'गेला माधव कुणीकडे', 'चतुर किती बायका', 'हृदयस्वामिनी' आदी त्यांची नाटके रंगभूमीवर आली. काही नाटकांनी अपूर्व यश पाहिले. काही चालली. काहींना चांगलेच अपयश आले. श्री. वसंत सबनीसांचा लौकिक नाटककार म्हणून वाढला.-चित्रपट व्यवसायात कथासंवादांनी त्यांनी नाव मिळवले. कुणातच नसणाऱ्या आणि सगळ्यातच असणाऱ्या या लेखकाने अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे १९९३ मधे मुंबई येथे अध्यक्षपद भूषविले.




७४ वे मराठी नाट्य संमेलन, मालवण, १९९४. अध्यक्ष : श्री. आत्माराम सावंत

प्रायोजक : **श्री. कारभारी लक्ष्मण काकड,** मखमलाबाद, नाशिक.

# श्री. आत्माराम कृष्णाजी सावंत

## ७-३-१९३३ - ४-३-१९९६

चौऱ्याहत्तरावे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी परिषद, मालवण शाखेच्या विद्यमाने
सिंधुदुर्ग, मालवण
स्वागताध्यक्ष : श्री. लिलाधर हडकर
दिनांक : १ ते ३ एप्रिल १९९४

पत्रकारिता, नाट्यलेखन या दोन आघाड्या कुशलतेने सांभाळणारे लेखक नाट्यव्यवसायाला प्रारंभापासूनच प्राप्त झालेले आहेत. श्री. न. चिं. केळकर, श्री. कृ. प्र. खाडीलकर, यांच्यापासून सुरू झालेली पत्रकार-नाटककार परंपरा श्री. अ. ह. गद्रे, श्री. आचार्य अत्रे, श्री. मो. ग. रांगणेकर, श्री. विद्याधर गोखले, श्री. आत्माराम सावंत यांच्यापर्यंत चालत आलेली आहे.

कोकणच्या नाट्यभूमीत जन्मलेले श्री. आत्माराम सावंत स्वाभाविकच लहानपणापासूनच मेळे-कीर्तनांच्या आवडीने नाटकाकडे आकर्षित झाले. शैक्षणिक काळापासूनच श्री. सावंतांनी आपली आवड जोपासली.

मुंबईत पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश केल्यावर कामगार रंगभूमीवर, नाट्यस्पर्धात सहभागी होऊन त्यांनी आपल्या नाट्यकारकीर्दीला सुरुवात केली. त्यांच्यामधला दिग्दर्शक, नट, नाटककार आकाराला आला. कामगार असो की अन्य कुठलाही असो, प्रथम तो प्रेक्षकच असतो. त्याच्या काही आवडीनिवडी असतात. श्री. आत्माराम सावंतांनी त्या नेमक्या हेरल्या आणि त्या अनुषंगाने आपली पावले ठामपणे टाकायला सुरूवात केली.

'सूनबाई', 'माझं कुंकू', 'तेथे पाहिजे जातीचे', 'मुलगी' अशी कौटुंबिक नाटके त्यांनी जशी लिहिली तशीच विनोदी नाटकेही त्यांनी लिहिली. त्यांनी आपल्या नाटकांचा साचा बनवला नाही. नाट्यस्पर्धांमधून त्यांच्या अनेक नाटकांना पारितोषिके प्राप्त झाली. कामगार रंगभूमीवर त्यांनी लक्षणीय यश मिळविले. लेखक म्हणूनच नव्हे तर नट, दिग्दर्शक या नात्यानेही त्यांना यश लाभले.

दैनिक नवाकाळ, दैनिक मराठा, दैनिक सकाळ या वृत्तपत्रांमधून उपसंपादक, सहसंपादक, संपादक आदी पदेही त्यांनी भूषविली. साप्ताहिक गांवकरीचेही ते प्रबंध संपादक होते. वृत्तपत्रीय क्षेत्रामुळे त्यांनी अनेक अनुभवांचा साठा केला. त्यांच्या निरीक्षणामधूनच 'राजकारण गेलं चुलीत'सारखे नाटक निर्माण झाले. 'वरचा मजला रिकामा', 'मुजरा घ्या सरकार', 'आई म्हणोनी कोणी', 'दरोडा', 'सत्तेवरचे शहाणे' आदी यशस्वी नाटके त्यांनी लिहिली.

अ. भा. मराठी नाट्य परिषदेच्या नाट्यलेखनाचा 'गो. ब. देवल', 'आचार्य अत्रे' हे पुरस्कार त्यांना मिळाले. समीक्षकाचा 'वि. स. खांडेकर पुरस्कार' तर त्यांना लाभलाच, पण बालनाट्याचा पुरस्कार 'आगपेटीतला राक्षस'ला मिळाला. महाराष्ट्र शासनाच्या विनोदी वाङ्मयाचे पारितोषक त्यांच्या 'चौथा अंक'ला मिळाले.

नाट्यव्यवसायातील महत्वाची क्षेत्रे, पत्रकारितेतला बहुमान, अनेक पुरस्कार प्राप्त झालेल्या श्री. आत्माराम सावंतांना अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे मालवण येथे १९९४ च्या चौऱ्याहत्तराव्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.



७५ वे मराठी नाट्य संमेलन, बारामती, पुणे, १९९५. अध्यक्ष : **श्री. राजा गोसावी**

प्रायोजक : **प्रेस मेटल इंडस्ट्रीज,** ई-४७, एम.आय.डी.सी., सातपूर नाशिक-४२२ ००७.

# श्री. राजा गोसावी

२८-३-१९२५

पंच्याहत्तरावे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बारामती शाखेच्या विद्यमाने
बारामती, जि. पुणे.
स्वागताध्यक्ष : श्री. शरद पवार
दिनांक : १२ ते १४ मे १९९५.

श्री. लोंढे यांच्या राजाराम नाटक मंडळीत जे पडेल ते काम करणाऱ्या, हरकाम्या रंगकर्मी म्हणून श्री. राजा गोसावी यांनी रंगभूमीशी संबंध जोडला. आणि अशी किरकोळ कामे करतानाच अभिनयाचे पाठही त्यांनी गिरवले. तो नाट्यसृष्टीचा पडता काळ होता. मोठ्या नाट्यसंस्था बंद पडल्या होत्या वा लहानसहान खेड्यांमधून किरकोळ नाट्यप्रयोग करून कसाबसा तग धरण्याची धडपड करत होत्या. बरेच कलाकार चित्रपटसृष्टीच्या मार्गाला लागले होते. श्री. राजा गोसावीही श्री. विनायकांच्या प्रफुल्ल संस्थेत सामील होऊन तेथेही पडतील ती कामे करू लागले. श्री. राजा परांजपे यांच्या 'लाखाची गोष्ट'ने त्यांचा यशाचा मार्ग सुकर झाला. अल्पावधीत श्री. राजा गोसावी मराठी चित्रपटव्यवसायातले आघाडीचे अभिनेते झाले. पण श्रेष्ठ अभिनेतेपदावर येण्यासाठी श्री. राजाभाऊंना अपार कष्ट, अगणित अपमान सोसावे लागले. हालअपेष्टांशी निकराने झुंज देत ते लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर सन्मानपूर्वक प्रस्थापित झाले.

मध्यंतरीच्या काळात मराठी चित्रपट व्यवसायालाही अवकळा प्राप्त झाली. पूर्वी नाट्यकलाकार चित्रव्यवसायात जाऊन नाव कमावण्याचा प्रयत्न करत होते. आता चक्र उलटे फिरू लागले. चित्रव्यवसायातले नामवंत नाट्यव्यवसायात नशीबाच्या नव्या वाटा शोधण्यासाठी धावपळ करू लागले. नाट्यव्यवसायात नाईटवर कामे करण्याची प्रथा मोठ्या प्रमाणावर सुरु झाली होती.

श्री. राजा गोसावींनी शंभर चित्रपटात भूमिका केल्या होत्या. त्यांच्या चित्रव्यवसायातल्या लौकिकामुळे त्यांची नाटके गर्दी खेचू लागली. त्यांनीही प्रेक्षकांना निराश केले नाही. रंगभूमीवरच्या कामाचा त्यांचा पूर्वानुभव होताच. प्रभाकर नाट्य मंदिरात प्रॉम्प्टरबरोबरच रखवालदाराच्या भूमिका करताकरताच 'भावबंधन'मधल्या धुंडिराजची गंभीर भूमिकाही ते सहजगत्या करू लागले होते. नाटक त्यांना नवे नव्हते. नाट्यव्यवसायातही त्यांनी आपल्या चित्रव्यवसायातला लौकिक कायम राखला.

विनोदी कलाकाराचा शिक्का त्यांच्या चित्रपट-नाटकातल्या भूमिकांमुळे त्यांच्या नावावर पडला होता. तो पुसून टाकण्याच्या ईर्षेने त्यांनी श्री. वि. वा. शिरवाडकरांच्या 'नटसम्राट'मधला गणपतराव बेलवलकर जिद्दीने उभा केला.

या कलागुणांमुळेच राजा गोसावी बारामतीमधील १९९५ च्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या पंचाहत्तराव्या अधिवेशनाचे अध्यक्ष निवडून आले.




७८ वे मराठी नाट्य संमेलन, मालवण, १९९५.

अध्यक्ष : **श्री. जितेंद्र अभिषेकी**

प्रायोजक : **श्री. अरविंद पिळगावकर**, गिरगांव, मुंबई-४०० ००४.

# श्री. जितेंद्र अभिषेकी

१७-४-१९३३

शहात्तरावे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, चिपळूण शाखेच्या विद्यमाने
चिपळूण, जिल्हा रत्नागिरी
स्वागताध्यक्ष : श्री. रमेश कदम
दिनांक : २३ व २४ डिसेंबर १९९५

मराठी रंगभूमी संगीताने भरलेली आहे. रसिक प्रेक्षक नाट्यसंगीताने प्रथमपासूनच भारावलेला आहे. रंगभूमीवरची संगीताची झालेली स्थित्यंतरे प्रेक्षकांनी ऐकली आहेत, पाहिली आहेत. प्रारंभीच्या काळात आठ आठ तास या संगीत रंगभूमीने मनाला मोहविणारे, मर्यादित वेळेत गायले जाणारे गाणे आणि कालांतराने या गाण्यांचा झालेला अतिरेक, काही काळ प्रेक्षकांनी सहन केला. पण रंगभूमीवर गाण्याला जलशाचे मैफलीचे स्वरुप आल्यावर मात्र तो हताश झाला. त्यातच चित्रपटातल्या संगीताची सोपी सुटसुटीत साथ त्याला लाभली.

या जबर धक्क्यातून बालमोहन-नाट्य मन्वंतरने रंगभूमी सावरण्याचा प्रयत्न केला. नाट्य निकेतनच्या संगीत नाटकांनी रंगभूमीला नवा श्वास मिळाला, नवे संगीत मिळाले. नाट्यसंगीताला नवे सूर मिळाले. निवडक जुन्या नाटकांबरोबरच नवी संगीत नाटके रंगभूमीवर येऊ लागली. नवे संगीत दिग्दर्शक आपली साथ त्याला देऊ लागले.

जितेंद्र अभिषेकी या नव्या संगीत दिग्दर्शकातील आघाडीवरचे. संगीत दिग्दर्शक जितेंद्र अभिषेकींचे वडील भिकाजी उपाख्य बाळूबुवा उत्तम कीर्तनकार होते. त्यांचा आवाज पल्लेदार होता. दीनानाथ मंगेशकरांच्या बळवंत मंडळीत ते होते. जितेंद्रांचा लहानपणापासूनच नाटकाशी आणि संगीताशी संबंध आला. त्यांच्या आवाजाचा गुण ओळखून ज्योत्स्ना भोळे यांच्या भगिनी गिरिजाबाई केळेकर यांनी त्यांच्या गाण्यावर नवे शास्त्रोक्त संस्कार करून त्यांच्या गाण्याला सुरेख घाट दिला. त्यानंतरच्या काळात अझमत हुसेनखा, जगन्नाथबुवा पुरोहित, गुलुभाई जसदवाला यांच्याकडे त्यांनी तालमी घेतल्या.

गाण्याच्या क्षेत्रात जे जे चांगले ते ते आत्मसात करण्याची वृत्ती अभिषेकींनी प्रथमपासूनच ठेवली. त्यामुळे त्यांच्या गाण्यांचा साचा बनला नाही. त्याला विविध पैलूंची साथ लाभली. सर्वांतले चांगले उचलल्यामुळे त्यांचे गाणे सर्वांचे झाले. सर्वांच्या ओठांवर घोळू लागले.

'मत्स्यगंधा', 'कट्यार काळजात घुसली', 'ययाती देवयानी', 'संत गोरा कुंभार' 'लेकुरे उदंड झाली' 'तू तर चाफेकळी'. आदी सुमारे पंचवीस नाटकांचे त्यांनी संगीत दिग्दर्शन केले आहे. त्यांची गाणी अद्यापही लोकप्रिय आहेत. बैठकीच्या संगीताबरोबरच नाट्यसंगीताची मैफिलही ते बहारदार रंगवितात.

मराठी नाट्यसंमेलनाच्या शहात्तराव्या अधिवेशनाचे, १९९६ मधे मालवण येथे जितेंद्र अभिषेकींनी अध्यक्षपद भूषविले होते.




७७ वे मराठी नाट्य संमेलन, नाशिक, १९९७.

अध्यक्ष : **श्री. नाना पाटेकर**

प्रायोजक : **गॅब्रिएल इंडिया लिमिटेड,** बी २, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक-४२२ ०१०.

# श्री. नाना पाटेकर

सत्त्याहत्तरावे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नाशिक शाखेच्या विद्यमाने
स्वातंत्र्यवीर सावरकरनगर, भालेकर हायस्कूल, नाशिक
स्वागताध्यक्ष : डॉ. दौलतराव आहेर
दिनांक : १८ व १९ जानेवारी १९९७

श्री. नाना पाटेकर हा चित्रपट व्यवसायात आता एक महत्वाचा परवलीचा शब्द झाला आहे. ज्या कलाकारांच्या नावावर चित्रपट गर्दी खेचतो आणि हमखास यशस्वी होतो अशा मोजक्या अभिनेत्यात अमिताभनंतर नाना पाटेकर यांचा अग्रक्रम लागतो. अर्थात यासाठी नानांना तपश्चर्या करावी लागली आहे. प्रदीर्घ मेहनतीनंतर त्यांना यशाचा लौकिकाचा मार्ग सुकर झाला तो त्यांच्या नाटकांमधील भूमिकांमुळे.

श्री. नाना पाटेकरांना बालपणापासूनच अभिनयाची आवड. वयाच्या सातव्या वर्षी शाळेतल्या 'वाल्मिकी' नाटकात वाल्या कोळ्याच्या सहकाऱ्याची भूमिका त्यांनी केली होती.

जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधे असताना श्री रमाकांत देशपांडे यांच्या दिग्दर्शनाखाली श्री. शं. गो. साठे यांचे 'ससा आणि कासव' नाटक महाविद्यालयाच्या वार्षिक समारंभासाठी बसविण्यात आले होते. त्यात श्रीधर-कासवाची भूमिका श्री. नाना पाटेकर यांनी केली होती.

महाविद्यालयीन शिक्षणानंतर नोकरी करत असताना महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेतील नाटक करण्याची संधी श्री. नाना पाटेकर यांना मिळाली. श्री. चिं. त्र्यं. खानोलकरांचे ते नाटक श्री. रमाकांत देशपांडेच दिग्दर्शित करत होते. श्री. खानोलकरांना जेव्हा समजले की श्री. नाना पाटेकर त्या नाटकात भूमिका करत आहेत. तेव्हा त्यांनी त्या दोन अंकी नाटकाचा दुसरा अंक पुन्हा नव्याने खास श्री. नाना पाटेकरांच्या भूमिकेला महत्व देऊन लिहून दिला. ते नाटक श्री. नाना पाटेकरांचे झाले.

राज्य स्पर्धेच्या पुढच्या वर्षी श्री. व्यंकटेश माडगुळकरांनी लिहिलेल्या 'गौराई' नाटकात श्री. अरविंद देशपांडे आणि श्रीमती सुलभा देशपांडे यांच्यामुळे महत्वपूर्ण भूमिका श्री. नाना पाटेकरांना मिळाली. ती त्यांनी कशोसीने केली. ते नाटक स्पर्धेत पारितोषिक पात्र ठरले नाही, तरी श्री. नाना पाटेकर यांची भूमिका गाजली. अभिनयाची दोन वैयक्तिक पारितोषिके त्यांना मिळाली.

श्री. अरविंद देशपांडे यांनी दिग्दर्शित केलेल्या श्री. विजय तेंडुलकरांच्या 'पाहिजे जातीचे'मधली बबन्या ही भूमिका व्यक्तीरेखा श्री. नाना पाटेकर यांनी केली. या भूमिकेमुळे श्री. नाना पाटेकर यांचे नाव पुन्हा एकदा गाजले. पण श्री. नानांच्या अभिनयाचे खरे दर्शन घडले ते श्रीमती विजया मेहता दिग्दर्शित 'हमिदाबाईची कोठी'मधील भूमिकेमुळे.

श्री. जयवंत दळवींच्या 'महासागर'मधली दिगप्पाची भूमिका श्री. नाना पाटेकरांना मिळाली. श्री. नानांच्या स्वतःच्या मताप्रमाणे त्यांनी केलेली ही सर्वात सुंदर व्यक्तीरेखा होती.

श्री. जयवंत दळवी यांचे 'पुरुष' नाटक त्यांच्या व्यावसायिक यशाचा परमोच्च बिंदू होता. त्यातील गुलाबराव तुफान यशस्वी झाला. त्याचे सोळाशेऐंशी प्रयोग झाले. या व्यतिरिक्त 'आई शप्पथ', 'भाऊ मुरारराव', 'तनमाजोरी' नाटकात त्यांनी भूमिका केल्या.

श्री. नाना पाटेकर यांची नाटकाची कारकीर्द ही मोजक्याच नाटकांची. नंतर ते चित्रपटव्यवसायात लौकिकास चढले, पारितोषिकाचे मानकरी झाले पण त्यांचे नाट्यप्रेम अबाधितच राहिले.

नाशिक येथे मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेच्या वतीने १९९७ साली १८ व १९ जानेवारीला भरलेल्या सत्त्याहत्तराव्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन त्यांच्या नाट्यप्रेमाची पावतीच त्यांना दिली गेली आहे.



७८ वे मराठी नाट्य संमेलन, कणकवली, १९९८ अध्यक्षा : **श्रीमती भक्ती बर्वे-इनामदार**

प्रायोजक : **वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान,** मुंबई गोवा महामार्ग, कणकवली.

## श्रीमती भक्ती बर्वे - इनामदार

**१० सप्टेंबर**

अठ्ठ्याहत्तरावे मराठी नाट्य संमेलन
वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या विद्यमाने
जयवंत दळवी नाट्यनगरी, कणकवली (जि. सिंधुदुर्ग)
स्वागताध्यक्ष : श्री. नारायण राणे
दिनांक २ व ३ मे १९९८

स्वाक्षरी
Bhakti Barve

मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळण्याचा योग फक्त यापूर्वी चार महिलांनी संपादन केला होता. पण ७८व्या नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विराजमान होणाऱ्या श्रीमती भक्ती बर्वे - इनामदार यांना हा योग रंगभूमीवर सक्रीय असतांना प्राप्त झाला आहे. कर्मठ बर्वे घराण्यात जन्म घेतलेल्या भक्ती-बर्वे इनामदार यांनी आपल्या बालवयातच नाट्य शिक्षणाचे पाठ 'लिटल थिएटर' या बाल कलाकारांच्या नाट्य संस्थेत श्रीमती सुधा करमरकर यांच्या दिग्दर्शनाखाली नाट्य शिक्षणास प्रारंभ केला. याच काळात त्यांनी नृत्य शिक्षणासही प्रारंभ केला. गुरू पार्वतीकुमारांनी 'मनात भाव आला की रसोत्पती होते' हे सूत्र त्यांच्या मनात कायमचे कोरले.

भक्तीची कारकीर्द आकाशवाणीपासून सुरू झाली. आकाशवाणीच्या जाहिरात विभागात दोन गाण्यांच्या मध्ये जाहिराती घालण्याचे काम करताकरताच त्यांना गाण्याचे वेड लागले. नाटके चालू होतीच. ७२ मध्ये मुंबईत दूरदर्शन आले आणि भक्ती बर्वे निवेदिका म्हणून रुजू झाल्या. एकीकडे नाट्यप्रयोग चालूच होते. 'बहिणाबाई' लघुपटातील शीर्षक भूमिका त्यांनी साकारली. 'जाने भी दो यारो' यासारख्या हिंदी चित्रपटातील मुशाफरी चालू असली तरी खरा रस होता नाटक आणि दूरदर्शन या माध्यमातच.

मुं. म. साहित्य संघाच्या नाट्यशाखेत 'अजब न्याय वर्तुळाचा' करतांना भारत सरकारच्या वतीने जर्मनीत ब्रेख्तच्या शताब्दी महोत्सवात भाग घेण्याची संधी श्रीमती भक्ती बर्वे यांना प्राप्त झाली. यानंतर निरनिराळ्या नाट्य संस्थातून श्रीमती भक्ती बर्वे त्यांना आवडलेल्या भूमिकातून कामे करून मराठी रंगभूमीवर एक दर्जेदार अभिनेत्री म्हणून रसिकांच्या पसंतीस आल्या.

'अखेरचा सवाल', 'रातराणी', 'नागमंडळ', 'पळा पळा कोण पुढे पळे तो', 'अजब न्याय वर्तुळाचा', 'हॅण्डस् अप', 'टिळक आणि आगरकर', 'किमयागार', 'फुलराणी', 'आई रिटायर होते', 'गांधी विरुध्द गांधी', 'गांधी - आंबेडकर' या नाटकातून भूमिका करून मराठी रंगभूमीवरील आपले श्रेष्ठत्व सिध्द केले.

श्रीमती सुधा करमरकर, श्री. पु. ल. देशपांडे, श्री. सत्यदेव दुबे, श्रीमती विजया मेहता, श्री. विश्राम बेडेकर, श्री. प्रकाश बुध्दीसागर, श्री. दिलीप कोल्हटकर, श्री. दामू केंकरे आदि दिग्गज दिग्दर्शकाकडून अभिनयाच्या शिक्षणाने त्यांच्या कलागुणांना बहर आला आहे.

श्रीमती भक्ती बर्वे यांनी मराठी, हिंदी आणि गुजराथी रंगभूमीवर आपल्या अभिनयाचा ठसा सारख्याच उत्कटतेने वठविला आहे. 'नाटक प्रेक्षकांच्या मनाची पकड घेणारं असलं तर इतर भाषेतही चालू शकते. मला स्वत:ला व्यक्तिश: ज्या नाटकात गोष्ट आहे असं नाटक जास्त आवडते'. मराठी नाटकांचे दौरे खूप असतात त्यामुळे नेपथ्याचा विचार दौऱ्यांची सोय पाहून करावा लागतो. असे श्रीमती भक्ती बर्वे-इनामदार यांचे म्हणणे आहे.

आपल्या नाट्यधर्मी आवाजामागचं आणि अभिनयाचं गमक सांगतांना श्रीमती बर्वे कामावरील प्रेम व काम उत्तमोत्तम व्हावे अशी त्यांची मनापासूनची इच्छा असल्याने ती भूमिका प्रेक्षकापर्यंत जाऊन पोचते. नाटकातील भूमिका आणि दूरदर्शन वरील निवेदकाची भूमिका त्यांनी उत्तम प्रकारे पार पाडून रसिकांना आनंद दिला आहे.

ही सर्व नाट्यानुकूल वाटचाल पाहिली म्हणूनच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाने त्यांची अविरोध निवड करून या गुणवान अभिनेत्रीला, ती रंगभूमीवर कार्यरत असतांना कणकवली येथे भरणाऱ्या अठ्ठ्याहत्तराव्या नाट्यसंमेलनाची अध्यक्षा म्हणून मान्यता देऊन श्रीमती भक्ती बर्वे-इनामदार यांच्या नाट्यसेवेचा गौरव केला आहे.




७९ वे मराठी नाट्य संमेलन, पिंपरी चिंचवड, १९९९. अध्यक्ष : **डॉ. रा. अ.** तथा **बाळ भालेराव**

प्रायोजक : **नाटय निरुपण न्यास, नासिक.**

# डॉ. राजाराम अमृत तथा बाळ भालेराव

११ एप्रिल १९३३.

एकूणऐंशीवे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा
पिंपरी-चिंचवड, नाट्यगृह व मोरया नाट्यनगरी
स्वागताध्यक्ष: श्री. हनुमंतराव भोसले, महापौर
दिनांक : १५, १६ व १७ फेब्रुवारी १९९९

स्वाक्षरी

राजाराम अमृत भालेराव

गायकांच्या घराण्याप्रमाणे नाटकाचीही घराणी आहेत. गंधर्व, ललितकला, बलवंत ही नाट्य निर्मात्यांची घराणी आहेत. गडकरी, खाडीलकर, देवल ही नाट्यलेखकांची घराणी, आनंदराव, बाबुराव पेंटर, पु. श्री. काळे ही कला दिग्दर्शकांची घराणी. या सर्वात महत्वाचे घराणे आहे डॉ. भालेराव घराणे. डॉ. अ. ना. भालेराव यांनी आपल्या अथक मेहनतीने नाट्यव्यवसायाला नवसंजीवनी दिली. डॉ. अ. ना. भालेराव नेहमीच पडद्यामागे राहिले. त्याप्रमाणे त्यांचे सुपुत्र डॉ. राजाराम अमृत भालेराव हेही आजवर पडद्यामागेच काम करीत होते. आता मात्र ७९ व्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून अखिल भारतीय नाट्य परिषदेने त्यांना निवडून, डॉ. अ. ना. भालेराव यांना आदरांजलीच वाहिली आहे.

१९४२ सालापासून शालेय जीवनात वडिलांच्या आदेशानुरूप व प्रसंगपरत्वे वेगवेगळया भूमिका करून रंगभूमीवरही त्यांनी पदार्पण केले. १९५६ साली एम. बी. बी. एस. मध्ये सुवर्णपदक विजेते डॉ. भालेराव यांनी के. ई. एम. रुग्णालयात शल्य विशारद म्हणून व्यावसायिक कार्यास प्रारंभ केला. कालातंराने एफ. आर. सी. एस च्या परिक्षेत बसण्यासाठी त्यांनी इंग्लडला प्रयाण केले. नियोजीत तीन वर्षे मुदतीचा अभ्यासक्रम पहिल्या सहा महिन्यातच त्यांनी पूर्ण केला आणि शिक्षकांना आश्चर्याचा सुखद धक्का देवून पहिल्याच प्रयत्नात एफ. आर. सी. एस. ची पदवी प्राप्त करून घेतली.

मायदेशी परत आल्यानंतर मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्यात डॉ. बाळ भालेराव कार्यरत झाले आणि कार्यकारी मंडळाच्या अनेकविध पदावर कार्य करून संघाचे डॉ. बाळ भालेराव एक आधारस्तंभ झाले. संघाच्या नाट्य शाखेतील कलाकारांना वैद्यकीय मदतीसाठी के. ई. एम. रुग्णालयातील शल्य विशारद डॉ. बाळ भालेराव केव्हाही उपलब्ध असत. निवृत्ती नंतर १९८५ साली हिंदुजा रुग्णालयात श्रीयुत हिंदुजा यांच्या आग्रहावरून शल्य विशारद या नात्याने त्यांनी सुरूवात केली व विविध अनुभवांनी आपली कार्यक्षमता सिध्द केली व व्यवस्थापनातील नियोजनाचे कौशल्य प्राप्त केले. आता डायरेक्टर ऑफ रिसर्च या पदावर ते कार्यरत आहेत.

संघकार्यात डॉ. बाळ भालेराव यांच्या मताला जी प्रतिष्ठा प्राप्त झाली ती त्यांच्या निरलस सेवेमुळेच. संघाचे कार्यवाह म्हणून विद्यापीठाच्या नाट्य शिक्षण समितीवर व महाराष्ट्र शासनाच्या साहित्य व नाट्य विषयांच्या समित्यांवर ते सदैव कार्यरत दिसून येत. संघाचे सादर होणारे नाट्य प्रयोग आणि इतर संघ कार्यात ते हिरीरीने काम करत असत.

१९७४ साली जर्मन नाटककार ब्रेख्त यांच्या श्रीयुत चिं. त्र्यं. खानोलकर यांनी अनुवादिलेल्या ''अजब न्याय वर्तुळाचा'' या नाटकाचा, श्रीमती विजया मेहता व श्री बेनेव्हिट्झ यांनी दिग्दर्शिलेला नाट्य प्रयोग, भारत सरकाच्या वतीने, रौप्य महोत्सवी जर्मनीत एकूण तेरा प्रयोग केले ते डॉ. बाळ भालेराव हे नाट्य पथकाचे नेतृत्व करीत असतानांच. जर्मनीमध्ये मराठी रंगभूमीचा झेंडा डौलाने सादर करण्याची संधी साहित्य संघाला मिळाली. ती डॉ. बाळ भालेरावांच्या नेतृत्वाखालीच. भरतमुनीच्या रंगमंचाचे पुनर्निर्माण चित्रकार गोडसे यांनी संघाच्या 'मुद्राराक्षस' नाटकासाठी तयार केले व नंतर हे नेपथ्य जर्मनीमध्ये 'मुद्राराक्षसच्या' जर्मन प्रयोगासाठी वापरले. याच नेपथ्यावर भासाचा नाटकावरून केलेल्या 'धाडीला तिने राम का वनी' या श्रीयुत गोडसे यांच्या नाटकासाठीही भरत रंगभूमीचा वापर करण्यात आला हेही डॉ. बाळ भालेराव यांच्या नाट्यशाखेच्या कार्यवाहपदाच्या अमदानीतच.

डॉ. बाळ भालेरावांच्या अल्पावधीतील कर्तृत्वाचा सन्मान पिंपरी-चिंचवड येथे भरणाऱ्या ७९ व्या मराठी नाट्य संमेलनाच्यां, नाटककार, कलावंत, तंत्रज्ञ नसलेल्या, कार्यकर्त्या व्यक्तीला पहिल्यानेच मिळालेल्या अध्यक्षपदाने झालेला आहे.




८०वे मराठी नाट्य संमेलन, परभणी, २००० अध्यक्ष : **प्रा. डॉ. लक्ष्मण नरसिंह देशपांडे**

प्रायोजक : **नाट्य निरुपण न्यास, नासिक.**

# प्रा.डॉ. लक्ष्मण नरसिंह देशपांडे

## ४ - १२ - १९४३

ऐंशीवे मराठी नाट्य संमेलन
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, परभणी शाखेच्या विद्यमाने
शिवाजी कॉलेज परिसरातील नाट्य मंडप, परभणी
स्वागताध्यक्ष : रावसाहेब जामकर
दिनांक : ८ व ९ जानेवारी २०००

स्वाक्षरी

श्री. लक्ष्मण देशपांडे यांच्या एक पात्री 'वऱ्हाड निघालंय लंडनला' या कार्यक्रमाची नोंद, जागतिक विक्रमांची आवर्जून जाण ठेवणाऱ्या 'गिनीज् बुक ऑफ वर्ल्ड'ने घेतली आहे. एका मराठी माणसाचे नाट्यक्षेत्रातील महत्त्वपूर्ण कर्तृत्व यामुळे विश्वविख्यात झाले आहे. दोन हजारांहून अधिक प्रयोग झाले आहेत. एक वेगळा नाट्यप्रकार म्हणून गिनिज्ने त्याची नोंद केली आहे. एकपात्री हा महाराष्ट्राला तसा नवा नाही. कालमानानुसार एकपात्री कार्यक्रमांना मराठी माणूस मुकतो की काय असे वाटत असतानाच लक्ष्मण नरसिंह देशपांडे रंगमंचावर आपले ' वऱ्हाड ' घेऊन आले.

अनेक पात्रांचे हे वऱ्हाड सुमारे वीसपंचवीस पात्रांच्या आवाजांनीशी रंगभूमीवर खेळविणे हे सोपे नाही. केवळ आवाजच प्रेक्षकांना ऐकू येत नाही. तर एका सलग कथेतून त्यातील विविध व्यक्तीचित्रेही प्रेक्षकांना पाहायला मिळतात. महाराष्ट्रामधीलच नव्हे तर, लंडननिवासीही त्यांच्या बारीक सारीक लकबींच्या वैशिष्ट्यांसह प्रेक्षकांशी साक्षात संवाद साधतात. या कर्तबगारीला तोड नाही.जोडही नाही.

औरंगाबाद (मराठवाडा) येथे एका सर्वसामान्य गृहस्थाघरी जन्मलेल्या प्रा. डॉ. लक्ष्मण नरसिंह देशपांडे, एम्. ए., पी. एच्.डी., मास्टर इन् ड्रॅमॅटिक्स, यांना हे कसब दाखविण्यामागे नटश्रेष्ठ बालगंधर्वांचा कौतुकस्पर्श आणि पारितोषिकही होते. वयाच्या सातव्या वर्षापासून गणपती उत्सवातील मेळ्यांमधे काम करून रंगमंचावर उभे राहण्याचे 'व्यसन' लक्ष्मण देशपांडे यांना लागले. 'अजिंठा', 'मराठवाडा' वृत्तपत्रातून मुद्रितशोधकापासून उपसंपादक पदापर्यंत पोहचलेले लक्ष्मण देशपांडे वृत्तपत्रीय लेखणी चालवत चालवत एम.ए. झाले. मराठीचे प्राध्यापक असतानाच महाविद्यालयात नाट्यशास्त्र विभाग सुरू केल्यावर त्याचे काम देशपांडे पाहू लागले. १९७३ मधे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नाट्यशास्त्र विभाग सुरू केला. श्री. कमलाकर सोनटक्के त्याचे प्रमुख होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १९७३ ते १९७६ देशपांडे यांनी नाट्यशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. कमलाकर सोनटक्के यांनी विद्यापीठ सोडल्यावर हा विभाग बंद होतो आहे असे दिसताच लक्ष्मणराव पुढे सरसावले आणि ' आम्ही पैसे न घेता येथे येऊन नाट्यशास्त्र शिकवितो. पण हा विभाग बंद करू नका', अशी कुलगुरूंना त्यांनी विनंती केली. १९८० मधे डॉ. देशपांडे यांची बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात नाट्यशास्त्र विभाग प्रमुखपदी त्यांची नियुक्ती झाली. आज पावेतो लक्ष्मणराव देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा विभाग चालू आहे. बावीस नाट्योत्सव, एकशे पन्नासहून अधिक नाटके आणि सुमारे एकशे पंच्याहत्तर एकांकिकांची १९८० पासून या विभागामधे निर्मिती केली आहे. अनेक नाट्यशिबीरे झाली. अनेक नाट्यतज्ञांची व्याख्याने आयोजित केली. अनेक विद्यार्थ्यांना संशोधनासाठी मार्गदर्शन केले. महाराष्ट्रातील विद्यापीठपातळीवरील हा पहिला विभाग आहे. जेथे पदवीपूर्व व पदव्युत्तर नाट्यशिक्षण दिले जाते. या विभागातून नाट्यशास्त्र शिकून बाहेर पडलेले ऐंशी-नव्वद विद्यार्थी नाटक, दूरदर्शन, चित्रपटसृष्टी यात आपले कार्यकौशल्य दाखवत आहेत. आजपावेतो देशपांडे यांनी दोनदा अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, दुबई, मस्कत, नायजेरिया, केनिया, कतार, थायलंड, कुवैत इत्यादी देशांना प्रयोगांसाठी भेटी दिल्या आहेत. आज पावेतो त्यांना एकूण पंचवीस पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

डॉ. लक्ष्मण नरसिंह देशपांडे यांनी व्यावसायिक रंगमंचावरही काही नाटके सादर केली, 'नटसम्राट'चे गणपतराव बेलवलकर आणि कावेरी अशा द्विपात्री कार्यक्रमाचे सुमारे पंचाऐंशी प्रयोग त्यांनी केले. दोन वेळा 'अपना उत्सव' आणि मराठवाडा सांस्कृतिक दर्शन कार्यक्रम आयोजित केला.

डॉ. लक्ष्मण नरसिंह देशपांडे हे मराठवाड्यातील पहिले रंगकर्मी आहेत ज्यांचा परभणी येथील जानेवारी दोनहजार सालात भरलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या ऐंशीव्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून उचित गौरव झाला आहे.



८१ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, रोहा, जि. रायगड, २००१

अध्यक्ष: **श्री. रमेश चौधरी**

# श्री. रमेश चौधरी

## ७ नोव्हेंबर १९३२ – १८ जुलै २०११

एक्याऐंशीवे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
धाविरनाट्यनगरी चिंतामणराव देशमुख रंगमंच, रोहा, जि. रायगड
स्वागताध्यक्ष : श्री. सुनील तटकरे
दिनांक : २४ व २५ फेब्रुवारी २००१

मराठी रंगभूमीचा 'हौशी रंगभूमी' हा जो उपप्रवाह आहे, तो समृद्ध करण्यात महाराष्ट्रातील अनेक रंगकर्मींचे योगदान लाभले; त्यातलं प्रमुख नाव म्हणजे ज्येष्ठ रंगकर्मी 'श्री. रमेश चौधरी' हे होय.

हौशी प्रायोगिक, व्यावसायिक रंगभूमी, तसेच आकाशवाणी आणि दूरचित्रवाणी या सर्व स्तरांवर चौधरी हे दिग्दर्शक, नट आणि  लेखक म्हणून वावरले. हौशी रंगकर्मींसाठी, 'हौशी रंगमंच संघटना' स्थापन करून त्याद्वारे विविध उपक्रम राबवले. राज्यभर नाट्यप्रशिक्षण शिबिरे सातत्याने घेतली. मूळचा शिक्षकी पेशा असल्याने नाटक शिकवण्याचे कामही ते उत्तमरीत्या करीत.

श्री. आत्माराम भेंडे यांच्या 'कलाकार' संस्थेच्या प्रायोगिक नाटकांत त्यांनी कामं केली. भेंडे दिग्दर्शित 'झोपी गेलेला जागा झाला' मध्ये ते नट म्हणून चमकले. 'उदय कला केंद्र' या हौशी नाट्यसंस्थेचे दिग्दर्शक म्हणून आपला लौकिक त्यांनी प्रस्थापित केला. उदय कला केंद्रातर्फे राज्य नाट्यस्पर्धेत 'खून पाहावा करून' 'मधल्या भिंती', 'ग्रँण्ड रिडक्शन सेल', 'श्रीमंत पतीची राणी', 'पाचोळा जळत नाहीये', 'महाभारत : एक अपूर्व पर्व' ही नाटके सादर केली. ती अतिशय गाजली. त्यात सलग पाच वर्षे प्रथम क्रमांक व अंतिम स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच अनिल सोनार यांचे 'गणपत वाणी' हे नाटक सादर करून पुन्हा अव्वलस्थान राज्य नाट्य स्पर्धेत मिळवले. मुंबई मराठी साहित्य संघातर्फे 'भारती' या हौशी-प्रायोगिक नाट्यशाखेची धुरा १९७२ ते १९७४ या काळात चौधरी यांनी वाहिली. त्यानंतर नाट्यशिबिरे सातत्याने आयोजित करून राज्यभर आपले शिष्य निर्माण केले.

दूरदर्शनवर गाजलेल्या पहिल्याच 'श्वेतांबरा' या  मालिकेचे पटकथा-संवादलेखन त्यांनीच केले होते. अ.भा. मराठी नाट्यपरिषदेत, मच्छिंद्र कांबळी यांच्या कारकिर्दीत बारा वर्षे कोषाध्यक्षपद सांभाळले. १९९३ साली, रोहा येथे झालेल्या नाट्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते.

मराठी रंगभूमीवरील स्पर्धेची पहिली पायरी ते रंगभूमीचे सर्वोच्च असणारे, नाट्यपरिषदेच्या संमेलनाचे अध्यक्षपद (दोन वेळा) हा त्यांचा प्रवास लक्षणीय आहे. 'उदय कला केंद्र' या त्यांच्या नाट्यसंस्थेने राज्य नाट्यस्पर्धेत जणू इतिहासच उभा केला.

१९६९-७० च्या सुमारास सत्यदेव दुबे व अमोल पालेकर यांचे 'वल्लभपूरची दंतकथा' तर रमेश चौधरी यांचे 'ग्रँण्ड रिडक्शन सेल' स्पर्धेत होतं. या दोन्ही नाटकांत कमालीची चुरस होती. चौधरी यांना दिग्दर्शनाचा तृतीय पुरस्कार मिळाला 'कां, असंच का?' या नाटकासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार तर 'पाचोळा जळत नाहीये'(११ वी नाट्यस्पर्धा) साठी नेपथ्य प्रकाशयोजना, लेखनासह अनेक पुरस्कार व दिग्दर्शनाचा तिसरा पुरस्कार मिळाला.

रंगभूमीवरील नव्या पिढीला आकार देण्यासाठी त्यांनी नाट्यशिक्षकाची भूमिका स्वतःहून स्वीकारली. त्यातून नाट्यसंस्कार केले.

रोहा येथे झालेल्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनी मांडलेले, हौशी, प्रायोगिक व स्पर्धेच्या रंगभूमीबद्दलचे विचार ही जणू मार्गदर्शक तत्वेच आहेत. त्यातून रंगभूमीला दिशा मिळू शकेल.



८२ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, वसई, जि. ठाणे, २००२

अध्यक्ष: **श्री. मोहन तोंडवळकर**

# श्री. मोहन तोंडवळकर

## १९ मार्च १९३४ – ६ ऑगस्ट २०१०

ब्याऐंशीवे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
कै. परशराम सामंत नाट्यनगरी रणवीर चिमाजी अप्पा मैदान, वसई, जि. ठाणे
स्वागताध्यक्ष : श्री. संजय राऊत
दिनांक : ६ व ७ एप्रिल २००२

मोहन तोंडवळकर म्हणजे 'कलावैभव' हे समीकरण. अनुभवी आणि श्रेष्ठ निर्मात्यांच्या यादीत त्यांचं नाव खूप वरचं आहे. अवघी नाट्यसृष्टी त्यांना यशस्वी निर्माता म्हणून ओळखते. त्यांचे वडील दशरथ तोंडवळकर हे सातत्याने छोट्या नाटकातून कामं करीत असल्याने, 'नाटक' या विषयाचं बाळकडू त्यांना घरातच मिळालं. तरूणपणी त्यांनी बॉम्बे पोर्ट ट्रस्ट मधील नोकरी सांभाळत, कंत्राटी पद्धतीने (ठेकेदार) नाट्यप्रयोग लावण्यास सुरूवात केली. ही गोष्ट आहे १९५५ ची. सन १९६० च्या आसपास नव्या नाट्यसंस्था हळूहळू उभ्या राहू लागल्या. या महत्त्वाच्या टप्प्यावर तोंडवळकरांनी 'एकच प्याला' ची निर्मिती केली. आणि ते नाट्यनिर्माता बनले.

'प्रेमा तुझा रंग कसा', 'नयन तुझे जादुगार', 'सौभाग्य', 'एक हट्टी मुलगी' अशी नाटकं सादर करून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. हे सगळं करण्यात रिस्क होतीच. गंभीर आणि आशयघन नाटकांचा शोधही त्यांनी जारी ठेवला. एकूण ८६ नाटकांची निर्मिती त्यांनी केली. पैकी 'काचेचा चंद्र', 'मंत्रमुग्ध', 'पुरूष', 'नांदा सौख्यभरे', 'नातीगोती', 'वाडा चिरेबंदी', 'प्रासंगिक करार', 'गेला माधव कुणीकडे', 'लपंडाव', 'लग्नाची बेडी' ही त्यापैकी काही. विशेष म्हणजे त्यांनी कलाकारही चाणाक्षपणे हेरले. 'पप्पा सांगा कुणाचे' मधून भक्ती बर्वे-इनामदार, 'सौभाग्य'साठी मधुकर तोरडमल, 'जास्वंदी' मधून विक्रम गोखले, 'महासागर' मधून नाना पाटेकर असे कित्येक कलावंत नावारूपाला आले. आणि त्यांनी मराठी नाट्यसृष्टीवर आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविला. जयवंत दळवी यांच्याशी तोंडवळकरांचं विशेष सख्य होतं. तोंडवळकरांच्या सूचनांचा, दळवी गांभीर्याने विचार करीत. निर्माता म्हणून चोख भूमिका बजावताना, त्यांनी अनेक वर्षे व्यावसायिक नाट्यनिर्माता संघाचं सचिवपद सांभाळलं.

नाट्यसृष्टीत ते सर्वांच्या आदराचं स्थान मिळवून होते. मोठमोठे मान-मरातब मिळूनही त्यांना त्याबद्दल ऐट नव्हती. यशस्वी निर्माता बनल्यावर इतर निर्मात्यांची नाटकं पाहायची नाहीत; राज्य नाट्यस्पर्धांकडे फिरकायचं नाही, हा इतर निर्मात्यांचा रिवाज. पण तोंडवळकर त्याला अपवाद होते. नाट्यनिर्मितीनंतर त्यांनी जाहिरातीच्या (नाटकांच्या) धंद्यातही पाय रोवले. आणि आपला हाही व्यवसाय चोखपणे करून दाखवला.

शिवाजी मंदिरमध्ये धूमधडाक्यात त्यांची पंचाहत्तरी साजरी झाली. त्यानंतर ते एका नव्या नाटकावर काम करीत होते. पण ते नाटक रंगमंचावर येण्यापूर्वीच या श्रेष्ठ आणि यशस्वी निर्मात्याने जगाच्या रंगभूमीवरून अखेरचा निरोप घेतला.



८३ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, अहमदनगर, २००३ अध्यक्ष: **श्रीमती जयमाला शिलेदार**

# श्रीमती जयमाला शिलेदार

## २१ ऑगस्ट १९२६

त्र्यांऐंशीवे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
बालगंधर्वनगरी, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल प्रांगण, अहमदनगर
स्वागताध्यक्ष : श्री. दिलीप गांधी (केंद्रीय राज्यमंत्री)
दिनांक : ३ व ४ मे २००३

बालगंधर्व घराण्याची गायकी, त्यांची सर्व पदे, त्यातील कठीण व लयदार स्वरालंकारासह, भावभावनांसह, आपल्या मधुर स्वराने रसिकमन जिंकणाऱ्या जयमाला शिलेदार म्हणजे पूर्वाश्रमीच्या प्रमिला जाधव. १९४२ ला गोविंदराव टेंबे यांच्या नाट्यसंस्थेच्या, 'देशांतर' या नाटकात, १६/१७ वर्षांच्या तरूणीने पहिली भूमिका केली. गंगाधरपंत लोंढे यांनी प्रमिला जाधव यांना अभिनयाचे पहिले धडे दिले. आणि १९४३ साली, संगीत शारदा या नाटकामधून 'शारदे'च्या रूपातून, रंगमंचावर जो दिमाखदार प्रवेश केला तो जवळजवळ ५०/५५ वर्षे त्यांनी संगीत नाटकांतल्या विविध नायिका आपल्या सुमधुर गाण्यांच्या आणि अभिनयातल्या सहजतेच्या जोरावर; रसिकांच्या ह्रदयातही प्रवेश केला.

साहित्य संघाच्या नाट्योत्सवात (१९५० साली) जयराम शिलेदार यांच्याशी त्यांचा प्रीतिविवाह झाला; तो अर्थातच नाटकाच्या माध्यमातून परिचय होऊनच. त्यांनी बालगंधर्वांबरोबर काम करून नाट्यक्षेत्रात पदार्पण केले. विवाहानंतर शिलेदार दाम्पत्याने 'मराठी रंगभूमी' (पुणे) ची स्थापना केली. आणि आपल्या संस्थेतर्फे त्यांनी बाळ कोल्हटकर यांच्या 'मुंबईची माणसे, एखाद्याचं नशीब, बाजीराव-मस्तानी, राम जोशी यासारख्या नाटकांची निर्मिती केली.

गणपतराव बोडस, चित्तरंजन केल्हटकर यांसारख्या दिग्जांकडून त्यांनी अभिनयाचे धडे घेतले. छोटा गंधर्व यांची नायिका म्हणून त्या गाजल्या. संशयकल्लोळ, सौभद्र, स्वयंवर, कान्होपात्रा, शाकुंतल, मृच्छकटिकम, एकच प्याला, सुवर्णतुला इ. संगीत नाटकांतील गायक-नायिकेच्या भूमिका त्यांनी अनेक वर्षे गाजविल्या. लडिवाळ, मधुर स्वर, घरंदाज व विनयशील अशा नायिका (रूक्मिणी, शंकुतला, शारदा इ.) त्यांनी साकारल्या या नायिका कमालीच्या गाजल्या. भावस्पर्शी गाणे आणि रंगभूमीवरचा सहजसुंदर वावर, संयत व मृदुता ओतपोत असणाऱ्या जयमालाबाईंनी 'नायिका' म्हणून शोभण्याचे वय संपल्यावर रंगभूमीवरचा वावर कमी केला.

कीर्ति व दीप्ती या त्यांच्या दोन्ही मुलींकडे गाण्याच्या व अभिनयाचा वारसा आलेला आहे. कीर्ति शिलेदार याही आपल्या आई प्रमाणे रूक्मिणी, गायक इ. नायिका साकारित आहेत. जयमालबाईंनी अनेक तरूण मुलींना गाणे शिकवले. अद्यापही त्या संगीताचे क्लासेस (पुणे येथे) घेतात.

महाराष्ट्रभर त्यांनी गाण्याच्या मैफिली केल्या आहेत. तरूण पिढीला संगीताचा वारसा देता देताच त्यांनी आपल्या अंगभूत ऋजुतेने, मृदु स्वभावामुळे अनेक नाट्यकंपन्याशी स्नेहभाव टिकवून ठेवला आहे.

लता मंगेशकर पुरस्कार (२००६) तसेच तीन बालगंधर्व पुरस्कार मिळविणाऱ्या जयमालाबाईंना अनेक मान-सन्मान लाभले आहेत. नाट्यपरिषदेनेही 'जीवन गौरव' पुरस्कार देऊन जयमालाबाईंचा उचित गौरव केला आहे.



८४ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, कऱ्हाड, जि. सातारा, २००४ अध्यक्ष: श्री. शंकर नारायण नवरे

# श्री. शंकर नारायण नवरे

## २१ नोव्हेंबर १९२७

चौऱ्याऐंशीवे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
यशवंतराव चव्हाण नाट्यनगरी, कऱ्हाड, जि. सातारा
स्वागताध्यक्ष : श्री. जयसिंग चव्हाण
दिनांक : ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २००४

मुंबईत जन्म झालेले श्री.शं.ना. नवरे हे सुप्रसिद्ध कथाकार, कादंबरीकार आणि नाटककार म्हणून ओळखले जातात. बी.एस्सी. झाल्यावर त्यांनी आपले पहिले लेखन 'विविधवृत्त' या साप्ताहिकातून केले. जवळपास साठ वर्षांत त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांचे ललित लेखन अत्यंत प्रसन्न शैलीतील आणि ताजेतवाने वाटणारे आहे. २७ कथासंग्रह, तसेच सुरूंग, संवाद, दिवसेंदिवस नो प्रॉब्लेम, दिनमान, आनंदाचं झाड या त्यांच्या कादंबऱ्याही प्रसिद्ध आहेत. चार एकांकिका, आणखी चार एकांकिका हे एकांकिका संग्रह त्यांच्या नावावर जमा आहेत.

व्यावसायिक रंगभूमीवर शंनांची नाटके अतिशय गाजली. एक असतो राजा, नवरा म्हणू नये आपला, देवदास धुक्यात हरवली वाट, सूर राहू दे, गुंतता हृदय हे, गहिरे रंग, धुम्मस ग्रँण्ड रिडक्शन सेल, सुरूंग, मला भेट हवी हो, हसत हसत फसवुनी, आज अचानक इ. लोकप्रिय नाटके लिहिणारे शंनां यांनी लेखन हाच आपला व्यवसाय ठेवला. आपल्या लेखनाने वाचकांचे मनोरंजन करीत असतानाच जगण्यातल्या नाट्यमयतेवर, मानवी संबंधांवर भाष्य करीत त्यांनी आपली लेखणी सदैव प्रसन्न आणि खुसखुशीत ठेवली. प्रवाही निवेदन आणि अत्यंत आकर्षक व्यक्तिचित्रणे आणि विषय हे त्यांच्या लेखनशैलीचे विशेष आहेत.



८५ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, डोंबिवली, २००५.

अध्यक्ष: **श्री. सुरेश खरे**

# श्री. सुरेश खरे

## २५ जानेवारी १९३८

पंचाऐंशीवे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
पु.भा. भावे नाट्यनगरी डोंबिवली, महानगरपालिका मैदान, डोंबिवली
स्वागताध्यक्ष : श्री. हरिश्चंद्र पाटील
दिनांक : २७, २८, २९-२००५

वसंत कानेटकर या नाटककाराला गुरूस्थानी मानणारे, नाटककार सुरेश खरे यांनी आपले पहिले नाटक, 'सागर माझा प्राण' हे राज्य नाट्य स्पर्धेसाठी म्हणून १९६६ साली लिहिले. आणि त्याला आठ पारितोषिके मिळाली. आणि त्यांना आपल्या लेखनाचा सूर सापडला असं म्हणता येईल.

बी.कॉम, बी.ए.एल.एल.बी. अशी शैक्षणिक पात्रता असणाऱ्या सुरेश खरे यांनी, सुरवातीला नाटकांत किरकोळ भूमिका, दिग्दर्शन, प्रकाशयोजना इ. गोष्टी केल्या होत्याच. नंतर त्यांच्या 'कांचेचा चंद्र' या नाटकाला प्रेक्षक आणि समीक्षकांनी दाद दिली. नाटक आणि नाट्यसमीक्षा यात त्यांना रस आहेच.

काळाच्या पुढची आणि बोल्ड विषयांवरच्या नाटकांची संयमित हाताळणी ही खरे यांची खासियत. कानेटकर, पेंडसे, शं.ना. नवरे हे यशस्वी नाटककार म्हणून गाजत असतांनाही सुरेश खरे यांनी स्वतःची स्वतंत्र शैली विकसित केली. १९६६ ते १९८५ या काळात त्यांनी अनेक नाटकं लिहिली. त्यातली बहुतेक सर्व गाजली.

'काचेचा चंद्र', 'मला उत्तर हवंय', 'पप्पा सांगा कुणाचे', 'असुनी नाथ मी अनाथ', 'कुणीतरी आहे तिथं', 'तिची कथाच वेगळी', 'मंतरलेली चैत्रवेल', संकेत मीलनाचा, शततारका रामनगरी इ. अनेक नाटके गाजली.

नुकतेच रंगभूमीवर आलेले 'सरगम' हे संगीत नाटकही रसिकप्रिय होते आहे.

'कुणीतरी आहे तिथं', 'ती वेळच तशी होती', 'अखेर तू येशीलच' ही त्यांची तीन रहस्यमय नाटकं.

त्यांची काही नाटकं गुजराथी, हिंदी, तमीळ, सिंधी आणि इंग्रजी भाषेत भाषांतरीत झाली आहेत.

नाटककार म्हणून ओळख होत असतानाच, दूरदर्शनवर गाजलेल्या 'गजरा' या कार्यक्रमाच्या अनेक भागांचं लेखनही त्यांनी केलं आहे. त्यात अभिनयही केला. नाट्यावलोकन तसेच प्रतिभा आणि प्रतिमा या कार्यक्रमांचं सूत्रसंचलनही त्यांनी केलं.

नट, दिग्दर्शक, नाटककार, सूत्रसंचालक, आस्वादक समीक्षक निवेदक आणि आयोजक अशा विविध अंगांनी त्यांची घडणूक झाली. दादर-माटुंगा सांस्कृतिक केंद्राशी ते गेली १७/१८ वर्षे संबंधित आहेत. एक उत्तम कार्यकर्ता अशीही त्यांची ओळख आहे.

नाट्यपरिषदेचा गो.ब.देवल पुरस्कार, आचार्य अत्रे फाऊंडेशन पुरस्कार, गणेश सोळंकी पुरस्कार. तसेच राज्यशासनाचा राम गणेश गडकरी पुरस्कार त्यांना लाभला आहे. याखेरीज कला प्रतिष्ठानचा काकासाहेब कालेलकर पुरस्काराचेही ते मानकरी आहेत.

राज्य नाट्यलेखनासाठी पुरस्कार १) मला उत्तर हवंय, २) देख पडोसन देख

मुंबई मराठी साहित्य संघाचा - नाट्यगौरव पुरस्कार तसेच वसंत कानेटकर स्मृती पुरस्कार



८६ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, नांदेड, २००६

अध्यक्ष: **प्रा. दत्ता भगत**

# प्रा. दत्ता भगत

## १३ जून १९४५

शहाऐंशीवे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
स्व. शंकरराव चव्हाण नाट्य नगरी, नांदेड गुरू गोविंदसिंग स्टेडियम, नांदेड
स्वागताध्यक्ष : श्री. अशोकरावजी चव्हाण
दिनांक : २८ व २९ जानेवारी २००६

नांदेड जिल्ह्यात 'बाघी' या गावी जन्मलेल्या प्रा.दत्ता भगत यांनी एम.ए. पर्यंतचे शिक्षण घेतले. एम.ए. झाल्यावर पीपल्स कॉलेज, नांदेड येथे सुमारे २७ वर्षे अध्यापनाचे काम केले. त्यानंतर डॉ. आंबेडकर तथा मराठवाडा विद्यापीठात ते काही काळ प्रपाठक होते.

'होळी', 'कायापालट' हे कथासंग्रह, आवर्त आणि इतर एकांकिका, चक्रव्यूह आणि इतर एकांकिका, जहाज फुटलं आहे आणि इतर एकांकिका, खेळिया, वाटा-पळवाटा, अश्मक ही नाटके त्यांनी लिहिली आहेत. प्रा. दत्ता भगत यांचे लेखन समतेचा आग्रह धरणारे व गंभीर आहे. क्षोभ, विद्रोह आणि प्रस्थापित व्यवस्थेला नकार ही दलित साहित्याची सगळी लक्षणे त्यांच्या लेखनात प्रकर्षाने दिसतात.

दलित साहित्यः दिशा आणि दिशांतर, दलित साहित्य प्रवाहाचा अभ्यास या त्यांच्या पुस्तकांतून दलित वाङ्‌मयाकडे पाहण्याचा त्यांचा तटस्थ आणि वाङ्‌मयीन मूल्यांचा आग्रह धरण्याचा दृष्टिकोन दिसतो. त्यांच्या चिकित्सक समीक्षेप्रमाणेच त्यांची नाटकेही वेगळी आहेत. त्यात दलित रंगभूमीचे सामर्थ्य आणि मर्यादा यांचा ताळा मांडलेला आहे.

गंभीर व विचारप्रवर्तक लेखक म्हणून त्यांची निर्मिती व समीक्षा ही दोन्ही, त्यांचे वेगळे व महत्त्वपूर्ण स्थान स्पष्ट करतात. विविध नियतकालिकांमधून त्यांचे संशोधनपर लेखही प्रसिद्ध झाले आहेत.



८७ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, जि. सिंधुदुर्ग, २००७

अध्यक्ष: **श्रीमती लालन सारंग**

# श्रीमती लालन सारंग

## २६ डिसेंबर १९४१

सत्याऐंशीवे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
श्री.ना. पेंडसे नाट्यनगरी, कमलाकर सारंग – रंगमंच कणकवली, जि. सिंधुदुर्ग
स्वागताध्यक्ष : श्री. नारायणराव राणे
दिनांक : २८ व २९ एप्रिल २००७

स्त्रीस्वातंत्र्याच्या भोक्त्या असणाऱ्या आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी, पती कमलाकर सारंग यांच्या बरोबरीने लढा देणाऱ्या कणखर अभिनेत्री लालन सारंग !

विजय तेंडुलकरांच्या 'सखाराम बाइंडर' या नाटकातली अत्यंत आव्हानात्मक आणि अवघड असणारी 'चंपा'ची भूमिका साकारणाऱ्या लालन सारंग. 'बाइंडर'मुळे उठलेल्या वादळाला आणि निर्माण झालेल्या लोकक्षोभाला त्यांना तोंड द्यावं लागलं. पती कमलाकर सारंग यांची निर्मिती असलेलं हे नाटक, फार वादग्रस्त ठरलं. न्यायालयीन लढाईत कमलाकर सारंग यांच्या बरोबरीने लालन सारंग यांनी हे वादळ शर्थीने पेललं. पुढे 'बेबी','कमला', 'गिधाडे' ही तेंडुलकरांची खासियत असणारी भिन्न 'आशय'शैली आणि भिन्न व्यक्तिरेखा असणारी, काहीशी उग्र, हिंसा, सेक्स यांचा अंतर्भाव असणारी नाटके आली. कमलाकर सारंग निर्मित या नाटकांतून श्रीमती लालन सारंग यांनी यातील पठडीबाहेरच्या भूमिका जीव ओतून केल्या. सुरूवातीला ही नाटकेही वादग्रस्त ठरली. मात्र यातील अवघड भूमिकांतून लालन सारंग यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली.

'बाइंडर' व अन्य नाटकांमुळे झालेल्या वादळाच्या तडाख्यातून श्रीमती लालन तावून सुलाखून अधिक अनुभवसमृद्ध झाल्या. अधिक धीट आणि अधिक कणखरही, त्यामुळेच 'सूर्यास्त' मधील 'जनाई' रथचक्रमधील 'ती', 'घरटे अमुचे छान' मधली 'विमल', 'कमला' मधील सरिता इ. काही आव्हानात्मक भूमिका त्यांनी लीलया पेलल्या.

नाटकांतले, काळाच्या पुढे जाणारे तेंडुलकरांचे विषय आणि त्यातल्या चाकोरीबाहेरच्या आव्हानात्मक विषयांची आवड असणारे कमलाकर सारंग, यांच्यामुळे श्रीमती लालन यांची या भूमिकां बाबतची जाण अधिक प्रगल्भ झाली.

लालन सारंग यांनी अभिनित केलेली नाटके 'सखाराम बाइंडर', 'बेबी', 'कमला', 'घरटे आमुचे छान', जंगली कबूतर, सहज जिंकी मना, सूर्यास्त, आरोप, रथचक्र, खोल खोल पाणी, गिधाडे, धंदेवाईक आक्रोश इत्यादी. तसेच राणीचा बाग, उद्याचा संसार, लग्नाची बेडी, चमकला ध्रुवाचा तारा इत्यादी नाटकांमधूनही त्यांनी भूमिका साकारल्या.



८८ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, सोलापूर, २००८. अध्यक्ष: **श्री. रमेश देव**

# श्री. रमेश देव

## ३० जानेवारी १९२५

अठ्ठ्याऐंशीवे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
कवी रामजोशी नाट्यनगरी त्र्यं.वि. सरदेशमुख रंगमंच पार्क स्टेडियम, सोलापूर
स्वागताध्यक्ष : मा. सुशिलकुमार शिंदे
दिनांक : १९ व २० जानेवारी २००८

नायक, खलनायक, चरित्र अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक अशा विविध स्वरूपाची कामगिरी केलेले लोकप्रिय व देखणा चेहरा असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री. रमेश देव.

चित्रपट व्यवसायाच्या सुरवातीच्या काळात त्यांनी सीमा या अभिनेत्री बरोबर नायकाच्या भूमिका साकारल्या. यशावकाश त्या उभयतांचा विवाहही झाला.

कोल्हापूर या कलावंताच्या नगरीतला हा अभिनेता. सीमा-रमेश देव ही जोडी नेहमीच 'हीट' ठरली. दोस्त असावा तर असा, भिंगरी हे त्यांचे चित्रपट गाजले स्वतःच्या निर्मिती संस्थेमार्फत त्यांनी 'सर्जा' या चित्रपटाची निर्मिती केली. रमेश देव यांचे एकूण रूप नायकासाठी साजेसे असले, तरी त्यांच्या गाजल्या त्या बहुतेक सर्व भूमिकांत ते 'खलनायक' होते. भिंगरी मधला त्यांचा खलनायक रूबाबदार आणि वैशिष्ट्यपूर्ण होता. त्यांनी खलनायक या भूमिकेला ग्लॅमर मिळवून दिले.

अनेक हिंदी चित्रपटांत त्यांनी उत्तमोत्तम भूमिका केल्या. 'आनंद' या हिंदी चित्रपटातही त्यांची भूमिका अविस्मरणीयच. देखणेपण, कष्टाळू वृत्ती आणि अभिनय कौशल्य यांच्या जोरावर ते उत्तम अभिनेता झाले. जिद्द आणि अपार मेहनत घेऊन त्यांनी एकाहुन एक सरस भूमिका वठवल्या.

श्री. रमेश देव यांनी अभिनित केलेले चित्रपट-भिंगरी, देवघर, आधी कळस मग पाया, बाप माझा ब्रह्मचारी, एक धागा सुखाचा, क्षण आला भाग्याचा, प्रेम आंधळं असतं, आंधळा मागतो एक डोळा, सोनियाची पाऊले, येरे माझ्या मागल्या, आलिया भोगासी, राम राम पाव्हणं, अवघाचि संसार, पसंत आहे मुलगी, साता जन्माचे सोबती, दोस्त असावा तर असा, यंदा कर्तव्य आहे. इत्यादी.

अनेक हिंदी चित्रपटातून त्यांनी साकारलेले खलनायक लक्षात राहण्यासारखे.

अनेक मानसन्मान व पुरस्कारांचे मानकरी, पत्नी सीमा देव अभिनेत्री, तर मुलगा अजिंक्य हा अभिनेता, दुसरा मुलगाही अभिनय फोटोग्राफी व जाहिरातीच्या क्षेत्रात आहे.



८९ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, बीड, २००९
९० वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, न्यूजर्सी, अमेरिका (यु.एस.ए.), २०१०

अध्यक्ष: **श्री. रामदास काम**

# श्री. रामदास कामत

## १८ फेब्रुवारी १९३२

एकोणनव्वदावे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
कै. केशरबाई क्षीरसागर नाट्यनगरी आद्य कवी मुकुंदराज रंगमंच, बीड
स्वागताध्यक्ष : श्री. जयदत्त क्षीरसागर
दिनांक : १४ व १५ फेब्रुवारी २००९

'नको विसरू संकेत मीलनाचा' 'देवाघरचे ज्ञात कुणाला' 'गुंतता हृदय हे', 'साद देती हिमशिखरे' ... इत्यादी नाट्यगीते तसेच अंबरातल्या निळ्या घनांची, सखी सांज उगवली आज, यासारखी भावगीते, निर्गुणाचे देही आलो सगुणासंगे... यासारखे अभंग अशी गाजलेली आणि अद्यापही आकाशवाणीवर गाजत असणारी गाणी रामदास कामत यांच्या नावावर जमा आहेत. कामत यांच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वरांमुळे ती लोकप्रियही आहेत.

गोव्यातील साखळी येथे जन्मलेल्या या कलाकाराने, लहानपणी आपल्या गावातील वाचनालयाच्या मदतीसाठी झालेल्या 'बेबंदशाही' या नाटकात प्रथमच भूमिका साकारली. त्यात त्यावेळी त्यांनी दोन गाणी गायली होती. पुढे १९४९ साली, महाविद्यालयीन शिक्षणासाठी मुंबईला आले.

अर्थशास्त्र घेऊन पदवीधर झाल्यावर रामदासांनी एअर इंडियात नोकरी केली. रीतसर ते निवृत्तही झाले. मात्र नोकरी करीत असतानाच, नोकरी सांभाळून सुरवातीला ते 'धी गोवा हिंदु असोसिएशन'च्या राज्य नाट्य स्पर्धेत छोट्या-मोठ्या भूमिका करीत होते. ज्येष्ठ बंधू उपेंद्र यांच्याकडे त्यांनी गाण्याचे शिक्षण घेतले. १९६४ साली आलेल्या 'मत्स्यगंधा' नाटकाने त्यांना खरे नाव मिळवून दिले. या नाटकांचे शेकडो हाऊसफुल्ल प्रयोग झाले. त्या नाटकातील कामत यांनी साकारलेल्या 'पराशर' यांच्या तोंडी असलेल्या पदांची ध्वनिमुद्रिका एचएमव्हीने काढली.

श्री. रामदास कामत यांनी 'मत्स्यगंधा' खेरीज संगीत, ययाति, देवयानी, धन्य ते गायनी कळा, मीरा, मधुरा, सौभद्र, संशयकल्लोळ, मृच्छकटिक, शारदा, मदनाची मंजिरी, मानापमान, स्वरसम्राज्ञी, कान्होपात्रा, होनाजी बाळा इ. संगीत नाटकांतून काम केले. सुमारे चार हजारांपेक्षाही अधिक प्रयोगातून ते गात राहिले आहेत. वयोपरत्वे १९९७ पासून त्यांनी रंगभूमीवर काम करणे बंद केले.

# श्री. रामदास कामत

## १८ फेब्रुवारी १९३२

नव्वदावे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
कै. मोहनवाघ नाट्यनगरी फीलाडेल्फीया, न्यूजर्सी, अमेरिका (यु.एस.ए.)
स्वागताध्यक्ष : डॉ. मीना नेरूरकर, माधुरी जोशी
दिनांक : २९, ३० व ३१ मे २०१०

लागोपाठ दुसऱ्यांदा संमेलनाध्यक्षपदाचा मान मिळविणारे, श्री. रामदास कामत यांचा जन्म गोव्यातील 'साखळी' या गावचा. या कलाकाराने, लहानपणी आपल्या गावातील वाचनालयाच्या मदतीसाठी झालेल्या 'बेबंदशाही' या नाटकात प्रथमच भूमिका केली. त्यात त्यांनी दोन गाणी गायली होती. इ.स. १९४९ साली ते महाविद्यालयीन शिक्षणासाठी मुंबईला आले.

अर्थशास्त्र हा विषय घेऊन पदवीधर झाल्यानंतर रामदास यांनी एअर इंडियात नोकरी केली; ते रीतसर निवृत्तही झाले. मात्र नोकरी करीत असतानाच, नोकरी सांभाळून सुरवातीला ते, 'धि गोवा हिन्दू असोसिएशन'च्या राज्य नाट्यस्पर्धेत छोट्या-मोठ्या भूमिका करीत होते. आपले ज्येष्ठ बंधू उपेंद्र यांच्याकडे त्यांनी गाण्याचे शिक्षण घेतले. १९६४ साली आलेल्या 'मत्स्यगंधा' या संगीत नाटकाने त्यांना भरपूर लोकप्रियता मिळवून दिली. या नाटकाचे शेकडो प्रयोग हाऊसफुल्ल झाले. त्या नाटकात कामत यांनी साकारलेल्या 'पराशर' यांच्या तोंडी असलेल्या पदांची ध्वनिमुद्रिका एच.एम.व्ही ने काढली.

'नको विसरू संकेत मीलनाचा', 'देवाघरचे ज्ञात कुणाला', 'गुंतता हृदय हे' 'साद देती हिमशिखरे...' इत्यादी नाट्यगीते तसेच अंबरातल्या निळ्या घनांची... सखी सांज उतरली आज यासारखी भावगीते, निर्गुणाचे देही आलो सगुणासंगे या सारखे अभंग अशी त्यांची गाणी आकाशवाणीवर सतत वाजत असतात. श्री. रामदास कामत यांच्या वैशिष्ट्यपूर्ण सुरांमुळे ती लोकप्रिय आहेत.

• श्री. रामदास कामत यांनी, मत्स्यगंधा खेरीज संगीत ययाति, देवयानी, धन्य ते गायनी कळा, मीरा मधुरा संशय कल्लोळ, मानापमान, स्वरसम्राज्ञी, सौभद्र, मदनाची मंजिरी होनाजी बाळा इ. नव्याजुन्या नाटकांतून काम केले. सुमारे चार हजारांपेक्षाही अधिक प्रयोगांतून ते गात राहिले.

वयोपरत्वे, १९९७ पासून त्यांनी रंगभूमीवर काम करणे बंद केले. श्री. कामत यांना अनेक मानसन्मान लाभले आहेत.



९१ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, रत्नागिरी, २०११

अध्यक्ष: **श्री. राम जाधव**

# श्री. राम जाधव

## २२ मार्च १९३४

एक्याण्णवावे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
लोकमान्य टिळक नगरी, रत्नागिरी
स्वागताध्यक्ष : श्री. उदय सामंत (आमदार)
दिनांक : २८, २९ व ३० जानेवारी २०११

श्री. राम जाधव हे मूळचे बुलढाण्यातले. शिक्षणासाठी ते अकोल्याला आले. नाटक जगवण्याचा ध्यास असणारे, रसिकांना आश्रय देणारे अशी अकोल्याची ख्याती. याच शहरात श्री. राम जाधव हे इतिहास, सूतकताई आणि शारीरिक शिक्षण हे विषय आपल्या तरूण वयात शिकवीत असत. मात्र रंगदेवतेचे वेड असणारा हा 'तरूण' गेली साठ वर्षे रंगदेवतेची पूजा करीत आले आहेत. 'रसिकाश्रय' ही नाट्यचळवळ त्यांनी संस्थेच्या स्वरूपात १९६० साली सुरू केली. त्या संस्थेचा २०१० साली सुवर्ण महोत्सव साजरा झाला.

रेल्वेतील तिकीट निरीक्षकाची फिरतीची नोकरी सांभाळूनच त्यांनी रंगभूमीची पूजा करून स्वकर्तृत्वाची मोहोर उमटविली. कायद्याची पदवी संपादन केलेल्या राम जाधव यांनी, अभिनय, दिग्दर्शन, निर्मिती आणि नाट्यचळवळीला रसिकाश्रय मिळवून देताना, कोणत्याही पदाची वा सन्मानाची अपेक्षा बाळगली नाही. वृत्तीने अत्यंत निरलस असलेल्या या कार्यकर्त्याने १९५० पासूनच्या या सहा दशकात सुमारे ९० नाटकांची निर्मिती केली. त्यात तीन संगीत नाटके आणि चार हिन्दी नाटकांचा समावेश आहे.

श्रीमती विजया मेहता यांच्या संपर्कात आल्यावर त्यांनी दहा बालनाटकांची निर्मिती तर केलीच; शिवाय विजया मेहता यांनी आयोजित केलेल्या तसेच अन्य शेकडो नाट्यप्रशिक्षण शिबिरात प्रशिक्षक म्हणून ते सहभागी झाले. जे करायचे ते परिपूर्णच असा ध्यास असलेल्या राम जाधव यांना 'मि. पर्फेक्शिनिस्ट' या नावानेही ओळखले जाते.

अनेक सामाजिक उपक्रमांत स्वतः आणि आपल्या 'रसिकाश्रय' संस्थेच्या कार्यकर्त्यांसह धावून जाण्याची संवेदनशीलता त्यांनी जपली आहे. 'नटसम्राट' या नाटकाचे संक्षिप्त 'मी नटसम्राट' करण्याचे धाडस आणि आव्हान.त्यांनी पेलले आहे.

वृद्ध कलावंतांचा उचित गौरव व त्यांना साहाय्य मिळवून देण्याची धडपड - पंचाहत्तरी उलटून गेल्यावरही ते करतांना दिसतात.

कै. पुरूषोत्तम दारव्हेकर यांच्यानंतर, सुमारे ४० वर्षांनी विदर्भातील राम जाधव यांना नाट्यसंमेलनाध्यक्ष पदाचा बहुमान मिळाला आहे.



९२ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, सांगली, २०१२

अध्यक्ष: **श्री. श्रीकांत मोघे**

# श्री. श्रीकांत मोघे

## ६ नोव्हेंबर १९३५

व्याण्णवावे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
कल्पद्रुम क्रिडांगण सांगली विश्रामबाग, सांगली
स्वागताध्यक्ष : श्री. पतंगराव कदम
दिनांक : २०, २१ व २२ जानेवारी २०१२

'मुंबई मराठी साहित्य संघा'ने १९५७ मध्ये रंगभूमीवर आणलेले 'तुझे आहे तुजपाशी' हे नाटक तुफान गाजत होते. त्यातील डॉ. सतीशची भूमिका करणारे अनन्त वर्तक दिल्लीला गेले. तर दुसरे, आत्माराम भेण्डे, ही भूमिका करीत त्यांनीही काही कारणाने ते नाटक सोडले. हे दोन्ही समर्थ अभिनेते अनुपलब्ध झाल्यावर डॉ. सतीशची भूमिका अत्यंत तडफदारपणे केली ती श्रीकांत मोघे यांनी. आपल्या दमदार आणि सशक्त अभिनयाने त्यांनी रंगभूमीवर स्वतःची नाममुद्रा उमटविली.

किर्लोस्करवाडी येथे जन्मले. श्रीकांत मोघे यांना आपल्या घरातूनच कीर्तनकाराच्या सुसंस्कृत सद्‌गुणी परंपरेचा वारसा लाभला. संस्कृत पठणामुळे सुस्पष्ट, स्वच्छ शब्दोच्चार रसाळ वाणी सद्‌अभिरूची लाभली. व्यायाम, कुस्ती, पोहणे, चित्रकला, गाणे अशा नानाविध गोष्टीत श्रीकांतजींना रूची. त्यामुळे व्यायामाने कमावलेले पिळदार कमनीय व लवचीक शरीर, भरपूर उंची प्रसन्न तसेच देखणा चेहरा आणि मृदु स्वभाव, हरहुन्नरी वृत्ती यामुळे त्यांचे एकूण व्यक्तिमत्त्वच अभिनेत्याला आवश्यक असलेल्या गुणांनी समृद्ध झालेले. कॉलेज जीवनापासूनच त्यांनी नाटके, एकांकिका यात भूमिका साकारून आपली नाममुद्रा कोरली. अगदी लहानपणी म्हणजे वयाच्या दहाव्या वर्षी त्यांनी बालनाट्यात काम करून पारितोषिक मिळवलं होतं. नाटक अंगात भिनलेलंच. त्यामुळे कॉलेजच्या स्नेहसंमेलनात अंमलदार नाटकात त्यांनी साकारलेली 'सर्जेराव' ची भूमिका तुफान गाजली.

विज्ञानाचे पदवीधर असलेल्या श्रीकांत मोघे यांनी प्रथम पुणे विद्यापीठात, त्यानंतर दिल्लीला आकाशवाणीत नोकरी केली पन्नासच्या दशकात राज्य नाट्यस्पर्धा सुरू झाल्या. त्यातल्या अनेक नाटकात त्यांनी काम केले. आवाजाची निसर्गदत्त देणगी आणि आवड. त्यामुळे तरूण वयात भावगायक म्हणूनही त्यांनी गाणी गायली. दिल्ली आकाशवाणीत ते वृत्तनिवेदकाचे काम करीत. तसेच स्वतःची गाणी व गझला गाऊन सादर करीत. नाटकांची आवड त्यांना स्वस्थ बसू देत नसे. त्यामुळे त्याचवेळी ते मराठी व हिंदी नाटकांतून 'हिरो' म्हणूनही गाजत राहिले.

'आर्किटेक्ट' (वास्तूरचना) चे शिक्षण आणि नाट्य व्यवसायातील दौरे अशी झंझावाती वाट चालू झाली. 'वाऱ्यावरची वरात (कडवेकर) तुझे आहे तुजपाशी, (डॉ. सतीश) सीमेवरून परत जा, बिकट वाट वहिवाट (नाना गवळी) लेकुरे उदंड झाली (राज शेखर) मृत्युंजय (दुर्योधन) शेर शिवाजी (हिन्दी नाटक) मधील शिवाजी, स्वामी (राघोभरारी) अशा विविध प्रकारच्या भूमिका बहुरूपी आणि बहुगुणी कलाकाराने नजाकतीने सादर केल्या.

याखेरीज गारंबीचा बापू (बापू) अशी पाखरे येती, अपराध मीच केला, अश्रूंची झाली फुले या नाटकातल्या त्यांच्या भूमिकाही दिमाखदार झाल्या.

आपल्या अमोघ वाणीने, सुसंस्कृत वृत्तीने, या नाट्यवेडाने पछाडलेल्या कलाकाराने सुमारे तीन तपे रंगभूमीची सेवा करून आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविला.



९३ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, बारामती

अध्यक्ष: डॉ. मोहन आगाशे

# डॉ. मोहन आगाशे

## २३ जुलै १९४७

त्र्याण्णवावे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन
महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल पटांगण, बारामती
स्वागताध्यक्ष : श्री अजितदादा पवार
दिनांक : २२,२३ डिसेंबर २०१२

डॉ. मोहन आगाशे हे मुळात मानसशास्त्राचे डॉक्टर, वास्तविक या शतकातील वाढत्या मानसरोगांचे प्रमाण पाहता, खासगीक्षेत्रात ते आपल्या ज्ञानाच्या जोरावर भरपूर पैसा कमावू शकले असते. परंतु संवेदनशील मनाच्या डॉ. आगाशे यांनी अभिनयाच्या आपल्या मूलभूत हौसेला आणि रंगभूमीशी जवळीक करण्यास महत्त्व दिले.

सन १९७० ते १९८० या दशकात रंगभूमी आणि चित्रपट यातील सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून ते नावारूपाला आले. डॉक्टरांचे नाव, विजय तेंडूलकरांच्या घाशीराम कोतवाल या नाटकातील नाना फडणवीसांच्या भूमिकेशी जोडले गेले ते त्यांच्या त्या भूमिकेच्या अभिनयातील अदाकारीने. बहुचर्चित आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलेल्या या नाटकामुळे डॉ. मोहन आगाशे चर्चेत राहिले. सत्यजित राय, मीरा नायर, श्याम बेनेगल, जब्बार पटेल यांच्यासारख्या दिग्गज चित्रपट निर्माते व दिग्दर्शकांच्या नावाजलेल्या चित्रपटात त्यांना महत्त्वाच्या भूमिका साकारायला मिळाल्या.

रंगभूमीवरचे त्यांचे हे प्रेम अभिनयापुरतेच मर्यादित नव्हते, १९८६ साली ग्रिप्स थिएटर ही संकल्पना सर्व प्रथम रूजविण्याचे श्रेय सर्वस्वी त्यांचेच आहे. भारतीय रंगभूमी – विशेषतः मराठी रंगभूमीसाठी त्यांचे हे सर्वात मोठे योगदान आहे. युरोपमध्ये आणि उत्तर अमेरिकेतही समकालीन भारतीय रंगभूमीची ओळख करून देण्याचे श्रेयही डॉक्टरांच्याच नावावर जमा आहे.

याखेरीज मानसिक आरोग्यशिक्षण आणि सेवाविषयक परिवर्तनासाठी एक बृहत शोधप्रकल्प घेऊन वैद्यकीय क्षेत्राला सेवाभावी वृत्तीचे संस्कार देण्याचे मोठे कामही त्यांनी केले आहे. त्याखेरीज मानसिक आरोग्यविषयक संस्थेची पुणे येथे स्थापना करून राज्य मानसिक आरोग्यसेवांच्या पुनर्बांधणीचे अभियान सुरू केले. लातूर भूकंपग्रस्तांचे मनोसामाजिक पुनर्वसन करण्यासाठी पुढाकार घेतला.

**ठळक विशेष :**

- होमी भाभा शिष्यवृत्ती, नॉर्थब्रुक सोसायटीची एबीसीएस शिष्यवृत्ती.
- महाराष्ट्र कल्चरल सेंटर निर्मितीत योगदान व एफटीआयचे संचालक म्हणून निवड.
- फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मन राष्ट्राध्यक्षांकडून दिला जाणारा द क्रॉस ऑफ ऑर्डर मेरिट हा सन्मान्य पुरस्कार
- संगीत नाटक अकादमीकडून सर्वोच्च पुरस्कार
- अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचा जीवन गौरव पुरस्कार
- राष्ट्रपतींकडून देण्यात येणारी पद्मश्री
- मनस्वी कलावंत, रंगभूमी व चित्रपट क्षेत्रातील डॉ. आगाशे यांचे मत्त्वपूर्ण योगदान तर आहेच. आजही रंगभूमीवर ते सतत कार्यरत आहेत.

## महाराष्ट्र नाटक मंडळ्यांचे पहिले संमेलन

मुंबईतील बॉम्बे थिएटर

दिनांक २८ ऑगस्ट १९०५

**संमेलनाध्यक्ष :** श्री. गणेश श्रीकृष्ण तथा दादासाहेब खापर्डे

श्री. बाबाजीराव राणे, श्री. शंकर बापूजी मुजुमदार,

श्री. अनंत वामन बरवे आणि उपस्थित नाटक मंडळ्यांचे प्रतिनिधी

व मराठी रंगभूमीचे रसिक प्रेक्षक.



**भारत नाट्य समाजाचे द्वितीय संमेलन**

नाशिकचे विजयानंद नाट्यगृह

दिनांक १५ व १६ मे १९०६

**संमेलनाध्यक्ष :** श्री. नरसिंह चिंतामण तथा तात्यासाहेब केळकर

पूर्वाध्यक्ष श्री दादासाहेब खापर्डे, श्री. माधवराव पाटणकर,

श्री. शंकरराव मुजुमदार, श्री. अ. बा. बरवे,

उपस्थित नाटक मंडळ्यांचे प्रतिनिधी व मराठी नाटकांचे जाणकार प्रेक्षक



**भारत नाट्य समाजाचे चतुर्थ संमेलन**

विजयानंद नाट्यगृह, नाशिक

दिनांक : २२ ते २४ मे १९०८

**संमेलनाध्यक्ष** : रावसाहेब नीळकंठ विनायक तथा कोंडोपंत छत्रे

संमेलनातील उल्लेखनीय विशेष, नाट्यवस्तु प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.
प्रदर्शनात कुसुंब्याचे फुलापासून तयार केलेले रंग, नाटकी पोषाख, सप्तस्वरांची पेटी, पडद्याच्या कप्प्या, मुखवटे , आयुधे, नाटकगृहाचा आराखडा, व्यक्तीचित्रे, नटांच्या कुंडल्या इत्यादी साहित्य.



**भारत नाट्य समाजाचे पाचवे संमेलन**

नूतन आर्यभूषण थिएटर,पुणे.

दिनांक : २४ व २५ मे १९०९

**संमेलनाध्यक्ष** : डॉ. गणेश कृष्ण गर्दे,

श्री. दादासाहेब छत्रे, श्री. द. आ. फाटक,

श्री. अ. वा. बरवे, पुण्यातील विद्वान व

नाट्यप्रेमी रसिक प्रेक्षक व नाटक मंडळ्यांचे उपस्थित प्रतिनिधी.



## भारत नाट्य समाजाचे आठवे संमेलन

अमरावती १९१२

**संमेलनाध्यक्ष** : सर मोरोपंत जोशी

सौ. जोशी, पूर्वाध्यक्ष श्री. दादासाहेब खापर्डे, श्री. अ. वा.बरवे, पाटणकर सं. ना. मंडळी, कोल्हापूरकर सं. ना. मं., नाट्यकला प्रवर्तक सं. ना. मं.चे श्री. आपटे, विदर्भातील विद्वान, नाट्यप्रेमी रसिक व अन्य उपस्थित प्रतिनिधी.



## अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन

६१ वे अधिवेशन, नाशिक, १९८१

**संमेलनाध्यक्ष** : श्री. आत्माराम भेंडे

अध्यक्षीय भाषण करताना श्री. आत्माराम भेंडे

पूर्वाध्यक्ष श्री. छोटा गंधर्व, श्री. वि. वा. शिरवाडकर, सौ. आशा भेंडे,
नाशिक शाखा अध्यक्ष श्री. दादासाहेब अंधृटकर, श्री. किसनलाल सारडा,
पूर्वाध्यक्ष श्री. दारव्हेकर, श्री. दाजी भाटवडेकर, श्री. वसंत कानेटकर, श्री. विद्याधर गोखले.



## अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन

७७ वे अधिवेशन १९९७, नाशिक

**संमेलनाध्यक्ष** : श्री. नाना पाटेकर

श्री. दादासाहेब अंधृटकर, नाशिक शाखा अध्यक्ष, प्रास्ताविक भाषण करतांना.

पूर्वाध्यक्ष श्री. जितेंद्र अभिषेकी, श्री. वि. वा . शिरवाडकर, श्री. वसंत कानेटकर,

श्री. प्रकाश मते, महापौर., श्री. मच्छिंद्र कांबळी, परिषद अध्यक्ष, श्री. गोविंद स्वरुप, श्री. जयसिंग चव्हाण,



## अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन

७७ वे अधिवेशन १९९७, नाशिक

**संमेलनाध्यक्ष** : श्री. नाना पाटेकर

७७ व्या संमेलनास उपस्थित असणारे सात हजार प्रतिनिधी, बहुसंख्य कलाकार, राजकीय नेते, नाट्य संस्थांचे प्रतिनिधी, सन्माननीय पाहुणे व असंख्य नागरिक.



गेली अनेक दशके नाट्य संमेलने व शेकडो नाट्य संस्था
यांची पूजनीय प्रतिमा नटराज.



## स्वागतपर कविता पहिल्या संमेलनामध्ये वाचलेल्या

(श्रीमती हिराबाई पेडणेंकरकृत)

(श्लोक.)

आले आजिं समस्त येथ जमुनी हे नाट्यशास्त्री महा,
नाना काव्यरसज्ञ जे स्वकृतिनें आनंद देती पहा।
भाषा मंडित पंडितांस बघुनि ये स्थानशोभा खरी
होतो कीं सण साजरा गमतसे श्रीशारदामंदिरी ॥

(आर्या.)

नाट्यकलाभिज्ञ महा आले मिळुनी समस्त या ठायां।
यत्कृतिगुण मन्मतिनें सांगे सत्कीर्ति अल्पशी गाया ॥
जमविली आजिं सभा ही 'बरव्यांनी' हा सुयोग आणविला।
नाट्यकला कुशलांचा लोकसमाजांत बोध जाणविला ॥
शोभे सुंदर मंदिर गुणगणयुत पंडितांहिं वाणीचें।
वानावें भाग्य किती कविरत्नांच्या अमूल्य खाणीचें ॥
साक्षात्परिषद्रंगीं विद्वत्संगें सरस्वती आली।
त्यायोगें सहजचि मग शोभा कैशी न ये तिची आली ॥
आजिं सभेच्या योगें कविरत्नांचे थवेच कीं जमले।
श्रीमद्वाग्देवीच्या चरणीं सेवार्थ भक्तसे गमले ॥
कोणी कंठमणी परि कोणी इतरत्र भूषणें असती।
देह श्रीवाणीचा शोभविती कोणि अन्यथा नसती ॥
दैवबळें प्राप्त जशी बुध्दि तशी घडतसे सदा करणी।
जो तो यथामतीनें नटवी श्री वाग्वधूस आभरणीं ॥
येथें जमले ज्ञाते त्याच्या श्रवणीं विनंति मम जावी।
माझी विचारसरणी रुचेल जरि तरि मनास आणावी ॥
अस्मत्कृतिसम कृतितें नाटककारीं सदाश्रया द्यावें।
दोषाविष्करणानें गुण झांकुनि तिज न दूर टाकावें ॥
जरि अल्पशा गुणातें गुणिजन हातीं सदैव धरितील।
उत्तेजन येउनि मग लघुमति ही सत्कृतीस करितील ॥
विद्वत्कृति मान्य सदा गुणिजनिं लघुशा कृतीस करिं घ्यावे।
जरि बोबडे मुलीचे शब्द असति तरि न काय ऐकावें ॥
नाट्यकला दाखवुनी जनचित्ता जे सदैव तोषविती।
सुचतुर गुणज्ञ नट ते साधारण कृति विशेष भूषविती ॥
ऐशा रसिकवरांच्या कृतिकन्या जरि करीं कधीं पडली।
तरि मग समजावी ती धन्या होउनि महत्पदीं चढली ॥
विद्याभांडार अशा अध्यक्षांची सुयोजना केली।
ज्यांच्या हृदयसरीं करी विद्यादेवी निरंतरा केली ॥
अध्यक्षांचे कविचे विनयें आभार मानित्यें फार।
धन्य प्रवर्तकांची जे उचलति योग्य कार्यसंभार ॥

परिशिष्ट तिसरे

# अध्यक्षीय नाट्यलेखन व कला संपदा

**मराठी रंगभूमीचे जनक**
**विष्णुदास भावे**
**यांची आख्याने**
गणपती जन्म,
मच्छावतार,
मच्छावतार (दुसरे),
कूर्मावतार ,
वराहावतार,
नरहरी अवतार,
दशरथ विवाह, श्रावण वध,
रामजन्म,
गाधिज मखरक्षण आणि त्राटिका वध,
अहिल्योध्दार आणि सीतास्वयंवर
१८९४
भार्गव गर्वविमोचन,
राघव वनप्रवेश,
भरतभाव,
शूर्पणखा विटंबना आणि खरदूषण वध,
सीताहरण, जटायु वध आणि राम
विरह,१८९४
वाली वध व हनुमंताचे किष्किंधा
आगमन,
सीताशुध्दी लंकादहन आणि रामाचा
सुवेळेत प्रवेश,
रावण विटंबना आणि अंगद शिष्टाई,
धूम्राक्ष, वज्रदंष्ट्र आणि प्रहस्तवध,
कुंभकर्ण, पराषद, श्रुतिकाया,
श्रोणिताक्ष,
विशालाक्षादि असुरवध,
इंद्रजित वध आणि सुलोचना सहगमन,
अहीमही वध,
शक्तिहत लक्ष्मणाख्यान,
रावण निधन आणि बिभीषणाचे लंकेत
आगमन आणि राज्यी स्थापना,
सुरबंध मोचन, भरतभेट आणि रामाचा
राज्याभिषेक,
अश्वमेध यज्ञ आणि लवकुश,
कृष्ण जन्म आणि कालिया
शकटसुरादिहनन,
रासक्रीडा,
कात्यायनी व्रतासह रासक्रीडा,
गोफ टिपऱ्यांचा खेळ,
कंसवध,
पारिजातक,
कचदेवयानी,
ययाति १८८३
हिडिंबवध,
बकासुरवध,
द्रौपदी स्वयंवर,
द्रौपदी वस्त्रहरण,
पांडवांचा वनवास,
किरातार्जुन युध्द आणि पाशुपतास्त्र
प्राप्ति,
स्वर्गलोकी अर्जुनाचे आगमन आणि
ऊर्वशीशाप,
पांडवांची तीर्थयात्रा आणि भीम
गर्वपरिहार,
दुर्वास भोजन,
वत्सलाहरण आणि परिणय,
विराट पर्वातील कीचक वध,
दक्षिणोत्तर गोग्रहण ,
चक्रव्यूह,
अश्वमेधांतील सुधन्वा,
चंद्रहास्य,
हरिश्चंद्र सत्वदर्शन,
वीरभद्र,
गोपीचंद (हिंदी)

**संगीत रंगभूमीचे प्रणेते**
**अण्णासाहेब किर्लोस्कर,**
शांकर दिग्विजय, १८७३
शाकुंतल - संगीत १८८१
सौभद्र - संगीत १८८३
रामराज्य वियोग - संगीत १८८४
अल्लाउद्दिनाची चितोडगडावरील
स्वारी
**विविध कर्तृत्व**
किर्लोस्कर नाटक मंडळीचे मालक,
संगीत रंगभूमीचे आद्य प्रवर्तक

**नाट्य संमेलन प्रणेते**
**अनंत वामन बरवे**
लोकमत विजय १८९८
गोपीचंद, १९०४
शारदा मंडन १९०५
उत्तरराम चरित रंगावृत्ती १९०९
अण्णासाहेबांची धांदल २ री आ.
१९१०
सुदाम १९१२
पिशाच्च विवाह १९१३
वेणीसंहार १९१४
अनसूया १९१६
सैतान १९१८
समजुतीचा घोटाळा,
शकार
शृंगार मंजिरी
**विविध कर्तृत्व**
वृत्तपत्र व्यवसाय,
भारत नाटक समाजाचे संस्थापक

**न. चिं. केळकर**

| | |
|---|---|
| सरोजिनी | १९०१ |
| तोतयाचे बंड | १९१२ |
| चंद्रगुप्त | १९१३ |
| कृष्णार्जुन युध्द | १९१४ |
| नवरदेवाची जोडगोळी (तो ही मीच हाही मीच) | १९१८ |
| अमात्य माधव | १९१९ |
| वीर विडंबन | १९१९ |
| संत भानुदास | १९१९ |
| पतीची निवड | १९५० |

**विविध कर्तृत्व**

केसरी-मराठाचे संपादक, लोकमान्य टिळक चरित्राचे लेखक, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**कृ. प्र. खाडीलकर**

| | |
|---|---|
| सवाई माधवरावांचा मृत्यू | १८९३ |
| कांचनगडची मोहना | १८९७ |
| कीचक वध | १९०६ |
| बायकांचे बंड | १९०७ |
| भाऊबंदकी | १९०९ |
| प्रेमध्वज | १९१० |
| संगीत मानापमान | १९१० |
| संगीत विद्याहरण | १९१३ |
| सत्त्वपरीक्षा | १९१४ |
| संगीत स्वयंवर | १९१६ |
| संगीत द्रौपदी | १९२० |
| संगीत मेनका | १९२६ |
| सवतीमत्सर | १९२७ |
| संगीत सावित्री | १९३० |
| संगीत बायकांचे बंड | १९३५ |
| संगीत त्रिदंडी संन्यास | १९३६ |

**विविध कर्तृत्व**

केसरीचे संपादक आणि नवाकाळचे संस्थापक, संपादक, नाटकांचे तालीम मास्तर, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

**नी. वि. तथा कोंडोपंत छत्रे**

दुर्योधन बलराम

**वि. दि. पलुस्कर**

**पुस्तके**

संगीत तत्त्वदर्शक

रागभैरव

राग मालकंस

अंकित अलंकार

**विविध कर्तृत्व**

संगीत शिक्षणासाठी भारत दौरा आणि संगीत विद्यालयांची स्थापना, राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात प्रारंभी 'वंदेमातरम' राष्ट्रगीत म्हणण्याबद्दल आग्रही

**के. रा. छापखाने**

| | |
|---|---|
| मोहन - तारा | १९०८ |

**शि. म. परांजपे**

| | |
|---|---|
| संगीत कादंबरी | १८९७ |
| मानाजीराव | १८९८ |
| रामदेवराव | १९०६ |
| भीमराव | १९०७ |
| पहिला पांडव | १९३० |

**विविध कर्तृत्व**

स्वतंत्र्याचे ज्वलज्जहाल पुरस्कर्ते, 'काळ' पत्राचे संपादक, राजकीय निबंधांचे प्रवर्तक, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**शंकर बा. मुजुमदार**

| | |
|---|---|
| मुद्रण दर्पण | १८९१ |
| अण्णासाहेब किर्लोस्कर (चरित्र) | १९०४ |
| मराठी 'रंगभूमी'ची किल्ली | १९०४ |
| जगप्रसिध्द नट गॅरिक | १९३० |
| महाराष्ट्रीय नाटककार यांची चरित्रे | |
| भारत नाट्य स. संमेलने (४ ते ११) | १९३४ |
| कुलीन स्त्रिया विरुध्द रंगभूमी | १९३४ |

**चिं. वि. वैद्य**

| | |
|---|---|
| संगीत संयोगिता | १९३४ |

**विविध कर्तृत्व**

महाभारताचा संशोधनात्मक अभ्यास आणि पुनर्लेखन, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**वीर वामनराव जोशी**

| | |
|---|---|
| राक्षसी महत्वाकांक्षा | १९१३ |
| रणदुंदुभी | १९२७ |
| धर्मसिंहासन | १९२९ |
| झोटींग पातशाही (अप्रकाशित) | १९३३ |
| शील संन्यास | १९५७ |

**विविध कर्तृत्व**

स्वातंत्र्य चळवळीचे आघाडीचे सेनानी, वृत्तपत्रांचे संपादक

**य. ना. टिपणीस**

| | |
|---|---|
| कमला | १९११ |
| मत्स्यगंधा | १९१२ |
| राधा माधव | १९१४ |
| जरासंध | १९१५ |
| चंद्रग्रहण | १९१८ |
| राज्यारोहण | १९१९ |
| शहाशिवाजी | १९२१ |
| आशानिराशा | १९२२ |
| राजरंजन | १९२५ |
| शिक्का कट्यार (राज्यारोहणाचे संगीत रूपांतर) | १९२७ |
| नेकजात मराठा (चंद्रग्रहणाचे संगीत रूपांतर) | १९३१ |
| स्वस्तिक बँक | १९३२ |
| शिवाजीला शह | १९३३ |
| दख्खनचा दिवा | १९३६ |

**दादासाहेब फाळके**

रंगभूमी

**विविध कर्तृत्व**

भारतीय चित्रपटाचे अद्यजनक, चित्रपट व्यवसायाचे भारतात यशस्वी बीजारोपण, अनेक चित्रपटांचे निर्माते-दिग्दर्शक, चित्रचमत्कृती (ट्रीकसीन्स) चित्रपटात रूढ केली

**गिरिजाबाई केळकर**

| | |
|---|---|
| पुरुषांचे बंड | १९१३ |
| वरपरीक्षा | |
| आयेषा | १९२१ |
| राजकुंवर | १९२४ |
| हीच मुलीची आई | १९३२ |
| सावित्री | |

**विविध कर्तृत्व**

पहिली स्त्री नाटककार आणि नाट्य संमेलनाची पहिली स्त्री अध्यक्षा

**अनंत हरी गद्रे**

| | |
|---|---|
| स्वराज्य सुंदरी | १९१९ |
| मूर्तीमंत सैतान | १९२९ |
| प्रेमदेवता | १९३० |
| पूर्णस्वातंत्र्य | १९३० |
| घटस्फोट | १९३० |
| कुमारी १९३१ | १९३१ |
| आई | १९३१ |
| तरुण पिढी | १९३१ |
| प्रीति विवाह | १९३१ |
| मुलींचे कॉलेज | १९३३ |
| पुणेरी जोडा | १९३३ |

**विविध कर्तृत्व**

'मौज' पाक्षिकाचे संस्थापक, संपादक, 'निर्भिड'चे संपादक, जाहीरात जनार्दन म्हणून ख्याती, झुणका भाकर चळवळीचे आद्य प्रणेते.

**ना. रा. बामणगावकर**

| | |
|---|---|
| धनुर्भंग | १९१६ |
| आत्मतेज | १९२० |
| नामदार ए.एस्.एस्. | १९३३ |
| राष्ट्रध्वज | १९५७ |
| शिपाई | |

**गोविंदराव टेंबे**

| | |
|---|---|
| पट - वर्धन | १९२४ |
| वरवंचना | १९२५ |
| तुळशीदास | १९२८ |
| वत्सला-हरण | १९२९ |
| गंभीर घटना | १९३२ |
| वेषांतर | |
| कामाक्षी | |
| तारकाराणी | |

**संगीतिका**

महाश्वेता

जयदेव

**पुस्तके**

| | |
|---|---|
| माझा संगीत व्यासंग | १९३९ |
| माझा जीवन विहार | १९४८ |
| अल्लादियाखाँ यांचे चरित्र | |
| रंगाचार्य | |
| जीवन व्यासंग (भाग १) | |

**शं. प. जोशी**

| | |
|---|---|
| विचित्र लीला | १९१६ |
| मायेचा पूत | १९२१ |
| खडाष्टक | १९२७ |
| तो आणि ती | १९३९ |

**मामा वरेरकर**

| | |
|---|---|
| कुंजविहारी | १९०४ |
| वरवर्णिनी अथवा सति सावित्री | १९१४ |
| हाच मुलाचा बाप | १९१७ |
| संन्याशाचा संसार | १९२० |
| सत्तेचे गुलाम | १९२२ |
| तुरुंगाच्या दारात | १९२३ |
| लयाचा लय | १९२३ |
| नवा खेळ | १९२४ |
| करग्रहण | १९२७ |
| करीन ती पूर्व | १९२७ |
| पतित पावन | १९३१ |
| पापी पुण्य | १९३१ |
| संसार | १९३२ |
| सोन्याचा कळस | १९३२ |
| जागती ज्योत | १९३३ |
| नामा निराळा | १९३३ |
| सदा बंदिवान | १९३३ |
| स्वयंसेवक | १९३४ |
| समोरासमोर | १९३७ |
| कोरडी करामत | १९३९ |
| उडती पाखरे | १९४१ |
| सारस्वत | १९४२ |
| माझ्या कलेसाठी | १९४२ |
| चला लढाईवर | १९४४ |
| न मागता | १९४४ |
| सिंगापूरातून | १९४४ |
| सिंहगड | १९४५ |
| संन्याशाचे लग्न | १९४५ |
| जिवाशिवाची भेट | १९५० |
| दौलत जादा | १९५० |
| द्वारकेचा राजा | १९५२ |
| अ-पूर्व बंगाल | १९५३ |
| भूमिकन्या सीता | १९५५ |
| लंकेची पार्वती | १९५५ |
| संजीवनी | १९६० |
| धरणीधर (अप्रकाशित) | |
| त्याची घरवाली (अप्रकाशित) | |

**अनुवादित नाटके**

| | |
|---|---|
| चंद्रशेखर अथवा समर्थ भिकारी | १९३४ |
| तिलाच ते कळतं ! | १९५१ |
| ठाकुरांची नाटके | १९६२ |
| वनहंसी | १९६२ |
| खेळघर | १९६५ |

**एकांकिका**

| | |
|---|---|
| कडकलक्ष्मी | १९४४ |
| जागलेली आई | १९५० |
| बडे बापके बेटे | १९५० |
| नवा जमाना | |
| तीन एकांकिका | १९५० |
| वरेरकरांच्या एकांकिका:१ | १९६१ |
| वरेरकरांच्या एकांकिका:२ | १९६१ |
| वरेरकरांच्या एकांकिका:३ | १९६२ |

माझा नाटकी संसार भाग १ ते ५

मूकपटापासून बोलपटापर्यंत अनेक चित्रकथा

**विविध कर्तृत्व**

केवळ लेखनावर उपजिविका करणार पहिले साहित्यिक, मूक चित्रपटांचे लेखक, दिग्दर्शक, सर्वोदय कला मंडळाचे संस्थापक, राज्य सभेचे सदस्य, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**त्र्यं. सी. कारखानीस**

| | |
|---|---|
| राजाचे बंड | १९२४ |
| स्वैरीणी | १९४३ |

**प्र. के. अत्रे**

संगीत गुरुदक्षिणा १९३०
संगीत वीरवचन १९३२
प्रल्हाद (हस्तलिखित उपलब्ध नाही)
संगीत साष्टांग नमस्कार १९३३
संगीत घराबाहेर १९३४
संगीत भ्रमाचा भोपळा १९३५
संगीत उद्याचा संसार १९३६
संगीत लग्नाची बेडी १९३६
संगीत वंदेभारतम् १९३७
संगीत पराचा कावळा १९३८
संगीत मी उभा आहे १९३९
संगीत जग काय म्हणेल १९४६
संगीत पाणिग्रहण १९४६
एकच प्याला (विडंबन) १९५३
कवडीचुंबक १९५५
वसंतसेना १९५८
तो मी नव्हेच १९६२
मोरूची मावशी १९६३
बुवा तिथे बाया १९६४
मी मंत्री झालो १९६६
डॉक्टर लागू १९६७
संगीत प्रीतिसंगम १९६८
शिवसमर्थ १९६८
ब्रह्मचारी १९६९
अशी बायको हवी १९६९
सम्राट सिंह १९७३
'मराठी रंगभूमीचा वैभवशाली वारसा' अध्यक्षीय भाषण ३२ वे नाट्य संमेलन, मुंबई १९४१
मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरीक महोत्सव १९४४ स्वागताध्यक्षीय भाषण 'मराठी रंगभूमीची मदार हौशी मंडळावर'
सर्व नाटकांच्या लिहिलेल्या प्रस्तावना
'मी नाटककार कसा झालो' आत्मचरित्रातील प्रकरण.
कऱ्हेचे पाणी आत्मचरित्रातील नाट्य विषयक मजकूर.
**चित्रपटकथा - सतरा**

**विविध कर्तृत्व**
कै. विष्णुदास भावे गौरव पुरस्कार, नवयुग वाचनमाला, नवयुग साप्ताहिक, मराठा दैनिक, 'शामची आई' चित्रपटास पहिला राष्ट्रपती पुरस्कार, महात्मा फुले चित्रपटास रौप्यपदक, सभा जिंकणारे प्रभावी वक्ते, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**ना. वि. कुलकर्णी**

पार्थ प्रतिज्ञा १९१६
माईसाहेब १९१९
डाव जिंकला १९२२
संत कान्होपात्रा १९३१
मंगलभुवन १९३४
नवीन कल्पना १९४२
क्षमेची क्षमा
उदयप्रकाश
**चित्रपट कथा-तीन**

**माधवराव जोशी**

संगीत प्रेमगुंफा
संगीत पद्मिनी-विलास
प्रेमसागर
गद्य कर्णार्जुन
संगीत कृष्णार्जुन १९१०
संगीत कृष्णविजय १९१०
संगीत विनोद १९१४
संगीत मनोरंजन १९१६
गद्य करमणूक १९१७
संगीत आनंद १९२४
संगीत स्थानिक स्वराज्य १९२५
संगीत हास्यतरंग १९२७
संगीत वऱ्हाडचा पाटील १९२८
संगीत गिरणीवाला १९२९
संगीत पुनर्जन्म १९३१
संगीत वशीकरण १९३२
संगीत विश्ववैचित्र्य १९३२
संगीत पैसाच पैसा १९३५
संगीत प्रो. शहाणे १९३६
संगीत सत्त्वसाफल्य
संगीत प्रेमळ लफंगे १९३८
संगीत मोरांचा नाच १९३८
संगीत उधार उसनवार १९४६
संगीत नामधारी राजे १९५८
**अपूर्ण**
बोर्डिंग रोमान्स (भीमाताई)
राजा उदार झाला अथवा प्रांतिक स्वराज्य
**चित्रकथा** - चार
**विविध कर्तृत्व**
साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

**चिंतामणराव कोल्हटकर**

वेड्यांचा बाजार १९२३
राजसंन्यास
वरील दोन नाटके श्री. रा. ग. गडकरी यांनी अपूर्ण लिहिलेली श्री. कोल्हटकरांनी पूर्ण केली.
पूर्णावतार लेखन १९२४
प्रकाशन १९९०

**वि. दा. सावरकर**

उ:शाप १९२७
संन्यस्त खड्ग १९३१
उत्तरक्रिया १९३३
**विविध कर्तृत्व**
प्रखर देशभक्त, लेखक, स्वातंत्र्य संग्रामात दोन जन्मठेपींची शिक्षा, अस्पृश्यता निवारण, समाज सुधारक, तेजस्वी कवी, ओजस्वी वक्ते, अभिनव भारत संघटनेचे संस्थापक, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**न. ग. कमतनूरकर**

श्री १९२६
सज्जन १९३१
स्त्री-पुरुष १९३२
शस्त्रसंन्यास (अप्रकाशित)
चिरंजीव शारदा १९६६
**चित्रपट**
मराठ्याची मुलगी

**वि. स. खांडेकर**

सं. रंकाचे राज्य १९२८
स्वराज्याचे ताट (अप्रकाशित)
संगीत दुर्गा (अप्रकाशित)
शनि प्रभाव (अप्रकाशित)
शील शोधन (अप्र)
मोहन माळ (अ)
मृग लांच्छन (अ)

**चित्रपटकथा अकरा**

**विविध कर्तृत्व**

मराठीतील पहिल्या ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी, मराठीतील आद्य जीवनवादी लेखक, अनेक कथा कांदबऱ्या-लघुनिबंध, समीक्षांचे लेखक, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**वसंत शांताराम देसाई**

विधिलिखित १९२८
अमृतसिध्दी १९३३

**पुस्तके**

मखमलीचा पडदा १९४७
बालगंधर्व चरित्र

**अनंत काणेकर**

घरकूल १९२७
निशिकांताची नवरी १९३८
फास १९४३
पतंगाची दोरी १९५१
झुंज १९५४

**एकांकिका**

धूर आणि इतर एकांकिका १९४१
सांबर आणि इतर एकांकिका १९५१

**चित्रपट**

नीला
माणूस

**विविध कर्तृत्व**

विद्यार्थी प्रिय प्राध्यापक, 'चित्रा', 'आशा' या नव्या वळणाच्या साप्ताहिकांचे संस्थापक सर्वस्पर्शी वक्ते, प्रवास वर्णनांची अनेक पुस्तके, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**पु. भा. भावे**

विषकन्या १९४७
स्वामिनी १९५६
पडछाया १९५७
महाराणी पद्मिनी १९७१
सौभाग्य १९८४

**चित्रपट-तीन पटकथा**

**विविध कर्तृत्व**

शैलीदार लेखक, कथा-कांदबऱ्यांबरोबरच राजकीय लेखनाचे अग्रणी 'आदेश', 'सावधान'चे संपादक, ओघवती वक्तृत्व शैली, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**पु. ल. देशपांडे**

तुका म्हणे आता १९४८
अंमलदार १९५२
भाग्यवान १९५३
तुझे आहे तुजपाशी १९५७
सुंदर मी होणार १९५८
ती फुलराणी १९७५
पहिला राजा १९७६
तीन पैशांचा तमाशा १९७८
राजा ओदवियौस १९७९
एक झुंज वाऱ्याशी १९८८

**स. अ. शुक्ल**

सम्राट कोण १९२४
सिंहाचा छावा १९२७
सौभाग्य लक्ष्मी १९२७
स्वर्गावर स्वारी १९२८
साक्षात्कार १९३०
साध्वी मीराबाई १९३०
सत्याग्रही १९३३
चार चांदण्या १९४१
लोकसिंहासन १९४६
जनता अमर आहे १९५८
चंद्रावर मधुचंद्र १९६१
रंगतरंग (एकांकिका) १९६२
शिकलेले शहाणे (एकांकिका) १९६२
आम्ही एकशे पाच

**चित्रपट कथा**

धृव, भक्तीचा मळा
सुदाम्याचे पोहे वगैरे

**बालनाटिका**

जंगल्या भिल्ल १९४५
नवलनगरची राजकन्या १९४९
वीर अभिमन्यू
जयद्रथवध
बनला बैरागी राजा
नाटक - नाटक १९४९

**मो. ग. रांगणेकर**

आशीर्वाद १९४१
कुलवधू १९४२
नंदनवन १९४२
अलंकार १९४४
माझे घर १९४५
वहिनी १९४५
तीन एकांकिका १९४७
- तुझं माझं जमेना
- फरारी
- सतरा वर्षे

एक होता म्हातारा १९४८
कोणे एके काळी १९५०
आजचे संसार
माहेर १९५१
रंभा १९५२
जयजयकार १९५३
लिलाव १९५५
भटाला दिली ओसरी १९५६
धाकटी आई १९५६
भाग्योदय १९५७
अमृत १९५८
हिमालयाची बायको १९६२
पतित एकदा पतित का सदा १९६५

**चित्रपट- पाच**

**विविध कर्तृत्व**

गाजलेल्या मराठी नाटकांच्या ध्वनीमुद्रिकांचे प्रवर्तक, धडाडीचे

संपादक, 'अरुण', ' वसुंधरा' 'तुतारी' 'चित्रा' 'आशा' नियतकालिकांचे संपादक, 'नाट्य-निकेतन'चे मालक, निरनिराळे यशस्वी प्रयोग करून रंगभूमी गाजविली.

**ग. दि. माडगुळकर**

युध्दाच्या सावल्या १९४४
राम जोशी १९४७
पराजित
संगितिका सौभद्र
अनेक पटकथा, संवाद, गीते आणि
गीत रामायण

**विविध कर्तृत्व**

कै. विष्णुदास भावे पुरस्कार, विधान सभा सदस्य, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**वि. वा. शिरवाडकर**

दूरचे दिवे १९४६
दुसरा पेशवा १९४७
वैजयंती १९५०
कौंतेय १९५३
राजमुकुट १९५४
ऑथेल्लो १९६०
आमचं नाव बाबूराव १९६६
ययाती आणि देवयानी १९६६
वीज म्हणाली धरतीला १९७०
नटसम्राट १९७१
बेकेट १९७३
विदूषक १९७३
एक होती वाघीण १९७४
आनंद १९७६
मुख्य मंत्री .१९७७
चंद्र जिथे उगवत नाही १९८१
महंत १९८६
कैकयी १९८९

**विविध कर्तृत्व**

कविता संग्रह, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते, जनस्थान पुरस्कार व गोदावरी पुरस्काराचे प्रणेते, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**वसंत कानेटकर**

वेड्याचं घर उन्हातं १९५७
देवांचं मनोराज्य १९५८
प्रेमा तुझा रंग कसा १९६०
रायगडाला जेव्हा जाग येते १९६२
दोन धृवांवर दोघे आपण १९६३
मत्स्यगंधा १९६४
मोहिनी १९६४
अश्रूंची झाली फुले १९६५
लेकुरे उदंड झाली १९६५
इथे ओशाळला मृत्यू १९६८
तुझा तू वाढवी राजा १९६९
घरात फुलला पारिजात १९६९
मला काही सांगायचंय १९७०
मीरा मधुरा १९७१
हिमालयाची सावली १९७२
बेईमान १९७४
अखेरचा सवाल १९७४
गरूड झेप १९७४
नलदमयंती १९७५
विषवृक्षाची छाया १९७६
कस्तुरी मृग १९७६
माणसाला डंख मातीचा १९७७
गोष्ट जन्मांतरीची १९७८
एक रूप अनेक रंग १९७८
सूर्याची पिल्ले १९७८
गाठ आहे माझ्याशी १९८०
कधी तरी कुठे तरी १९८१
पंखांना ओढ पावलांची १९८१
छूमंतर १९८२
गगनभेदी १९८२
प्रेमाच्या गावा जावे १९८३
वादळ माणसाळतंय १९८४
मदनबाधा १९८६
सोनचाफा १९८६
जिथे गवताला भाले फुटतात १९८७
आकाश मिठी १९८८
सुख पाहता १९८९
रंग उमलत्या मनाचे १९८९
प्रिय आईस १९९१
फक्त एकच कारण १९९३
तू तर चाफेकळी १९९५
मास्तर एके मास्तर /अप्रकाशित

**एकांकिका - आठ**

**चित्रकथा - तीन**

**कांदबरी व अन्य साहित्य**

**विविध कर्तृत्व**

विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, कै. विष्णुदास भावे पुरस्कार प्राप्त, विविध विषयांवरची अनेक लोकप्रिय नाटके यशस्वी, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

**विद्याधर गोखले**

साक्षीदार १९६०
पंडितराज जगन्नाथ १९६०
सुवर्णतुला १९६०
मंदारमाला १९६३
बावनखणी १९६३
अमृत झाले जहराचे १९६५
मदनाची मंजिरी १९६५
जय जय गौरी शंकर १९६६
मेघमल्हार १९६७
चमकला धृवाचा तारा १९६९
स्वर साम्राज्ञी १९७२

**विविध कर्तृत्व**

